# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

एम. ए. भाग–२ : राज्यशास्त्र

# भारतीय राजकीय प्रक्रिया

## (Indian Political Process)

**सत्र ३ : पेपर DSC-6**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारित अभ्यासक्रम
शैक्षणिक वर्ष २०२३–२४ पासून

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)

**प्रथमावृत्ती :** २०२१

**सुधारित आवृत्ती :** २०२३

एम. ए. (राज्यशास्त्र) भाग-२ पेपर DSC-6

सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : ३००**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN- 978-93-92887-01-7

★ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

# दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ■ सल्लागार समिती ■


**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) प्रकाश पवार**
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. विद्याशंकर**
कुलगुरू, केएसओयू,
मुक्तगंगोत्री, म्हैसूर, कर्नाटक-५७० ००६

**डॉ. राजेंद्र कांकरिया**
जी-२/१२१, इंदिरा पार्क,
चिंचवडगांव, पुणे-४११ ०३३

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**डॉ. संजय रत्नपारखी**
डी-१६, शिक्षक वसाहत, विद्यानगरी, मुंबई विद्यापीठ,
सांताक्रुझ (पु.) मुंबई-४०० ०९८

**प्रा. (डॉ.) कविता ओझा**
संगणकशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) चेतन आवटी**
तंत्रज्ञान अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एस. देशमुख**
अधिष्ठाता, मानव्य विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) श्रीमती एस. एच. ठकार**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. ए. एन. जाधव**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्रीमती सुहासिनी सरदार पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. के. मोरे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


**■ अभ्यासमंडळ : राज्यशास्त्र ■**

अध्यक्ष - **डॉ. रविंद्र पांडुरंग भणगे**
राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. प्रकाश रामचंद्र पवार**
  राज्यशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. अरुण मारुतीराव चव्हाण**
  भोगावती महाविद्यालय, कुरुकली, जि. कोल्हापूर
- **डॉ. शिरीषकुमार धोंडिराम पवार**
  बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटन, ता. कराड,
  जि. सातारा
- **डॉ. सचिन महादेव पाटील**
  श्रीमती कुसुमताई राजारामबापू पाटील कन्या महाविद्यालय,
  उरूण-इस्लामपूर, जि. सांगली
- **डॉ. विक्रमराव एन. पाटील**
  शंकरराव जगताप जगताप आर्टस कॉलेज, वाघोली,
  जि. सातारा
- **डॉ. श्रीमती मेघा संजय पाटील**
  कै. मालती व. पाटील कन्या महाविद्यालय,
  उरूण-इस्लामपूर, जि. सांगली
- **डॉ. संतोष केशव खडसे**
  कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरूण-इस्लामपूर,
  ता. वाळवा, जि. सांगली
- **डॉ. श्रद्धा विनोद कोठावळे**
  सहकारभूषण मा. एस. के. पाटील कॉलेज, कुरुंदवाड,
  ता. शिरोळ, जि. कोल्हापूर
- **डॉ. राहुल दत्ता मांडणीकर**
  श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, २९६८, 'सी',
  दसरा चौक, कोल्हापूर
- **प्राचार्य डॉ. बाळ अनंत कांबळे**
  धनंजयराव गाडगीळ कॉलेज ऑफ कॉमर्स, सातारा
- **डॉ. वासंती प्रतापचंद्र रासम**
  घरोंदा ३८४/३८५ आर. के. नगर सोसायटी नं. ५,
  मोरेवाडी, कोल्हापूर
- **डॉ. अनिल देवगौडा पाटील**
  आर्टस, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज, गडहिंग्लज,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. सिकंदर आप्पासाहेब जमादार**
  राजहंस हौसिंग कार्पोरेशन प्लॉट नं. ०९, विजय नगर,
  इस्ट सांगली मिरज रोड, सांगली
- **डॉ. रमेश दिनकर डुबल**
  किसन वीर महाविद्यालय वाई, जि. सातारा

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठाने दूरशिक्षण केंद्राच्या माध्यमातून शिक्षणापासून व्यक्तिगत आणि भौतिक परिस्थितीने दूर गेलेल्या अनेकांना पुन्हा शिक्षण प्रवाहात येण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून दिली याचे संपूर्ण श्रेय विद्यापीठाला जाते. 'ज्ञानमेवामृतम्' या शिवाजी विद्यापीठाच्या ब्रीद वाक्याप्रमाणे ज्ञानरूपी अमृत प्राप्त करण्याची संधी सर्वांसाठी उपलब्ध करून दिली. याच दूरशिक्षण केंद्राद्वारे नोंद झालेल्या बहिःस्थ विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययन साहित्य उपलब्ध करून दिले आहे.

हे पुस्तक एम. ए. भाग दोन च्या राज्यशास्त्र विषयाच्या आवश्यक पेपर क्रमांक DSC-6 सत्र तीन साठी 'भारतीय राजकीय प्रक्रिया' हे विद्यार्थ्यांच्या हाती देताना आम्हाला विशेष आनंद होत आहे.

भारतीय राजकीय प्रक्रिया यामध्ये भारतातील राजकीय प्रक्रियेची ओळख, निवडणुकांचे राजकारण आणि पक्ष पद्धती, भारतीय राजकारणातील जात आणि वर्गसमूह, राजकीय अर्थकारण या घटकांचा विस्ताराने अभ्यास करणार आहोत.

या पुस्तक निर्मितीमध्ये शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. डी. टी. शिर्के यांची प्रेरणा व प्रोत्साहन आम्हाला मिळाले त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार. त्याचप्रमाणे राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार, राज्यशास्त्र अभ्यास मंडळाच्या माजी अध्यक्षा डॉ. भारती पाटील, राज्यशास्त्र विभागामधील प्राध्यापक डॉ. रविंद्र भणगे, माजी विभागप्रमुख प्रा. अशोक चौसाळकर, शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य, शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. शिरिष पवार व अधिसभा सदस्य डॉ. वसंत पाटील व सर्व लेखक यांचे सहकार्य लाभल्याबद्दल त्या सर्वांचे मी आभार मानतो.

वरील सर्वांइतकेच महत्त्वाचे म्हणजे दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे, केंद्रातील सर्व सहकारी विद्यापीठाचे सर्व पदाधिकारी यांचे सहकार्याबद्दल व तत्परतेबद्दल सर्वांचे मनःपूर्वक आभार.

**■ संपादक ■**

**डॉ. शिवाजी पाटील**
विभागप्रमुख, राज्यशास्त्र विभाग,
छत्रपती शिवाजी कॉलेज,
सातारा

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**भारतीय राजकीय प्रक्रिया**
**एम. ए. भाग–२ : राज्यशास्त्र पेपर** DSC-6

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखक | घटक क्रमांक |
|---|---|
| **डॉ. सूर्यकांत लक्कप्पा गायकवाड**<br>समन्वयक, विभागीय केंद्र सातारा,<br>दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | १ |
| **डॉ. आण्णासाहेब हरदारे**<br>शिवराज कॉलेज, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर | २ |
| **डॉ. अनिल पाटील**<br>ओंकार शिक्षण संस्थेचे, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,<br>गडहिंग्लज, जि. कोल्हापूर | ३ |
| **डॉ. श्रावण पाटील**<br>सहा. प्राध्यापक, राज्यशास्त्र अधिविभाग,<br>शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | ४ |

**■ संपादक ■**

**डॉ. शिवाजी पाटील**
विभागप्रमुख, राज्यशास्त्र विभाग,
छत्रपती शिवाजी कॉलेज,
सातारा

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| १. | भारतातील राजकीय प्रक्रियेची ओळख | १ |
| २. | निवडणुकांचे राजकारण आणि पक्ष पद्धती | २२ |
| ३. | भारतीय राजकारणातील जात आणि वर्गसमूह | ६५ |
| ४. | राजकीय अर्थकारण | ८२ |

■ **विद्यार्थ्यांना सूचना**

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२३-२४ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

घटक–१

# भारतातील राजकीय प्रक्रियेची ओळख

**अनुक्रमणिका**


१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१ भारतीय राजकीय प्रक्रिया–अर्थ आणि स्वरूप

१.२.२ भारतीय राजकीय प्रक्रियेच्या अभ्यासाचा आढावा– १९५० ते आजपर्यंत

१.२.३ राजकीय प्रक्रियेचे विश्लेषण– वैशिष्ट्ये आणि प्रारुपे

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१.५ सरावासाठी स्वाध्याय

१.६ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


## १.० उद्दिष्ट्ये

राज्यशास्त्राच्या अभ्यासामध्ये राजकीय प्रक्रिया ही एक उपशाखा म्हणून उदयास आलेली आहे. त्या अनुषंगाने या प्रकरणामध्ये राज्यशास्त्रातील राजकीय प्रक्रियासंबंधी चर्चा करणार आहोत. कारण राजकीय प्रक्रिया ही महत्वाची शाखा आहे, त्याचबरोबर भारतीय राजकीय प्रक्रियेसंदर्भात अनेक विचारवंतांनी अभ्यास केलेला आहे, त्याही अभ्यासाचा आढावा घेणार आहे. तसेच भारतीय राजकारणाचे जे प्रकार निर्माण झालेले आहेत. त्या सर्व प्रकाराची आणि वैशिष्ट्याची चर्चा केली आहे. एकूणच भारतीय राजकीय प्रक्रिया संदर्भातील सैद्धांतिक मांडणी करण्याचा प्रयत्न या प्रकरणात केला आहे. याबाबतची माहिती आपणास या प्रकरणामध्ये होणार आहे.

## १.१ प्रास्ताविक

भारताचे राजकारण हे व्यक्तीच्या सामाजिक जीवनाचा एक भाग आहे, म्हणून एखाद्या देशाची राजकीय पक्रिया समजून घेण्यासाठी त्या राजकीय प्रक्रियेच्या अवतीभवतीच्या सामाजिक, राजकीय वातावरणाचा विचार करावा लागतो. आपल्याला भारताच्या राजकीय प्रक्रियेचे आकलन करून

घ्यायचे असेल किंवा त्याचा अभ्यास करायचा असेल तर त्या देशातील सर्व राजकीय, सामाजिक घडामोडींचा अभ्यास करावा लागतो. कारण राजकीय प्रक्रिया ही व्यक्तीच्या सभोवतालच्या परिसराचा एक घटक आहे. त्या प्रक्रियेकडे कोणत्या दृष्टीकोनातून पाहतो, तसा त्या व्यक्तीचा प्रक्रियेशी संबंध येतो, म्हणून राजकीय प्रक्रिये समजून घेताना त्या समाजातील राजकीय वातावरणाचा अभ्यास करणे महत्त्वाचे ठरते.

मनुष्य हा जसा सामाजिक प्राणी आहे तसा तो राजकीय प्राणी आहे त्यामुळे प्रत्येक व्यक्तीला राजकीय प्रक्रियेबरोबर संबंध जोडावे लागतात. भारतीय राजकारणामधील राजकीय प्रक्रियेचा अभ्यास करताना भारतीय राज्यघटना, संस्था, संघटना, निवडणूक, सामाजिक चळवळी, राजकीय पक्ष, वर्ग, जात, आर्थिक धोरण इत्यादी गोष्टीचा विचार करावा लागतो. या प्रकरणामध्ये राजकीय प्रक्रियेचा अर्थ त्याचे स्वरूप, आजपर्यंत राजकीय प्रक्रियेसंबंधी झालेला अभ्यास, राजकीय प्रक्रियेची वैशिष्ट्ये आणि प्रारूपे इ. गोष्टीची चर्चा करणार आहोत.

## १.२ विषय विवेचन

राजकीय प्रक्रिया ही राज्यशास्त्राची उपशाखा आहे, त्याचा अभ्यास एकोणिसाव्या शतकातील उत्तरार्धाच्या काळात शास्त्रशुध्द आणि पध्दतशीर केला जाऊ लागला. आधुनिक राज्यशास्त्रामध्ये राजकारणाचा अभ्यास करण्यासाठी राजकीय प्रक्रिया ही संज्ञा वापरली जाते, त्याचा अर्थ व स्वरूपासंबंधी चर्चा खालीलप्रमाणे करता येईल.

### १.२.१ भारतीय राजकीय प्रक्रिया : अर्थ

राजकीय संस्था, संघटना आणि गट, व्यक्तीच्या वृत्ती यांच्यातील व्यवहाराचा राजकीय प्रक्रियेमध्ये समावेश होतो. म्हणजेच औपचारिक व अनौपचारिक राजकीय कर्त्या घटकांनी केलेल्या सर्व कृतीचा राजकीय प्रक्रियेमध्ये समावेश होतो. सुहास पळशीकर आणि राजेंद्र व्होरा यांनी संपादित केलेल्या राज्यशास्त्र कोशामध्ये सुहास पळशीकर यांनी राजकीय प्रक्रियेच्या संकल्पनेचा अर्थ स्पष्ट केला आहे. त्यांच्या मते, एखाद्या समाजातील राजकीय व्यवहारांचा राजकीय प्रक्रिया असा उल्लेख केला जातो. या शब्दप्रयोगात व्यक्तीनी केलेल्या सर्व राजकीय कृती अभिप्रेत असतात. त्या कृती सुट्ट्या, विस्कळीत नसून परस्परांशी संबंधित आणि राजकारणबाह्य घटकाद्वारे प्रभावित असतात हे 'प्रक्रिया' या शब्दाने सुचविले जाते, याशिवाय प्रक्रिया ह्या शब्दामुळे राजकीय कृतीचे निश्चित आणि दृश्य आकृतीबंध असतात व ते निरीक्षकाला स्पष्टपणे दिसून येतात असेही ध्वनित केले जाते. राजकारणाचा शास्त्रशुध्द आणि पध्दतशीर अभ्यास करण्यासाठी राजकीय प्रक्रिया हा शब्दप्रयोग वापरला जातो.

## ❑ व्याख्या

मेरीयम वेबस्टर डिक्शनरीनुसार राजकीय प्रक्रियेची व्याख्या अशी केली आहे की, ''राजकीय प्रक्रिया म्हणजे 'सामाजिक गट, राजकीय संस्था, राजकीय नेतृत्व आणि लोकमत यांच्या आंतरक्रियेमधून सार्वजनिक धोरणाची निर्मिती आणि त्याची अंमलबजावणी करणे तसेच प्रशासन चालविणे होय.''

एकूणच राजकीय प्रक्रिया म्हणजे राजकीय व्यवहार कृती संस्था, संघटना, सामाजिक चळवळी, नेतृत्व, जनमत, आंदोलन, दबावगट इत्यादी घटकाचा अभ्यास करणे होय. इंग्लिश विकीपिडीया नुसार असे म्हटले आहे की. राजकीय संधी सिध्दात हा राजकीय प्रक्रिया या नावाने ओळखला जातो. यानुसार राजकीय प्रक्रिया हा दृष्टीकोन सामाजिक चळवळीशी निगडीत आहे. सामाजिक चळवळीचे यश किंवा अपयश हे राजकीय संधी मिळण्यावर अवलंबून आहे. म्हणजे सामाजिक चळवळीतून राजकीय संधी मिळून ते पुढे नेतृत्व प्रस्थापित केले जाते. अशा नेतृत्वाचा किंवा चळवळीचा राजकीय प्रक्रियेमध्ये समावेश होतो. काही सामाजिक चळवळी निर्माण झाल्या परंतु त्याचा राजकीय पटलावर प्रभाव निर्माण होवू शकला नाही. अशा चळवळीचा राजकीय प्रक्रियेत अभ्यास फारसा केला जात नाही त्यामुळे राजकीय प्रक्रियेचा संबंध राजकीय संधी मिळण्याशी जोडला गेला आहे. त्यामुळे सर्वसाधारणपणे असे म्हणता येईल की, राजकीय प्रक्रियेचा अर्थ म्हणजेच सर्व राजकीय कृतीचा, व्यवहाराचा अभ्यास होय असे म्हणता येईल.

## ❑ भारतीय राजकीय प्रक्रिया-स्वरूप

भारतीय राजकीय व्यवस्थेमध्ये येणाऱ्या संस्थाच्या प्रक्रियांच्यामध्ये अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. सार्वजनिक व राजकीय जीवनात निर्माण झालेला भ्रष्टाचार, धर्मांधता व हिंसेद्वारा प्रश्न सोडवण्यावर भर देणारे राजकीय व सामाजिक वर्तन, सर्वसामान्य जनतेमध्ये वाढत जाणारी हतबलता इत्यादी अनेक समस्या भारतीय समाजामध्ये निर्माण झाल्या आहेत. भारत हा राष्ट्र, राज्य म्हणून १९४७ साली अस्तित्वात आला. परंतु त्यावर एकोणिसाव्या शतकातील झालेल्या राजकीय प्रक्रियेचा परिणाम होता. राष्ट्र राज्याच्या निर्मितीच्या काळातही भारतामध्ये अनेक राजकीय व सामाजिक शक्ती, संस्था, गट तसेच अनेक राजकीय प्रवाह अस्तित्वात होते. भारताच्या स्वातंत्र्यानंतरच्या काळामध्ये दलित, आदिवासी, इतर मागासवर्ग, अल्पसंख्यांक गट, स्त्रिया, गरीब इत्यादी गट हे राजकीय व्यवहारात सहभागी झाले. कारण या सामाजिक गटामध्ये नव्याने आत्मभान जागृत झाल्यामुळे राजकीय प्रक्रियेत योग्य तो वाटा मिळविण्यासाठी विविध स्थानिक पक्षांमार्फत संघटित होऊ लागले. अशा सर्व गोष्टींचा राजकीय प्रक्रियेमध्ये सहभाग होत गेला. कारण मध्यम जाती, दलित, स्त्रिया इत्यादी घटक हे दिर्घकाळ राजकीय प्रक्रियेच्या परिघावर होते आणि १९६७ नंतरच्या बदलत्या परिस्थितीनुसार राजकीय प्रक्रियेतील सहभाग वाढत राहिला व मंडल आयोगाच्या शिफारशी अंमलात आल्यानंतर या घटकांकडे काही राज्यातील सत्तासूत्रे गेल्याचे दिसते. ही राजकीय प्रक्रिया बहुजन

राजकारणाच्या जोरदार प्रवाहाच्या प्रस्थापनेची होती असे निरीक्षण राजकीय विश्लेषक प्रा. योगेंद्र यादव यांनी नोंदवले आहे. यादव यांच्या मते, सामाजिकदृष्ट्या अप्रतिष्ठित वा दुर्बल मानल्या जाणाऱ्या मग ते जातीच्या उतरंडीत असोत, आर्थिकदृष्ट्या असोत, स्त्री-पुरुष भेदभावापायी असोत वा शहरी ग्रामीण विभागणीतून असोत, समूहात राजकीय प्रक्रियेत सहभागी होण्याची उर्मी उफाळून आल्यासारखी वाटते. राजकीय सहभागाच्या बाबतीत पुढारलेल्या समाजगटाच्या तुलनेत पूर्वी ते जसे मागे होते तसे ते आता राहिलेले नाहीत किंबहुना काही बाबतीत ते अधिक सक्रिय झालेले दिसतात. आधुनिक सामाजिकशास्त्रातील 'बहुजन' ही संकल्पना या समाजगटाचे समर्पक वर्णन करते. आज बहुजन या शब्दप्रयोगात दलित, आदिवासी, इतर मागासवर्ग आणि सर्व अल्पसंख्यांक गट यांचा समावेश होतो. अशाप्रकारे भारतीय राजकीय प्रक्रियेमध्ये अनेक नवीन सामाजिकदृष्ट्या वंचित अशा सर्व समाज गटाचा समावेश झाला, त्यामुळे भारतीय राजकीय प्रक्रियेचे स्वरूप हे सातत्याने बदलत असलेले दिसून येते. भारतीय राजकीय प्रक्रियेमध्ये बिगर संसदीय चळवळी कार्यरत होत्या. या चळवळी बदलत्या राजकीय प्रक्रियेमुळे संपुष्टात आल्या. त्यापैकी अनेक गट सोईसाठी राजकीय पक्षात सामील झाले व जे राहिले त्यांचे एनजीओ तयार झाले. भारतीय राजकीय व्यवस्थेमध्ये सहभागी होण्याची संधी १९७५ नंतर स्वयंसेवी संस्थाना नव्याने मिळू लागली. लोकसंख्या नियंत्रण, विकास प्रक्रिया, आरोग्य शासकीय योजनांची अंमलबजावणी, शिक्षण, पाण्याचा प्रश्न, पर्यावरणाचे प्रश्न इत्यादी क्षेत्रात या स्वयंसेवी संस्था आज कार्यरत आहेत. परंतु या संस्था राजकीय कार्यात न राहिल्यामुळे तसेच या गटांनी हाताळणारे लोकांचे प्रश्न मर्यादित असल्यामुळे त्याचा परिणाम म्हणून भारतीय राजकीय व्यवस्थेवर प्रभाव पाडणारी राजकीय शक्ती निर्माण झाली नाही. त्यामुळे राजकीय प्रक्रियेला आव्हान देणारी क्षमता त्याच्यामध्ये निर्माण झाली नाही. परंतु स्वयंसेवी संस्थाचे कार्य महत्त्वाचे आहे. या सर्व गोष्टींचा राजकीय प्रक्रियेच्या स्वरूपावर मात्र प्रभाव दिसून येते. खालील मुद्द्याच्या आधारे राजकीय प्रक्रियेच्या स्वरूपाची चर्चा करता येईल.

### १. राजकीय व्यवहार म्हणजेच राजकीय प्रक्रिया :-

एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वी राजकीय प्रक्रिया म्हणजे राजकीय व्यवहार म्हणून ओळखले जात होते. त्यामध्ये प्रामुख्याने राज्यातील राजकीय व्यवहाराबाबतच्या घडामोडी समाविष्ट होतात. हा राजकीय व्यवहार कसा आहे यापेक्षा कसा असावा, त्याची उद्दिष्ट्ये कोणती असावीत असा आदर्शवादी दृष्टीकोन मांडला गेला. परंतु एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धामध्ये राजकीय व्यवहार काय आहे, त्यात निर्माण झालेले विविध अर्थ या राजकीय प्रक्रिया म्हणून समजले गेले. एकूणच राजकीय प्रक्रिया म्हणजे राजकीय व्यवहार होय. या राजकीय व्यवहारामध्ये सर्व राजकीय कृतीचा समावेश होतो.

## २. राजकीय व्यवस्था म्हणजेच राजकीय प्रक्रिया :–

राजकीय प्रक्रियेमध्ये राजकीय व्यवस्था असतात, त्यामध्ये राज्यघटना, शासनसंस्था, राजकीय पक्ष व चळवळी, प्रशासकीय व्यवस्था इत्यादी घटकांचा समावेश होतो. राजकीय प्रक्रिया ही या व्यवस्थेद्वारे कार्यरत असते. राज्यामध्ये ज्या संस्था आहेत त्या सामाजिक दृष्टीकोनातून कार्य करीत असतात, परंतु त्या राजकीय अर्थकारण आणि राजकीय समाजशास्त्राच्या आधारावर निर्माण झालेल्या असतात. त्यामुळे राजकीय समाजशास्त्र, राजकीय अर्थकारण व राजकीय चळवळी या विषयांना स्वतंत्र विद्याशाखा न मानता त्याचा राजकीय प्रक्रियेमध्येच समाविष्ट केला जातो. यामुळे राजकीय प्रक्रिया हे एका अर्थाने समाजशास्त्रीय स्वरूपाचा असते. त्यामध्ये अनेक राजकीय व्यवस्था कार्यरत असतात.

## ३. बिगर संस्थात्मक घटक म्हणजेच राजकीय प्रक्रिया :–

राज्यव्यवस्थेमध्ये बिगर संस्थात्मक घटक कार्यरत असतात. त्यामध्ये दबावगट, नेतृत्व, स्वयंसेवी संस्था, हितसंबंधी गट, कामगार संघटना, शेतकरी संघटना इत्यादी घटकाचा समावेश होतो. या सर्व बिगर संस्थात्मक घटकांनी ज्या कृती केलेल्या आहेत त्या सर्व कृती राजकीय प्रक्रियेमध्ये समाविष्ट होतात. या बिगर संस्थात्मक घटक हे राजकारणामध्ये अनेक नवे वळण देतात त्यामुळे बिगर संस्थात्मक घटकाच्या स्वरूपामध्ये राजकीय प्रक्रिया कार्यरत असते.

## ४. सार्वजनिक धोरण म्हणजेच राजकीय प्रक्रिया :–

भारतामध्ये अथवा इतर देशामधील जनतेच्या हितासाठी अनेक योजना निर्माण केल्या जातात. या योजना सार्वजनिक धोरण म्हणून राबविल्या जातात. तर ते धोरण निर्माण करण्यासाठी समाजातील अनेक घटक प्रभाव टाकीत असतात. हे सार्वजनिक धोरण निश्चित झाल्यानंतर त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी एक शासनयंत्रणा कार्यरत असते. या यंत्रणांनी केलेली सर्व कृती, सार्वजनिक धोरण निर्माण करण्यासाठी प्रभाव टाकणारे घटक हे राजकीय प्रक्रियेचे भाग म्हणून कार्यरत असतात.

## ५. संकल्पना, सिध्दांत आणि विचारप्रणाली म्हणजेच राजकीय प्रक्रिया :–

प्रत्येक देशाची विचारप्रणाली असते किंवा काही देशामध्ये अनेक विचारप्रणाली कार्यरत असतात. भारतामध्ये मार्क्सवादी, राष्ट्रवादी, लोकशाही, भांडवलवादी इत्यादी विचारसरणी आहेत. तसेच राजकीय प्रक्रियेमध्ये अनेक संकल्पना निर्माण झालेल्या असतात. अनेक सिध्दांत प्रस्थापित केलेले असतात या सर्व संकल्पना सिध्दांत आणि विचारप्रणाली या राजकीय प्रक्रियेत समाविष्ट झालेल्या असतात.

### ६. धर्म, भाषा व संस्कृतीचा समावेश राजकीय प्रक्रियेमध्ये असतो :-

राज्यामध्ये अनेक धर्म असतात. भाषिक समूहामध्ये आपले अस्तित्व, आत्मभान निर्माण झालेले असते. त्याची एक स्वतंत्र संस्कृती असते. या धर्माधारीत अनेक कृती होतात. भाषिक समूह आपल्या अस्तित्वासाठी आपल्या हितासाठी अनेक चळवळी, आंदोलने करतात आणि त्यांच्या संस्कृतीचा विकास करण्यासाठी अनेक कार्य करतात. या सर्व गोष्टींचा समावेश राजकीय प्रक्रियेमध्ये झालेला असतो.

### ७. नेतृत्वाची भूमिका म्हणजे राजकीय प्रक्रिया :-

भारतीय राजकारणामध्ये अनेक नेतृत्वे निर्माण झाली आहेत. त्यामध्ये गोखले, रानडे, महात्मा फुले, टिळक, नेहरू, गांधी, आंबेडकर, इंदिरा गांधी, व्ही.पी.सिंग, राजीव गांधी, मनमोहनसिंग, नरेंद्र मोदी इत्यादी अनेक नेतृत्वे उदयास आलेली आहेत. या नेतृत्वानी भारतीय राजकीय प्रक्रियेवरती आपला प्रभाव प्रस्थापित केला आहे. या सर्व नेतृत्वांनी केलेल्या अनेक राजकीय कृती, निर्णय, योजना, चळवळी इत्यादींचा राजकीय प्रक्रियेमध्ये समाविष्ट होतो. त्यामुळे नेतृत्वाची भूमिका हा राजकीय प्रक्रियेचा भाग बनला आहे.

### ८. ग्रामीण व शहरी जनतेची भूमिका म्हणजे राजकीय प्रक्रिया :-

भारतातील ७० टक्के जनता ग्रामीण भागात राहते. ग्रामीण भागातील जनतेला शेती, साखर कारखाने, कृषी आधारित उद्योग व्यवसाय निर्माण करणे आवश्यक असते, त्यातून त्यांचा आर्थिक आणि राजकीय सहभाग निर्माण होतो. तर शहरातील लोकांना वीज, पाणी पुरवठा, आरोग्य सुविधा इत्यादी गोष्टींसाठी आंदोलने, निवेदने द्यावी लागतात. या सर्व कृतीचा समावेश राजकीय प्रक्रियेमध्ये होतो. जनतेच्या प्रत्येक राजकीय भूमिकेला ही राजकीय प्रक्रियेचे स्वरूप असते.

अशाप्रकारे भारताच्या राजकीय प्रक्रीयेचे स्वरूप स्पष्ट करता येते. राजकीय प्रक्रीया ही केवळ एका घटकाद्वारे कार्यरत राहत नाही तर त्यामध्ये शासन संस्था, राजकीय पक्ष, दबावगट हितसंबंधी गट, राजकीय अभिजन, राजकीय संस्कृती, जात, धर्म, भाषिक समूह, राजकीय संकल्पना, सिध्दांत, विचारप्रणाली, सार्वजनिक धोरण इत्यादी अनेक घटकांच्या आंतरक्रियेमधून राजकीय प्रक्रिया विकसित होते. ही राजकीय प्रक्रिया कालांतराने बदलतही जाते, त्याचे स्वरूपही बदलते. सुरवातीच्या काळामध्ये राजकीय व्यवहाराचा समावेश असलेली प्रक्रिया ही नंतरच्या काळामध्ये मोठ्या प्रमाणात अनेक नव्या घटकाचा, नव्या चळवळीचा, नव्या संस्थांच्या कृतीचा समावेश करून घेतली आहे.

## १.२.२ भारतीय राजकीय प्रक्रियेच्या अभ्यासाचा आढावा (१९५० ते आजपर्यंत)

भारतामध्ये राजकीय प्रक्रियेच्या अनुषंगाने अभ्यास करण्याची परंपरा फार मोठी आहे. परंतु

आपण काही महत्त्वाच्या अभ्यासकाचा आढावा घेणार आहे. प्रामुख्याने यामध्ये काही पाश्चिमात्य देशातील अभ्यासकांनी भारतीय राजकारणासंबंधी अभ्यास केलेला आहे. त्यात सेलीग हॅरीसन, मोरीस जोन्स, ग्रॅनव्हिले ऑस्टिन, रूडाल्फ आणि रूडाल्फ पॉल ब्रास इत्यादी अनेक अभ्यासकांनी भारतीय राजकीय प्रक्रीयेचा अभ्यास केला आहे. भारतीय राजकीय प्रक्रियेच्या अभ्यासाचा आढावा घेताना प्रामुख्याने चार टप्पे करावे लागतात.

### अ) १९५० ते १९६७ :-

या काळामध्ये भारतीय राजकीय प्रक्रियेचा अभ्यास हा केवळ राज्यघटनेची निर्मिती, संसदीय व्यवस्था, काँग्रेस पक्ष, निवडणूक, शासनसंस्था इत्यादी घटकाचा अभ्यास केलेला दिसून येतो. कारण भारत स्वतंत्र झाल्यानंतर भारताने संस्थात्मक रचनेवर भर दिला. भारतीय राज्यघटनेची निर्मिती झाली त्याचबरोबर संसदीय व्यवस्था असल्यामुळे सार्वत्रिक निवडणूका, त्याचबरोबर संघराज्य व्यवस्था स्विकारल्यामुळे घटकराज्यांची निर्मिती, त्यासाठी झालेली आंदोलने इत्यादी गोष्टींचा अभ्यास या काळामध्ये करण्यात आला आहे. त्याबरोबर काँग्रेस पक्षाचे वर्चस्व इत्यादी संबंधीचा अभ्यास करण्यात आला. या काळातील काही महत्त्वाची पुस्तके खालीलप्रमाणे आहेत.

१. **सेलींग हॅरीसन** यांनी *'इंडिया द मोस्ट डेंजरस डीकेडस्'* हे पुस्तक १९६० साली लिहिले. या पुस्तकामध्ये स्वातंत्र्यानंतरच्या काळातील जे भारतासमोर जे प्रश्न निर्माण झालेले होते, त्या सर्व गोष्टीची चर्चा करण्यात आली आहे. त्यामध्ये प्रामुख्याने वेगवेगळ्या राज्यातील भाषा प्रश्न, १९४६, १९५२, १९५५ च्या निवडणूका, जात-वर्ग केंद्रीत सत्तासमतोल इत्यादी अनेक घटकांवर चर्चा करण्यात आली आहे.

२. **मॉरीस जोन्स** यांनी *'द गव्हर्नमेंट अॅन्ड पॉलीटीक्स ऑफ इंडिया'* हे पुस्तक १९६४ साली लिहिले गेले. या पुस्तकामध्ये राजकारण आणि समाज, १९४७ च्या काळातील काही घटना, नियोजन आयोग, काँग्रेस पक्षाचा उदय, राजकीय संस्था आणि राज्यघटना इत्यादी घटकाचा अभ्यास केलेला आहे.

३. **ग्रॅनव्हिले ऑस्टीन** यांचे *'द इंडियन कॉन्स्टीट्युशन कॉर्नर स्टोन ऑफ अ नेशन'* हे पुस्तक १९६६ साली प्रकाशित झाले. यामध्ये राज्यघटनेसंदर्भात चर्चा केली आहे. प्रामुख्याने घटना परिषदेपासून घटना तयार होईपर्यंतच्या प्रत्येक घटनाचा आढावा यामध्ये घेतला आहे.

४. **मायरन विनर** यांनी *'पार्टी पॉलीटीक्स इन इंडिया-द डेव्हलपमेंट ऑफ अ मल्टीपार्टी सिस्टीम'* हे पुस्तक १९५७ साली प्रकाशित केले आहे. या पुस्तकामध्ये भारतातील राजकीय पक्षाचा विकास, प्रजा सोशालिस्ट पार्टी, किसान मजदूर प्रजा पार्टी, मार्क्सिस्ट लेफ्ट पार्टी, हिंदू जमातवादाची पार्श्वभूमी, जनसंघ, हिंदू-महासभा, बहुपक्ष पध्दतीचा विकास इत्यादी घटकाचा अभ्यास केला आहे.

**५. मायरन विनर** यांनी *'इंडिया पॉलिटिक्स ऑफ स्कारसिटी : पब्लिक प्रेशर अॅण्ड पॉलिटिकल रिस्पॉन्स इन इंडिया'* हे पुस्तक १९६२ साली प्रकाशित केले आहे. या पुस्तकामध्ये नऊ प्रकरणे असून पहिल्या व दुसऱ्या प्रकरणामध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने ब्रिटीशांविरुध्द लढलेल्या नेत्याची आणि त्यांनी घेतलेल्या निर्णयाचा आढावा घेतलेला आहे. तिसऱ्या ते आठव्या प्रकरणामध्ये वेगवेगळ्या हितसंबंधी गटांनी त्यामध्ये कम्युनिटी असोसिएशन्स, ट्रेड युनियन्स, व्यापारी संघटन, शेतकरी संघटना, विद्यार्थी इतयादी गटांनी वगवेगळ्या पध्दतीने केसलेल्या चळवळीचा आणि मागण्यांचा आढावा घेतला आहे.

**६. रूडॉल्फ आणि रूडॉल्फ** याने *'द मॉर्डनिटी ऑफ ट्रेडीशन्स'* हे पुस्तक १९६७ साली लिहिले आहे. या पुस्तकामध्ये आधुनिकीकरण आणि पारंपारिक यांच्या अर्थासंबंधी बदल सांगण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने तीन घटकाचा विचार केला आहे. सामाजिक स्तरीकरण, वलयांकित नेतृत्व आणि कायदा याची चर्चा केली आहे.

**ब) १९६७ ते १९९० :–**

या काळामध्ये अभ्यासकांनी भारतीय राजकारणातील पक्षीय राजकारण, ओबीसी राजकारण, जातीचे वर्चस्व, राज्याचे राजकारण, सहकार चळवळ, सामाजिक स्तरीकरण, निवडणूका जातींची राजकारणातील भूमिका, वर्गाची राजकारणातील भूमिका इत्यादी घटकाचा अभ्यास केला आहे. १९६७ च्या निवडणूकीत काँग्रेसचा राज्यामधील प्रभाव कमी होऊन काँग्रेसव्यतिरिक्त पक्षाचे सरकार स्थापन झाले. प्रादेशिक पक्षांचे महत्त्व वाढू लागले, त्याचबरोबर अनेक राज्यामध्ये वांशिक, धार्मिक, सांस्कृतिक अस्मितेचे राजकारण सुरू झाले होते. १९८० नंतर प्रादेशिक राजकारण, राष्ट्रवाद, संघराज्य व्यवस्था, विकासाचा समतोल, राजकीय केंद्रीकरण इत्यादी मुद्दयावर प्रभावी ठरले. मंडल आयोगाच्या शिफारशीवरून निर्माण झालेले राजकारणामुळे राज्य हा राजकारणाचा केंद्रबिंदू बनण्याच्या प्रक्रियेला गती प्राप्त झाली. त्यामुळे मध्यमजाती या राजकारणाच्या रंगमंचावर यायला सुरूवात झाली. एकूण राजकीय प्रक्रियेमध्ये जात–धर्म, भाषा इत्यादीची भूमिका महत्त्वाची राहिली आहे. त्याचबरोबर राज्याचा अभ्यास करण्यासाठी महत्त्वाचे स्थान मिळाले. त्यामुळे सुरुवातीच्या काळातील फक्त शासनसंस्थेच्या रचनेसंदर्भात होणाऱ्या अभ्यासामध्ये बदल होऊन कार्यात्मक दृष्टीकोनातून अभ्यासासाठी चालना मिळाली, त्यासंदर्भात काही पुस्तकाचा आढावा पुढीलप्रमाणे घेतला आहे.

**१. मायरन विनर** यांचे *'स्टेट पॉलीटिक्स इन इंडिया'* हे पुस्तक १९६८ साली प्रकाशित करण्यात आले आहे. यामध्ये भारतीय घटक राज्यातील राजकीय विकासासंबंधी चर्चा करण्यात आली आहे, त्याचबरोबर उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, जम्मू आणि काश्मीर, पश्चिम बंगाल, राजस्थान, आंध्र प्रदेश आणि पंजाब इत्यादी राज्यातील निवडणूकांचे विश्लेषण करण्यात आले आहे, तसेच

प्रादेशिक पातळीवरील जात, धर्म, सामाजिक स्तरीकरण इत्यादी विषयासंदर्भात आढावा घेण्यात आला आहे.

२. **इक्बाल नारायण** यांनी *'स्टेट पॉलीटीक्स इन इंडिया'* हे पुस्तक १९७६ साली संपादित केले असून अनेक राज्याच्या राजकारणाचा अभ्यास केला आहे. या पुस्तकामध्ये वेगवेगळ्या लेखकांनी त्यांच्या राज्यामधील वेगवेगळ्या पक्षाची भूमिका आघाडी सरकारामधील कार्य इत्यादी घटकांचा अभ्यास केला आहे.

३. **इक्बाल नारायण** यांचा *'इलेक्शन स्टडीज इन इंडिया ऑन इव्यालूशन्स'* हा रिपोर्ट १९७८ साली प्रकाशित झाला. यामध्ये प्रामुख्याने १९७७ च्या निवडणूकीचे विश्लेषण करण्यात आले आहे. त्यामध्ये मतदाराचे वर्तन आणि निवडणूकांच्या राजकारणाचा अभ्यास केला आहे.

४. **रजनी कोठारी** यांनी *'पॉलीटीक्स इन इंडिया (१९७०), कास्ट इन इंडियन पॉलीटिक्स (१९७३)'* ही दोन पुस्तके लिहिली आहेत. प्रामुख्याने पहिल्या पुस्तकामध्ये काँग्रेस व्यवस्था या संदर्भात चर्चा केली आहे, तर भारतीय राजकारणातील जातीची भूमिका यासंदर्भात दुसऱ्या पुस्तकामध्ये मांडणी केली आहे.

५. **रजनी कोठारी** यांनी *'स्टेट अॅन्ड नेशन बिल्डींग अ थर्ड वर्ल्ड परस्पेक्टीव'* हे पुस्तक १९७६ साली संपादित केले आहे. सिंगापूर येथे १९७१ साली आशियन अभ्यास बैठक आयोजित केली होती. तेथे त्यांनी मांडलेल्या शोधनिबंधाचे पुस्तकरूपाने प्रकाशन करण्यात आले, यामध्ये प्रामुख्याने नव्याने स्थापन झालेल्या विकसनशील देशातील शासन राजकारण्यासंदर्भात चर्चा करण्यात आली आहे.

६. **फ्रान्सीस फ्रॅंकेल** व **एम.एस.ए.राव** यांनी *'डॉमीनन्स अॅन्ड स्टेट पॉवर इन मॉडर्न इंडिया (१९८९-९०)'* या पुस्तकाचे दोन खंड संपादित केले आहे. या दोन्ही खंडामध्ये राज्यशास्त्र, समाजशास्त्र इतिहासाचे अभ्यासकांनी भारतीय वसाहतीच्या काळापासून १९८० च्या दशकाच्या मध्यापर्यंतच्या काळातील वैचारिक आणि संरचनात्मक बदलाचे विश्लेषण करण्यासाठी समान संकल्पना स्वीकारलेल्या आहेत. यामध्ये प्रामुख्याने समाज राज्य यांच्यातील संबंधाचा अभ्यास केला आहे. म्हणजेच समाजातील जात-वर्ग-वांशिक राज्यातील संस्थानवरील प्रभावाची चर्चा केली आहे.

७. **पॉल ब्रास** यांनी *'कास्ट, फॅक्शन अॅण्ड पार्टी इन इंडियन पॉलीटिक्स'* या पुस्तकाचे दोन खंड प्रकाशित करण्यात आले आहे. त्यामध्ये पहिल्या खंडात जात, पक्षासंबंधी चर्चा केली आहे, तर दुसऱ्या खंडात निवडणूकीविषयीचा अभ्यास करण्यात आला आहे.

**क) १९९० ते २०१४ :-**

या काळामध्ये अनेक चळवळी उदयास आल्या आहेत. प्रामुख्याने मंडल आयोगाच्या शिफारशीवरून निर्माण झालेले ओबीसी आंदोलन, शेतकरी चळवळ, नर्मदा बचाव आंदोलन, पर्यावरण चळवळ, दलितमुक्ती चळवळ, स्त्रीवादी चळवळ, कामगार चळवळ इत्यादी चळवळींनी या भारतीय राजकीय प्रक्रियेवरती प्रभाव पाडला आहे. तसेच भारतीय राजकारणामध्ये हिंदुत्व चळवळ, रामजन्मभूमीसाठीची चळवळ, अर्थकारणासंदर्भातील जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरण, त्याचबरोबर (उडऊह) च्या माध्यमात निवडणूकीचे विश्लेषण इत्यादी घटकाचा अभ्यास राजकीय प्रक्रियेमध्ये केला आहे. त्यातील प्रमुख पुस्तकाची चर्चा पुढीलप्रमाणे करता येते.

**१. पार्थ चटर्जी** यांनी *'स्टेट अ‍ॅण्ड पॉलीटिक्स इन इंडिया'* हे पुस्तक १९९७ साली संपादित केलेले पुस्तक प्रकाशित झाले. यामध्ये प्रामुख्याने संस्थात्मक दृष्टीकोनातून अभ्यास केलेले लेख समाविष्ट करण्यात आले आहेत. तसेच राज्याच्या निवडणूकीसंदर्भात चर्चा करण्यात आली आहे. राजकीय प्रक्रियेच्या संदर्भामध्ये प्रभाव आणि प्रतिकाराच्या अनुषंगाने दलित जाती, अल्पसंख्यांक, महिला इत्यादीच्या संघर्षाची चर्चा या पुस्तकामध्ये करण्यात आली आहे.

**२. मीनू रॉय** यांनी *'इलेक्शन पॉलीटीक्स इन इंडिया'* हे पुस्तक २००० साली प्रकाशित केले आहे. यामध्ये प्रामुख्याने निवडणूका, मतदारांचे वर्तन, जातीय राजकारण, प्रादेशिक प्रभाव इत्यादी घटकाची चर्चा करण्यात आली आहे, त्याचबरोबर वाजपेयी सरकारचे गुण-दोष, भारतातील निवडणूकीचे राजकारण आणि पक्षाचे जाहीरनामा याचा आढावा घेतला आहे.

**३. झोया हसन** यांनी *'पार्टीज अ‍ॅन्ड पार्टी पॉलीटिक्स इन इंडिया'* हे पुस्तक २००२ साली संपादित करण्यात केले आहे. यामध्ये भारतातील महत्त्वाच्या राजकीय पक्षांचा अभ्यास केला आहे, त्याचबरोबर भारतातील पक्षपध्दतीच्या स्वरूपासंबंधी चर्चा करण्यात आली आहे.

**४. ग्रॅनव्हिले ऑस्टीन** यांनी *'वर्कींग अ डेमॉक्रेटीक कॉन्स्टीट्युशन अ हिस्ट्री ऑफ दि इंडीयन इक्सपीरीयन्स'* हे पुस्तक २००३ साली लिहिले आहे. या पुस्तकामध्ये भारत स्वतंत्र झाल्यानंतरच्या पहिल्या चार दशकातील, भारतीय राज्यघटनेचा अनुभव टिकात्मकरित्या मांडला आहे. स्वातंत्र्याला पासून ते आणीबाणीच्या काळापर्यंतच्या विचारसरणीची चर्चा केली आहे. त्यानंतर १९९० पर्यंतच्या राजकारणाचीही कायदेशीर व राजकीय प्रश्नाची सोडवणूक भारतीय राज्यघटनेनी कशी केली आहे याची मांडणी केली आहे.

**५. व्होरा राजेंद्र** व **सुहास पळशीकर** यांनी *'भारतीय लोकशाही : अर्थ आणि व्यवहार'* हे पुस्तक २००४ साली संपादित केले आहे. या पुस्तकामध्ये वेगवेगळ्या लेखकांचे सोळा लेख असून त्यामध्ये पहिल्या भागात भारतीय लोकशाही पुढील आव्हाने, सिध्दान्त, राजकारण इत्यादी घटकावरील

लेख समाविष्ट केले आहेत. दुसऱ्या भागामध्ये धर्मनिरपेक्षता, दलित राजकारण, जातीय बहुसंख्यांकवाद, भाजपचा उदय, डाव्या पक्षांची स्थिती, अनिश्चित निवडणूका, सामाजिक चळवळीचा पेचप्रसंग, पर्यावरण चळवळ इत्यादी घटकावरती प्रकाश टाकला आहे.

६. **क्रिस्तोफर जेफरलेट** यांनी *'इंडियाज सायलेन्ट रिव्होलूशन-द राईज ऑफ द लोअर कास्टस् इन नॉर्थ इंडिया'* हे पुस्तक २००५ साली प्रकाशित झाले असून त्यामध्ये दोन भाग पाडले आहेत. पहिल्या भागामध्ये काँग्रेसचे वर्चस्व आणि स्थितीवादी लोकशाही, भारतीय लोकशाहीचा तत्त्वज्ञानात्मक सामाजिक ऱ्हास, अनुसूचित जातीचा नेतृत्वाचा पर्याय, इंदिरा गांधी काँग्रेसची निरस्त सुधारणा इत्यादी गोष्टीची चर्चा करण्यात आली आहे. तर दुसऱ्या भागामध्ये भारतीय लोकशाहीचे दुसरे पर्व, जनता दल आणि तळातील जातीचे सक्षमीकरण, उच्च जाती आणि मंडल आयोग इत्यादी गोष्टीचा आढावा घेतला आहे.

७. **भांब्री सी. पी.** यांचे *'पॉलीटिकल प्रोसेस इन इंडिया-१९४७-१९९१'* हे पुस्तक १९९३ साली प्रकाशित झाले आहे. यामध्ये राजकारणाच्या गतीशीलतेची चर्चा केली आहे. राजकारणाचे प्रवाह स्पष्ट करण्यासाठी व्यक्ती, तत्त्वनिष्ठ राजकीय विश्लेषण अपुरे आहे. यामध्ये भारत अणि पंजाबमधील जातीय राजकारण, राजकीय पक्ष, निवडणूका आणि राजकारणाला आकार देणाऱ्या सामाजिक शक्तीच्या भूमिकेसंदर्भात चर्चा केली आहे. लोकशाहीमध्ये राजकीय पक्ष महत्त्वाची भूमिका बजावतात त्यांच्या अभ्यासाशिवाय लोकशाही समजून येत नाही. अशाप्रकारे राजकीय प्रक्रियेचा अभ्यास केला आहे.

८. **संजयकुमार प्रवीण राय** यांनी *'भारतातील मतदान वर्तनाचे मापन'* हे मूळ इंग्रजी पुस्तक आहे. हे पुस्तक २०१३ साली इंग्रजीमध्ये प्रकाशित झाले आहे. यामध्ये भारतातील मतदान वर्तन व दृष्टीकोन यांचे मापन, भारतातील निवडणुक अभ्यासांचा ऐतिहासिक आढावा, निवडणूक सर्वेक्षणातील शास्त्रीय नमुना, निवडीचे महत्त्व, प्रश्नावली, माहितीचे विश्लेषण इत्यादी विषयाची मांडणी केली आहे.

९. **निरजा गोपाल जयाल** व **प्रताप भानू मेहता** यांनी *'द ऑक्सफर्ड कंपेनियन टू पॉलीटिक्स इन इंडिया'* हे पुस्तक २०१० साली संपादित केले आहे. या पुस्तकामध्ये आठ भाग आहेत. पहिल्या भागामध्ये संस्थात्मक रचनेसंबंधी मांडणी केली आहे. दुसऱ्या भागामध्ये अस्मितेच्या राजकारणाची चर्चा करण्यात आली आहे. तिसऱ्या भागामध्ये राजकीय प्रक्रियेसंदर्भात मांडणी केली आहे. चौथ्या भागामध्ये भारतीय राजकारणातील विचारसरणीची चर्चा करण्यात आली आहे. पाचव्या भागामध्ये सामाजिक चळवळी व नागरी समाजासंबंधी विषय समावेश केले आहेत. सहाव्या भागामध्ये राजकारण आणि धोरण, सातव्या भागामध्ये भारत आणि जग आणि आठव्या भागामध्ये भारतीय राजकारणाकडे

पाहण्याचे मार्ग इत्यादी घटकाचा समावेश करण्यात आला आहे.

**१०. प्रकाश बाळ** व **किशोर बेडकीहाळ** यांनी *'भारतीय राजकीय व्यवस्था व स्वरूप'* हे पुस्तक २००२ साली संपादित केले आहे. यामध्ये १५ लेख असून त्यामध्ये भारतीय राज्यसंस्था, नागरी समाज, राष्ट्रवादाची जडणघडण, प्रादेशिकता, जात, डाव्या पक्षांचे राजकारण, जमातवाद, पर्यावरण, जन चळवळी, एनजीओ लोकशाही, लोकांचे हक्क, जागतिकीकरण, राखीव जागा, स्त्रिया, राज्यघटनेतील सामाजिक ध्येयवाद, आर्थिक विकास इत्यादी विषयाची मांडली केली आहे.

**११. सुहास पळशीकर** यांनी *'राजकारणाचा ताळेबंद'* हे पुस्तक २०१३ साली प्रकाशित केले आहे. भारतीय राज्यघटनेचा विकास, राजकीय संस्था त्याचे नियंत्रण, संघराज्य व प्रादेशिकता काँग्रेस वर्चस्वाचे राजकारण, भाजपचा उदय आणि विस्तार, जात आणि राजकारण, हरितक्रांतीच्या शेतकरी चळवळी, मंडलनंतरचे राजकारण, पक्षीय राजकारणापुढील प्रश्न इत्यादी घटकाचा अभ्यास केलेला आहे. अशाप्रकारे राजकीय प्रक्रियेसंबंधी अभ्यास झाले आहेत.

### ड) २०१४ ते आजपर्यंत :–

२०१४ साली भारतामध्ये सत्ता परिवर्तन होऊन भाजप पक्षाचे सरकार स्थापन झाले. १९५० पासून काँग्रेस पक्षाने धर्मनिरपेक्ष राष्ट्रवाद, लोकशाही, समाजवाद यांच्या आधारावर आपली भारतविषयक कल्पना विकसित केली होती त्याला १९९० साली तडा जाऊ लागला. २०१४ आणि २०१९ या दोन्ही निवडणूकांच्या माध्यमातून भाजपने हिंदू राष्ट्रवाद, हिंदुत्व यांची मांडणी केल्याचे स्पष्ट होते. भारतामध्ये भाषा, जात, धर्म व प्रदेश यांच्यात मोठ्या प्रमाणामध्ये अंतर्विरोध असतानाही हिंदुत्व, रामजन्मभूमी आणि काँग्रेस पक्षावरील निराश भावनेमुळे भाजप पक्षाला २०१४ आणि २०१९ मध्ये जनादेश मिळाला आहे. यामध्ये काही पुस्तके प्रकाशित झाली असून त्यामध्ये प्रामुख्याने भाजपाच्या संबंधीचा अभ्यास केला आहे. त्याचबरोबर (CSDS) सारख्या संस्थांनी निवडणूकीपूर्वी निकालासंदर्भात अभ्यास करून मते मांडली आहेत. अनेक खाजगी संस्थांनीसुध्दा निवडणूक निकालासंदर्भात कलचाचणी केल्या आहेत. एकूणच निवडणूका आणि सत्तेच्या वापरासंबंधी अभ्यास केला जात आहे.

**१. सुहास पळशीकर, संजयकुमार** यानी *'इलेक्टोरल पॉलीटिक्स इन इंडिया'* हे पुस्तक २०१७ साली प्रकाशित झाले आहे. या पुस्तकाचे चार भाग पाडले असून पहिल्या भागामध्ये २०१४ साली भाजपाचा झालेला पुनरोदय, काँग्रेस पराभव समजून घेणे, २०१४ ची राष्ट्रीय निवडणूक, आम आदमी पक्षाचा विजय, भाजप आणि बिगर भाजपाची राज्ये इत्यादी विषयाची चर्चा करण्यात आली आहे. दुसऱ्या भागामध्ये महाराष्ट्र, बिहार, आंध्र प्रदेश, उत्तर प्रदेश या राज्यातील राजकारणामधील भाजपच्या भूमिकेची चर्चा केली आहे. तिसऱ्या भागामध्ये ओरिसा, पश्चिम बंगाल, केरळ आणि

तामिळनाडू या राज्यातील भाजपाच्या स्थितीसंदर्भात चर्चा केली आहे आणि शेवटच्या भागामध्ये २०१४ च्या निवडणूकीमधील नवे प्रवाह, मिडिया, मध्यम वर्गाची भूमिका, नवमतदाराची भूमिका यांची चर्चा केली आहे. एकूणच भारतीय राजकारणातील भाजपाचा झालेला उदय याची चर्चा केली आहे.

२. **महेंद्र प्रसाद सिंग** यांनी *'इंडियन पॉलीटिकल सिस्टीम'* हे पुस्तक २०१८ साली संपादित केले आहे. या पुस्तकाची चार भागामध्ये विभागणी केली असून पहिल्या भागामध्ये वसाहतवाद काळातील राज्ये आणि अर्थकारणासंबंधी लेखाचा समावेश केला आहे. दुसऱ्या भागामध्ये शासन संस्थेसंबंधातील रचनेचा अभ्यास केला आहे. तिसऱ्या भागामध्ये राजकीय प्रक्रियेसंबंधी चर्चा करण्यात आली आहे. चौथ्या भागामध्ये शासनाच्या वेगवेगळ्या योजनांचा आढावा घेण्यात आला आहे.

अशाप्रकारे चारही टप्प्यामधील राजकीय प्रक्रियेसंबंधी केलेल्या महत्त्वाच्या अभ्यासाचा आढावा घेतला आहे.

## १.२.३ राजकीय प्रक्रियेचे विश्लेषण– वैशिष्ट्ये आणि प्रारुपे

भारतीय राजकीय प्रक्रियेचा अभ्यासकांच्या पुस्तकाचा, ग्रंथाचा कृतीचा आढावा घेतल्यानंतर राजकीय प्रक्रियेच्या अभ्यासाची क्षेत्रे स्पष्ट होतात. त्यामध्ये प्रामुख्याने राजकीय अर्थकारण, राजकीय व सामाजिक चळवळी, राजकीय पक्ष व त्याच्यातील स्पर्धा, सार्वजनिक धोरणाचा राजकारणावरील परिणाम, आघाड्यांचे राजकारण, निवडणूकाचा अभ्यास, राज्याच्या राजकारणातील जात, धर्म, भाषा, वर्ग इत्यादी क्षेत्रावर अभ्यास झालेला आहे. आजही निवडणूका राजकीय पक्षाच्या भूमिका, त्याचा जाहीरनामा, त्यांची धोरणातील परिणामकता इत्यादीचा अभ्यास केला जातो. एकूणच राजकीय प्रक्रियेच्या अभ्यासामध्ये राजकीय पक्षाचा अभ्यास जास्त झाला आहे.

राजकारणामध्ये प्रामुख्याने राजकीय पक्ष कार्यरत असतात, त्यामुळे पक्षाची रचना, मूळ कार्यक्रम, धोरणे, त्यात झालेला बदल, पक्षानी केलेल्या निवडणूक पूर्व व निवडणूकनंतरच्या आघाड्या, उमेदवार, नेतृत्व, संघटना, गटबाजी, संलग्न संघटना यांची निरीक्षणे ही राजकीय पक्षाचा अभ्यास करताना महत्त्वाचे ठरतात. त्याचबरोबर राजकारणाला प्रभावित करणारे जात, प्रादेशिकता, धर्म, भाषा, जमातवाद, हिंदू अस्मिता, हितसंबंधी गट इत्यादी मुद्याची ही चर्चा भारतीय राजकीय प्रक्रियेत केली जाते. अशाप्रकारे राजकीय प्रक्रियेमध्ये स्थानिकपासून राष्ट्रीय पातळीवरील राजकारणाचा अभ्यास केला जातो.

### ❑ राजकीय प्रक्रियेच्या विश्लेषणाची वैशिष्ट्ये :–

राजकीय प्रक्रियेच्या विश्लेषणाची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे सांगता येतील.

**१. विचारप्रणालीचे विश्लेषण :–**

राजकीय प्रक्रियेमध्ये राजकीय विचारप्रणाली, संकल्पना सिध्दांत इत्यादी घटकांचा विचार करून विश्लेषण केले जाते. कारण प्रत्येक देशामध्ये वेगवेगळ्या विचारसरणी प्रस्थापित झालेल्या असतात, तेथील शासन व्यवस्था किंवा राजकीय पक्ष हे वेगवेगळ्या विचारप्रणालीच्या सिध्दान्ताच्या आधारावर कृती करीत असतात त्या सर्व विचारप्रणालीचे विश्लेषण हे राजकीय प्रक्रियेचे वैशिष्ट्य आहे.

**२. शासनसंस्थेचे विश्लेषण :–**

राज्यामध्ये एक शासनयंत्रणा कार्यरत असते तसेच अनेक संस्था संघटना काम करीत असतात. त्याची रचना, कार्ये इत्यादी गोष्टींचे विश्लेषण राजकीय प्रक्रियेमध्ये केले जाते. त्यामध्ये संसद, निवडणूक आयोग, नीती आयोग, वित्त आयोग, राज्याची विधीमंडळे, पंतप्रधान कार्यालय, राष्ट्रपती कार्यालय इत्यादी शासन संस्थांचा विश्लेषण केले जाते.

**३. नेतृत्वाची भूमिका :–**

राजकीय प्रक्रियेचा अभ्यास करताना राजकारणातील नेतृत्वाच्या भूमिकेचा विचार करावा लागतो. कारण नेतृत्वानी घेतलेले निर्णय, त्यांनी मांडलेली भूमिका या सर्व गोष्टी या राजकीय प्रक्रियेमध्ये समावेश होतात. भारतामध्ये नेहरू, इंदिरा गांधी, व्ही. पी. सिंग, राजीव गांधी, नरसिंहराव, वाजपेयी, मनमोहन सिंग, नरेंद्र मोदी इत्यादी नेतृत्वांनी ज्या काही भूमिका घेतल्या, जी काही कार्ये केली ही सर्व कृती राजकीय प्रक्रियेचा भाग बनले आहेत.

**४. धर्म/भाषा/संस्कृती :–**

भारतामध्ये अनेक धर्माचे लोक राहतात. त्यांनी आपली धार्मिक भूमिका मांडली आहे. तसेच अनेक भाषिक समूह आहेत. या भाषिक समूहांनी आपल्या अस्तित्वासाठी अनेक आंदोलने केली आहेत. भारतीय राजकारणामध्ये भाषा हा घटक महत्त्वाचा राहिला आहे. त्याची संस्कृती ही कार्यरत असते. एकूणच धर्म, भाषा, संस्कृतीचे संरक्षण आणि विकास होण्यास केलेल्या सर्व कृतींचा, कार्याचा समावेश राजकीय पक्रियेमध्ये होतो.

**५. जातीव्यवस्था :–**

भारतीय राजकारणामध्ये जाती या महत्त्वाच्या मानल्या जातात. बहुतांशी निवडणूका या जाती आधारित होतात. अनेक जात, संघटना निर्माण झाल्या आहेत. जातीच्या विकासासाठी या संघटनांनी अनेकदा आंदोलने करून राजकारणामध्ये महत्त्वाचे निर्णय घेण्यास शासन व्यवस्थेला भाग पाडण्याचे कार्य केले आहे. तसेच आरक्षणासाठी आंदोलने केली जातात. या सर्व जाती व्यवस्थेचा राजकीय प्रक्रियेमध्ये विचार केला जातो.

### ६. भांडवलदाराची भूमिका :-

राजकीय प्रक्रियेमध्ये उद्योगधंदे चालवणाऱ्या मालकाचा, भांडवलदारांचा गट असतो. अशा गटाच्या भूमिका महत्त्वाच्या असतात. नेहरूच्या काळामध्ये टाटा-बिर्ला इत्यादी मोठे भांडवलदार वर्ग उदयास आले. राजकारणामध्ये हे भांडवलदार राजकीय नेत्यांना प्रभावित करून आपल्या हिताचे निर्णय घेण्यासाठी कार्यरत असतात. याचाही राजकीय प्रक्रियेमध्ये अभ्यास केला जातो. सध्या अंबानी, अदानी इ. भांडवलदार भारताच्या राजकीय प्रक्रियेवर प्रभाव पाडताना दिसून येतात.

### ७. जागतिकीकरण :-

१९९० नंतर जगामध्ये जागतिकीकरणाचा प्रभाव वाढू लागला. भारतामध्येही १९९१ साली पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव यांनी जागतिकीकरणाचा स्विकार केला. या जागतिकीकरणामुळे अनेक मल्टीनॅशनल कंपन्या भारतामध्ये आपली गुंतवणूक करीत आहेत. तसेच शेअर मार्केटमध्ये फॉरेन डायरेक्ट इनव्हेस्टमेंट (एफ.डी.आय.) आणि फॉरेन इन्स्टिट्यूशनल इनव्हेस्टमेंट (एफ.आय.आय.) च्या धोरणामुळे मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली आहे. त्यामुळे शेअर मार्केटचा सेन्सेक्स सातत्याने वाढत आहे. अनेक परदेशी भांडवलदारांनी भारतामध्ये उद्योगधंदे सुरू केले आहेत. सर्व मल्टीनॅशनल कंपन्या भारतीय राजकारणावर प्रभाव टाकून आपल्या हिताचे निर्णय घेण्यास भाग पाडतात. अदानी-अंबानी सारखे भांडवलदार तर राजकारणामध्ये उघडउघड राजकीय पक्षाशी संबंधित कार्य करताना दिसतात. एकूणच या जागतिकीकरणाचा अभ्यास या राजकीय प्रक्रियेमध्ये करावा लागतो.

### ८. दबावगट व हितसंबंधी गटांची भूमिका :-

भारतीय राजकारणामध्ये अनेक दबावगट आणि हितसंबंधी गट कार्यरत आहेत, त्यांनी अनेक चळवळी उभ्या केल्या. या चळवळीच्या माध्यमातून आपल्या हिताच्यादृष्टीने ते योग्य असेल ते निर्णय घेण्यास प्रभावित करतात. त्यामध्ये प्रामुख्याने पर्यावरण चळवळ, नवीन सामाजिक चळवळी, SEZ च्या विरोधातील चळवळ या सर्व चळवळीचा समावेश होतो. या सर्व चळवळीचा अभ्यास राजकीय प्रक्रियेमध्ये करावा लागतो.

### ९. ग्रामीण राजकीय प्रक्रिया :-

ग्रामीण भागामध्ये शेती आणि शेतीसंबंधीत उद्योगधंदे साखर कारखाने कृषी आधारित कंपन्या निर्माण झालेल्या आहेत. हे भारतीय अर्थव्यवस्थेबरोबर राजकीय भूमिका ही पार पाडतात. त्याच्यासंबंधी निर्णय घेण्यासाठी एकत्र येऊन आपल्या भूमिका मांडतात. भांडवलदार वर्गानी शेती बळकावण्यासाठी शासनाची धोरणे बदलली आहेत. त्याविरोधी शेतकरी आंदोलने केली जातात. या सर्व गोष्टीचा राजकीय प्रक्रियेमध्ये प्रभाव पडतो. सहकार चळवळ, सोसायट्या स्थापन झाल्या, त्यातूनही राजकीय नेतृत्व उदयास येत आहेत. या ग्रामीण राजकीय प्रक्रियेचा अभ्यास महत्त्वाचा ठरत आहे.

### १०. शहरी राजकीय प्रक्रिया :–

शहरी राजकीय प्रक्रिया ही शहरातील स्वच्छता, पाणी, आरोग्य सुविधांच्या अनुषंगाने तयार झालेली आंदोलन असतात. तसेच बांधकाम क्षेत्रातील बिल्डर्स लॉबी, एम.आय.डी.सी. स्थापन करणे इत्यादी घटक राजकारणातील नेत्यांवर प्रभाव निर्माण करून त्यांनी आपले हित साध्य करण्यासाठी निर्णय घेण्यास भाग पाडतात. उच्च मध्यम वर्गाची भूमिका ही महत्त्वाची असते. अशाप्रकारे शहरी राजकीय प्रक्रिया कार्यरत असतात.

### ११. राजकीय पक्ष आणि निवडणूका :–

भारतीय राजकारणामध्ये अनेक राजकीय पक्ष आहेत. वेगवेगळ्या विचारसरणीच्या आधारावर राजकीय पक्षाची निर्मिती झालेली असते हे राजकीय पक्ष निवडणूक लढवित असतात. तसेच जनता मतदान प्रक्रियेत सहभागी होते. या सर्व वृत्तींचा समावेश राजकीय प्रक्रियेमध्ये होतो. राजकीय प्रक्रियेचा महत्त्वाचा भाग म्हणजे राजकीय पक्ष आणि निवडणूका होय. या निवडणूका राजकीय पक्ष मतदान प्रक्रिया, निवडणूक आयोग याच्या सर्व कृतीचा अभ्यास राजकीय प्रक्रियेमध्ये करणे आवश्यक आहे, त्याशिवाय राजकीय प्रक्रिया पूर्ण होत नाही.

अशाप्रकारे भारतीय राजकीय प्रक्रियेची वैशिष्ट्ये स्पष्ट करता येतील. राजकीय प्रक्रियेमध्ये सामाजिक, आर्थिक, राजकीय सर्व कृतीचा समावेश होतो आणि त्याच्या बदलत्या भूमिकेमुळे राजकीय प्रक्रिया ही बदलत जाते.

## ❑ राजकीय प्रक्रियेच्या विश्लेषणाची प्रारूपे :–

भारतीय राजकीय प्रक्रिया यांचा अभ्यास करताना खालील प्रारूपे भारतीय राजकारणात तयार झालेली आहेत, त्याद्वारे राजकीय प्रक्रियेचा अभ्यास केला जातो, ती पुढीलप्रमाणे :–

### १. नेहरू प्रतिमान :–

भारत स्वतंत्र झाल्यानंतर नेहरूंनी पंतप्रधानाची सुत्रे हाती घेतली आणि १९४७ ते १९६४ पर्यंत पंतप्रधान म्हणून भारताची धुरा वाहिली व तीन सार्वत्रिक निवडणूकांत संसदेत व वेगवेगळ्या राज्य विधानसभेमध्ये काँग्रेसला विजय मिळवून दिला. या काळामध्ये देशातील मूलभूत लोकशाही, राजकीय संस्थाची निर्मिती केली. अर्थकारणामध्ये नियोजन आयोग, मिश्र अर्थव्यवस्था यांचा स्वीकार करून आर्थिक क्षेत्रातील कार्य व्यवस्थितरित्या पार पाडले. भारतीय संघराज्य व्यवस्थेची निर्मिती करताना भाषावार प्रांतरचना करून घटकराज्यांची निर्मिती केली. त्याकाळातील दारिद्र्याचा प्रश्न, अन्नधान्य उत्पादन, औद्योगिक विकासासाठी पायाभूत उद्योगातील सार्वजनिक कारखाने, विद्युत निर्मिती केंद्रे स्थापन केली. भारतातील ग्रामीण भागाच्या विकासासाठी आणि लोकशाही सहभागाबद्दल जागृती

निर्माण करण्यासाठी राज्याचा पुढाकार गरजेचा होता, त्याना चालना दिली. भारताने स्विकारलेले अलिप्ततावादी धोरण या सर्व गोष्टी नेहरूचे एक नवे प्रारूप होते. नेहरू प्रतिमानामध्ये संसदीय लोकशाही, धर्मनिरपेक्ष राष्ट्रवाद, समाजवाद आणि कल्याणकारी राज्याचे धोरण, अलिप्ततावाद इत्यादी गोष्टींचा समावेश होतो. भारतीय राजकीय प्रक्रियेचा अभ्यास करताना संस्थात्मक रचनेचा आणि त्याच्या कार्याचा अभ्यास महत्त्वाचा आहे.

### २. एकपक्षीय वर्चस्व पध्दत (काँग्रेसचे वर्चस्व आणि ऱ्हास) :-

भारताच्या राजकारणात दीर्घकाळ काँग्रेस पक्ष हा मध्यवर्ती पक्ष होता. त्यातूनच 'काँग्रेस व्यवस्था' हे भारताच्या राजकीय प्रक्रियेचे वर्णन प्रचलित झाले. कारण स्वतंत्र भारतामध्ये पक्ष पध्दतीचा विकास ज्या प्रकारे झाला, त्यातून पहिल्या काही दशकात काँग्रेस पक्षाची पकड भारतीय राजकारणावर होती, याचा उल्लेख काही अभ्यासकांनी एकपक्षीय वर्चस्व पध्दत असा केला, तर भारतीय राजकारणाच्या आकलनासाठीच एक विश्लेषणात्मक साधन म्हणून रजनी कोठारीनी 'काँग्रेस व्यवस्था' ही संकल्पना प्रचलित केली. काँग्रेस व्यवस्था हे वर्णन अधिक योग्य वाटते, कारण काँग्रेस पक्षच सत्तेवर होता. १९६७ सालच्या निवडणूकीत काही घटकराज्यामध्ये बिगर काँग्रेस सरकार अस्तित्वात आले परंतु खऱ्या अर्थाने काँग्रेसच्या मध्यवर्ती स्थानाला १९८९ नंतर धक्का बसला आणि वारंवार बहुपक्षीय सरकारे अस्तित्वात आली. याची सुरूवात मात्र १९६७ पासूनच झाली होती. त्यामुळे भारतीय राजकीय प्रक्रियेच्या विश्लेषणासाठी काँग्रेसचे वर्चस्व आणि ऱ्हास हे एक प्रारूप म्हणून निर्माण झाल्याचे दिसून येते.

### ३. प्रादेशिक पक्षाच्या वर्चस्वाचे प्रतिमान :-

प्रादेशिक पक्ष हा शब्दप्रयोग अनेकवेळा एका मर्यादित अर्थाने वापरला जातो. प्रादेशिक पक्षाचे अस्तित्व भारतीय राजकारणामध्ये १९७७ पूर्वी पासूनच होते. परंतु काँग्रेस पक्षाचा वरचष्मा असल्यामुळे एखाद्या राज्यापुरता काँग्रेसविरोधी पक्ष चालविणे शक्य व्हायचे. मात्र प्रादेशिक पक्षाचे महत्त्व हे १९७७ पासून वाढले आणि प्रादेशिक पक्षांना राष्ट्रीय राजकारणात महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले. १९७७ साली जनता पक्षाकडे पुरेसे बहुत होते, तरीही अकाली दल जनता सरकारमध्ये होते. बहुमत राष्ट्रीय राजकारणात १९८९ पासून अनेक प्रादेशिक पक्ष इतके महत्त्वाचे बनले की, त्याच्याशिवाय केंद्रातील सरकार सत्तेत राहूच शकणार नव्हते. केंद्रातील सरकार अस्तित्वात आणणे, टिकविणे किंवा पाडणे हे प्रादेशिक पक्षावर अवलंबून राहू लागले. म्हणून भारतीय राजकीय प्रक्रियेचे 'प्रादेशिक पक्षांचे वर्चस्व' हे एक प्रारूप म्हणून पुढे आले आहे.

### ४. आघाड्यांच्या राजकारणाचे प्रारूप :-

भारतीय राजकारणामध्ये १९९१ नंतर नवे प्रवाह निर्माण झाले. १९९१ ला नरसिंहराव सत्तेत

आल्यानंतर त्यांनी तीन महत्त्वाचे निर्णय घेतले. त्यामध्ये मंडल आयोगाच्या शिफारशी सुरू ठेवणे, पंचायतराज व्यवस्थेमध्ये जागा राखीव ठेवणे आणि तिसरा म्हणजे नव्या आर्थिक धोरणाची अंमलबजावणी करणे. त्यामुळे काँग्रेस पक्षाला अनेक राज्यात पराभवास तोंड द्यावे लागले. भारतात १९९१ ते २००४ या काळात चारवेळा संसदीय निवडणूका झाल्या व सहा नेत्यांनी पंतप्रधानाची शपथ घेतली. केंद्रात कोणत्याही एका पक्षास बहुमत मिळण्याची शक्यता कमी झाली, त्यामुळे केंद्रात आघाडीची सरकारे सत्तेवर आली. या आघाडीच्या सरकारमध्ये प्रादेशिक पक्षाचे प्रभुत्व होते आणि याच काळात जातीचे नवे राजकारण, प्रादेशिक पक्षाचे प्रभुत्व, काँग्रेसचा ऱ्हास, समिश्र मंत्रिमंडळाचे आघाड्याचे राजकारण आणि भाजप पक्षाचा विस्तार या सर्वच गोष्टी एकाचवेळी होत होत्या या सर्वांनी मिळून १९९० नंतरची राजकीय प्रक्रिया साकारली ती जवळजवळ २०१४ पर्यंत आघाड्याचे राजकारण कायम राहिले म्हणून हे राजकीय प्रक्रियेचे प्रारूप म्हणून उदयास आले आहे.

### ५. भाजपचा पुन्हा उदय :-

अटलबिहारी वाजपेयीच्या नेतृत्वाखालील १९९८ ते २००४ पर्यंत भाजपने केंद्रामध्ये आघाडीचे सरकार स्थापन केले होते. नंतरची दहा वर्षे काँग्रेस आघाडीचे सरकार होते. परंतु सर्व राजकीय अभ्यासक यापुढे कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत मिळणार नाही असे सांगत होते. पण २०१४ आणि २०१९ च्या निवडणूकीमध्ये भाजपला बहुमत मिळाले आहे. आज भाजप हा सत्तेवर असून तो वर्चस्ववादाकडे जाण्याचा प्रयत्न करीत आहे. परंतु तो काँग्रेसच्या काळाइतका सक्षम नाही कारण केंद्रात जरी भाजपाची सत्ता असली तरी केरळ, पं. बंगाल, तामिळनाडू, आंध्र प्रदेश, पंजाब इत्यादी राज्यामध्ये त्यांची सत्ता नाही, तर बिहार, ओरिसा, आसाम, ईशान्य भारतातील राज्यांमध्ये त्यांचा मर्यादित प्रभाव आहे. भाजपाचा पुन्हा झालेला उदय हा एक भारतीय राजकीय प्रक्रियेचा प्रारूप म्हणता येईल.

### ६. पॉप्युलिझम :-

भारतीय राजकीय प्रक्रियेमध्ये पॉप्युलिझम हे एक महत्त्वाचे प्रारूप आहे. पॉप्युलिझमची संकल्पना मागील दोन दशकामध्ये फार मोठ्या प्रमाणात वापरण्यात आली आहे. त्याला मराठीमध्ये लोकवाद असे म्हटले तर अधिक योग्य ठरेल. भारताच्या संदर्भात ही संकल्पना प्रामुख्याने अजय गुडावर्ती आणि आशुतोष वार्ष्णेय यानी वापरला आहे. यामध्ये लोकशाही नेता सतत लोक हा सत्तेचा एकमेव आणि अंतिम स्रोत कसा आहे हे सांगत असतो. अमूक इतक्या कोटी जनतेने मला अधिकार दिला आहे. असा हा युक्तीवाद असतो. शिवाय नेता आणि लोक यांच्यात थेट नाते आहे असे मानले जाते. लोक थेट नेत्याला संमती देतात. तुमच्या मतदारसंघात मीच उभा आहे असे समजून मत द्या असा आग्रह मतदारांना केला जातो आणि निवडणूकीला सार्वमताचे स्वरूप येते. पक्ष आणि इतर नेते

या सगळ्या बाबी गौण ठरतात आणि नेत्याचे दिव्यवलय निर्माण होते. दुसरी गोष्ट म्हणजे लोकवादामध्ये लोकांच्यापेक्षा श्रेष्ठ काहीच नसते. संस्था, नियम, कार्यप्रणाली या सगळ्या गोष्टी लोकापुढे दुय्यम आहेत आणि कायदे नियमाबाबत समाजात काहीशी दुराव्याची भावना निर्माण केली जाते. त्याचबरोबर कायदे आणि संविधान बदलणे योग्य आहे अशी लोकवादामध्ये लोकांची मानसिकता निर्माण होते. तिसरी गोष्ट म्हणजे लोकांच्या हिताच्या विरोधात कोणीतरी मूठभर आहेत असे भासवले जाते. लोकांच्याविरुध्द अभिजन असे द्वैत निर्माण केले जाते. भारतीय राजकारणामध्ये इंदिरा गांधी आणि मोदी यांनी पॉप्युलिझमचा प्रयोग केलेला असल्याचे दिसून येते.

## ७. वंश–धर्माधिष्ठीत लोकशाही :–

हे प्रारूप भारतात सध्या प्रचलित नसले तरी ते भारताच्या लोकशाहीसाठी स्विकारली जात आहे. सामाजिकशास्त्रामध्ये इथनिक हा शब्द बहुविध व लवचिक अर्थानी वापरला जातो. त्यात वंश, धर्म, संस्कृती अशा विविध छटा सामावलेल्या आहेत. युरोपीय आणि अमेरिकेत हे प्रारूप आहे. भारतामध्ये हिंदू–मुस्लीम प्रश्न हा देखील इथनिक म्हटला जातो आणि भारतातल्या जातीची चर्चा देखील इथनिसिटीच्या प्रारूपांमध्ये सामावली जाते. भारतीय लोकशाहीमध्ये आवश्यक त्या प्रक्रियात्मक बाबी आहेत, पण त्या राजकीय व्यवस्थांच्या निर्मितीचा आधार एकत्र वंश, धर्म, समूह हा नाही. अशा यांच्या विश्लेषणात प्रत्यक्ष राजकीय प्रक्रियेत एखादा समूह बाजूला फेकला जाणे किंवा एखाद्या समूहाला प्राधान्य मिळणे एवढाच भाग नाही, तर राज्यसंस्था एकाच समूहाशी जोडली जाणे, हा भागही आहे. जर हे प्रारूप भारतासाठी वापरायचे म्हटले तर असे म्हणता येईल की, राज्यसंस्था औपचारिकपणे समूह निरपेक्ष राहिली, तरी जर प्रक्रिया आणि व्यवहार हे एकाच समूहाच्या नियंत्रणाखाली गेले तर ती एथनिक म्हणजे वंश, धर्म यावर आधारित किंवा एकाच समूहावर आधारित लोकशाही ठरते. त्यामुळे भारतात एकाच समूहाला सर्व राजकीय आणि सार्वजनिक व्यवहारांचा आधार बनवणे ही प्रक्रिया किती प्रमाणात पूर्ण झाली की नाही हे पहावे लागेल. अशाप्रकारे वंश, धर्माधिष्ठित लोकशाही प्रारूप हे राजकीय प्रक्रियेचे प्रारूप म्हटले आहे.

## ८. बहुसंख्यांकवाद :–

बहुसंख्यांकवाद हे भारतीय राजकीय प्रक्रियेचे प्रारूप आहे. कारण बहुसंख्यांकवाद हा शब्दप्रयोग अलीकडे भारतीय राजकारणासाठी वापरला जात आहे. प्राश्चात्य उदारमतवादी लोकशाहीमध्ये मेजॉरीटेरीयनीझम असा शब्द वापरला जातो. या शब्दाचा अर्थ निवडणूकीच्या लोकशाहीसाठी न वापरता एकच मोठा समाज स्वत:कडे सगळे कर्तेपण कसे घेतो, त्यातून सार्वजनिक जीवनाचा सर्व अंगामध्ये केवळ बहुसंख्य समाजाची इच्छा हाच निकष कसा लोकशाहीचा अंतिम निकष म्हणून प्रचलित होतो. या अर्थाने वापरला जातो. भारतीय राजकारणामध्ये हिंदू बहुसंख्य आहेत. प्रादेशिक

संदर्भात तर सर्वच प्रदेशातील समाज बहुसंख्यांकवादाचे पुरस्कर्ते आहेत. स्थानिक राजकराणामध्येही बहुसंख्यांकवाद आणून त्यांना बहुसंख्यांकवादी बनवले आहे. भारतीय राजकारण लोकशाहीच्या बहुमत या तत्वाशी सुसंगत असते. सर्वसामान्य नागरिकांना देखील बहुसंख्य समाजाच्या बाजूने सार्वजनिक निर्णय घेण्यात काय गैर आहे असेच वाटत असते. भारतीय राजकारणाला हिंदूत्ववादी वैचारिक प्रभुत्व मिळवून देण्यात आताचा क्षण जवळपास यशस्वी बनला आहे आणि हिंदुत्ववादी हे बहुसंख्यांकवादी धोरण म्हणून पुढे येत आहे. एकूणच भारतीय राजकीय प्रक्रियेमध्ये बहुसंख्यवादी राजकारण एक प्रारूप बनले आहे. पॉप्युलिझम, वंश-धर्माधिष्ठित लोकशाही, बहुसंख्यांकवाद या प्रारूपांची सविस्तर चर्चा सुहास पळशीकर यांनी समाज प्रबोधन पत्रिका अंकामध्ये केली आहे.

## १.३ सारांश

भारतीय राजकीय प्रक्रिया त्याचा अर्थ व स्वरूप, त्याची वैशिष्ट्ये, प्रारूपे आणि राजकीय प्रक्रियेचा आजपर्यंत झालेला अभ्यास या सर्व गोष्टीची चर्चा प्रस्तुत प्रकरणात करण्यात आली आहे. राजकीय प्रक्रियेमध्ये प्रामुख्याने राजकीय व्यवहार, कृती, व्यवस्था, विचार प्रणाली, संकल्पना, रचना, सामाजिक चळवळी इत्यादी घटकाचा अभ्यास केला जातो. भारतीय राजकीय प्रक्रियेचा अभ्यास करताना पहिल्या टप्प्यामध्ये संस्थात्मक दृष्टीकोनातून विश्लेषण अथवा चर्चा करण्यात आली होती. नंतरच्या काळामध्ये जात, धर्म, भाषा आणि त्याचा राजकारणावर पडलेला प्रभाव या सर्व गोष्टींचा अभ्यास करण्यात आला. तिसऱ्या टप्प्यामध्ये सामाजिक चळवळी विशेषत: शेतकरी चळवळ, मंडल आयोगानंतरची ओबीसी चळवळ, नर्मदा बचाव आंदोलन इत्यादी चळवळीचा अभ्यास करण्यास सुरूवात झाली. त्याचबरोबर राज्याच्या राजकारणाचा अभ्यास करण्यात आला. कारण जात-भाषा, प्रादेशिकता या गोष्टी राज्याच्या राजकारणावर प्रभाव पाडीत असतात. त्यामुळे त्या सर्व गोष्टीचा अभ्यास करणे क्रमप्राप्त होते. त्यानंतरच्या काळात म्हणजे २०१४ नंतरच्या काळामध्ये भाजपप्रणीत राज्ये आणि हिंदुत्ववादी धोरणाचा अभ्यास होताना दिसून येतो. त्याचबरोबर भारतीय राजकारणातील जे नवे बदल झालेले आहेत त्याचाही अभ्यास या भारतीय राजकीय प्रक्रियेचा अभ्यासामध्ये केला जातो. एकूणच भारतीय राजकीय प्रक्रियेचा अभ्यास अनेक अभ्यासकांनी महत्त्वपूर्णरित्या केल्याचे स्पष्ट होते, कारण भारतातील अनेक अभ्यासकांनी वेगवेगळ्या दृष्टीकोनातून अभ्यास केला असून समाजातील अनेक गुंतागुंतीचे प्रश्न उलघडून दाखविण्याचा प्रयत्न केला आहे.

## १.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१. **राजकीय प्रक्रिया :** राजकीय व्यवहाराचा अभ्यास.

२. **आघाडी सरकार :** अनेक पक्षांनी एकत्र येऊन निर्माण केलेले सरकार.

३. **एकपक्ष प्रबळ पध्दती :** अनेक पक्ष असूनही एकाच पक्षाचे वर्चस्व असणे.

४. **काँग्रेस व्यवस्था :** केंद्र व राज्यामध्ये काँग्रेसची सत्ता होती, त्या काळाला काँग्रेस व्यवस्था असे म्हणतात.

## १.५ सरावासाठी स्वाध्याय

१. भारतीय राजकीय प्रक्रियेचा अर्थ, स्वरूप स्पष्ट करा.

२. राजकीय प्रक्रियेच्या अभ्यासाच्या टप्प्यांची चर्चा करा.

३. राजकीय प्रक्रियेची वैशिष्ट्ये आणि प्रारुपे स्पष्ट करा.

## १.६ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


१. **बेडकीहाळ किशोर, बाळ प्रकाश** *(२००२)* : *'भारतीय राजकीय व्यवस्था : प्रक्रिया व स्वरूप'*, आंबेडकर अकादमी, सातारा.

२. **पळशीकर सुहास** *(२०१३)* : *'राजकारणाचा ताळेबंद'*, साधना प्रकाशन, पुणे.

३. **Jayal & Mehta** (2010) : *'The Oxford Companion To Politics in India'*, Oxford University Press.

४. **पळशीकर सुहास** : *'राजकारणाचा बहुसंख्यांकवादी टप्पा-२०१९ आणि २०१४ : विश्लेषण : चौकटीचा प्रश्न'*, समाज प्रबोधन पत्रिका, अंक-२२६, एप्रिल-जून-२०१९, पृष्ठ ३-१३.

५. **व्होरा पळशीकर** *(१९८७)* : *'राज्यशासन कोश'*, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे.

६. **सेलींग, हॅरीसन** *(१९६०)* : *'इंडिया द मोस्ट डेंजरस डीकेटस्'*, प्रिन्सटन युनिर्व्हसिटी प्रेस.

७. **ग्रॅनविल ऑस्टिन** *(१९६६)* : *'द इंडियन कॉन्स्टीट्युशन कॉर्नर स्टोन ऑफ नेशन'*, ऑक्सफर्ड युनिर्व्हसिटी प्रेस.

८. **मायरन विनर** *(१९५७)* : *'पार्टी पॉलीटिक्स इन इंडिया द डेव्हलपमेंट ऑफ मल्टिपार्टी सिस्टीम'*, प्रिन्सटन युनिर्व्हसिटी प्रेस.

९. **कोठारी, रजनी** *(१९७०)* : *'पॉलीटीक्स इन इंडिया'*, ओरियन्ट ब्लॅकस्वॅन.


❑❑❑

घटक-२

# निवडणूकांचे राजकारण आणि पक्ष पध्दती

**अनुक्रमणिका**

२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

२.२.१ भारतातील लोकसभेच्या निवडणूकांचे सिंहावलोकन

२.२.१.१ अ) १९५२ ची लोकसभा निवडणूक ते २०१९ ची लोकसभा निवडणूक-आढावा

२.२.२ एकपक्ष प्रबळ पक्षपध्दती ते बहुपक्ष पध्दती

२.२.२.१ अ) प्रस्तावना

२.२.२.२ ब) एकपक्ष प्रबळ पक्षपध्दती

२.२.२.३ क) बहुपक्ष पध्दती-आघाडी सरकारे

२.२.३ प्रादेशिक पक्ष आणि राजकारण

२.२.३.१ अ) प्रस्तावना

२.२.३.२ ब) शिवसेना, तृणमूल काँग्रेस, द्रमुक, अण्णा द्रमुक, नॅशनल कॉन्फरन्स इत्यादी प्रादेशिक पक्ष

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

२.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## २.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला,

१. भारतातील राजकीय पक्ष पध्दतीचे स्वरूप समजून येईल.

२. भारतातील कॉंग्रेस, भाजपा इतर पक्षांचे राजकारण समजेल.

३. प्रादेशिक पक्षांचा उदय आणि त्याचे राजकारण समजून येईल.

४. लोकसभेच्या निवडणूकांचे राजकारण समजून येईल.

५. भारतातील निवडणूकांच्या प्रचाराचे आणि जाहीरनाम्याचे आकलन होईल.

६. प्रादेशिक पक्ष आणि राष्ट्रीय पक्ष यांच्या आघाड्यांच्या राजकारणाचे स्वरूप समजून येईल इत्यादी.

## २.१ प्रास्ताविक

प्रातिनिधीक लोकशाहीमध्ये निवडणूका या राजकीय प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावत असतात. निवडणूका ही लोकशाहीची एक महत्त्वपूर्ण प्रक्रिया आहे. ज्याद्वारे जनता किंवा लोक आपला प्रतिनिधी निवडते. निवडणूकीद्वारे आधुनिक लोकशाहीतील लोक ग्रामपातळीपासून ते राष्ट्रीय पातळीवरील विभिन्न पदावरील व्यक्तींना निवडतात. निवडणूकांचा प्रयोग हा राजकीय संस्था, खाजगी संस्था, धार्मिक संस्था आणि शैक्षणिक संस्था इत्यादीमध्ये तो प्रगट होतो. भारतीय राज्यघटनेत लोकांचे सार्वभौमत्व स्विकारण्यात आले असल्यामुळे ग्रामपंचायत सदस्यापासून ते सर्वोच्च अशा राष्ट्रपतीपदापर्यंतची निवड ही लोकांच्याकडूनच होत असते. यासाठी स्वातंत्र्यानंतर खऱ्या अर्थाने लोकप्रतिनिधी सत्तेवर यायचे असतील तर सार्वत्रिक निवडणूकांची गरज होती. म्हणून २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारतीय राज्यघटना कलम ३२४ अन्वये २५ जानेवारी १९५० रोजी औपचारिकरित्या 'निवडणूकांचे नियोजन, संचालन आणि नियंत्रण' करण्यासाठी 'निवडणूक आयोगाची' स्थापना केली. २१ मार्च १९५० रोजी पहिले मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून 'श्री. सुकुमार सेन' यांची नियुक्ती करण्यात आली. १२ मे १९५० रोजी निवडणूकीसाठी कायदेशीर आकृतीबंध तयार करण्यासाठी संसदेने 'लोकप्रतिनिधीत्व कायदा' मंजूर केला. पुढे त्यामध्ये काही किरकोळ दुरुस्त्या करून १७ जुलै १९५१ रोजी 'लोकप्रतिनिधीत्व कायदा १९५१' हा कायदा मंजूर केला. त्यात संसदेच्या दोन्ही सभागृहात आणि सर्व राज्यांच्या विधानसभांच्या निवडणूकीची प्रक्रिया निश्चित केली गेली. संसदेच्या व घटक राज्यांच्या विधानसभेच्या उमेदवार निवडीचे संपूर्ण स्वातंत्र्य 'प्रौढ मताधिकार' अंतर्गत (एकमत) 'एक व्यक्ती-एक मत' असे अधिकार देवून गरीब-श्रीमंत, निरक्षर-विद्वान एवढेच काय पण विविध वर्ग, वर्ण, जात यांच्यातील सर्व स्तरांना किमान समान पातळीवर आणले. राजकीय पक्ष संघटित करण्याचे स्वातंत्र्य, तसेच इतर

राजकीय अधिकार न्यायसंस्थेच्या कक्षेत आणून संसदीय लोकशाहीचा पाया भक्कम केला. संसदेच्या संमत्तीने आणि निवडणूक आयोगाच्या सल्ल्यानुसार १९५१ च्या पहिल्या सार्वत्रिक लोकसभा निवडणूकीपासून २०१९ च्या १७व्या (सतराव्या) लोकसभा निवडणूका निपक्ष, पारदर्शी आणि निर्भिडपणे पार पाडल्या. याचे सगळे श्रेय निवडणूक आयोगाकडे जाते. थोडक्यात आजपर्यंतच्या झालेल्या सार्वत्रिक निवडणूकांचे निकाल राजकीय पक्षांची स्थित्यंतरे, आघाडी सरकारचे प्रयोग आणि बदलती राजकीय समीकरणे यांचा अभ्यास या प्रकरणामध्ये करणार आहोत.

## २.२ विषय विवेचन

भारतीय संसदेच्या संमत्तीने आणि निवडणूक आयोगाच्या सल्ल्यानुसार १३ ऑगस्ट, १९५१ रोजी राष्ट्रपतीनी लोकसभा व विधानसभेच्या पहिल्या सार्वत्रिक निवडणूकीचा आदेश काढला. जम्मू-काश्मीर वगळता एकूण १७ कोटी ३२ लाख १३ हजार ६३५ मतदार होते. तसेच १९५१ रोजी सर्व राज्यामध्ये प्रथमच मतदार यादी प्रसिध्द करण्यात आली. १९५१-५२ च्या पहिल्या सार्वत्रिक निवडणूकीच्यावेळी आयोगाने १५ राजकीय पक्षांना बहुराज्यीय पक्ष तर ३९ पक्षांना प्रादेशिक पक्ष म्हणून मान्यता दिली होती. आज भारतात सात राष्ट्रीय पक्ष आहेत. तर ४० मान्यताप्राप्त प्रादेशिक पक्ष आहेत. १९९२ मध्ये झालेल्या पहिल्या सार्वत्रिक निवडणूकीच्यावेळी निवडणूक आयोगाने मताधिकार बजावण्यासाठी 'मतपेटी' ची व्यवस्था केली होती. त्यानुसार प्रत्येक मतदान केंद्रावर एका स्वतंत्र खोलीत प्रत्येक उमेदवाराला एक स्वतंत्र मतपेटी देण्यात आली होती. तसेच मतदारांना त्यांच्या पसंतीनुसार उमेदवाराच्या मतपेटीत केंद्रामार्फत पूर्वमुद्रित मतपत्रिका टाकण्यास सांगितले होते. १९६२ साली झालेल्या लोकसभेच्या तिसऱ्या निवडणूकीत निवडणूक आयोगाने 'मतपत्रिका' पध्दत सुरू केली आणि त्यामध्ये मार्किंग सिस्टम सुरू केली. या मतपत्रिकेवर उमेदवाराचे नाव आणि चिन्हे देण्यात आली होती. त्यानंतर निवडणूक आयोगाने १९८२ साली प्रथम प्रायोगिक तत्त्वावर अंशत: इलेक्ट्रॉनिक्स व्होटींग मशीन (इव्हीएम) चा वापर सर्वप्रथम केरळच्या पेरूर विधानसभा मतदार संघात केला. जसे निवडणूक आयोगाने निवडणूकीत वेगवेगळे बदल केले. त्याचप्रमाणे भारतीय राजकारण टप्प्याटप्प्याने बदलत होते. १९७७ पर्यंत भारतात एक पक्ष प्रबळ पक्ष पध्दती होती. काँग्रेस पक्षाचे तेव्हापर्यंत वर्चस्व होते, पण १९७७ ला देशात मुरारजी देसाई यांचे पहिले बिगरकाँग्रेस सरकार सत्तेवर आले. त्यानंतर १९८९ नंतर प्रादेशिक पक्षाची निर्मिती मोठ्या प्रमाणावर झाली आणि घटकराज्य आणि देश पातळीवरील निवडणूकामध्ये राष्ट्रीय पक्षांना आव्हाने निर्माण झाली. त्यातूनच भारतात आघाडीचा प्रयोग सुरू झाला. प्रादेशिक पक्षांचे वर्चस्व स्थानिक, राज्य आणि देश पातळीवर महत्त्व वाढले. निवडणूक आयोगाने २००४ नंतर चौदाव्या लोकसभेपासून आजपर्यंत इव्हीएम मशीनचाच वापर केला. अशाप्रकारे आजअखेर आपल्या देशात १६ लोकसभा निवडणूका झाल्या. या निवडणूकांचे सिंहावलोकन

पुढीलप्रमाणे केले आहे.

### २.२.१ भारतातील लोकसभेच्या निवडणूकांचे सिंहावलोकन

### २.२.१.१ भारतीय लोकसभा निवडणूका १९५२ ते २०१९ चा आढावा

### १. पहिली लोकसभा सार्वत्रिक निवडणूक : १९५२

भारतीय घटना समितीच्या निर्णयानुसार व तरतुदीनुसार पहिली लोकसभा निवडणूक २५ ऑक्टोबर १९५१ ते २१ फेब्रुवारी १९५२ या चार महिन्यात पार पडली. लोकसभेच्या पहिल्या सार्वत्रिक निवडणूकीत लोकसभेच्या ४९७ आणि राज्य विधानसभेच्या ३२८३ जागासाठी सतरा कोटी ३२ लाख १२ हजार ३४३ मतदारांनी मतदानाचा हक्क मिळाला. या निवडणुकीमध्ये १९२ लहान-मोठे राजकीय पक्ष सहभागी झाले होते. भारतीय स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या सार्वत्रिक निवडणूकीत राजकीय जीवनातील दुरावस्था, पृथगात्मता व विस्कळीतपणा एका बाजूला तर दुसऱ्या बाजूला भारत हा इंग्रजांनी लुटलेला, बहुसंख्य अशिक्षित मतदार आणि गुलाम असणाऱ्यामुळे निवडणूका यशस्वीपणे पार पडतील कि नाही याची शंका होती. पण अगदी सुरळीतपणे या निवड पार पडल्या. लोकसभेच्या या पहिल्या निवडणूकांचे प्रशासकीय नेतृत्व श्री. सुकुमार सेन यांनी केले. या निवडणूकीत लोकसभेसाठी ४४.६३% मतदान झाले तर राज्य विधानसभेसाठी ४५.३% मतदान झाले. या निवडणुकीमुळे भारताने स्वत:ला जगातील समर्थ लोकशाहीचे दर्शन घडविले.

२५ ऑक्टोबर १९५१ रोजी हिमाचल प्रदेशातील चीनी तहसिल कार्यालयात पहिले मतदान झाले आणि भारतात प्रातिनिधीक लोकशाही युगाला सुरूवात झाली. पहिल्या निवडणूकीत काँग्रेसला लोकसभेत ३६४ जागा मिळाल्या. भारतीय कम्युनिस्ट पार्टीने १६ जागा जिंकल्या. आचार्य देव, जयप्रकाश नारायण, डॉ. लोहिया यांच्या समाजवादी पार्टीला १२ जागा तर किसान मजदूर प्रजा पार्टीला ९ जागा मिळाल्या. हिंदूमहासभेला ४ तर डॉ. शामाप्रसाद मुखर्जीच्या भारतीय जनसंघाला ३ जागा मिळाल्या.

लोकसभेसाठीच्या या पहिल्या निवडणूकीत पंडित नेहरू हे स्टार प्रचारक होते. त्यांनी पहिल्या निवडणूक प्रचारासाठी ४० हजार कि.मी.चा प्रवास केला. या काळात जवळ-जवळ ४ कोटी लोकांशी संवाद साधला. आपला पक्ष, धोरणे, मुलभूत अधिकार व कर्तव्य यांची माहिती लोकांना दिली, यामुळे पंडित नेहरूंच्या काँग्रेस पक्षाला ४५% मते मिळाली व पंडित नेहरू हे भारतीय नवनिर्वाचीत 'पंतप्रधान' बनले. काँग्रेसला एवढे भरघोस मतदान होण्याचे कारण म्हणजे पक्षाच्या पाठीशी भारताच्या स्वातंत्र्य चळवळीचा प्रदीर्घ इतिहास, राष्ट्रव्यापक संघटन, आणि स्वातंत्र्य संपादनाची पुण्याई यामुळे राष्ट्रीय काँग्रेस पक्षाला प्रतिकूल मताचे अनुकूल मतात परिवर्तन झाले. या निवडणूकीत बहुसंख्य मतदार निरक्षर असल्यामुळे प्रत्येक मतदारांना ओळखण्यासाठी मतदाराकडे उमेदवारांची चिन्हे देण्यात

आली होती, तसेच प्रत्येक बुथ मध्ये वेगवेगळ्या मतपत्रिका व मतपेट्या देण्यात आल्या होत्या. त्यासाठी लोखंडाच्या दोन कोटी १२ लाख मतपेट्या तयार करण्यात आल्या होत्या.

## २. दुसरी सार्वत्रिक लोकसभा निवडणूक : १९५७

लोकसभेची दुसरी सार्वत्रिक निवडणूक १९ जानेवारी १९५७ ते १ मार्च १९५७ च्या दरम्यान पार पडली. ही निवडणूक पहिल्या सार्वत्रिक निवडणूकीच्या कालावधीपेक्षा कमी कालावधीत पार पडली. पहिली सार्वत्रिक निवडणूक पार पाडण्यास १७ आठवले लागले तर दुसरी लोकसभा निवडणूक १७ दिवसात पार पाडली. यामुळे निवडणूक आयोग ही संस्था अधिक कार्यक्षम व अधिक तत्पर झाल्याचे दिसून आले. ही निवडणूक १९५६ च्या भाषावार प्रांत रचनेच्या नंतरची ही लोकसभा निवडणूक होती. या निवडणूकीत मतदार संख्या १९ लाख ३० लाखावर गेली होती. ४९% टक्क्याहून अधिक मतदारांनी मतदान केले होते. या निवडणूकीत ४५ हून अधिक राजकीय पक्षांनी सहभाग नोंदवला होता. अपक्षांचीही संख्या मोठी होती.

१९५७ च्या लोकसभेच्या एकूण ४९४ जागा होत्या. त्यापैकी ४९० जागांवर काँग्रेसने उमेदवार उभे केले होते. त्यापैकी ३७१ ठिकाणी त्यांना विजय मिळाला. 'पंडित नेहरू'च्या नेतृत्वाखाली ही निवडणूक नि:संशयपणे जिंकली. काँग्रेसनंतर भारतीय कम्युनिस्ट पार्टी हा सर्वात मोठा पक्ष होता. कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया या पक्षाला-२७ जागा. प्रजासमाजवादी पार्टीला-१९ जागा, भारतीय जनसंघाला-१३० उमेदवारापैकी ४ जागा मिळाल्या. या ११९ मतदार संघातून प्रादेशिक पक्षांचे उमेदवार उभे होते, त्यापैकी ३१ जागावर निवडून आले.

१९५७ च्या लोकसभेचे वैशिष्ट्य म्हणजे प्रथमत: केरळमध्ये पहिले बिगर काँग्रेस साम्यवादी पक्षाचे सरकार स्थापन झाले. या निवडणूकीत असे चार दिग्गज निवडून आले ते पुढे भारतीय राजकारणात सर्वोच्च पदावर पोहचले. लालबहादूर शास्त्री (पंतप्रधान), मोरारजी देसाई (पंतप्रधान), अटलबिहारी वाजपेयी (पंतप्रधान), आर. वेंकटरामण (राष्ट्रपती) झाल्याचे दिसते. म्हणजेच हे चार दिग्गज पुढील भारतीय राजकारणाचे चेहरे बनले.

या निवडणूकीचे आणखी एख वैशिष्ट्य म्हणजे विरोधी पक्षच अस्तित्वात नव्हता. कारण निवडणूक लढविलेल्या कोणत्याही राजकीय पक्षाकडे विरोधी पक्षासाठी आवश्यक अशी सदस्य संख्या नव्हती, त्यामुळे दुसरी लोकसभा ही बिना विरोधी पक्षाची होती. या निवडणूकीत प्रादेशिक पक्षांनी ७.६% मतदान घेतले होते. दुसऱ्या लोकसभेत २२ महिला सदस्य निवडून आल्या होत्या. त्याचबरोबर विरोधी पक्षात फूट पडून कम्युनिस्ट पार्टीचे व समाजवादी पार्टीचे अनुक्रमे किसान मजदूर पार्टी व प्रजा समाजवादी पार्टी अशी निर्मिती झाली होती. १९५७ च्या दुसऱ्या लोकसभा निवडणूकीत डॉ. लोहिया, व्ही. व्ही. गिरी अशा दिग्गजांचा पराभव झाला.

## ३. तिसरी सार्वत्रिक लोकसभा निवडणूक : १९६२

लोकसभेची तिसरी सार्वत्रिक निवडणूक फक्त दहा दिवसात पार पडली. या निवडणूकीत पंडित नेहरू यांच्यावर घराणेशाहीचा आरोप झाला. कारण पंडित नेहरू यांनी १९५९ मध्ये त्यांच्या कन्या 'इंदिरा गांधी' यांना काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षपदी नियुक्त केले होते आणि पंडित नेहरूंनी 'इंदिरा गांधी' यांच्या दबावाखाली केरळमधील निवडून आलेले कम्युनिस्ट सरकार बरखास्त केले होते. त्याचबरोबर पंडित नेहरू यांचे जावई फिरोज गांधी यांनी मुंदडाकांडचा पर्दाफाश केला. यामुळे नेहरू सरकारमधील अर्थमंत्री टी. टी. कृष्णम्माचारी यांना राजीनामा द्यावा लागला होता. अशा प्रकरणांच्या पार्श्वभूमीवर ही तिसरी लोकसभा निवडणूक पार पडली.

१९६२ च्या या निवडणूकीत ४९४ जागांसाठी ११ कोटी ९९ लाख मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. म्हणजेच या निवडणूकीत ५५.४२% मतदान झाले. निवडणूकीच्या मैदानात १९८५ उमेदवार उतरले होते. काँग्रेस पक्षाने ४८८ जागा लढवल्या होत्या, त्यापैकी ३६१ जागांवर त्यांना विजय प्राप्त झाला. भारतीय कम्युनिस्ट पार्टीला २९ जागा, स्वतंत्र पार्टीला-१८ जागा, प्रजा-समाजवादी पार्टीला १२ तर समाजवादी पार्टीला ६ जागा मिळाल्या. प्रादेशिक पक्षांनी ३४ जागांवर विजय संपादन केला. नव्याने राजकीय क्षितीजावर आलेल्या स्वतंत्र पक्षाला ओरिसा, बिहार, राजस्थान या राज्यात बराच पाठिंबा मिळाला. प्रादेशिक पक्षापैकी प्रमुख आणि अकाली दल, ओरिसात आसाम गण परिषद त्या-त्या राज्यात कमालीचे यश मिळवले होते.

या निवडणूकीत २१ लाख ६४ मतदारांपैकी ११ लाख ९९ मतदारांनी मतदानाचा हक् क बजावला. तिसऱ्या लोकसभेत ६६ पैकी ३१ महिला विजयी झाल्या. भारतीय कम्युनिस्ट पार्टी विरोधी पक्षावर विराजमान झाली. जनसंघाला या निवडणूकीत १४ जागा मिळाल्या. या निवडणूकीचे खास वैशिष्ट्य म्हणजे या निवडणूकीत काँग्रेस व इतर राजकीय पक्षांच्या माध्यमातून शेतकरी व ग्रामीण पार्श्वभूमी असलेल्या नेतृत्वांचा उदय झाला. त्याचबरोबर १९६२ च्या चीन युध्दाचा पंडित नेहरूंवर गंभीर परिणाम झाला होता. या निवडणूकीत काँग्रेसला पर्याय ठरू शकेल असा कोणताच पक्ष राष्ट्रीय पातळीवर नव्हता. पण मुंदडा कांडाचे भ्रष्टाचाराचे प्रकरण, चीनचे आक्रमण आणि डॉ. लोहियांचे पंडित नेहरूंवरील वागण्याविषयीची प्रखर टिका यामुळे काँग्रेसला गेल्या वेळपेक्षा जागा कमी मिळाल्या, पण बहुमतात फरक पडला नाही. कारण विरोधी पक्षात एकमत नव्हते व ते फुटलेले होते.

## ४. चौथी सार्वत्रिक लोकसभा निवडणूक : १९६७

१९६७ च्या लोकसभेच्या चौथ्या सत्र-३ : सार्वत्रिक निवडणूकीने भारतीय राजकारणात एका नव्या अध्यायाला सुरूवात झाल्याचे दिसते. १९६२ ते १९६७ च्या दरम्यानचा काळ भारतीय इतिहासात अतिसंघर्षाचा काळ म्हणून ओळखला जातो, त्याचे परिणाम देशाच्या राजकारणावर दीर्घकाळ उमटत राहिले. देशावर चीन आणि पाकिस्तानची दोन आक्रमणे झाली. या आक्रमणामुळे

नेहरूंच्या मनातील हिंदी-चीनी-भाई-भाई हे स्वप्न धुळीस मिळाले. हा धक्का सहन न झाल्यामुळे पंडित नेहरूंचे अवघ्या दीड वर्षाच्या आत निधन झाले. १९६४ मध्ये पंडित नेहरूंच्या मृत्युनंतर गुलजारीलाल नंदा काळजीवाहू पंतप्रधान झाले. काही दिवसानंतर नेहरूंचे उत्तराधिकारी म्हणून देशाची सूत्रे लालबहादूर शास्त्री यांच्याकडे सोपविण्यात आली आणि याच पार्श्वभूमीवर १९६७ च्या निवडणूका झाल्या.

१९६५ च्या भारतीय आणि पाकिस्तानच्या युध्दाला प्रांरभ झाला. पुढे सोव्हीएत रशियाच्या हस्तक्षेपामुळे भारत-पाक यांच्यात ताश्कंद करार झाला. कराराच्या वेळीच लालबहादूदर शास्त्री यांचा मृत्यू झाला आणि १९६६ ला इंदिरा गांधी पंतप्रधान झाल्या. या निवडणूकीत लोकसभेच्या ४९४ जागांमध्ये वाढ होऊन या ५२० करण्यात आल्या. १५ कोटी २७ लाख लोकांनी मतदान केले. यावेळी मतदानाची टक्केवारी ६१% होती. निवडणूकीचे निकाल अनपेक्षित होते. या निवडणूकीत काँग्रेस पक्षाला २८३ जागा मिळाल्या. उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश व दिल्लीत जनसंघ प्रभावी ठरला. या निवडणूकीत स्वतंत्र पार्टीला ४४ जागा, जनसंघाला-३५ जागा, भाकपा-२३ आणि माकपला १९ जागा मिळाल्या. तामिळनाडूमध्ये द्रमुकने २५ जागांवर विजय मिळवला. या निवडणूकीत प्रादेशिक पक्षाचे ४३ उमेदवार निवडून आले.

१९६७ च्या निवडणूकीत काँग्रेसची एका बाजूला दैन्यावस्था होत असताना 'डॉ. लोहीयांच्या' गैरकाँग्रेसच्या नाऱ्यामुळे वेगवेगळ्या राज्यात विरोधी पक्षाची सरकारे स्थापन झाली. पं.बंगालबिहार, पंजाब, ओरिसा या राज्यात संयुक्त आघाडीची सरकारे स्थापन झाली. अशा अनेक कारणामुळे भारतीय राजकारणाचा नक्षाच पार बदलून गेला. अनेक राज्यात विरोधी पक्षांची संयुक्त सरकारे स्थापन झाली. १९६९ साली काँग्रेस पक्ष दुभंगला. याला १९६७ ची पार्श्वभूमि होती. इंदिराजींच्या कारभारावर नाराज होऊन चौधरी चरणसिंग यांनी भारतीय क्रांतीदल, बीजू पटनाईक यांनी उत्कल काँग्रेस, महामाया प्रसाद मोरारजी देसाई, कामराज, अतुल्य घोष यांनी वेगवेगळे पक्ष स्थापन केले व इंदिरा गांधी यांच्या विरोधात आवाज उठवला.

### ५. पाचवी सार्वत्रिक लोकसभा निवडणूक : १९७१

१९६९ सालची काँग्रेसमधील फूट आणि वेगवेगळ्या राज्यात स्थापन झालेली संयुक्त सरकारे या पार्श्वभूमीवर ही निवडणूक महत्त्वाची आहे. काँग्रेस किंवा इंदिरा गांधीचे विरोधक एका बाजूला 'इंदिरा हटाव' चा नारा देत होते तर इंदिरा गांधी स्वत: 'गरीबी हटाव'चा नारा देत होत्या. १९७१ च्या लोकसभा निवडणूकीत १५ कोटी जनतेने मतदानाचा हक्क बजावला. या निवडणूकीत ५५.२७ टक्के मतदान झाले. 'गरीबी हटाव'च्या नाऱ्यामुळे इंदिरा गांधींची 'समाजवादी प्रतिमा' तयार झाली. त्याचबरोबर बँकांचे राष्ट्रीयकरण, संस्थानिकांचे तनखेबंद भूमिकेमुळे श्रीमती गांधींच्या पक्षाला अभूतपूर्व यश मिळाले.

१९७१ च्या निवडणूकीत काँग्रेस पक्षाने ३५२ जागावर विजय प्राप्त केला. या निवडणूकीत काँग्रेसमध्ये बंडखोरी केलेल्या संघटना काँग्रेसला २३८ पैकी १६ जागावर विजय मिळाला. संघटना काँग्रेसला गुजरात व बिहार राज्यातच काही जागा मिळाल्या. जनसंघाला २२ जागा, मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टीला २५ जागा तर भारतीय कम्युनिस्ट पार्टीला २३ जागा मिळाल्या. आंध्र व तामिळनाडू या दोन राज्यात प्रादेशिक पक्षांनी जोरदार मुसुंडी मारली. द्रमुकला या निवडणूकीत २३ जागा मिळाल्या.

मोरारजी देसाई वगळता काँग्रेसमधील सर्व नेते पराभूत झाले. या निवडणूकीत 'गरीबी हटाव' नारा प्रभावी ठरला. १९७१ च्या भारत-चीन युध्दानंतर अटलबिहारी वाजपेयी यांनी 'इंदिरा गांधी' यांचा 'दुर्गावतार' अशा शब्दात गौरव केला. पंडित नेहरूंनंतर कोण? आणि 'गुंगी गुडीया'ची विशेषणे या निवडणूकीने पुसून काढली.

## ६. सहावी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक : १९७७

भारताच्या निवडणूक इतिहासातील १९७७ ची सहावी लोकसभा निवडणूक दीर्घकाळ लक्षात राहणारी आहे. या निवडणूकीत मतदारांनी काँग्रेस पक्षाला सत्तेतून पायउतार करून भारतीय राजकारणाचा प्रवाहच बदलून टाकला. एका अर्थाने ही निवडणूक म्हणजे देशाच्या स्वातंत्र्याची दुसरी लढाईच मानली जाते. या निवडणूकीत काँग्रेस पक्षाच्या पराभवाबरोबर स्वतः इंदिरा गांधी देखील पराभूत झाल्या होत्या. १९७१ च्या निवडणूकीतील स्वतःचा 'समाजवादी चेष्टा' म्हणून बहुमत प्राप्त करणाऱ्या इंदिरा गांधीचा करिश्मा १९७४ ला संपला.

१२ जून १९७५ रोजी अलाहाबाद उच्च न्यायालयाने भ्रष्टाचाराच्या सिध्द झालेल्या आरोपांच्या आधारे इंदिरा गांधी यांच्यावर पाच वर्षांसाठी निवडणूक लढवण्यास बंदी घातली. विरोधी पक्षांनी त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली. पण इंदिरा गांधींनी 'राष्ट्रहिताखातर' व लोकाग्राहास्तव त्यांनी ती धुडकावून लावली आणि इंदिरा गांधी यांनी राजीनामा देण्याऐवजी २५ जून १९७५ ला देशात आणीबाणी लागू केली. विरोधी पक्षातील अनेक नेते आणि हजारो कार्यकर्त्यांना तुरुंगात टाकले. संजय गांधी यांच्याकडे अमर्यादित सत्ता देवून त्यांना घटनाबाह्य सत्ताकेंद्र बनविले. त्यामुळे देशात हाहाकार माजला. वृत्तपत्रावर कडक सेन्सारसिप बसवली. सर्व प्रकारच्या टीकाकारांनी मुस्कटबाजी केली. अनेक संघटनावर बंदी आणली. ३८ व ३९ ची घटनादुरुस्ती करून न्यायालयाच्या अधिकारावर मर्यादा आणल्या. न्यायालयाचे न्यायालयीन पुनर्विलोकाचे अधिकार मर्यादित करण्यात आले. या सर्व कारणामुळे इंदिरा गांधींच्या माध्यमातून भारतातील लोकशाहीच्या सर्व प्रक्रियाच नष्ट झाल्या होत्या. अशा परिस्थितीत पाचव्या संसदेची पाच वर्षांची मुदत नियतकालमर्यादा नुसार मार्च १९७६ ला संपली असती पण एक वर्षांनी वाढवण्यात आली. या काळात इंदिरा गांधी विरोधी सूर त्यांना त्यांच्यापर्यंत पोचत नव्हता. त्यामुळे त्यांना वाटले कि, अशा परिस्थितीत आपण निवडणूका घेतल्या तर बहुमत

मिळेल म्हणून त्यांनी जानेवारी १९७७ ला सार्वत्रिक निवडणूकीची घोषणा केली. १९ महिन्यानंतर देशातील आणीबाणी संपली.

१९७७ च्या निवडणूकीत ५४२ जागासाठी झालेल्या या निवडणूकीत ४९२ ठिकाणी काँग्रेसने उमेदवार उभे केले होते. त्यापैकी १५७ ठिकाणी त्यांना विजय मिळाला. ३४.५% मते काँग्रेसला मिळाली. उत्तर भारतात काँग्रेसचा पूर्ण पराभव झाला. सहाव्या लोकसभेत आणीबाणी हा मुद्दा प्रभावी ठरला. पहिल्यांदा विरोधी पक्ष एकत्र आल्याचे दिसले. केवळ कम्युनिस्ट सेडून इतर सर्वांनी एकत्र येवून जनता पक्षाची स्थापना केली. भारतीय लोकदल, समाजवादी पार्टी, जनसंघ आणि बंडखोर काँग्रेस यांच्या एकत्रीकरणातून जनता पक्षाचा उदय झाला. या पक्षाने ४०५ जागांवर आपले उमेदवार उभे केले. त्यापैकी २९५ उमेदवार निवडून आले. ४१% मते त्यांना मिळाली. परत ३ जागा जगजीवन राय यांच्या पक्षाने जिंकल्या होत्या. त्यानी स्वत:ला जनता पक्षात विलीनीकरण करून घेतल्यामुळे जनता पक्षाच्या खासदारांची संख्या २९८ झाली. यामध्ये १९ महिलांचा सहभाग होता. या पक्षाचे नेतृत्व मुरारजी देसाई यांनी केले व देशात पहिले 'बिगरकाँग्रेस' सरकार स्थापन झाले.

या निवडणूकीत संजय गांधी व इंदिरा गांधीना पराभव पत्करावा लागला होता. जनता पक्षाचे नेते रामकृष्ण हेगडे पराभूत झाले होते. जॉर्ज फर्नांडीस तुरुंगात राहूनही निवडणूक जिंकले. अशाप्रकारे १९७७ च्या निवडणूकीत पहिल्यांदा काँग्रेस सत्तेपासून दूर राहिली.

## ७. सातवी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक : १९८०

१९७७ मध्ये झालेले सत्तांतर आणि इंदिरा गांधींनी देशात लागू आणीबाणी लागू केल्यानंतर प्रथमच केंद्रात स्थापन झालेले बिगर काँग्रेस सरकार अल्पजीवी ठरले. जनता पक्षात सहभागी झालेल्या विविध राजकीय पक्षांच्या अंतर्गत मतभेदामुळे अल्पावधीतच कोसळले. इंदिरा गांधींनी केलेले घटनाविरोधी कायदे किंवा घटनादुरुस्त्या रद्द करण्यापुरतेच कार्य या पक्षाने केले. आर्थिक विकासाची दिशा बदलण्याची आश्वासने हे सरकार पूर्ण करण्यास अपयशी ठरले. या सरकारामध्ये मधु लिमये, राजनारायण, जॉर्ज फर्नांडिस, मधु दंडवते, अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, नानाजी देशमुख यांच्यासारखे दिग्गज नेते होते. पण बिहारमधील झालेले दलित हत्याकांड, पक्षाचे सदस्यत्व आणि घटक पक्षामधील सत्तेसाठी निर्माण झालेला ताणतणाव यामुळे सत्तेवर आल्यापासून २ वर्षाच्या आतच जनता पक्ष सत्ता गमावून बसला. चरणसिंग, जगजीवनराम यांनी जनतापक्षाविरुध्द बंड पुकारून त्यांच्या गटातील ९० खासदारांनी मोरारजी देसाई यांचा पाठिंबा काढून घेत त्यांच्याविरुध्द अविश्वास प्रस्ताव दाखल केला. अविश्वास ठराव मंजूर झाल्याने १५ जुलै १९७९ रोजी देसाई सरकारने राजीनामा दिला. त्यानंतर काँग्रेस पक्षाच्या पाठिंब्याने चरणसिंग पंतप्रधान बनले. दुर्दैवाने हे सरकारदेखील केवळ तीन आठवड्यातच कोसळले. त्यांनी विश्वासदर्शक ठराव मांडण्याच्या अगोदरच आपला राजीनामा राष्ट्रपतीकडे सुपूर्द केला व २२ ऑगस्ट १९७९ रोजी लोकसभा बरखास्त झाली.

१९८० च्या सातव्या लोकसभेच्या निवडणूकीत काँग्रेसने ४९२ उमेदवार उभे केले होते. त्यापैकी ३५३ जिंकले. निवडणूकीत जनता पक्षाला-३१, लोकदलाला-४२ जागा, माकपाला-३७ जागा, भाजपाला-१० तर द्रमुकला १७ जागा मिळाल्या. या निवडणूकीत इंदिरा गांधींनी राजकीय स्थैर्य देण्याचे आश्वासन देत निवडणूक जिंकली. जमीनदार, सधन शेतकऱ्यापासून गरीब शेतकरी, कामगार अल्पसंख्यांक व दलित यांनी वेगवेगळ्या कारणास्तव या पक्षाला मते दिली आणि परत इंदिरा गांधी सरकार केंद्रात स्थापन झाले. यानंतर इंदिरा गांधींनी वेगवेगळे कार्यक्रम जाहीर करून प्रशासनावर पकड निर्माण केली. जून १९८४ मध्ये ऑपरेशन ब्ल्यूस्टार सारखी महत्त्वपूर्ण कारवाई केली, पण त्यांच्यासाठी ती आत्मघातकी ठरली. या 'सुवर्ण मंदिरातील' कारवाईमुळे पंजाबमधील शिख समुदाय खूप दुखावला आणि त्यांनी याचा बदला घेण्यासाठी त्यांच्याच शिख अंगरक्षकाने ३१ ऑक्टोबर १९८४ ला त्यांची हत्या केली व उर्वरित कालावधीसाठी पंतप्रधान म्हणून 'राजीव गांधी'नी शपथ घेतली.

## ८. आठवी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक : १९८४

डिसेंबर १९८४ ची निवडणूक ही 'इंदिरा गांधींच्या' हत्येच्या सहानुभूतीच्या लाटेवर स्वार होती आणि ही सहानुभूतीची लाट राजीव गांधींच्या पथ्यावर पडली. या निवडणूकीत राजीव गांधींनी प्रचारादरमयान आपल्या परिवाराच्या योगदानाची भारतीय लोकांना आठवण करून दिली. ही निवडणूक २४ ते २८ डिसेंबर १९८४ पर्यंत चालली. या निवडणूकीत काँग्रेस पक्षाला ४०४ जागा मिळाल्या. भारतीय जनता पक्षाला-२ जागा, जनता पार्टीला-१० जागा, माकपला-२२ जागा, तेलगू देसमला-३० जागा, अण्णा द्रमुकला-१२ जागा मिळाल्या. या निवडणूकीत काँग्रेसला अभूतपूर्व बहुमत मिळाले होते.

१९८४ च्या निवडणूकीचे वैशिष्ट्य म्हणजे 'इंदिरा गांधी'च्या हत्येची सहानुभूतीची लाट या निवडणूकीवर होती. त्यानंतर भारतीय जनता पार्टीला-२ जागा मिळाल्या. आंध्र प्रदेशमधून चंदुपाटीया रेड्डी आणि नरसिंहराव यांना हार पत्करावी लागली होती. तेलगू देसम या पक्षाला ३० जागा मिळून तेलगू देसम हा पक्ष दुसरा मोठा पक्ष बनला होता. या निवडणूकीमुळे प्रादेशिक पक्षांचा उदय आणि प्रभाव प्रामुख्याने जाणवत होता. राजीव गांधींच्या नेतृत्वाखालील सरकारने भारतात 'संगणक क्रांती' आणली म्हणून त्यांना आधुनिक भारताचे पंतप्रधान म्हटले जाते. त्यांनी घेतलेल्या निर्णयामध्ये दूरध्वनी क्रांती, शिक्षणाचा प्रसार, १८ वर्षे पूर्ण झालेल्या युवकांना मतदानाचा अधिकार, पंचायत राज्याचे अधिकारातील वाढ हे महत्त्वपूर्ण निर्णय मानले जातात. पण त्यांच्यावर बोफोर्स घोटाळ्यामध्ये समावेश असल्याचा आरोप करण्यात आला. पुढे १९९१ मध्ये तामिळनाडूमध्ये लिट्टे संघटनेच्या कार्यकर्त्याने त्यांची आत्मघातकी स्फोटाच्या माध्यमातून हत्या केली.

## ९. नववी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक : १९८९

नोव्हेंबर १९८९ च्या महिन्यात नवव्या लोकसभेसाठी निवडणूका झाल्या. सर्वच राजकीय पक्षांनी या निवडणूकीत कोणत्याच प्रश्नांचा किंवा घोषणांचा यावेळी उल्लेख केला नव्हता. विकासाचे मूलभूत प्रश्न, जमातवादाच्या राजकारणाची सुरूवात आणि दारिद्र्य व बेकारीच्या समस्यांनी भारत पोखरला जात असताना कोणत्याही पक्षाच्या अजेंड्यावर विकासाच्या घोषणा नव्हत्या. प्रादेशिक पक्षाच्या प्रभावामुळे सत्तास्पर्धेलाच मध्यवर्ती स्थान प्राप्त झाले होते. ही निवडणूक २२ नोव्हेंबर १९८९ ते २६ नोव्हेंबर १९८९ या कालावधीत पार पडली. मतदारांचे वर्तन मात्र यावेळी भावनिक नव्हते. बोफर्स प्रकरणामुळे राजीव गांधी आणि काँग्रेस पक्षाने आपली विश्वासार्हता गमावली होती. पक्षावरील संकट हे आतून आणि बाहेरून होते.

नववी लोकसभा निवडणूक ५२५ जागेसाठी लढवली. या निवडणूकीत काँग्रेस पक्षाला १९७ जागा मिळाल्या आणि सर्वात मोठा पक्ष म्हणून सरकार स्थापनेचा दावा केला, पण राजीव गांधींचे निकटवर्तीय श्री. विश्वनाथ प्रताप सिंह यांनी पक्षाचा राजीनामा दिला. ११ ऑक्टोबर १९८८ मध्ये जनमोर्चा, जनता पार्टी, लोकदल आणि काँग्रेस (एस) यांनी सर्वांनी मिळून जनता दलाची स्थापना केली. त्यांनी राजीव गांधींना विरोध केला आणि द्रमुक, तेलगू देसम पार्टी आणि आसाम गण परिषद या प्रादेशिक पक्षांसह जनता पक्षाने 'नॅशनल फ्रंट' या आघाडीची स्थापना केली. या निवडणूकीत जनता दलाला १४३ जागा, माकपाला ३३ जागा आणि भाकपाला १२ जागा मिळाल्या होत्या. काँग्रेसला बाहेर ठेवून त्यांनी विश्वनाथ प्रताप सिंहांच्या नेतृत्वाखाली 'नॅशनल फ्रंट'चे सरकार स्थापन केले, पण कोणतीच ठोस कामगिरी करण्यापूर्वीच १० नोव्हेंबर १९९० रोजी ते गडगडले, त्यानंतर याच आघाडीच्या जोरावर चंद्रशेखर देशाचे पंतप्रधान झाले. पण तेही सरकार २१ जून १९९१ रोजी कोसळले.

या निवडणूकीत जनता दलाच्या नेतृत्वाखाली झालेल्या पक्षांनी आपापल्या पक्षाचा दबदबा वाढवावयास सुरुवात केली. मुस्लीम ओबीसी राजकारण सुरू झाले. मंडल, मंदिर व मार्केटला या काळात चालना मिळाली. राममंदिराचा मुद्दा देशासमोर आला. आर्थिक उदारीकरणातून नव्या राजकीय आघाडींना वाव मिळाला. परिणामी त्याचा निवडणूक प्रक्रियेवर प्रभाव पडून अनेक प्रादेशिक राजकीय पक्षांची निर्मिती झाली व आघाडी सरकारांचा प्रयोग सुरू झाला. यामध्ये काँग्रेसच्या ऱ्हासाला सुरूवात झाली व नव्या प्रादेशिक पक्षांचा उदय झाला.

## १०. दहावी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक : १९९१

देशाची दहावी लोकसभा निवडणूक २० जून १९९१ ते १० मे १९९६ साली झाली. १९९१ ची लोकसभा निवडणूक मे-जून १९९१ मध्ये घेण्यात आली. १० वी लोकसभा निवडणूक ही मध्यावधी निवडणूक होती, कारण ९वी लोकसभा आपला कार्यकाल पूर्ण होण्यापूर्वीच म्हणजे १६

महिन्यांनी बरखास्त करण्यात आली होती. ही निवडणूक एका विचित्र किंवा अस्वस्थ वातावरणात घेण्यात आली. अस्वस्थ वातावरण यासाठी व्ही.पी. सिंग सरकारने 'मंडल आयोगाच्या' शिफारशी लागू केल्या हात्या. त्यामुळे देशातील ओबीसी जातींना नोकरीमध्ये २७% आरक्षण मिळणार होते. या निर्णयामुळे देशभरातील सवर्णांनी व सामान्य लोकांनी, विद्यार्थ्यांनी देशभर आंदोलने केली. देशभरात वेगवेगळ्या ठिकाणी जाळपोळ व हिंसाचार झाला होता. त्याचबरोबर दुसऱ्या बाजूला भारतीय जनता पार्टीने हिंदुत्वाचा नारा देत अयोध्यामध्ये मंदिर बांधण्याचा मुद्दा लावून धरला. त्यासाठी लालकृष्ण अडवाणी यांच्या नेतृत्वाखाली देशभर प्रचार व प्रसार केला. मंदिर मुद्यामुळे देशामध्ये दंगे झाले. भाजपाने जाणीवपूर्वक जातीय आणि धार्मिक मुद्यांवर ध्रुवीकरण केले. अशा मंडल आयोगाच्या शिफारशी आणि रामजन्मभूमी बाबरी मशीद यांच्या वादातून निर्माण झालेल्या 'मंडल-मंदिर' या विचित्र परिस्थितीत ही लोकसभा निवडणूक पार पडली.

१०वी लोकसभा निवडणूक ३ टप्प्यात घेण्यात आली. या निवडणूकीत काँग्रेस, भाजपा आणि राष्ट्रीय मोर्चा या आघाड्यांनी भाग घेतला होता. काँग्रेसचे स्टार प्रचारक म्हणून राजीव गांधी होते. पण २० मेला मतदानाच्या पहिल्या टप्प्यातील प्रचार दौऱ्यात असताना एलटीटी द्वारा पुरस्कृत संघटनेच्या महिलेने श्रीपेरूम्बुदूर येथे हत्या केली. त्यामुळे जूनपर्यंत ही निवडणूक स्थगित केली आणि ही निवडणूक १२ जून आणि १५ जूनला झाली. या निवडणूकीत ५३% मतदान झाले. या निवडणूकीत काँग्रेसला २३२ जागा मिळाल्या. तर भारतीय जनता पार्टीला १२० जागा मिळाल्या. जनता दलाला ५९ जागा, माकपला-३६, अण्णाद्रमुकला-१२, झारखंड मुक्ती मोर्चा-७ आणि तेलगू देसम पार्टीला-७ जागा मिळाल्या. २१ जून १९९१ ला काँग्रेसचे पी. व्ही. नरसिंहराव यांनी पंतप्रधान म्हणून शपथ घेतली. गांधी परिवाराचे सदस्य नसलेले पी. व्ही. नरसिंहराव हे दुसरे प्रधानमंत्री होते.

१९९१ ची निवडणूक ही 'मंडल-मंदिर' या विषयावर लढवली गेली. पण या निवडणूकीत काँग्रेस सर्वात मोठा पक्ष म्हणून निवडून आला आणि त्यांनी वेगवेगळ्या छोट्या-छोट्या राजकीय पक्षाचे समर्थन घेवून आपले सरकार स्थापन केले. अल्पमताचे सरकार असून देखील पी. व्ही. नरसिंहराव यांनी स्वत:च्या कुशलपणावर पाच वर्षे टिकविले.

## ११. अकरावी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक : १९९६

लोकसभेची अकरावी निवडणूक एप्रिल-मे १९९६ दरम्यान झाली. पंतप्रधान नरसिंहराव यांनी पाच वर्षाच्या काळामध्ये सरकारमध्ये सुधारणा करण्यासाठी वेगवेगळ्या योजना राबवल्या. आर्थिक उदारीकरणाचा पुरस्कार केला आणि आपला पाच वर्षाचा कार्यकाल पूर्ण केला. या काळात जमातवादाचा राजकारणातील राजरोज वापर, नव्या आर्थिक धोरणातूननिर्माण झालेल्या समस्या, भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणे, राजकारणातील गुन्हेगारीचे वाढते प्रमाण, मंडल आणि मंदिर आंदोलनातून जागृत झालेले सामाजिक न्यायाचे भान इत्यादी प्रश्नामुळे भारतीय जनमानस भांभावल्या परिस्थितीत

वावरत होते. समाजामध्ये राजकारण्याविषयी अविश्वास वाटत होता. शासकीय अस्थैर्य हा एक त्याचा पैलू होता. कारण 'मंडल आणि मंदिर' आंदोलनामुळे जनतेने सरकार बरोबरच प्रशासनाला देखील वेठीस धरले होते. शहरी आणि ग्रामीण असा भेदभाव निर्माण झाला होता. त्यामुळे मतदारांचा कोणत्याच पक्षावर विश्वास उरलेला नव्हता. अशा परिस्थितीत ही निवडणूक पार पडली.

या निवडणूकीत काँग्रेसला फक्त १३२ जागा मिळाल्या आणि भाजपा १६१ जागा मिळून तो सर्वाधिक जागा मिळविणारा पक्ष ठरला. नॅशनल फ्रंटला ७९ जागा, वाममोर्चा-५१ जागा, तमिळी काँग्रेसला २० जागा, द्रमुकला-१७ जागा मिळाल्या. १९९६ च्या निवडणूकीनंतर लोकसभेत मताधिक्य असलेला पक्ष म्हणून भाजपाने १६ मे १९९६ रोजी सरकार बनवले. पण ते सरकार अल्पावधीतच पडले. त्यानंतर एच.डी.देवेगोंडा व आर. के. गुजराल यांनी आपली सरकारे बनवली, पण तीही अल्पजीवी ठरली. या निवडणुकीत प्रादेशिक पक्षांची सरशी झाल्यामुळे केंद्रपातळीवरील राजकारणात त्यांची भूमिका निर्णायक ठरली. त्याचाच परिणाम म्हणजे देवेगौडा पंतप्रधान होणे हा आहे. वरील सगळी सरकारे अल्पजीवी ठरल्यामुळे १९९८ च्या मार्च महिन्यात बाराव्या लोकसभेसाठी निवडणूका झाल्या.

## १२. बारावी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक : १९९८

१९९६ च्या सार्वत्रिक लोकसभा निवडणूकीत भारतीय जनता पार्टी सर्वात मोठा पक्ष म्हणून निवडून आला होता. अटल बिहारी वाजपेयी १३ दिवस प्रधानमंत्री राहिले, पण बहुमत सिध्द करू न शकल्यामुळे राजीनामा द्यावा लागला. त्यानंतर देवेगौडा यांच्या नेतृत्वाखाली संयुक्त मोर्चा गठबंधन सरकार स्थापन झाले. हे सरकार १८ महिन्यापेक्षा जास्त काळ टिकू शकले नाही. परत काँग्रेसच्या पाठिंब्यावर इंद्रकुमार गुजराल-पंतप्रधानाच्या खुर्चीवर बसले, पण तेही सरकार जास्त काळ न टिकल्यामुळे १९९८ ला मध्यावधी निवडणुकीची घोषणा झाली.

या निवडणूकीत वेगवेगळ्या पक्षांच्या निवडणूकपूर्व आघाड्या स्थापन केल्या आणि स्पर्धेत उतरल्या. या निवडणूकीत भारतीय जनता पक्षाने आपल्या हिंदुत्ववादी मागण्यांना मुरड घालून राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे नेतृत्व केले. या निवडणूकीत भाजपाला १८० जागा आणि भाजप-नेतृत्वाखालच्या आघाडीला २५२ जागा मिळाल्या तर काँग्रेसला १०० जागा आणि काँग्रेस नेतृत्वाखालच्या आघाडीला १६६ जागा मिळाल्या आणि तिसरी राष्ट्रीय मोर्चा व डावी आघाडी ९६ जागा मिळवू शकली. सीपीएमला ३२ जागा, समता पाटी-१२, जनता दल-६ आणि बसपाला-५ जागा मिळाल्या. या निवडणूकीचे वैशिष्ट्य म्हणजे या निवडणूकीत १५० जागा वेगवेगळ्या प्रादेशिक पक्षांनी जिंकल्या होत्या.

अटलबिहारी वाजपेयी यांनी भाजपा, शिवसेना, अकाली दल, समता पार्टी, बिजु जनता दल इत्यादी पक्षांचे सहकार्य घेवून सरकार बनविले. या सरकारचे नेतृत्व भारतीय जनता पार्टीच्या

‘अटलबिहारी वाजपेयी’ यांनी केले. राष्ट्रीय पक्षाला नाकारण्याची मतदारांची प्रवृत्ती या निवडणूकीत पुन्हा एकदा प्रत्ययाला आली. १३ महिन्यानंतर अटल बिहारी वाजपेयी सरकारचा पाठिंबा एआईएडीएमके ने काढून घेतल्यामुळे सरकार कोसळले. १९९१ ते १९९९ च्या काळात वारंवार झालेल्या सार्वत्रिक निवडणूकांचा सर्वाधिक लाभ ओबीसी घटकांना झाला. याच घटकाला पहिल्यांदा लोकसभेत प्रवेश करण्याची संधी मिळाली. दुसरे वैशिष्ट्य म्हणजे घटक राज्ये आणि प्रादेशिक पक्षांची भूमिका ही केंद्रपातळीवरील निवडणूकीत निर्णायक ठरत गेली. राजकीय निष्ठा, मते आणि सामाजिक अस्मिताही राज्यपातळीवरून ठरविल्या जाऊ लागल्या. १९९० नंतरच्या निवडणूकीमधील स्पर्धात्मकता एवढी वाढली की त्यामुळे एकपक्षीय सरकारे इतिहास जमा होवून केंद्रात आणि अनेक राज्यात अनेक पक्षांची संमिश्र सरकारे येत राहिली.

## १३. तेरावी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक : १९९९

१७ एप्रिल १९९९ मध्ये अटलबिहारी वाजपेयी सरकारने १२ व्या लोकसभेतील अविश्वासाच्या ठरावानंतर आपल्या मंत्रीमंडळाचा राजीनामा दिला होता आणि सांगितले होते की, २५ पक्षांच्या या संयुक्त पुरोगामी आघाडीच्या घटकपक्षामध्ये असामंजस्य व अंतर्गत विरोध यामुळे मी राजीनामा देत आहे असे स्पष्टीकरण पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांनी दिले होते. खरे कारण जयललिता आणि त्यांचा पक्ष अण्णाद्रमुक होता. अटलबिहारी वाजपेयी यांच्याआघाडीत सहभागी झाल्यापासून जयललिता यांनी वाजपेयी यांच्याकडे तामिळनाडूमधील द्रमुकच्या ‘करूणानिधी’च्या सरकारवर भ्रष्टाचाराचे, घटनाविरोधी वर्तनाचे आरोप लावून ते सरकार बरखास्त करावे आणि तिथे राष्ट्रपती राजवट लावावी अशी मागणी केली होती, पण भाजपा ‘जयललिता’ यांनाच भ्रष्टाचारी मानत होती आणि त्यांनी स्वत:ला वाचवण्यासाठी परत त्या ‘मुख्यमंत्री’ होण्याचे स्वप्न पाहत आहेत असे वाटत होते. जयललिता यांची मागणी त्यांनी मान्य केली नाही. त्यामुळे जयललिता यांनी भाजपाच्या सरकारचा पाठिंबा काढून घेतला आणि सरकार कोसळले आणि परत निवडणूक आयोगाने तेराव्या लोकसभेसाठी निवडणूक जाहीर केली.

१९९९ च्या १३ व्या लोकसभेच्या निवडणूकीत ४५ पक्षांनी सहभाग घेतला होता. त्यामध्ये ६ राष्ट्रीय आणि बाकीचे प्रादेशिक पक्ष होते. ५४३ जागांसाठी निवडणूका झाल्या. या निवडणूकीत भाजपाने ३७० वे कलम रद्द करणे, राममंदीर बांधणे, वित्तीय सुधारणा, या मुद्द्यांच्या आधारे प्रचार केला. तसेच या निवडणूकीत भाजपाने उदारीकरणाचे धोरण थोडे बाजूला ठेवून स्वदेशीचा पुरस्कार केला. त्याचबरोबर ‘कारगील युध्द’ आणि ‘पोखरण’मधील अणुचाचणी यामुळे भारतात वाजपेयी यांच्यावर किंवा भारतीय जनता पक्षावर मोठी निष्ठा निर्माण झाली होती. कारगिल युध्दामुळे भारताची ‘लष्करी क्षमता’ सिध्द झाली होती. वरील सर्व कारणांनी १३वी निवडणूक ‘भाजपाच्या’ बाजूने होती. दुसऱ्या बाजूला काँग्रेसच्या अध्यक्षपदी ‘सोनिया गांधी’ यांची निवड करण्यात आली. त्याचवेळी शरद

पवार, पी.ए.संगम्मा आणि तारीक अन्वर यांनी सोनिया गांधींच्या विरोधात विदेशी नागरिकत्वाचा मुद्दा मांडून बंडखोरी केली आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना केली. हाच विदेशी नागरीत्वाचा मुद्दा भाजपाने प्रचाराचा मुद्दा केला. ६ ऑक्टोबर १९९९ ला लोकसभेचा निकाल जाहीर झाला. यानिवडणूकीत अटल बिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीला २९८ जागा मिळाल्या. त्याचबरोबर द्रमुक, एम.डी. एम.के. तेलगू देसम, संयुक्त जनता दल यांच्या पाठिंब्यामुळे ३०२ जागाच्या पाठिंब्यावर राष्ट्रीय लोकशाही आघाडी सत्तेवर आली. काँग्रेस पक्षाच्या आघाडीला १३६ जागा मिळाल्या. काँग्रेसचा या निवडणूकीत मोठा पराभव झाला आणि त्या पक्षास लोकसभेत ११२ जागा मिळाल्या. तेलगू देसमला-२९, जनता दल (यु)-१८, नॅशनल कॉन्फरन्स-४, शिवसेना-१५, बिजू जनता दल-१० आणि शिरोमणी अकाली दलाला १० जागा मिळाल्या. १३ ऑक्टोबर १९९९ मध्ये पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील संयुक्त पुरोगामी आघाडीचे सरकार सत्तेवर आले.

या निवडणूकीनंतर अटलबिहारी वाजपेयी यांनी जाणीवपूर्वक मंत्रिमंडळ निर्माण केले होते. राम नाईक यांना पेट्रोलियम मंत्री केले. 'संरक्षण मंत्री' जॉर्ज फर्नांडिस यांच्याकडे दिले. त्याचबरोबर या सरकारने उदारीकरणाचे धोरण पुढे रेटले. आता हिंदुत्ववादाला विकासाची किनार लाभली होती. परकीय गंगाजळीत मोठी वाढ होत होती. मुरली मनोहर जोशी यांच्या इतिहासकारांनी हिंदु संस्कृतीचा गौरव करीत सर्व सांस्कृतिक व शैक्षणिक संस्थांवर आपल्या माणसांना नेमायला सुरुवात केली होती. एकूणच शिक्षणाचे भगवेकरण करण्याचा प्रयत्न सुरू केला. पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद अमेरिकेच्या मदतीने नियंत्रणात आणला. भारताने एक प्रादेशिक सत्ता म्हणून उदयास येण्यासाठीचा सरकारने प्रयत्न केला.

## १४. चौदावी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक : २००४

भारतीय निवडणूक आयोगाकडून २० एप्रिल २००४ ते १० मे २००४ या कालावधीत चौदाव्या लोकसभेसाठी निवडणूक घेण्यात आल्या. या निवडणूकीत वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडी आणि सोनिया गांधी यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेस पक्षाची संयुक्त पुरोगामी लोकशाही आघाडी यांच्यात लढत झाली. या निवडणूकीत सोनिया गांधी यांनी आपली राजकारणातील परिपक्वता दाखवली. कारण का १९९७ मध्ये भारतीय जनता पक्षाने आपल्या 'रालोआ' या आघाडीची जमवाजमव सुरू केली. अकाली दल, अण्णाद्रमुक, शिवसेना, तृणमुल काँग्रेस, समता पक्ष, बिजू जनता दल या पक्षांचा पाठिंबा मिळवून १९९८ ची निवडणूक जिंकली होती. त्यामुळे सोनिया गांधी यांनीही आघाडी मजबूत केली होती.

लोकसभेच्या ५४२ जागांसाठी आणि आंध्र प्रदेश, ओरीसा व सिक्कीम या राज्याच्या विधानसभा घेण्यात आल्या. ही निवडणूक भारतीय जनता पक्षाने मोठ्या तयारीने लढविल्या. केंद्रात

सत्ताधारी असल्यामुळे त्यांच्याजवळ निधी व साधने मोठ्या प्रमाणात होती. प्रचाराचे अटलबिहारी वाजपेयी आणि लालकृष्ण अडवाणी हे स्टार प्रचारक होते. या सर्व प्रचार मोहिमेचे सूत्रधार भाजपाचे सरचिटणीस प्रमोद महाजन होते. या निवडणूकीत भाजपाने १७ हेलीकॉप्टर्स व एक विमानाचा उपयोग केला. भाजपा सरकारने निवडणूक घोषित होण्याआधी सरकारी खर्चाने सुमारे ५५० कोटी रुपयांच्या जाहीराती केल्या होत्या. याउलट काँग्रेसने प्रचार शांतपणे केला. काँग्रेसची घोषणा 'काँग्रेस का हाथ। आम आदमी के साथ' होती आणि ती लोकांना पसंद पडली होती. भाजपामुळे भ्रष्टाचार, अकार्यक्षमता, जातीयवाद, जातीय दंगली आणि 'धर्मनिरपेक्षतेस' धोका आहे. हा 'विषय' काँग्रेसच्या प्रचाराचा मुद्दा होता. 'फील गुड' व 'इंडिया शायनिंग'च्या घोषणा कशा चुकीच्या आहेत हे त्यांनी लोकांना पटवून दिले. श्रीमती सोनिया गांधी या पक्षाच्या स्टार प्रचारक होत्या. त्यांनी ६० सभा घेतल्या, रोड शो केले. राहूल गांधींनी देखील प्रचार केला.

१३ मे २००४ रोजी चौदाव्या लोकसभेचा निकाल जाहीर झाला. या निवडणूकीत सर्वांना धक्का बसेल असा निकाल लागला. सत्ताधारी राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा मोठा पराभव झाला. आघाडीला १८८ जागा मिळाल्या तर काँग्रेसला संयुक्त लोकशाही आघाडीला २१७ जागा मिळाल्या. तर डाव्या पक्षांना ६४ जागा मिळाल्या. सोनिया गांधींनी ज्या मतदारसंघात ६० सभा घेतल्या होत्या त्यापैकी ५९ जागी उमेदवार निवडून आले होते. १९९६, १९९८, १९९९ या सतत तीन निवडणूकीत सर्वात जास्त जागा मिळवणाऱ्या भाजपाचा पराभव झाला. २००४ च्या या निवडणूकीत काँग्रेसला-१४५ जागा, भाजपाला-१३८, समाजवादी पाटी-३६, राजद-२१, बसपा-१९, द्रमुक-१६, बिजु जनता दलाला-८ जागा मिळाल्या.

भारतीय जनता पक्षप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीस फक्त १८८ जागा मिळाल्यामुळे भाजपाचे नेते नाराज झाले. कारण आपणच निर्माण केलेल्या मोहजालात ते अडकले. काँग्रेसने आघाडीचे २१७ खासदार आणि डाव्यांचे ६४ खासदार एकत्र करून बहुमत मिळवले. त्यानंतर बसप, समाजवादी पक्ष, धर्मनिरपेक्ष जनता दल, राष्ट्रीय लोकदल यांनीही काँग्रेसला पाठिंबा जाहीर केला. त्यामुळे नव्या सरकारला ३२५ पेक्षा जास्त खासदारांचा पाठिंबा मिळाला. काँग्रेस संसदीय पक्षाने सोनिया गांधी यांची नेतेपदी निवड केली. त्यानंतर त्यांनीच पंतप्रधान व्हावे असा आग्रह काँग्रेस नेत्यांनी धरला पण सोनियांनी पंतप्रधानपद स्विकारण्यास नकार दिला आणि मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखालील संयुक्त पुरोगामी आघाडीचे सरकार स्थापन केले. २२ मे २००४ रोजी मनमोहनसिंग यांनी व ६८ मंत्र्यासह पद आणि गोपनियतेची शपथ घेतली.

### १५. पंधरावी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक : २००९

१६ एप्रिल २००९ ते १३ मे २००९ या काळात पंधरावी लोकसभा निवडणूक पार पडली. या निवडणूकीत देशात पाच टप्प्यात मतदान झाले. ही निवडणूक सोनिया गांधी यांच्या नेतृत्वाखाली

संयुक्त पुरोगामी आघाडी, लालकृष्ण अडवाणी यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय लोकशाही आघाडी, तिसरी आणि चौथी आघाडी व अन्य स्वतंत्र पक्ष यांच्यामध्ये झाली. या निवडणुकीचे वैशिष्ट्य म्हणजे समान ताकद असणाऱ्या शक्ती अर्थात संयुक्त पुरोगामी आघाडी, राष्ट्रीय लोकशाही आघाडी, तिसरी आघाडी व्यतिरिक्त समाजवादी पक्ष, राष्ट्रीय जनता दल आणि लोकजनशक्ती या पक्षांची मिळून चौथी आघाडी ही निवडणूकीपूर्वीच निर्माण केल्या होत्या. या निवडणूकपूर्व आघाड्यांच्या मार्फत ही २००९ ची लोकसभा निवडणूक लढवली गेली. काँग्रेसपूर्व आघाडीत राष्ट्रवादी काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, नॅशनल कॉन्फरन्स, द्रमुक, झारखंड मुक्ती मोर्चा, रिपाई, केरळ काँग्रेस इत्यादी तर भाजपा पुरस्कृत आघाडीत शिवसेना, संयुक्त जनता दल, शिरोमणी अकाली दल, राष्ट्रीय लोकदल, आसाम गण परिषद, इंडियन नॅशनल लोकदल, एमएनएफ आणि तिसऱ्या आघाडीत माकप, शेकाप, तेलगू देसम, अण्णाद्रमुक जद (एस) तेलंगणा राष्ट्र समिती, फॉरवर्ड ब्लॉक, क्रांतीकारी समाजवादी पक्ष, झारखंड विकास पार्टी, एम.डी. एम.के. इत्यादी पक्ष सहभागी होते.

निवडणूक काळात वेगवेगळ्या राजकीय पक्षांनी जाहीरनाम्याच्या माध्यमातून धोरणांचे प्रकटीकरण करण्यात आले. या निवडणूकीत काँग्रेसने 'जय हो' चा नारा लावत आम आदमीच्या विकासाचे आश्वासन दिले. तर भाजपाने सुरक्षा, सुशासन व विकास या तीन गोष्टींबरोबर राममंदीर, रामसेतू व ३७० वे कलम रद्द करण्याचे आश्वासन दिले होते. काँग्रेसने ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील लोकांना १०० दिवस काम, २५ किलो गहू व तांदूळ देण्याचे आश्वासन दिले होते. काँग्रेसने राहूल गांधींना नवीन चेहरा म्हणून पुढे केले. राहूल गांधींनी १०६ मतदार संघात ११२ सभा घेतल्या. मनमोहनसिंग यांनी राजकीय स्थिरता व देशाचा आर्थिक विकास या मुद्द्यांना पुढे करत काँग्रेस आघाडीच्या कामगिरीवर सभांमधून प्रकाश टाकला. नरेंद्र मोदी आणि त्यांच्या टीमने डिजीटल व संचार माध्यमातून प्रचार केला. मोदींनी प्रथम विकासाचा मुद्दा पुढे केला मात्र सरतेशेवटी मोदी परत हिंदुत्ववादाकडे वळले.

१६ मे २००९ रोजी लोकसभेचा निकाल जाहीर झाला. संयुक्त पुरोगामी आघाडीने २६२ जागा मिळवून या निवडणूकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा मोठा पराभव केला. राष्ट्रीय लोकशाही आघाडीला केवळ १५९ जागांवर समाधान मानावे लागले. पंधराव्या लोकसेभत काँग्रेसला २०६ जागांपैकी १०६ जागा मिळाल्या. काँग्रेसने निवडणूकपूर्व आघाडी व निवडणूकीनंतर पाठिंबा मिळालेल्या पक्षांच्यामुळे काँग्रेसचे ३२१ संख्याबळ झाले. २३ मे रोजी नव्या सरकारचा शपथविधी पार पडला आणि डॉ. मनमोहन यांच्या नेतृत्वाखाली संयुक्त पुरोगामी आघाडीचे सरकार स्थापन झाले. या निवडणूकीत राष्ट्रवादी काँग्रेसला-०९ जागा, भाजपाला-११६, तृणमूल काँग्रेसला-१९, शिवसेना-११ जागा, संयुक्त जनता दल-२१ जागा, माकप-१६, समाजवादी-२३, बसपा-२१ जागा मिळाल्या. या निवडणुकीची आणखी महत्त्वाची गोष्ट आहे. दुसरी गोष्ट म्हणजे मीराकुमार यांना लोकसभेच्या

पहिल्या भारतीय महिला 'सभापती' म्हणून नियुक्त करण्यात आलेले आहे. या निवडणूकीमुळे नव्या राजकीय बदलाना पुन्हा सुरुवात झालेली आहे. राष्ट्रीय पक्षांना पुन्हा महत्त्व आलेले आहे. प्रादेशिक प्रश्नांमध्ये राजकीय पक्षांनी गुरफूटून न राहता राष्ट्रीय हित व अखिल भारतीय प्रश्नाकडे पाहावे असा आदेश जनतेने राजकीय स्थिरतेसाठी व आर्थिक विकासासाठी दिलेला आहे, होता.

## १६. सोळावी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक : २०१४

सोळावी लोकसभा निवडणूक ७ एप्रिल २०१४ ते १२ मे २०१४ या कालावधीत नऊ टप्प्यांमध्ये पार पडली. १६ मे रोजी सर्वाची सार्वत्रिक मतमोजणी झाली. या निवडणूकीत प्रथमच 'नोटा' म्हणजे 'यापैकी कुणीही नाही' असे मत व्यक्त करण्याची संधी देणारा पर्याय मतदारांना होता. मताधिकार बजावण्याची पावती देणारी वीस हजार यंत्रे लावण्यात आली होती. २०१४ च्या निवडणूकीत अर्धशतकाहून अधिक काळ सत्तेवर असलेल्या काँग्रेस पक्षाला सर्वात कमी मते पडली होती. म्हणजेच १९८४ नंतर गेल्या तीस वर्षात एकाच पक्षाला बहुमत मिळून भाजपाचे नरेंद्र मोदी हे प्रथमच लोकसभेत स्पष्ट बहुमत मिळवून सत्तेवर आलेले 'पंतप्रधान' आहेत.

१६ मे रोजी जाहीर झालेल्या या निवडणूकीत भारतीय जनता पार्टीला सर्वात जास्त २८२ जागा मिळाल्या होत्या. त्यानंतर काँग्रेस-४४, शिवसेना-१८, भाकप-१, माकप-९, राष्ट्रवादी काँग्रेस-६, आण्णा द्रमुक-३७ जागा, तृणमूल काँग्रेसला-३४ वर तर तेलगू देसमला-१६ जागा मिळाल्या. एकेकाळी काँग्रेस ४०४ जागावरून या निवडणूकीत ४४ जागावर आला होता, तर भाजपा २ जागांवरून २८२ जागांवर पोहचला होता. भाजपा आणि काँग्रेस पक्षांना मिळालेली मते ५०.३ टक्के होती तर इतर प्रादेशिक पक्षांना ४९.७ टक्के मते मिळाली होती, याचा अर्थ म्हणजे भारतातील निम्म्या मतदारांनी काँग्रेस व भाजपाच्या उमेदवारांना नाकारले होते. या निवडणूकीमुळे काँग्रेस मुळापासून उखडली आणि प्रादेशिक पक्षाचा वरचष्मा कमी झाल्याचे दिसते. या निवडणूकीत केवळ तीन उमेदवार विजयी झाले होते. तसेच 'नोटा'चा वापर तब्बल ६० लाख लोकांनी मतदान केले होते. काँग्रेसला अवघ्या ४४ जागा आणि १९.३% मते या पक्षाला मिळाली असून पक्षाच्या इतिहासातील हा नीचांक आहे. २००४ पासून सत्तेत असलेल्या काँग्रेसच्या नेतृत्वाखालील आघाडीतील पक्षावर भ्रष्टाचाराचे आणि मनमोहन सिंग यांच्या अत्यंत अकार्यक्षम सरकारला लोक कंटाळले होते. त्याचाच फायदा 'मोदी' यांनी घेतला. मोदींनी योजनाबध्द प्रचार करून, डिजीटल प्रसार माध्यमातून 'गुजराथ मॉडेल' म्हणून जनतेसमोर आणले. प्रचार आणि जाहीरात याच्या साहाय्याने आता जणू 'मोदींशिवाय तरणोपाय नाही' अशी भावना तयार करून भाजपाने ही निवडणूक जिंकली. दुसरी बाजू म्हणजे राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे नेतृत्व हा कळीचा मुद्दा होता. काँग्रेसच्या राष्ट्रीय अभ्यासाच्या नेतृत्वावर कोणाचा विश्वास नव्हता. राहुल गांधींना मोदी पर्याय म्हणून पुढे रेटले, पण त्यांचा टिकाव लागू शकला नाही. या निवडणूकीत प्रचाराच्या दरम्यान पंतप्रधान मनमोहन सिंग व त्यांच्या मोठ्या नेत्यांनी भारतभर फिरून

प्रचार केला नाही तसेच माध्यमांच्या व्यवस्थापनात हा पक्ष कमकुवत ठरला. वरील सर्व कारणाने 'भारतीय जनता पार्टीचा' विजय झाल्याचे दिसून येते.

## १७. सतरावी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक : २०१९

सतराव्या लोकसभा निवडणुकीची अधिकृत घोषणा मुख्य निवडणूक आयुक्त सुनिल अरोरा यांनी १० मार्च २०१९ रोजी केली. या निवडणूका ११, १८, १९ एप्रिल आणि ६, १२, १९ मे २०१९ या सात टप्प्यात झाल्या. निवडणूक आयोगाने दिलेल्या आकडेवारीनुसार या निवडणूकीत एकूण मतदार संख्या ९० कोटी होती, त्यापैकी ८.४ कोटी हे नव्याने नोंदणी झालेले सदस्य होते. १८ ते १९ या वयोगटातील १.५ कोटी मतदार होते. तृतीयपंथी मतदार ३८ हजार ३२५ तर परदेशातील मतदार ७१.७९५ होते. या निवडणूकीसाठी १० लाख मताधिकार केंद्रे होती. त्यामध्ये २३.३ लाख यंत्रे व १७.४ लाख व्ही.व्ही.पॅट यंत्रे होती. निवडणूक आयोगाच्या नोंदीनुसार देशात सात मान्यताप्राप्त राष्ट्रीय पक्ष आणि ५२ राज्यस्तरीय पक्ष आहेत, तर एकूण पक्षांची संख्या २३५४ इतकी होती.

सतराव्या लोकसभा निवडणूकीत भाजपाने 'मै चौकीदार हूँ' व भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने 'चौकीदार चोर है', 'लोकशाही विरुध्द हुकूमशाही' या ट्रेंडसभोवती फिरवली. ही निवडणूक आघाड्यांचीच होती. या निवडणूकीत काँग्रेस आघाडीत २०-२१ पक्ष समाविष्ट होते. तर भाजपा आघाडीत ३० ते ४० पक्ष सहभागी होते. २०१९ च्या या सार्वत्रिक निवडणूकीत भाजपाने पुलवामाच्या आत्मघातकी हल्ला आणि त्यानंतरची सैनिक कारवाई (सर्जिकल स्ट्राईक), त्यानंतर दहशतवादावर केलेल्या कारवाया यांचा अतिशय चपखलपणे प्रचारात वापर केला. काँग्रेसने सोनिया गांधी, राहूल गांधी आणि प्रियांका गांधी यांनी सरकारच्या कारभाराचे वाभाडे काढले. नोटाबंदीच्या परिणामांवर व भ्रष्टाचाराचा प्रचार केला. या निवडणूकीत जवळजवळ १०% मतदार हा नवमतदार असल्यामुळे सर्वच राजकीय पक्षांनी 'सोशल मिडिया'चा प्रचंड प्रमाणात वापर केला. भाजपाला ही निवडणूक बेरोजगारी, न आलेले अच्छे दिन, शेती क्षेत्राची लागलेली वाट, धोक्यात आलेली बँकिंग व्यवस्था, स्वच्छ भारत आणि स्टार्ट-अप इंडियाचे अपयश यामुळे अपयशाकडे घेवून जाणारी होती, पण या पक्षाने जाणीवपूर्वक सांस्कृतिक व भारतीय राष्ट्रवादाचा बागुलबुवा उभा केला आणि त्याला यश मिळाल्याचे दिसून येते. दुसऱ्या बाजूला काँग्रेसमध्ये पर्यायाने पक्षामध्ये संस्थात्मक संघटन बळकट नव्हते. पक्षाला प्रभावी असा पक्षाध्यक्ष नव्हता, प्रचारासाठी प्रभावी असे मुद्दे असताना देखील तर प्रचार जनसामान्यांपर्यंत पोहचू शकला नाही. याचाच फायदा भाजपाला झाल्याचे दिसून येते. लोकसभा निवडणूकीला कलाटणी किंवा नवी वळण देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. ती पुलवामा, बालाकोट प्रकरणाने. या प्रकरणाने मोदींच्या हातात देश सुरक्षित आहे ते देशाला खंबीर नेतृत्व देऊ शकतात, असा प्रचार इलेक्ट्रॉनिक माध्यमातून भाजपाने केला.

या निवडणूकीत भारतीय जनता पार्टीला सर्वाधिक ३०३ जागा मिळाल्या. तर काँग्रेसचा दारूण पराभव झाला. काँग्रेसला या निवडणूकीत सर्वात कमी ५२ जागा मिळाल्या. शिवसेना-१८, जनता दल-१६, डिएमके-२३, राष्ट्रवादी-५, तृणमूल काँग्रेस-२२ आणि बिजु जनता दल-१२, वाय.एस.आर.-१६ जागा मिळाल्या.

अशाप्रकारे भाजपा पुरस्कृत एन.डी.ए.ला ३५० जागा,

काँग्रेस पुरस्कृत युपीए ला ९६ तर इतर पक्षांच्या आघाडीला ९६ जागा मिळाल्या. या निवडणूकीत ३०० उमेदवार प्रथमच निवडून आले आहेत. इतिहासातील सर्वाधिक ७८ महिला खासदारानी या लोकसभेत प्रवेश केला आहे. ईव्हीएम यंत्रावर प्रथमच या निवडणूकीत उमेदवारांची छायाचित्रे देण्यात आली होती. तर महाराष्ट्रातील गौरी सावंत ही पहिली तृतीयपंथी निवडणूक दूत ठरली आहे. अशाप्रकारे भारतीय जनता पक्षाने सर्वाधिक जास्त उमेदवार जिंकून या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन केले.

*** स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - १ ***

- **गाळलेल्या जागा भरा.**

१. भारताचे पहिले पंतप्रधान ............. हे होते.

२. पंडित नेहरूंच्या मृत्यूनंतर ............. हे हंगामी पंतप्रधान बनले.

३. ................. हे भारतीय जनसंघाचे पहिले खासदार आहेत.

४. १९७१ साली ............... यांच्यात युद्ध झाले.

५. १९७७ च्या जनता पक्षाचे नेतृत्व ................. यांनी केले.

## २.२.२ एकपक्ष प्रबळ पक्षपध्दती ते स्पर्धात्मक बहुपक्ष पध्दती

### २.२.२.१ अ) प्रस्तावना

प्रातिनिधीक लोकशाहीत आपण मताधिकारी ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, नगरपालिका, विधानसभा अगर लोकसभा या सभागृहाचे सर्वाधिकारी किंवा अंतिम अधिकार असतो. परंतु हा आपला अधिकार आपण निवडून दिलेल्या आपल्या प्रतिनिधींच्या मार्फत चालत असतो. लोकांच्या आशा, आकांक्षा, अपेक्षा पूर्ण करण्याची किंवा लोककल्याणकारी योजनांची धोरण राबवण्याची व ठरविण्याची जबाबदारी ही आपण निवडून दिलेल्या प्रतिनिधीकडे असतो. हा प्रतिनिधी कोणत्यातरी पक्षीय संघटनेचा किंवा वर्गसंघटनेचा घटक असतो. पक्षीय संघटनेचा किंवा वर्गसंघटनेचा असणे हा देखील महत्त्वाचा असतो, कारण समाजाचे किंवा विशिष्ठ वर्गाचे जे सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक गरजा असतात. त्यासंबंधी सुसंगत धोरणे निर्माण करून मार्गदर्शन करणाऱ्या धोरणाची असते, असे धोरण

ठरविण्याची जबाबदारी राजकीय पक्षाची असते. त्यामुळे राजकीय पक्षांची आवश्यकता असते आणि आपल्या बुध्दीला व अनुभवांना जी धोरणे योग्य वाटत असतील त्याची निवड करून त्या-त्या राजकीय पक्षामध्ये आपण सहभागी असणे ही लोकशाहीच्या सक्षमतेच्या व सुदृढतेच्या दृष्टीने आवश्यक असते आणि त्यातच लोकशाहीचे मर्म आहे.

लोकसभेच्या कार्यवाहीची योग्यरितीने परिपूर्ती करण्यासाठी, लोकशाहीच्या संवर्धनासाठी व संरक्षणासाठी आणि राष्ट्राची आरोग्य संपदा आणि जागतिक राजकारणातील सन्माननीय स्थान व जबाबदारी संबधाची विश्वसनीयता कायम राखण्यासाठी राजकीय पक्षाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. मानवी जीवनावश्यक माणसांनी मोठ्या सखोल आणि उत्तुंग अशा स्वरूपाची तत्वज्ञान व सिध्दांत बनविले आहेत. त्यांच्या सामूहिक सिध्दतेसाठी सामूहिक प्रयत्न करण्याचे साधन म्हणून राजकीय पक्षाची निर्मिती केली जाते. प्रचार व प्रसारमाध्यमे यामधून पक्षाच्या भूमिका लोकांपर्यंत पोहोचविल्या जातात आणि मताधिकाऱ्याचा पाठिंबा मिळवण्यासाठी राजकीय पक्ष निवडणूकांना उभे राहतात. अशी राजकीय पक्षांची लोकशाहीवादी पध्दत असते.

भारतातील पक्षपध्दतीची जडणघडण ही देशातील सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, भौगोलिक घटकाच्या प्रभावातून झालेली दिसून येते. भारतात राजकीय पक्षांचा उदय ब्रिटिश काळात झाला. १८८५ मध्ये भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसची स्थापना ही भारतातील पक्षपध्दतीचा प्रारंभ मानला जातो. त्यानंतरच्या काळात वेगवेगळ्या विचारसरणीच्या आधारावर वेगवेगळे पक्ष उदयाला आले. उदा. मुस्लीम लिग, मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टी, साम्यवादी पक्ष, हिंदु महासभा इत्यादी. या पक्षांचे कार्य १९४७ पूर्वी भारत स्वतंत्र करणे हेच सर्वात महत्त्वाचे कार्य होते. पारतंत्र्याच्या काळात स्थापन झालेल्या वेगवेगळ्या पक्षामध्ये वैयक्तिक मतभेद असले तरी अनेक गट कॉंग्रेसच्या नेतृत्वाखालच्या चळवळीत सामील होते. १९३४ मध्ये कॉंग्रेसमध्ये निर्माण झालेला समाजवादी गट १९४८ मध्ये जयप्रकाश नारायण आणि अशोक मेहता यांच्या नेतृत्वाखाली बाहेर पडून 'समाजवादी पक्ष' म्हणून नावारूपाला आला. १९५१ मध्ये आचार्य कृपलानी यांनी कॉंग्रेस पक्षाचा त्याग करून किसान मजदुर प्रजा पक्षाची स्थापना केली. पुढे या पक्षाचे नामकरण प्रजा समाजवादी पक्ष असे झाले. १९५९ साली चक्रवर्ती राज गोपाल यांनी कॉंग्रेसची फारकत घेवून स्वतंत्र पक्षाची स्थापना केली. अशाप्रकारे भारतात बहुपक्ष पध्दती अस्तित्वात आहे. भारतामध्ये सुमारे २०४४ नोंदणीकृत राजकिय पक्ष आहेत, त्यापैकी राष्ट्रीय कॉंग्रेस, भारतीय जनता पक्ष, भारतीय कम्युनिस्ट पक्ष, भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी), बहुजन समाजवादी पक्ष, तृणमूल कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस असे सात (७) राजकीय पक्ष अखिल भारतीय स्तरावर मान्यताप्राप्त राष्ट्रीय पक्ष आहेत. जनता दल युनायटेड, अण्णाद्रमुक, शिवसेना, द्रविड मुन्नेद्र कळघम, समाजवादी पार्टी, तेलगू देसम, नॅशनल कॉन्फरन्स, बिजु जनता दल यासारखे एकूण ३१ राजकीय पक्षांना प्रादेशिक पक्ष म्हणून मान्यता आहे. अशाप्रकारे भारतात बहुपक्ष पध्दती अस्तित्वात असली तरी स्वातंत्र्योत्तर काळात सलग तीन वर्षे राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षच सत्तेवर राहिला.

मतसंख्येच्या दृष्टीने विरोधी पक्षांना काँग्रेस पक्षाला कमी मते मिळूनसुध्दा विरोधी पक्षाच्या आपापसातील मतांच्या विभागणीमुळे काँग्रेस पक्ष प्रत्येकवेळी सत्ताधारी होत होता. १९५२ पासून १९६७ ते १९७१ आणि १९७७ ची लोकसभा निवडणूक वगळता काँग्रेस पक्षाला एकछत्री अंमल या देशामध्ये कायमस्वरूपी चालू होता. थोडक्यात भारतात बहुपक्षपध्दती अस्तित्वात असूनसुध्दा १९५२ ते १९६७ पर्यंत देशाच्या पक्षपध्दतीचे स्वरूप एक प्रबळ पक्ष पध्दती असे होते.

**२.२.२.२ ब) एकपक्ष प्रबळ पक्षपध्दती**

१९५२ च्या सार्वत्रिक लोकसभेच्या पहिल्या निवडणूकीपासून १९७७ आणि १९८१ ची लोकसभा निवडणूक सोडली असता सलग ३० ते ३५ वर्षे काँग्रेस पक्ष सत्ताधारी पक्ष म्हणून देशात सत्तेवर राहिला आहे. कारण राष्ट्रीय काँग्रेस पक्षाला भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास होता. त्याचबरोबर पंडित नेहरू सारखे प्रभावशाली नेतृत्व राहिले होते. या काळात काँग्रेसला एवढे भरघोस मतदान घेण्याचे कारण म्हणजे पक्षाच्या पाठीशी चळवळीचा इतिहास, राष्ट्रव्यापक संघटन आणि स्वातंत्र्य संपादनाची पुण्याई यामुळे राष्ट्रीय काँग्रेस पक्षाला प्रतिकूल मताचे अनुकूल मतात परिवर्तन करता आले. त्याचबरोबर या पक्षाने पुरोगामी, डावे, उजवे, प्रतिगामी यांना सामावून घेतो. पक्षाने प्रथमपासूनच समाजवादी समाजरचनेचा पुरस्कार केला होता. त्यामुळे विरोधी पक्षांना प्रभावशून्य केले होते. या काळात विरोधी पक्षांचे अस्तित्व होते, पण ते प्रभावशाली नव्हते.

१९५० पासून काँग्रेस पक्षात नेतृत्वाची विशिष्ठ संरचना तयार झालेली होती. त्यानुसार केंद्रीय पातळीवर पंडित नेहरू काँग्रेसचे नेतृत्व करताना दिसतात, तर वेगवेगळ्या राज्यामध्ये राज्य पातळीवर उच्च जाती, प्रबळ जमिनदार किंवा मालक हे काँग्रेसचे नेतृत्व करीत होते. समाजवादी समाजरचना, मिश्र अर्थव्यवस्थेचा पुरस्कार, जमिन सुधारणा आणि आर्थिक नियोजन यापैकी अनेक योजना पंडित नेहरूंनी प्रभावीपणे राबवल्या होत्या. त्यामुळे समाजवादी व लोककल्याणकारी चेहरा असलेले केंद्रीय नेतृत्व आणि तळागाळातील जाती-जमातीच्या हितसंबंधाची पाठराखण करणारे राज्य पातळीवरील नेतृत्व यामुळे काँग्रेस पक्ष देशात सर्वत्र लोकांचा पाठिंबा मिळवून निवडणूक जिंकण्यात यशस्वी होत होता. १९६४ साली नेहरूंच्या मृत्यूपर्यंत काँग्रेसने एकहाती सत्ता केंद्रात राखली होती.

१९६४ साली नेहरूंच्या मृत्यूनंतर केंद्रीय पातळीवरील नेतृत्वाची पोकळी स्थानिक किंवा राज्य पातळीवरील नेतृत्वानी भरून काढली. उदा. अतुल्य घोष (बंगाल), कामराज (मद्रासप्रांत), के. निजलींगाप्पा (म्हैसूर प्रातं), संजीव रेड्डी (आंध्रप्रदेश) इत्यादी पुढे या नेतृत्वांच्या फळीला 'सिंडीकेट' म्हटले जाऊ लागले. यांनी नेहरूंच्या निधनानंतर काँग्रेस पक्ष टिकवण्यात व यशस्वी करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका निभावली. सिंडिकेटमधील एका गटाच्या पाठिंब्याने इंदिरा गांधी पंतप्रधान झाल्या, असे असले तरी काँग्रेसचे केंद्रीय नेतृत्व सिंडिकेटच्या ताब्यात होते. यामुळे पुढे इंदिरा गांधींना निवडणूका जिंकण्यासाठी सिंडिकेट नेत्यांच्या राज्या-राज्यातील पाठिंब्यावर अवलंबून राहावे लागणार होते हे

उघड होते. त्याचवेळी याच काँग्रेसच्या राज्यपातळीवरील नेत्यामध्ये अनेक प्रकारचे गट-तट, उपगट अस्तित्वात होते. या गटामध्ये प्रचंड संघर्ष व ताणतणाव होते. परिणामी, राज्य पातळीवर काँग्रेस अंतर्गत सत्ता-स्पर्धा प्रचंड वाढली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकामध्ये त्याचे पडसाद दिसून येवू लागले. काँग्रेसच्या राज्यामधील अनेक गटांच्या राजकारणामुळे १९६७ च्या निवडणूकीमध्ये अनेक राज्यात काँग्रेसमधून फुटून अनेकपक्ष बाहेर पडले. ज्याचा काँग्रेसच्या पराभवात मोठा हातभार लागला. यामुळे काँग्रेसच्या संघटनात्मक प्रतिकाला धक्का बसू लागला.

१९६९ च्या राष्ट्रपतीच्या निवडणूक कारणामुळे परत काँग्रेसमध्ये संघर्ष सुरू झाला. १९६७ च्या निवडणूकीत मतदारांनी या पक्षावर आपला संताप व्यक्तच केला होता. पण केंद्रामध्ये सत्ता असल्यामुळे पक्ष हिताच्या नावाखाली कमालीचा गैरवापर झाला. या काळात पक्षाला यामुळे आपली गेलेली सत्ता परत मिळवण्यास शक्य झाले. इंदिरा गांधीच्या कारभारामुळे पक्षाचे १९६९ साली विभाजन झाले. इंदिरा गांधींनी मात्र सामाजिक-आर्थिक परिस्थितीत परिवर्तन घडविण्याच्या 'वचनपूर्तीच्या' घोषणेमुळे १९७१ ला या पक्षाला उदंड प्रतिसाद मिळाला. इंदिरा गांधी पक्षाच्या सर्वेसर्वा बनल्या. त्यांनी जाणीवपूर्वक राज्यातील काँग्रेस संघटनेवर, राज्यांच्याकाँग्रेस सरकारातील मुख्यमंत्री व इतर मंत्री निवडण्यावर हस्तक्षेप सुरू केला. यामुळे काँग्रेसचे केंद्रीकरण वाढले. थोडक्यात इंदिरा काळात काँग्रेसचा तंबू एकखांबी राहिला होता. जयप्रकाश नारायण यांचे आंदोलन व आंतरराष्ट्रीय परिस्थिती यामुळे इंदिरा गांधींनी २५ जून १९७५ च्या मध्यरात्री राष्ट्रीय आणीबाणी पुकारली. आणीबाणीच्या विरुध्द जनतेमध्ये मोठ्या प्रमाणात असंतोष निर्माण झाला, आणि जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखाली १९७७ च्या संसदीय निवडणूकीत विरोधी पक्षांनी एकत्र येवून जनता पक्ष नावाचा पक्ष स्थापन केला. या पक्षाने काँग्रेस पक्षाबरोबर स्वत: इंदिरा गांधीचा पराभव केला आणि जनता पक्ष सत्तेवर आला. या निवडणूकीमुळे काँग्रेसच्या ऱ्हासाला खरीखुरी सुरुवात झाली आणि आजपर्यंत एकसंघ प्रबळ पक्ष पध्दतीच्या स्वरूपाला धक्का बसला. जनता राजवटीने हा प्रयोग सुरू केला असला तरी तो फार काळ टिकला नाही. जनता पक्षाची राजवट अल्पजीवी ठरली. पुढे १९८० मध्ये परत काँग्रेस (काँग्रेस) पक्षाने संसदीय निवडणूकीत घवघवीत यश संपादन करून सरकार स्थापन केले असले तरी १९७७ च्या निवडणूकीने दिर्घकाळ एकाच पक्षाची मक्तेदारी मोडीत काढली. तसेच या निवडणूकीमुळे छोट्या-छोट्या राजकीय पक्षांची महत्त्वाकांक्षा वाढली. त्यांनीही राज्य आणि केंद्रीय पातळीवर जोमाने संघटन कार्य सुरू केले. यामुळे पुढे संसदीय निवडणूकीत काँग्रेसला मोठा शह मिळत गेला. थोडक्यात १९७७ च्या निवडणूकीने भारतामधील दिर्घकाळ एकाच पक्षाची मक्तेदारी मोडीत काढून एकपक्ष प्रबळ पध्दतीचे स्वरूप बदलले.

### २.२.२.३ क) बहुपक्ष पध्दती : आघाडीच्या राजकारणाची सुरुवात

१९८० साली इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखालील काँग्रेस पक्षाने पुन्हा एकदा लोकसभेत मोठे

बहुमत मिळवून सत्ता हातात घेतली. मात्र यानंतर १९८५ पर्यंतच्या काळात हिंदुत्ववादी विचारसरणीचा प्रयत्न-अप्रत्यक्ष पुरस्कार हे काँग्रेसच्या राजकारणाचे वैशिष्ठ्य ठरले. १९६० ते १९८५ या काळात काँग्रेस पक्ष विशिष्ठ राजकीय आणि आर्थिक परिस्थितीतून जात असल्यामुळे तसेच इंदिरा गांधींच्या नेतृत्वामुळे या पक्षाची राज्यपातळीवरील पक्ष संघटना पुरती खिळखिळी झाली आणि १९७७ ते १९८० या तीन वर्षाच्या काळात पक्षाने राष्ट्रीय पातळीवरची सत्ताही गमावली. दुसऱ्या बाजूला वेगवेगळे 'प्रादेशिक पक्ष' आपल्या स्थानिक अस्मितेच्या आधारावर निर्माण होत होते आणि त्यांनी बऱ्यापैकी राज्यपातळीवरील राजकारणापर्यंत आपली दखल घेण्यापर्यंत मजल मारली होती. याची सुरुवात १९६७ सालच्या भारतातील १६ घटक राज्यांच्या निवडणूकीत झाली. त्यापैकी बिहार-केरळ, मद्रास, ओरिसा, पंजाब, राजस्थान, उत्तर प्रदेश या राज्यात काँग्रेसला बहुमत मिळाले नाही आणि अनेक राजकीय विरोध पक्षांची सरकारे स्थापन झाली. म्हणजेच १९६७ ते १९७१ हा काळ भारतीय राजकारणातील महत्त्वाची घटना म्हणजे राज्यपातळीवरील आघाडी सरकारांचा प्रयोग होय. या आघाड्या फक्त सत्ताकारणावर आधारित होत्या. या निवडणूकीत हा बदल म्हणजे काँग्रेसचे धोरण आणि इंदिरा गांधींचे वर्तन यांना विरोध होय. हा पहिला प्रयोग राज्यपातळीवर झालेला दिसून येतो. १९६७ च्या निवडणूकांच्या निकालांनी राज्यसत्तेच्या संरचनेत पायाभूत बदल झाले आणि काँग्रेस पक्षाला विरोध निर्माण झाला व बहुपक्षपध्दतीच्या भारतातील राजकारणातील आशा निर्माण झाली.

१९८९ पासून केंद्र पातळीवर आघाड्याचे राजकारणाचे दुसरे पर्व सुरू झाले. जे राजकारण घटक राज्याच्या पातळीपर्यंत सिमीत होते, ते केंद्रपातळीवरही घडून आले. १९८९ आणि १९९१ च्या संसदेच्या सार्वत्रिक निवडणूका या भारतीय राजकारणातील दुसऱ्या आघाडीच्या पूर्वीची किंवा बहुपक्ष पध्दती सरकारच्या विश्रांतीची नांदी होती. कारण या निवडणूकीत कोणत्याही राष्ट्रीय राजकीय पक्षाला बहुमत मिळाले नव्हते. तसेच १९८९ च्या निवडणूकीच्या निमित्ताने विरोधी पक्षाच्या संघटीकरणास सुरूवात झाली. १९८९ च्या निवडणूकीची घोषणा झाल्यावर जनता दल-समाजवादी काँग्रेस, तेलगू देसम, द्रमुक, आसाम गण परिषद हे प्रादेशिक पक्ष यांनी एकमेकांशी समझोता करून निवडणूका लढवण्याचा निर्णय घेतला. समान कार्यक्रम व व्यूहरचना करून मतविभागणी टाळावी असे त्यांनी ठरविले. या निवडणूकीने भारतात येथूनपुढे बहुपक्षपध्दती राहू शकते, हे सिध्द केले. घटक राज्यातील वेगवेगळे प्रादेशिक पक्ष आणि त्यांच्या आघाड्या यामुळे १९८९ ला काँग्रेसला पराभव पत्करावा लागला आणि व्ही. पी. सिंग सरकार स्थापन झाले.

अशाप्रकारे भारतीय राजकारणात आजपर्यंत आघाड्याचे राजकारण सुरू असल्याचे दिसून येते. २०१४ ची सोळावी आणि २०१९ ची सतरावी संसदीय निवडणूकीचा निकालाचा अपवाद वगळता आघाडी अपरिहार्य दिसून येते. १९८९ चे व्ही.पी.सिंग सरकार, चंद्रशेखर यांचे सरकार, १९९१ चे नरसिंहराव यांचे सरकार, १९९५ चे अटल बिहारी वाजपेयी यांचे सरकार, २००४ व २००९ चे

मनमोहन सिंग सरकार या सगळ्या सरकारांचा विचार करता ही सर्व आघाडी सरकारे होती. या वेगवेगळ्या निवडणूकीत कोणत्याही राजकीय पक्षाला बहुमत मिळाले नव्हते. १९८०-१९८४ च्या काळात निर्माण झालेल्या वेगवेगळ्या घटक राज्यांच्या उदा. शिवसेना, तृणमूल काँग्रेस, नॅशनल कॉन्फरन्स, द्रमुक, अण्णा द्रमुक आणि देलगुदेशय इत्यादी प्रादेशिक पक्षांच्या सहकार्यावर आघाडी सरकारे स्थापन करण्यात आली होती. ह्या आघाड्या, विशिष्ठ विचारसरणी व तत्त्वज्ञान आणि समान किमान कार्यक्रमाच्या आधारावर निर्माण करण्यात आल्या होत्या. राष्ट्रीय काँग्रेसच्या नेतृत्वाखाली 'संयुक्त पुरोगामी आघाडी' आणि भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखालील 'राष्ट्रीय लोकशाही आघाडी' अशा आघाड्या स्थापन करून सरकार स्थापन केली जात आहेत. म्हणजेच आजपर्यंत भारतातील संसदीय राजकारणाचा अभ्यास केला असता संसदीय राजकराणाची वाटचाल ही एक पक्ष प्रबळ पक्ष पध्दती कडून बहुपक्ष पध्दतीकडे झालेली दिसून येते.

*** स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - २ ***

❑ **रिकाम्या जागा भरा.**

१. भारतात .............. पक्षपध्दती आहे.

*अ) एकपक्ष    ब) बहुपक्ष    क) द्विपक्ष    ड) त्रिपक्ष.*

२. तेलगू देसम पक्ष कोणत्या घटक राज्यात उदयाला आला.

*अ) आंध्रप्रदेश    ब) केरळ    क) तामिळनाडू    ड) कर्नाटक.*

३. १९७७ मध्ये ............... सरकार स्थापन झाले.

*अ) काँग्रेस सरकार    ब) जनता सरकार    क) आघाडी सरकारड) नरसिंहराव सरकार.*

४. १९६७ साली ............ राज्यात बिगर काँग्रेस सरकारे स्थापन झाली.

*अ) १०    ब) १२    क) ८    ड) ११.*

५. पहिले आघाडी सरकार ............... च्या नेतृत्वाखाली स्थापन झाले.

*अ) इंदिरा गांधी    ब) व्ही. पी. सिंग*

*क) डॉ. मनमोहन सिंग    ड) अटल बिहारी वाजपेयी.*

## २.२.३ प्रादेशिक पक्ष (Regional Parties) आणि राजकारण

### २.२.३.१ अ) प्रस्तावना

प्रादेशिक राजकीय पक्ष आणि स्थानिक राजकीय पक्षांची निर्मिती हे भारतीय राजकीय पक्षांचे असाधारण वैशिष्ट्य मानले जाते. देशाच्या राजकारणातील प्रादेशिक किंवा स्थानिक पक्षांचे अस्तित्व पाहता या राजकीय पक्षांचे महत्त्व जवळपास दोन दशके झाली तरी अबाधित असून ते अजूनही काही काळ त्यांचे अस्तित्व टिकून राहिल, अशी चिन्हे आहेत. देशपातळीवरील एकपक्ष वर्चस्वाच्या

अस्तामुळे आणि मर्यादित प्रादेशिक विविधतेच्या व अस्तित्वाच्या बहुविध संघटनांच्या उदयामुळे प्रादेशिक पक्षांचा उदय झाल्याचे दिसून येते. भारताचा निवडणूक आयोग कांही पक्षांना 'राष्ट्रीय' तर काही पक्षांना 'प्रादेशिक पक्ष' म्हणून मान्यता देतो. 'प्रादेशिक पक्ष' असा शब्द आपण वापरतो तेव्हा आपल्याला एखाद्या राज्यातील प्रश्नावर लक्ष केंद्रित करणारा, प्रादेशिक विकास, प्रादेशिक अस्मिता, भाषेचा मुद्दा इत्यादींच्या आधारावर भर देवून पक्ष स्थापन होतो, त्याला 'प्रादेशिक राजकीय पक्ष' म्हणतात. हे पक्ष राष्ट्रीय प्रश्नाकडे बघतानाही आपल्या हितसंबंधाच्या चष्म्यातून पाहतात. 'प्रदेशवाद' हा त्यांचा मुख्य आधार असतो. आपल्या वेगवेगळ्या प्रादेशिक संस्कृतीच्या अभिमानातून किंवा आपल्या राज्यावर 'अन्याय' होत असल्याच्या भावनेतून त्यांची निर्मिती झाल्याची दिसून येते आणि ते विशिष्ठ एखाद्या राज्यापुरतेच मर्यादित असतात. उदा. नॅशनल कॉन्फरन्स, अकाली दल, द्रमुक आणि आण्णा द्रमुक, तेलगू देसम, आसाम गट परिषद, शिवसेना इत्यादी. अशा पक्षांना खरे प्रादेशिक पक्ष म्हणायला हवे, कारण हे पक्ष विविध प्रदेशापुरता विचार करणारे आणि विशिष्ठ प्रादेशिक-सांस्कृतिक-भाषिक विविधतेमुळे निर्माण झालेले आहेत. अशा प्रकारे एक किंवा अनेक वैशिष्ठ्यांवर निष्ठा किंवा अस्मिता व्यक्त करण्यासाठी आणि तिचे संवर्धन आणि संगोपन करण्यासाठी स्वतंत्र व वेगळ्या प्रादेशिक राजकीय पक्षांची निर्मिती होत गेली. भारताच्या मुख्य निवडणूक आयोगानुसार 'प्रादेशिक पक्ष' म्हणून मान्यता मिळण्यासाठी त्या पक्षांना :-

(अ) विधानसभेच्या निवडणूकीत त्या पक्षाला वैध मतापैकी कमीतकमी ६% मते आणि एकूण जागापैकी २ जागा मिळाल्या पाहिजेत किंवा,

(ब) लोकसभा निवडणूकीत त्या पक्षाला वैध मतापैकी कमीत कमी ६% मते आणि एकूण जागापैकी ०१ जागा मिळाली पाहिजे किंवा,

(क) विधानसभा निवडणूकीत त्या पक्षाला एकूण जागापैकी कमीत कमी ३% जागा किंवा कमीत कमी ३ जागा मिळाल्या पाहिजेत किंवा,

(ड) लोकसभा निवडणूकीत त्या पक्षाला राज्यातील २५ जागामागे १ जागा मिळाली पाहिजे किंवा,

(ई) विधानसभा किंवा लोकसभेच्या निवडणूकीत त्या पक्षाला वैध मतांपैकी कमीतकमी ८% मते मिळाली पाहिजेत.

वरील निकषांपैकी एक निकष पूर्ण करावा लागतो. (The Election Symbol's (Reservation and Allotment) order 1968) वरील अटी पूर्ण करणाऱ्या पक्षांना निवडणूक आयोगाने १६ सप्टेंबर २०१४ रोजी प्रादेशिक पक्ष म्हणून मान्यता दिली आहे. याची यादी खालील प्रमाणे :-

| पक्षाचे नांव | स्थाप./वर्ष | राज्य | संस्थापक | राष्ट्रीय अध्यक्ष | पक्षाचे चिन्ह |
|---|---|---|---|---|---|
| १. राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी | १९९९ | महाराष्ट्र | शरद पवार | शरद पवार | घड्याळ |
| २. बहुजन समाज पार्टी | १९८४ | उत्तर प्रदेश | कांशीराम | मायावती | हत्ती |
| ३. तृणमूल कॉंग्रेस | १९९८ | प. बंगाल | ममता बॅनर्जी | ममता बॅनर्जी | फुलाचे झाड |
| ४. आण्णा द्रमुक | १९७२ | तामिळनाडू | रामचंद्रन | ई.के.पलान स्वामी | दोन पाने |
| ५. लोकदल | १९९६ | हरियाणा | चौधरी देवीलाल | ओमप्रकाश चौटाला | चष्मा |
| ६. जनता दल (युनायटेड) | २००३ | बिहार | शरद यादव | नितीशकुमार | बाण |
| ७. जनता दल (सेक्युलर) | १९९९ | कर्नाटक | एच.डी. देवेगौडा | देवेगौडा | मोळी घेतलेली बाई |
| ८. नॅशनल कॉन्फरन्स | १९४८ | जम्मु-कश्मिर | शेख अब्दुला | फारूक अब्दुला | नांगर |
| ९. तेलगु देसम | १९८२ | आंध्र प्रदेश | एन.टी.रामाराव | चंद्राबाबू नायडू | सायकल |
| १०. द्रविड मुन्नेत्र कळघम | १९४९ | तामिळनाडू | सी.एन. अन्नादुराई | एम.के. स्टॅलिन | उगवता सूर्य |
| ११. बिजू जनतादल | २००६ | ओडिसा | बिजु पटनाईक | नविन पटनाईक | शंख |
| १२. महाराष्ट्र नवनिर्माण सेना | २००६ | महाराष्ट्र | राज ठाकरे | राज ठाकरे | रेल्वे इंजिन |
| १३. शिवसेना | १९६६ | महाराष्ट्र | बाळासोा ठाकरे | उद्धव ठाकरे | धनुष्यबाण |
| १४. निरोयणी | १९२० | पंजाब | प्रकाशसिंह बादल | --''-- | तराजू |
| १५. समाजवादी पार्टी | १९९३ | उ. प्रदेश | मुलायमसिंह यादव | अखिलेश यादव | सायकल |

| पक्षाचे नांव | स्थाप./वर्ष | राज्य | संस्थापक | राष्ट्रीय अध्यक्ष | पक्षाचे चिन्ह |
|---|---|---|---|---|---|
| १६. लोकजन शक्ती | २००० | बिहार | रामविलास पास्वान | --"-- | घर |
| १७. राष्ट्रीय जनतादल | १९९७ | बिहार | लालूप्रसाद यादव | --"-- | लालटेन |
| **संदर्भ :** www.wikipedia.org/wiki/all indian national parties (30/03/20 20) | | | | | |

वरीलप्रमाणे 'प्रादेशिक पक्ष' भारताच्या राष्ट्रीय राजकारणात सक्रिय आहेत. त्यातील प्रमुख प्रादेशिक पक्षांची वाटचाल पुढीलप्रमाणे आहे.

### २.२.३.२ ब) प्रादेशिक पक्ष

- **शिवसेना :-**

भारतीय जनता पक्षाशी सैद्धांतिक एकरूपता असणारा किंबहुना भाजपाचा पहिला मित्रपक्ष म्हणजे 'शिवसेना' होय. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर काही काळानंतर बाळासाहेब ठाकरे यांनी 'मार्मिक' हे व्यंगचित्र साप्ताहिक सुरू केले. मार्मिकमधून त्यांनी मराठी माणसांच्या प्रश्नावर, मुंबईत मराठी माणसाच्या झालेल्या कोंडीवर आणि त्यांच्या अगतिक अवस्थेसंदर्भात अत्यंत तीव्रपणे लिहायला सुरूवात केली. प्रामुख्याने मराठी माणसाच्या भावनेवर आधारित असेच त्यांचे लिखाण होते. समोरच्या माणसाचे वस्त्रहरण करणारे हे लिखाण मराठी मनाचा ठाव घेणारे होते. त्यातूनच मराठी माणसाला त्याच्यावर होणाऱ्या अन्यायाची जाणीव झाली आणि आपल्यावर होणाऱ्या अन्यायाचे परीमार्जन करण्यासाठी 'बाळासाहेब ठाकरे' यांनीच नेतृत्व करावे असा विचार मुंबईतील मध्यमवर्गीय मराठी मनाभोवती रुंजी घालू लागला. त्यानंतर १९ जून १९६६ रोजी मुंबई येथे कार्यकर्त्यांनी 'बाळासाहेब ठाकरे' यांना घेराव घालून संघटना स्थापन करण्यास भाग पाडले. मार्मिकमधील लिखाण, व्यंगचित्रे, सभा आणि व्याख्याने यामुळे मुंबईतील मराठी भाषिक बाळासाहेब ठाकरे यांच्याकडे आकर्षित होत होते. वारंवार त्यांना भेटून आपली गाऱ्हाणी मांडत होते. यामुळे मुंबइृतील मराठी माणसांचा ओघ ठाकरेंच्या निवासस्थानाकडे वाढतच होता. लोक येतात-जातात पण असे किती दिवस चालणार हा विचार डोक्यात येवून आणि काही मराठी माणसांच्या सल्ल्यानुसार 'मराठी माणसांचा एकत्र करून पक्ष न काढता मराठी माणसांच्या हिताचे रक्षण करणारी संघटना काढूया' हा विचार पक्का करून संघटना काढण्याचे ठरविले. १९ जून १९६६ रोजी आपल्या निवडक सहकारी आणि घरातील लोकांच्या साक्षीने 'एका संघटनेची' स्थापना किंवा उद्‌घाटन सोहळा पार पाडला. या संघटनेला स्वत: प्रबोधनकार ठाकरे यांनी 'शिवसेना' हे नाव दिले. कारण छ. शिवाजी महाराज या सतराव्या शतकातील राजाविषयी जनतेच्या मनात असलेली आदराची भावना आणि नुसता महाराजांचा केवळ नामोल्लेखाने मराठी माणसाच्या मनाला स्फूरण चढते. हे पाहून त्यांनी बाळासाहेब ठाकरेंच्या संघटनेला 'शिवसेना' शिवाजीची सेना असे नांव दिले.

३० ऑक्टोबर १९६६ च्या दसऱ्याच्या दिवशी दादरच्या शिवाजी पार्क मैदानावर शिवसेनेची भूमिका स्पष्ट करणारा पहिला मेळावा भरला. या मेळाव्यात बाळासाहेब ठाकरे यांनी महाराष्ट्रवादाची संकल्पना मांडली. मुंबई ही महाराष्ट्राची आहे आणि मुंबईत मराठी माणूस अन्याय सहन करणार नाही अशी भूमिका घेतली. पहिल्यांदा बाळासाहेब ठाकरे यांनी मराठी माणसाचा ठाव घेतला आणि मराठी माणसांच्या हितासाठी व कल्याणासाठी मी आयुष्य घालवणार असे स्पष्ट सांगितले हे सांगताना मात्र त्यांनी आधी समाजकारण व नंतर राजकारण अशी भूमिका घेतली. बाळासाहेबांचे दिव्य वलय लाभलेल्या शिवसेनेने महानगरपालिका लढण्याचे ठरविले. १९६७ च्या ठाणे महानगरपालिकेच्या निवडणूकीमध्ये पहिल्याच पदार्पणात ४० पैकी १७ जागा मिळाल्या, अपक्षांच्या मदतीने ठाणे महानगरपालिकेची सत्ता काबीज केली. त्यानंतर मुंबई महानगरपालिका निवडणूका-१९६८, १९७३, १९७८ अशा वेगवेगळ्या स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये स्थानिक गटांशी हात मिळवणी करून सत्ता स्थापन करून भगवा झेंडा फडकवलेला आपल्याला दिसतो. या पक्षाने आपले चिन्ह 'धनुष्यबाण' निवडले होते. सध्या या पक्षाचे नेतृत्व उध्दव ठाकरे यांच्याकडे आहे.

☼ **निवडणूकीचे राजकारण :-**

१९६६ ते १९८० या कालखंडात शिवसेना संसदीय व विधीमंडळीय राजकारणात फारशी सक्रीय व इच्छूकही नव्हती. कारण शिवसेना नगरपालिका व महानगरपालिका या राजकारणातून स्थानिक लोकांच्या दैनंदिन अडी-अडचणींना अनुसरून राजकराण करीत होती. तिचे कार्यक्षेत्र मुंबई व तिच्या आसपासच्या प्रदेशांपुरते मर्यादीत होते. त्यामुळेच सेनेने या काळात लोकसभा निवडणूकामध्ये वेगवेगळ्या पक्षांना पाठिंबा देऊन त्यांचे उमेदवार निवडून आणण्यासाठी नेटाने प्रयत्न केले. विधीमंडळ पातळीवर शिवसेनेचे राजकारण पाहता सेनेने विधीमंडळाच्या निवडणूकीत १९७० मध्ये प्रथम भाग घेतला आणि यावेळी झालेल्या पोटनिवडणुकीत वामनराव महाडीक सेनेचे पहिले आमदार झाले. १९७२ ला मनोहर जोशी शिवसेनेचे नेते स्थानिक स्वराज्य संस्थामधून विधान परिषदेवर निवडून आले. याचवेळी विधान सभेवर प्रमोद नवलकर निवडून आले.

१९८० ते ८७ हा कालखंड शिवसेनेच्या वाटचालीत महत्त्वपूर्ण म्हणून ओळखला जातो. १९८३ नंतर शिवसेनेने महाराष्ट्रवादी, मराठीवादी भूमिकेबरोबरीने हिंदुत्ववादी भूमिका घेण्यास सुरूवात केली. १९८४ च्या मुंबईमधील दंग्यात शिवसेनेने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती आणि त्याची परिणती हिंदूंचा रक्षणकर्ता असा एकमेव पक्ष अशी शिवसेनेची प्रतिमा निर्माण झाली. हिंदुत्ववादी विचारांची नाळ परस्परांशी जुळत असल्यामुळे १९८४ च्या लोकसभा निवडणूकीत महाराष्ट्रात भाजपाने शिवसेनेशी युती केली व काही मुंबईतील जागा लढवल्या पण एकही उमेदवार निवडून आला नाही. १९८५ च्या विधानसभा निवडणूकीत शिवसेना एकटी लढली. या निवडणूकीत फक्त ३३ पैकी १ उमेदवार निवडून आला.

शिवसेनेने १९८४ साली भाजपाबरोबर युती करून निवडणूका लढवल्या. या युतीचे नेतृत्व बाळासाहेब ठाकरे, प्रमोद महाजन, गोपीनाथ मुंडे यांनी केले होते. या युतीने १९९५ साली बहुमत मिळवून भाजपा शिवसेना युतीने सरकार स्थापन केले होते. यावेळी शिवसेनेला ७३ जागा मिळाल्या होत्या व शिवसेनेचे मनोहर जोशी हे राज्याचे मुख्यमंत्री झाले. २०१४ मध्ये शिवसेना व भाजपा यांच्यातील युती जागा वाटपातील मतभेदामुळे तुटली. दोन्ही पक्ष वेगवेगळे लढले. पण निवडणूक निकाल लागल्यानंतर पुन्हा दोन्ही पक्ष एकत्र येऊन युतीचे सरकार स्थापन केले. २०१३ च्या निवडणूकीत शिवसेनेचे १८ खासदार निवडून आले आहेत. २०१९ साली महाराष्ट्र विधानसभा निवडणूक एकत्र लढवली. या निवडणूकीत शिवसेनेला ५६ जागा मिळाल्या आणि भाजपाला १०५ जागा मिळाल्या. परत युतीचे सरकार स्थापन होईल असे वाटत होते, पण मुख्यमंत्री पदावरून दोघांमध्ये वाद झाला व शिवसेनेने ३० वर्षांची युती तोडली. शिवसेनेने राष्ट्रवादी काँग्रेस, राष्ट्रीय काँग्रेस पक्ष यांच्या सोबत महाराष्ट्र विकास आघाडी स्थापन केली व उध्दव ठाकरे महाराष्ट्राचे १९ वे मुख्यमंत्री झाले. या सरकारमध्ये काँग्रेसकडे विधानसभा अध्यक्षपद तर राष्ट्रवादीकडे उपमुख्यमंत्रीपद देण्यात आले आहे.

### ❑ द्रविड मुन्नेत्र कळघम :-

द्रविड मुन्नेत्र कळघम हा तामिळनाडू राज्यातील प्रादेशिक पक्ष आहे. या पक्षाचा जन्म देशाच्या सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक आणि राजकीय प्रणालीतून निर्माण झालेल्या समस्यांमध्ये झाला आहे. या शतकाच्या प्रारंभी तामिळनाडूमध्ये ब्राम्हण वर्चस्वाविरुध्द द्रविडीयन असा जो संघर्ष निर्माण होऊन द्रविडीयन किंवा ब्राम्हणेतर चळवळ सुरू झाली. द्रविड लोकांना आर्येत्तर संस्कृती व त्या संस्कृतीचे मोठेपणा या त्यागामील प्रेरणा आहेत. थोडक्यात मद्रासमधील ब्राम्हणेत्तरांच्या आंदोलनाला द्रमुकचा पाया आहे. मद्रासमध्ये स्थापन झालेल्या रामस्वामी नायकर यांच्या 'जटिस पार्टी'च्या माध्यमातून तामिळींची भाषीक आणि सांस्कृतिक अस्मिता व्यक्त करणारी 'स्वाभिमानी चळवळ' उभी केली. स्वाभिमानी चळवळीच्या (Self Respect Movement) च्या माध्यमातून रामस्वामी नायकर यांनी द्रविड लोकांचे स्वतंत्र राज्य निर्माण करणे हे आपले ध्येय असल्याचे जाहीर केले व त्या उद्देशाने 'द्रविड कळघम' म्हणजे द्रविड फेडरेशन या नावाची संघटना स्थापन केली. आजचा 'द्रविड मुन्नेत्र कळघम' हा पक्ष 'द्रविड कळघम' या संघटनेचा वारसदार असल्याचे दिसते.

तामिळनाडूमध्ये सुरू झालेली द्रविडीयन किंवा ब्राम्हणेत्तर चळवळ आणि 'काँग्रेस पक्ष' हा राज्यात ब्राम्हणी पक्ष अशी असल्यामुळे लोकांचा काँग्रेसला पूर्वापार विरोध होताच याचाच आधार घेवून १९४९ रोजी अण्णा दुराई यांनी समाजसुधारणेच्या बॅनरखाली 'द्रविड कळघम' मधील एका गटाने 'द्रविड मुन्नेत्र कळघम' (द्रविड प्रागतिक संघ) ची स्थापना केली. त्याचेच पुढे 'द्रविड मुन्नेत्र कळघम' पक्षात रूपांतर झाले. द्रमुकची भूमिका अशी होती कि, केवळ काँग्रेस विरोधाच्या नकारात्मक

आधारावर नव्हे तर भारतीय राष्ट्राच्या सामाजिक, धार्मिक, आर्थिक व राजकीय प्रणालीतून उद्भवलेल्या समस्यांच्या वास्तविक व राजकिय प्रणालीतून उद्भवलेल्या समस्यांच्या वास्तविकव मुलभूत तत्वावर हा पक्ष उभा होता. सामाजिक सुधारणेचा सर्वांगीण प्रयत्न करणे, तामिळी जनतेत तामिळी भाषा व संस्कृतीचा पुरस्कार करणे, प्रसार करणे, लोकशाही घटनात्मक मार्गांनी समाजवादाची स्थापना करणे आणि भारतीय अधिपत्यापासून मुक्त अशा 'द्रविडनाडू'ची स्थापना करणे या सिध्दांतावर प्रारंभी 'द्रमुकपक्ष' आधारीत होता.

☼ **तत्त्वप्रणाली :–**

१) तमिळी जनतेची भाषिक आणि सांस्कृतिक अस्मिता जपणे.

२) हिंदी भाषेच्या सक्तीला विरोध करणे.

३) घटक राज्यांना अधिक स्वायत्तता देणे.

४) जाती, वर्गविरहीत समाजव्यवस्था निर्माण करणे.

५) समाजवादी अर्थव्यवस्थेचा पुरस्कार करणे.

☼ **पक्षाचे राजकारण :–**

राज्यपातळीवरील द्रविडी पक्षाचा प्रभाव ही तामिळनाडूसाठी नवी गोष्ट नाही. १९६० पासून प्रादेशिक राजकारण करणाऱ्या द्रविड पक्षाचा प्रभाव तामिळनाडूतील मतदारावर दिसून येतो. हिंदी भाषेला विरोध, भाववाढीला विरोधी आंदोलनातून १९६७ साली राज्यात 'सत्ता' प्राप्त झाली होती. या पक्षाला तामिळनाडू विधानसभेत बहुमत प्राप्त होवून श्री आण्णादुराई यांच्या नेतृत्वाखाली द्रविड पक्षाचे सरकार स्थापन झाले. सत्तेवर आल्यानंतर गरीबांना स्वस्त धान्य देणे, पक्की घरे स्वस्तात बांधून देणे यासारख्या लोकानुरंजनवादी धोरणाच्या, तसेच ओबीसींना आरक्षण देण्याच्या धोरणावर आधारीत गरीब आणि ओबीसीमध्ये आपला सामाजिक पाया तयार केला. सत्तेवर आल्यानंतर १९६९ मध्ये आण्णा दुराई यांचा मृत्यू झाला. यानंतर पक्षाचे नेतृत्व करूणानिधी यांच्याकडे झाले. १९७६ पर्यंत करुणानिधींचे मंत्रीमंडळ सत्तेवर होते. पण या काळात द्रविड मनेत्र कळघम पक्षाचे एक आघाडीचे नेते आणि चित्रपट अभिनेते एम.जी.रामचंद्रन यांच्यातील नेतृत्वकलह पक्षात तीव्र झाला. परिणामी एम.जी.आर यांनी पक्षातून फुटून 'आण्णाद्रमुक' किंवा 'अखिल भारतीय आण्णा द्रविड मन्नेत्र कळघम' पक्षाची स्थापना केली आणि १९७७ च्या विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणूका स्वबळावर जिंकून या नव्या पक्षाने बहमत प्राप्त करून आपले स्वत:चे सरकार बनविले.

थोडक्यात तामिळनाडूमध्ये १९६० पासून १९७७ पर्यंत द्रमुक (डी.एम.के.) आणि आण्णाद्रमुक (ए.डी.एम.के.) अशी दोन पक्षात विभागणी झाली, तेव्हापासून आलटून-पालटून यापैकी एका

पक्षाकडे सत्ता असते. १९७० ला ज्यावेळी कॉंग्रेसमध्ये फूट पडली, तेव्हा करुणानिधी इंदिरा गांधीच्या बरोबर होते. पुढे आण्णा द्रमुकचे नेते एम. जी. रामचंद्रन यांच्या मृत्यूनंतर या पक्षाचे नेतृत्व श्रीमती जयललिता यांच्याकडे आले. एम.जी.आर. यांनी अद्रमुकच्या माध्यमातून करुणानिधींची अशी कोंडी केली कि, नंतर बरीच वर्षे म्हणजे एम.जी.आर. जिवंत असेपर्यंत १३ वर्षे करुणानिधींना तामिळनाडूच्या सत्तेवर येवू दिले नाही. त्यांनी शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी दुपारचे जेवण, दूध पावडर पासून ते चप्पलपर्यंत अनेक 'मोफत योजना' राबवल्या. अंतिम श्वासापर्यंत ते 'लोकप्रिय नेते' राहिले. १९८४ च्या विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणूकीत ते एक मैलही प्रवास करू शकले नाहीत आणि एक शब्दही बोलू शकले नाहीत, तरीही या निवडणूकीत त्यांचा अण्णा द्रमुक पक्ष विजयी झाला व सत्तेवर आला आणि पक्षाचे व सरकारचे नेतृत्व श्रीमती जयललिता यांनी केले.

जयललिता यांनी मुख्यमंत्री पदाच्या कार्यकाळात ओबीसीचे आरक्षण ५० टक्क्यांवरून ६५ टक्के केले. स्त्रियांना जास्तीत जास्त पक्षाची उमेदवारी देवून स्त्रीयांचे सक्षमीकरण केले. तामिळनाडूला फार मोठ्या संख्येने 'स्वयं-सहाय्यता' गटाची स्थापना करून स्त्रियांना आर्थिकदृष्ट्या सक्षम केले. १९७७ च्या राष्ट्रीय निवडणूकीमध्ये द्रमुक पक्षाचे जनता दलाशी आणि आण्णा द्रमुकने कॉंग्रेस पक्षांशी समझोता केला होता. १९८० मध्ये करुणानिधींच्या द्रमुक पक्षाला राज्यविधानसभेत बहुमत प्राप्त होवून ते परत मुख्यमंत्री झाले. १९९१ मध्ये जयललिता यांनी आण्णाद्रमुकचे सर्व गट एकत्र आणले आणि पुन्हा सत्ता प्राप्त केली. १९९६ मध्ये भ्रष्टाचाराच्या आरोपामुळे जयललितांना सत्ता गमवावी लागली, पण २००१ मध्ये परत त्यांनी सत्ता मिळवली.

१९६७ ते १९९० पर्यंत द्रमुकचा पाया किंवा 'सामाजिक आधार' हा मुख्यत: शहरी गरीब, ओबीसी, पुरुष मतदार या समाजघटकांनी बनलेला होता. तर अद्रमुकचा सामाजिक आधार मुख्यत: ग्रामीण गरीब, दलित व महिला मतदार होता. या कालावधीत तामिळनाडूच्या जनतेने दोन्ही द्रविडी पक्षांना पाच-पाच वर्षे आलटून पालटून सत्ता दिल्याचे दिसते.

१९९० नंतरच्या राजकारणात जयललिता यांनी अमाप लोकप्रियता मिळवली. भ्रष्टाचाराच्या आरोपामुळे द्रमुकची अवस्था खिळखिळी झाली. त्याचबरोबर ओबीसीच्या आरक्षणाचा मुद्दा समोर ठेवून पी.एम.के.ची स्थापना केली. यानंतर जाणीवपूर्वक करुणानिधी यांनी द्रमुकचा ताबा आपल्या कुटुंबाकडे घेण्यास सुरुवात केली. २०१४ ला द्रमुकच्या नेतेपदावरून स्टॅलिन आणि अळगीरी यांच्यात संघर्ष निर्माण झाला. सामान्य गरीब जनतेच्या ओबीसीच्या आशा-आकांक्षाना तडे जाऊ लागले. दुसरीकडे जयललिता यांनी सत्तेच्या माध्यमातून लोकानुरंजनवादी योजना सुरू केल्या. 'अण्णा कॅटींनी'ची संकल्पना राबविली. २०१६ ला परत आण्णा-द्रमुखची सत्ता स्थापन झाल्याचे दिसून येते. अशाप्रकारे तामिळनाडूमध्ये प्रादेशिक पक्षाचे राजकारण दिसून येते.

### ❑ तेलगु देसम पार्टी :-

आंध्रप्रदेशात गेल्या अनेक वर्षापासून सत्तेवर असलेल्या 'तेलगू देसम' पक्षाची स्थापना एन.टी. रामाराव या प्रसिद्ध अभिनेत्याने १९८२ मध्ये केली. देशातील काँग्रेसच्या वर्चस्वाला शह देणाऱ्या पर्यायी पक्षाची उभारणी संपूर्ण देशभर १९६० च्या दशकात अनेक राज्यात सुरू झाली होती, त्याला आंध्र-प्रदेश अपवाद होते. पण १९८० च्या दशकात राज्यवार पुन्हा पक्षाची उभारणी होवू लागली, तेव्हा एन.टी. रामाराव या प्रख्यात आणि लोकप्रिय सिनेनटाच्या नेतृत्वाखाली १९८२ च्या मार्च महिन्यात तेलगू देसम पक्ष अस्तित्वात आला, आणि केवळ नऊ महिन्याच्या अवधितच जानेवारी १९८३ मध्ये हा पक्ष राज्यात सत्ताधारी पक्ष बनला. पक्षाच्या स्थापनेनंतर इतक्या अल्प काळात तो सत्तेवर येणाचा विक्रम भारतातील राज्यातच नव्हे तर जगामध्ये क्वचित घडला होता. १९८४ साली झालेल्या लोकसभा निवडणूकीत काँग्रेसची राज्यात सरशी चालू असताना आंध्र प्रदेशातून लोकसभेच्या ३४ जागांपैकी ३० जागा जिंकून इतर राष्ट्रीय पक्षांना मागे टाकले. श्री. एन. टी. रामाराम यांनी तेलगू देसमचा पुढील कार्यक्रम जाहीर केला होता.

### ☼ तत्त्वप्रणाली :-

तेलगू देसमची स्थापना किंवा घोषणा ही कोणत्याही सैध्दांतिक विचारधारेवर किंवा तत्तवज्ञानावर झालेली नव्हती. त्यासाठी प्रदीर्घ लक्ष किंवा सामाजिक चळवळ नव्हती, पण पक्षाच्या अध्यक्षांनी जाहीर केलेला पक्षाचा जाहीरनामा पुढील प्रमाणे :-

१) नि:स्वार्थपणे जनतेची सेवा करणे. २) त्यागाची भावना निर्माण करणे. ३) स्वच्छ प्रशासन देणे. ४) स्त्री-प्रतिष्ठा जपणे. ५) केंद्र सरकारशी सहकार्य भावना. ६) भाषा-संस्कृतीची प्रतिष्ठा जपणूक. ७) स्वप्रतिष्ठा जपणे इ.

### ☼ पक्षाचे राजकारण :-

एन.टी.रामाराव यांच्या मार्गदर्शनाने स्थापन झालेल्या तेलगू देसम (१९८२) पक्षाने १९८३ मध्ये झालेल्या राज्यविधानसभा निवडणूकीत २९४ पैकी २०२ जागा जिंकल्या आणि आंध्र प्रदेशमध्ये प्रथम गैर काँग्रेस सरकार सत्तेवर आले. त्यानंतर झालेल्या १९८४ च्या लोकसभा निवडणूकीत राज्यात काँग्रेसची सरशी असताना आंध्र प्रदेशातून लोकसभेच्या ३४ पैकी ३० जागा जिंकून इतर राष्ट्रीय पक्षांना मागे टाकून लोकसभेत तेलगू देसम पक्ष विरोधी पक्षाच्या स्थानावर गेला.

१९८३ साली झालेल्या निवडणूकीनंतर एन.टी.रामाराव यांच्या नेतृत्वाखालील सरकारचा पाठिंबा १९८४ साली पक्षातील एका गटाने काढून घेतला. त्यामुळे तात्कालिन राज्यपाल यांनी मंत्रिमंडळ बरखास्त केले. त्या पार्श्वभूमीवर १९८५ च्या राज्य विधानसभेच्या निवडणूकीत २/३

बहुमत मिळाले आणि एन.टी.रामाराव पुन्हा मुख्यमंत्री बनले. तेलगू देसमच्या उदयापासूचा विचार केला असता १९९५ पर्यंत रामाराव यांच्या खांद्यावर तेलगू देसमची धुरा होती. १९८९ ची विधानसभा वगळता १९९४ पर्यंत 'तेलगू देसम' पक्षाची सत्ता आंध्र प्रदेशमध्ये होती. सर्वसामान्यांच्या कल्याणाची धोरणे राबवणारे मुख्यमंत्री अशी रामाराव यांची ख्याती होती, पण नंतर या पक्षाची वाटचाल उलट्या दिशेने सुरू झाली. पक्षसंघटना हा स्वतःच्या आयुष्याचा भाग आहे, असे मानल्यामुळे इतर कोणत्याही पक्ष नेत्यांची त्यांनी कदर केली नाही. त्यांना स्वतःला पर्याय मंजूर नव्हता. तेलगू देसमच्या स्थापनेत पुढाकार असणारे एन. श्रीनिवासुलू रेड्डी यांना पक्षातून बाहेर काढले.

१९९५ हे वर्ष तेलगू देसमच्या रामरावांच्यासाठी (तेलगू) इतिहासातले सर्वात खराब वर्ष होते. कारण त्यांनी जन्माला घातलेल्या आणि वाढवलेल्या पक्षात अंतर्गत बंडाळी सुरू झाली, त्यामध्ये त्यांचे दोन जावई विरोधात गेले, त्यानंतर रामराव यांनी आपली द्वितीय पत्नी हिला पक्ष आणि प्रशासन याच्या कामामध्ये लक्ष घालण्याची संधी दिली आणि फसली आणि १९९४ सालच्या तेलगू देसमच्या यशानंतर त्यांना पदच्युत करण्यात आले. यामध्ये चंद्राबाबू याची महत्त्वाची भूमिका होती. चंद्राबाबू नायडू हे पक्षातून बाहेर पडून एन. टी. रामाराव यांना आव्हान उभे केले. पक्षातील बहुसंख्य नेते व कार्यकर्ते चंद्राबाबूच्या बाजूने उभे राहिल्याने पक्षाची सर्व सूत्रे चंद्राबाबू नायडू याच्या हातात आली आणि ते मुख्यमंत्री झाले.

सत्तेवर आल्यानंतर चंद्राबाबू नायडू यांनी आपली पक्षाची पूर्वापार स्विकारलेली ध्येयधोरणे बाजूला सारून उदीरकरणाच्या दिशेने वळलेली धोरणे स्विकारली. आपली प्रगती आणि विकास यावर विचार करा असे आव्हान केले आणि त्यानुसार राज्यकारभार सुरू केला. त्यानंतर सतत ते 'आधुनिक मुख्यमंत्री' म्हणून निवडून येत गेले. २०१४ च्या निवडणूकीत तेलगू देसम पार्टीला ११७ जागा मिळाल्या, परत 'चंद्राबाबू नायडू' मुख्यमंत्री बनले. पुढे २०१९ च्या राज्यविधानसभा निवडणूकीत तेलगू देसमच्या विरोधी कौल आंध्रच्या जनतेने दिला असल्यामुळे वाय.एस.आर. काँग्रेस १५० जागांवर विजय मिळवून वाय.एस. जगमनमोहन रेड्डी हे मुख्यमंत्री बनलेले आहेत. यावेळी तेलगू देसमला २२ जागा मिळालेल्या आहेत. पराभव झाला असला तरी तेलगू देसमचे महत्व कमी झालेले नाही. ३८% मते मिळवलेला तेलगू देसम पक्ष राज्यातील विरोधी प्रमुख पक्ष आणि विरोधी शक्ती म्हणून टिकून राहणार आहे.

- **अकाली दल :–**

अकाली दल हा पंजाबमधील प्रादेशिक पक्ष आहे. पंजाबमधील अकाली दल हा पक्ष म्हणजे प्रादेशिकता आणि धर्म यांची झालर असलेला पक्ष आहे. अकाली दलाची स्थापना स्वातंत्र्यपूर्व काळातच झाली होती. गुरूद्वाराचे म्हणजेच शीख धर्ममंदिराचे व्यवस्थापन परंपरानिष्ठ शिखांच्या हाती

असावे यासाठी चळवळ करणारा गट म्हणून प्रथम अकाली दल या संघटनेची स्थापना झाली. मास्टर तारासिंग आणि संत फत्तेसिंग असे प्रभावी दोन गट या संघटनेत होते. 'पंजाब' हा स्वतंत्र सुभा निर्माण व्हावा ही त्यापाठीमागची भूमिका होती आणि याला १९५६ च्या राज्य पुनर्रचना आयोगाच्या निर्णयाने खतपाणी मिळाले. १९६६ मध्ये या नेत्यांनी 'पंजाब भाषीक राज्याची' मागणी करून ती मिळवली. यानंतर हा पक्ष पंजाबमध्ये प्रभावी पक्ष बनला. १९७७ सालच्या पंजाब विधानसभेच्या निवडणूकीत या पक्षाला बहुमत प्राप्त होऊन तो सत्तारूढ बनला.

### ☼ तत्त्वप्रणाली :–

अकाली दलाची स्थापना ही विशिष्ठ प्रादेशिकता आणि धर्म यावर आधारित झाल्यामुळे धर्माचा प्रभाव तत्त्वप्रणालीवर दिसून येतो. अकाली दलाची तत्त्वप्रणाली पुढील प्रमाणे :–

१) शीख धर्मपरंपरेची जोपासना करणे. २) शीखांची अस्मिता आणि हितसंबंध यांचे रक्षण करणे. ३) घटक राज्यांना स्वायत्तता देणे. ४) शीख शेतकऱ्यांचे आर्थिक सबलीकरण करणे. ५) केंद्राने राज्यात कमीतकमी हस्तक्षेप करणे. ६) बेरोजगारी कमी करणे.

### ☼ पक्षाचे राजकारण :–

पंजाबमधील 'अकाली दलाला' १९५२ च्या विधानसभा निवडणूकीत १३ जागा मिळाल्या. तर १९६७ च्या निवडणूकीत १०४ सदस्यांच्या सभागृहात २४ जागा मिळाल्या. अशा प्रकारे शिखाची अस्मिता राखण्यात अतोनात प्रयत्न करूनही 'अकाली दल' सत्तेवर येवू शकला नाही. पण १९६० साली पंजाब भाषीक राज्याची मागणी मान्य झाली आणि अकाली दल हा पंजाबमधील प्रभावी पक्ष बनला. १९७७ साली झालेल्या विधानसभा निवडणूकीत ११७ पैकी ५८ जागेवर विजय मिळवून हा पक्ष सत्तेवर आला. जनता दल–व–अकाली दल यांचे संयुक्त सरकार १९८० पर्यंत सत्तेवर होते.

१९८० मध्ये अकाली दलात फूट पडून अकाली दल (लोंगोवाल) व अकाली दल (तलवंडी) असे तट पडले. दल खालसा आणि संत भिद्रानवाले यांचे पर्यायी सत्ता केंद्र उभारण्याचा प्रयत्न श्रीमती गांधींनी केला होता. १९८५ च्या राज्य विधानसभेच्या निवडणूकीत या पक्षाला बहुमत प्राप्त होऊन तो सत्तारूढ बनला. पुढे या पक्षात फूट पडल्याने मंत्रिमंडळ बरखास्त करण्यात आले. १९८९ मध्ये अकाली दल (मान) लोकसभेच्या निवडणूकीत ८ पैकी ६ जागांवर विजयी झाले. १९८४ च्या 'ऑपरेशन ब्ल्यूस्टार' आणि 'आपरेशन वुडरोज' या केंद्रसरकारच्या लष्करी मोहीमेमुळे पंजाबातील लोक व अकाली दल हा पक्ष काँग्रेसच्या विरोधात होता. १९८५ ते १९९० पर्यंत पंजाबमध्ये 'अकाली दल' हा पक्ष सत्तेत होता.

१९९९ मध्ये अकाली दलात फूट पडली व तोहरा यांच्या नेतृत्वाखाली ३० मे १९९९ रोजी

हिंद शिरोमणी अकाली दलाची स्थापना झाली. या संघटनेने अकाली दल (मान), पांथिक आणि डेमॉक्रटिक यांच्याशी समझोता केला आणि हे सर्व गट १९९९, २००२ च्या निवडणूकीत स्वतंत्र लढले. याचा फायदा काँग्रेसने उठवला. १९९९ पासून ढप्प झालेली अकाली दलाची पांथिक ऐक्याची वाटचाल गुरूचरण सिंग तोहरा व प्रकाश बादल यांनी सुरू केली आणि अकाली दलात नवचैतन्य निर्माण केले.

पक्षाचे अध्यक्षपद २००३ मध्ये तोहरांना मिळाले यांनी आपल्या समाजाच्या प्रगतीसाठी आणि विकासासाठी भारतीय जनता पक्षासोबत युती केली. १९९९ मधील विधानसभा निवडणूकीत आधीच्या निवडणूकीच्या विरोधी चित्र दिले, त्यानंतरच्या सर्व निवडणूका अकाली दलाने भाजपबरोबर लढण्याचे दिसून येते. २००७ सालच्या विधानसभा निवडणूकीमध्ये अकालीदल भाजपाने बाजी मारली आणि ११७ पैकी ६८ जागा जिंकल्या. १९९७ ला सुधा या युतीचे सरकार होते. २०१२ च्या राज्यविधानसभा निवडणूकीत शिरोमणी अकाली दलाला ५६ जागा व भाजपाला १२ जागा मिळून 'प्रकाशसिंह बादल' हे मुख्यमंत्री झाले. पुढे २०१७ च्या राज्य विधानसभा निवडणूकीमध्ये काँग्रेसला ७७ जागा मिळाल्या. अकाली दलाला १५ जागा मिळाल्या आहेत. सध्या १६ मार्च २०१७ पासून काँग्रेस पक्षाचे कॅप्टन अमरिंदर सिंग हे पंजाबचे मुख्यमंत्री आहेत.

### ❑ नॅशनल कॉन्फरन्स :-

भारतातील सर्वात जुन्या प्रादेशिक पक्षापैकी एक पक्ष म्हणजे नॅशनल कॉन्फरन्स होय. काश्मीर जनतेमधील जागृतीचा परिणाम म्हणून १९३९ साली 'अखिल जम्मू आणि काश्मीर मुस्लीम परिषद' या संघटनेची स्थापना झाली. पुढे पं. नेहरू, मौलाना आझाद यांच्या सल्ल्यावरून त्यातील 'मुस्लीम' हा शब्द वगळण्यात येवून तिथे 'नॅशनल कॉन्फरन्स' (राष्ट्रीय परिषद) असे नामकरण करण्यात आले. १९३९ पासून ते आजपर्यंत हा पक्ष जम्मू-काश्मीर मधल्या राजकारणाच्या केंद्रस्थानी राहिला आहे. राज्यामधील सरंजामशाही आणि एकाधिकारशाही राजवटीला विरोध करण्यासाठी आंदोलनाच्या रूपात उभा राहिलेला हा पक्ष अनेक परिवर्तनातून आपले राजकीय अस्तित्व टिकवून आहे. शेख अब्दुला त्याचे प्रमुख नेते होते. १९४७ सालच्या नंतर हा पक्ष भारतीय सत्तेच्या राजकारणात तो आपले अस्तित्व टिकवून होता. या पक्षाने विशेषत: काश्मीर खोऱ्यात आपले वर्चस्वाचे राजकारण सुरू ठेवण्याचे दिसून येते. स्वातंत्र्यानंतर काश्मीरचे भारतात विलिनीकरण झाल्यानंतर शेख अब्दुलांच्या नेतृत्वाखाली तिथे नॅशनल कॉन्फरन्सचे मंत्रिमंडळ सत्तारूढ झाले.

### ☼ तत्त्वप्रणाली :-

१) राज्यातील सरंजामशाही आणि एकाधिकारशाही नष्ट करणे. २) काश्मीरच्या अस्मितेचा विकास करणे. ३) काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग रहावा. ४) काश्मीरच्या संस्कृतीचे रक्षण

आणि विकास करणे. ५) काश्मीरला अधिक स्वायत्तता मिळावी. ६) काश्मीरला स्वतंत्र दर्जा देणारे घटनेतील ३७० वे कलम कायम ठेवणे इत्यादी.

### ☼ पक्षाचे राजकारण :–

१९४७ नंतर 'नॅशनल कॉन्फरन्स'ला राज्यातील एकमेव वर्चस्व असणारा पक्ष अशी मान्यता जम्मू आणि काश्मीरमध्ये मिळाली. काश्मीरची राजकीय अस्मिता जनमानसावर आणि शासनकर्त्यावर ठसवण्यासाठी नॅशनल कॉन्फरन्सची भूमिका महत्त्वाची होती. १९४७ नंतर सर्वप्रथम शेख अब्दुलांच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन झाले. त्या काळात त्यांनी घटनेच्या ३७० व्या कलमांतर्गत स्वायत्त घटक राज्याची अधिकृत मान्यताही मिळवून घेतली. जमीन सुधारणा कायदे अंमलात आणले. पुढे नॅशनल कॉन्फरन्ससमोर असणाऱ्या काही प्रादेशिक आव्हानापुढे १९५३ साली पक्षाचे प्रमुख शेख अब्दुल्लाना अटक झाली, त्यांना बराच काळ स्थानबध्दता पत्करावी लागली. त्यामुळे पक्षामध्ये काही मुलभूत स्वरूपाचे बदल झाले. पक्ष दुर्बल झाला, त्याची परिणिती अखेर नॅशनल कॉन्फरन्स १९६० च्या दशकात काँग्रेसबरोबर किंवा काँग्रेसमध्ये विलीन झाला.

१९७५ ला शेख अब्दुल्लांची दिर्घकाळानंतर स्थानबध्दतेतून मुक्तता झाली आणि शेख अब्दुल्ला पुन्हा राजकारणात सक्रिय झाल्यावर 'नॅशनल कॉन्फरन्स' हा पक्ष सचेतन झाला. १९७५ साली त्यांच्या नेतृत्वाखाली मंत्रीमंडळसुध्दा सत्तारूढ झाले. पुढे शेख अब्दुल्ला यांच्या निधनानंतर त्यांचे चिरंजीव डॉ. फारूक अब्दुल्ला यांनी नॅशनल कॉन्फरन्सची धुरा स्वत:च्या खांद्यावर घेतली आणि ते जम्मू–काश्मीरचे मुख्यमंत्री बनले.

याच कालखंडात शेख अब्दुल्लासारखे नेतृत्व हरवल्यामुळे काश्मीरमध्ये सुरक्षिततेची पोकळी निर्माण झाली होती. दहशतवादी कारवाया वाढल्या होत्या. त्यावेळी काँग्रेस नेतृत्वाने कारवाईच्या निमित्ताने 'नॅशनल कॉन्फरन्स'वर वचक बसवला. १९८३ झालेल्या निवडणूकीत काँग्रेसबरोबर समझोता केला. पण १९८४ मध्ये फारूख अब्दुल्लाचे सरकार अंतर्गत कलहामुळे कोसळले. पुढे १९८७ च्या निवडणूका झाल्या त्यावेळीसुध्दा नॅशनल कॉन्फरन्सने काँग्रेसबरोबर आघाडी करून निवडणूका जिंकल्या व सत्ता स्थापन केली. याच काळात या सरकारने अनेक भ्रष्टाचार केले. त्याचा परिणाम पक्षाच्या विश्वासार्हतेवर होत असल्यामुळे १९९० मध्ये सत्ता सोडून राष्ट्रपती राजवट सुरू केली. पुन्हा पक्ष हा अज्ञातवासात गेला.

१९९४ मध्ये परत या पक्षाने मध्यवर्ती कार्यकारिणीची बैठक बोलावून राजकीय आखाडा बांधण्यास सुरूवात केली. १९९६ च्या विधानसभा निवडणूकीत स्वायत्ततेचा मुद्दा केंद्रस्थानी ठेवला व केंद्रातील भाजपाबरोबर समन्वय साधून राजकारण करण्याचे ठरविले. म्हणून त्यांनी केंद्रातील एनडीए सरकारला पाठिंबा दिला. २००२ सालच्या निवडणूकीत या पक्षाला हार पत्करावी लागली. यावेळी

पक्षाचे अध्यक्ष ओमर अब्दुल्ला होते आणि काँग्रेस-पीपल डेमॉक्रेटिक पार्टीचे सरकार स्थापन झाले. पुढे २००८ च्या राज्यविधानसभेच्या निवडणूकीत नॅशनल कॉन्फरन्स या पक्षाने सर्वाधिक जागा जिंकल्या व काँग्रेससोबत युती करत ओमर अब्दुल्ला हे मुख्यमंत्री झाले. २००८ नंतर केंद्रातील सत्ताबदलामुळे राज्यातील सत्ता बदलाला प्रोत्साहन मिळाले आणि भाजपाने-पीपल डेमॉक्रटीक पार्टीसोबत आघाडी करून सरकार स्थापन केले होते. २०१४ च्या राज्यविधानसभा निवडणूकीत हा पक्ष स्वतंत्रपणे लढला. या ुपक्षाला फक्त १५ जागा मिळाल्या. त्यामुळे ओमर अब्दुला यांनी २४ डिसेंबर २०१४ रोजी मुख्यमंत्री पदाचा राजीनामा दिला. (संदर्भ : https://en.m.wikipedia.org/wiki/Jammu_%26_ Kashmir_National_Conference (Last seen on 01/412020)

## ❑ तृणमूल काँग्रेस :-

पश्चिम बंगालमधील सक्रिय प्रादेशिक पक्ष म्हणजे तृणमूल काँग्रेस होय. काँग्रेस पक्षाच्या पश्चिम बंगाल शाखेमध्ये झालेल्या फुटाफुटीतून तृणमूल पक्ष जन्माला आला. रामकृष्ण परमहंस यांच्या स्मृतिप्रित्यर्थ होणाऱ्या कल्पतरू उत्सवाच्या मुहूर्त साधून ममता बॅनर्जी यांनी जानेवारी १९९८ ला पक्षाची जाहीररित्या स्थापना केली. २६ वर्षे भारतीय काँग्रेस पार्टीचे सक्रिय सदस्य असतानादेखील ममता बॅनर्जी यांनी या पार्टीची निर्मिती केली. १९९८ च्या लोकसभा निवडणूका तृणमूल काँग्रेसने लढवल्या. २९ जागा लढवून ७ जागा मिळवल्या आणि पक्षाचे अस्तित्व सिध्द केले.

नुकत्याच जन्मलेल्या पक्षाचा विजय हा कौतुकास्पद होता. वाजपेयींनी जेव्हा नवीन सरकारात सहभागी होण्यासाठी आमंत्रण दिले, त्यावेळी बॅनर्जी यांनी ते नाकारले. १९९८ पासून २००३ पर्यंत तृणमूल काँग्रेसच्या उमेदवारांनी डाव्यांना सळो की पळो करून सोडले. ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेत डाव्यांची संख्या कमी झाली आणि तृणमूल काँग्रेसची संख्या वाढत गेली.

### ☼ तत्त्वप्रणाली :-

१) मातभूमीचे रक्षण करणे. २) लोककल्याणकारी योजना राबवणे. ३) राज्यातील उद्योजकांना प्रोत्साहित करणे. ४) राज्यातील बेकारी दूर करणे. ५) जात, वंश, भाषा, प्रांत यांना महत्त्व इत्यादी.

### ☼ पक्षाचे राजकारण :-

१ जानेवारी १९९८ ला 'ममता बॅनर्जी' यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेला तृणमूल काँग्रेस पक्ष अल्पावधीतच संपूर्ण पश्चिम बंगाल व्यापून स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये घवघवीत यश संपादन करणारा ठरला. १९९८ च्या निवडणूकीत या पक्षाने २१ जागा लढवून ७ जागा जिंकल्या. २००१ च्या.निवडणूकीत या पक्षाने राज्यविधानसभेत आपले बहुमत प्राप्त करून सत्ता स्थापन केली आणि

राष्ट्रीय लोकशाही आघाडीशी जवळीक साधली. पण पुढे २००३ च्या बंगालमधील पंचायतीच्या निवडणूकामध्ये तृणमूलचा पार धुव्वा उडाला. २००६ सालच्या विधानसभा निवडणूकीत तृणमूल कॉंग्रेसवर मात करून डाव्या आघाडीने विजय मिळवला आणि बुध्ददेव भट्टाचार्य मुख्यमंत्री झाले. पुढे या सरकारच्या नवीन 'आर्थिक धोरणाला विरोध करत नंदीग्राम प्रश्न हाती घेतला. तृणमूल कॉंग्रेसने २००९ च्या लोकसभा निवडणूकीत १९ जागा जिंकल्या आणि २०१९ च्या निवडणूकीत २२ जागा जिंकल्या आहेत. २०११ च्या बंगाल विधानसभा निवडणकीत तृणमूल कॉंग्रेसच्या आघाडीने १८४ जागा जिंकल्या व आपले सरकार स्थापन केले आणि ममता बॅनर्जी मुख्यमंत्री झाल्या. २०१६ च्या निवडणूकीत तृणमूल कॉंग्रेस पक्षाने राज्यविधानसभा निवडणूकीत या जागा जिंकून परत ममता बॅनर्जी पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री झाल्या आहेत.

❑ **प्रादेशिक पक्षांचे राजकारण :–**

गेल्या ३० वर्षांमध्ये केंद्रातील सत्ता एका पक्षाच्या बळावर मिळवण्यात राष्ट्रीय पक्षांना अपयश आले आहे. त्यामुळे प्रादेशिक पक्षांचा चांगलाच प्रभाव वाढला आहे. केंद्रातील सत्ता टिकवण्यासाठी प्रादेशिक पक्षांच्या प्रमुखांची मनधरणी राष्ट्रीय पक्षांना करावी लागते. त्यामुळे केंद्रातील राजकारणात सौदेबाजीला ऊत आला आहे. वाढते प्रादेशिक पक्ष, त्यांच्या वाढत्या अवाजवी, हटवादी मागण्या आणि या पक्षाच्या नेत्यांचे ब्लॅकमेलींग यामुळे राष्ट्रीय राजकारणात अनेक अडचणी येत असल्याचे दिसते. १९८९ पासून राष्ट्रीय राजकारणात अस्थिरता सुरू झाली. जनता पक्षाच्या अडीच वर्षाचा सत्तेचा काळ सोडला तर कॉंग्रेसला केंद्रात मोठ्या बहुमताने सत्ता मिळत होती. केंद्रात एकपक्षीय राजवट असल्यामुळे अस्मिता कधीच निर्माण होवू शकली नाही. पण १९८९ मध्ये जनता दल, कॉंग्रेस, भाजपा आघाडी याचबरोबर असंख्य प्रादेशिक पक्ष यामध्ये लोकसभा निवडणूक झाली. जनता दलाचे बळ उत्तर भारतापुरते मर्यादित होते. डावी आघाडी आणि भाजपाच्या पाठिंब्यावर जनता दलाने सत्ता मिळवली.

१९९१ मध्ये राजीव गांधींच्या हत्येच्या पार्श्वभूमीवर झालेल्या लोकसभा निवडणूकीत कॉंग्रेसला बहुमताला जवळजवळ ४०–४५ जागा कमी पडल्या होत्या. त्यावेळी केंद्रातील सत्ता टिकवण्यासाठी प्रादेशिक पक्षाचे महत्त्व वाढले. या निवडणूकीत मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टीला ३९ जागा. जनता दल–६९ जागा, आण्णा द्रमुकला ११ आणि तेलगू देसमला–१३ जागा मिळाल्या. त्यामुळे पंतप्रधान पी.व्ही. नरसिंहराव यांनी आघाडी सरकार स्थापन केले. सरकार टिकवण्यासाठी प्रादेशिक पक्षाला केंद्रातील सत्ता टिकवण्यासाठी वाटेल त्या मागण्या पूर्ण कराव्या लागल्या. १९९८ मध्ये अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार सत्तेत आले. या सरकारला जयललिता यांच्या अण्णाद्रमुक पक्षाचा पाठिंबा होता. जयललिता यांच्या 'करूणानिधी सरकार हटाव'च्या मागणीमुळे सरकारला सत्ता गमवावी लागली. १९८९ पासून देशात अनेक प्रादेशिक पक्ष

निर्माण झाले. त्याआधी देशात प्रादेशिक पक्ष होते. मात्र त्यांची संख्या मर्यादित होती. द्रमुक, नॅशनल कॉन्फरन्स, बिजु जनता दल, अकाली दल, प्रजा समाजवादी पक्ष, राष्ट्रीय लोकदल, धर्मनिरपेक्ष जनता दल, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना इत्यादी प्रादेशिक राजकीय पक्षांना सोबत घेवून राजकारण केले आहे. १९९१ पासून आजपर्यंत महत्त्वाचे राष्ट्रीय पक्ष भारतीय राष्ट्रीय काँग्रेस आणि भारतीय जनता पार्टीने अनुक्रमे संयुक्त पुरोगामी आघाडी (युपीए) आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडी अंतर्गत वेगवेगळ्या प्रादेशिक पक्षांना एकत्र करून आघाडीचे राजकारण सुरू आहे.

*** स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - ३ ***

❑ **रिकाम्या जागी अचूक उत्तर लिहा.**

१. शिवसेना हा .................. राज्यातील पक्ष आहे.

*अ) महाराष्ट्र ब) कर्नाटक क) बिहार ड) पंजाब.*

२. तृणमूल काँग्रेसच्या सर्वेसर्वा ................. आहेत.

*अ) प्रतिभा पाटील ब) ममता बॅनर्जी क) मायावती ड) जयललिता.*

३. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ............... हे अध्यक्ष आहेत.

*अ) चंद्राबाबू नायडू ब) केजरीवाल क) शरद पवार ड) सोनिया गांधी.*

४. चंद्राबाबू नायडू ............... पक्षाचे आहेत.

*अ) काँग्रेस ब) राष्ट्रवादी क) शिवसेना ड) तेलगू देसम.*

५. अकाली दल ............... राज्यातील प्रादेशिक पक्ष आहे.

*अ) महाराष्ट्र ब) कर्नाटक क) बिहार ड) पंजाब.*

## २.३ सारांश

भारतामध्ये स्वातंत्र्यानंतर झालेल्या पहिल्या निवडणुकीपासून म्हणजे १९५१-५२ ते १९६७ च्या चौथ्या सार्वत्रिक लोकसभा निवडणूकीपर्यंत काँग्रेस पक्षाचे एकपक्ष म्हणून प्रभावी वर्चस्व राहिले आहे. १९६७ नंतर थोड्या प्रमाणात हे वर्चस्व कमी होण्यास सुरूवात झाली. केरळ सारख्या राज्यात १९५७ पासूनच काँग्रेसला विरोध झालेला होता. पुढे १९७७ च्या निवडणुकीमध्ये काँग्रेस पक्षाची सत्ता आणीबाणीच्या परिणामामुळे जाऊन जनता पक्षाच्या रूपाने आघाडी पहिले बिगर काँग्रेस सरकार सत्तेवर आले. परंतु पुन्हा १९८० च्या निवडणुकीमध्ये इंदिरा गांधी तर १९८४ च्या निवडणुकीमध्ये राजीव गांधींच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षाने आपले वर्चस्व पुन्हा प्रस्थापित केले. परंतु १९८९ नंतर

मात्र भारतात कोणत्याही एका पक्षाचे वर्चस्व राहिले नाही व आघाडीची सरकारे सत्तेवर येऊ लागली. १९८९, १९९१, १९९६, १९९८, १९९, २००४, २००९ च्या लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीमध्ये काँग्रेसप्रणित 'संयुक्त पुरोगामी आघाडी (युपीए) तर भाजपप्रणित 'राष्ट्रीय लोकशाही आघाडी' (एनडीए) प्रादेशिक पक्षांच्या पाठिंब्याने सत्तेवर आल्याचे दिसून येते. या काळात प्रादेशिक पक्षांचे व त्यांच्या नेत्यांचे महत्त्व जास्त प्रमाणात वाढले. प्रादेशिक अस्मितांचा प्रभाव राष्ट्रीय राजकारणावर पडू लागला. यामुळे राष्ट्रीय नेतृत्वावर अनेक मर्यादा आल्या. राष्ट्रीय पक्षाच्या धोरणामध्ये सर्वसमावेशकता व लवचिकता आली. राष्ट्रीय पातळीवर प्रभावी विरोधी पक्षाचा अभाव दिसू लागला. थोडक्यात, आघाडीच्या राजकारणामुळे 'एकपक्षीय वर्चस्व' ते 'बहुपक्षीय आघाडी व्यवस्था' असा भारतीय राजकारणाचा प्रवास झाला आहे. याला थोडा अपवाद म्हणजे २०१४ व २०१९ च्या लोकसभा सार्वत्रिक निवडणूका मा. नरेंद्र मोदी यांच्या प्रभावी नेतृत्वामुळे भाजपाने एकहाती जिंकल्या. सध्या भाजपप्रणित राष्ट्रीय लोकसाही आघाडी सरकार केंद्रामध्ये सत्तास्थानी असून यामध्ये भाजप या पक्षाचे वर्चस्व आहे. त्यामुळे काही प्रमाणात प्रादेशिक पक्षाच्या मनमानीवर मर्यादा आल्याचे दिसून येते. परंतु प्रादेशिक पक्षांचे एकूणच राजकारणामधील महत्त्व कमी झालेले नाही. प्रादेशिक पक्षांना बरोबरीने स्थान देणे ही बाब राष्ट्रीय पक्षांना अपरिहार्य ठरताना दिसत आहे.

## २.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१. **लोकसभा** : भारतीय कायदेमंडळाचे कनिष्ठ सभागृह.

२. **मताधिकार** : भारतातील १८ वर्षे पूर्ण झालेल्या स्त्री-पुरुषांना मतदानाचा अधिकार.

३. **पक्ष** : विशिष्ठ विचारसरणीच्या आधारावर सत्ता प्राप्तीसाठी प्रयत्न करणारा हितसंबंधी गट.

४. **प्रादेशिक पक्ष** : विशिष्ट घटकराज्याच्या सत्तास्पर्धेत सहभागी असलेला पक्ष.

५. **इव्हीएम** (EVM) : इलेक्ट्रॉनिक वोटिंग मशिन.

६. **बिगर काँग्रेस** : काँग्रेस सोडून इतर पक्ष.

७. **भाजपा** : भारतीय जनता पार्टी.

८. **सार्वत्रिक** : एकाचवेळी निवडणूका.

## २.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

- **स्वयं-अध्ययन प्रश्न-१ ची उत्तरे**

*१. पंडित नेहरू.*

२. *गुलझारीलाल नंदा.*

३. *अटल बिहारी वाजपेयी.*

४. *भारत-पाक.*

५. *मोरारजी देसाई.*

- **स्वयं-अध्ययन प्रश्न-२ ची उत्तरे**

१. *ब) बहुपक्ष.*

२. *अ) आंध्रप्रदेश.*

३. *ब) जनता सरकार.*

४. *क) ८.*

५. *ब) व्ही. पी. सिंग.*

- **स्वयं-अध्ययन प्रश्न-३ ची उत्तरे**

१. *अ) महाराष्ट्र.*

२. *ब) ममता बॅनर्जी.*

३. *क) शरद पवार.*

४. *ड) तेलगू देसम.*

५. *ड) पंजाब.*

## २.६ सरावासाठी स्वाध्याय

१. कॉंग्रेस पक्षाच्या ध्येयधोरणाची व निवडणूकीच्या राजकारणाची चर्चा करा?

२. भारतीय जनता पक्षाचे संसदीय निवडणूकीचे राजकारण स्पष्ट करा.

३. भारतातील प्रादेशिक पक्षांचा उदय आणि राजकारणाची चर्चा करा.

४. आघाडीच्या राजकारणाचे स्वरूप आणि वाटचाल विषद करा.

५. १६वी लोकसभा निवडणूक/निवडणूक अर्थ व अन्वयार्थ विशद करा.

## २.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


१. **डॉ. भा. ल. भोळे** : *'भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण'*, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर.

२. **कॉ. प्रकाश पवार** : *'काँग्रेसपुढील आव्हाने आणि भाजपाचा उदय'.*

३. **सुहास कुलकर्णी, चांपानेकर मिलींद** : 'असा घडला भारत-१९४७ ते २०१२', रोहन प्रकाशन, पुणे.

४. **सुहास पळसीकर** : *'जात व महाराष्ट्रातील राजकारण'*, सुगावा प्रकाशन, पुणे.

५. **प्रकाश पवार** : *'भारतीय राजकारण आणि नेतृत्वाची वाटचाल, राजकीय धुरीणत्व वर्चस्व'*, डायमंड प्रकाशन, पुणे.

६. **वा. भा. पाटील** : *'भारतीय शासन आणि राजकारण'*, औरंगाबाद प्रकाशन, औरंगाबाद.

७. **य. दि. फडके** : *'लोकसभा निवडणूका : १९५२ ते १९९९'*, औरंगाबाद प्रकाशन, औरंगाबाद.


❑❑❑

घटक–३

# भारतीय राजकारणातील जात आणि वर्गसमूह

**अनुक्रमणिका**


३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रस्तावना

३.२ विषय विवेचन

 ३.२.१ प्रबळ जातींचे राजकारण व त्याचा ऱ्हास

 ३.२.२ मागासवर्गीयांचे राजकारण

 ३.२.३ उपेक्षित वर्गीयांचे राजकारण

 ३.२.४ जातीच्या राजकारणातील नवे प्रवाह

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

३.५ स्वयं–अध्ययन प्रश्न व उत्तरे

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


## ३.० उद्दिष्ट्ये

मागील दोन घटकात आपण भारतातील राजकीय प्रक्रिया, निवडणूकीचे राजकारण आणि पक्ष पध्दती यांचा अभ्यास केला आहे. या घटकात आपण जात आणि वर्ग आधारित राजकारण याचा अभ्यास करणार आहोत. या घटकाच्या अभ्यासाअंती आपण–

१. भारतीय राजकारणातील प्रबळ जातींचे राजकारण व त्यांचा ऱ्हास समजावून घेणार आहोत.

२. भारतातील मागास किंवा उपेक्षित जातींचे राजकारण समजावून घेणार आहोत.

३. जातीच्या राजकारणातील नवीन प्रवाह समजण्यासाठी मदत होणार आहे.

## ३.१ प्रस्तावना

जाती व्यवस्था हे भारतीय समाज व्यवस्थेचे एक अनोखे वैशिष्ट्य आहे. भारतातील कोणत्याही सामाजिक, राजकीय किंवा आर्थिक व्यवस्थेचा सर्वंकष अभ्यास करण्यासाठी जातीय दृष्टिंकोनातून त्याचे विश्लेषण करणे आवश्यक आहे. जातीय राजकारणाचा अभ्यास केल्याशिवाय भारताच्या

राजकीय प्रक्रियेचा अभ्यास परिपूर्ण होणार नाही. भारतीय राजकारणात जातीचा प्रभाव मोठ्या प्रमाणात दिसून येतो. जातीच्या समीकरणाशिवाय सत्ता संपादन करता येणार नाही अशा प्रकारची धारणा राजकीय पक्षांची देखील झालेली दिसून येते. जातीच्या राजकारणाचे विविध पैलू आहेत. प्रत्येक राज्यात वेगवेगळे जातसमूह प्रभावी असल्याचे दिसून येतात. जातीच्या राजकारणात प्रस्थापित विरुध्द विस्थापित असा संघर्ष दिसून येतो. तसेच बहुसंख्य विरुध्द अल्पसंख्यांक जातसमूह असादेखील संघर्ष पहावयास मिळतो. याशिवाय दोन उच्च जातीमध्ये देखील परस्पर संघर्ष दिसून येतात. तसेच दोन मागास जातीमध्ये देखील परस्पर संघर्ष दिसून येतात. स्वातंत्र्यपूर्व काळापासून भारतीय राजकारणात जातीला महत्त्वाचे साधन म्हणून वापरले गेले आहे. गेल्या सात दशकात जातीच्या राजकारणामध्ये अनेक स्थित्यंतरे घडून आली आहेत. थोडक्यात जातीचे राजकारण हा एक कळीचा आणि संवेदनशील विषय आहे.

ज्याप्रमाणे भारतीय समाजात जात आधारित विभागणी आहे, तशीच ती वर्ग आधारित देखील आहे. विशेषत: १९९१ च्या नवीन आर्थिक (खाउजा) धोरणाचा स्विकार केल्यानंतर एक मोठा सुखवस्तू वर्ग देशात निर्माण झाला आहे. श्रीमंत ते गरीब यांच्यातील दरी प्रचंड मोठ्या प्रमाणात वाढली आहे. या स्पर्धेच्या युगात भांडवलदार वर्गाचे वर्चस्व दिसून येत आहे. उलटपक्षी श्रमजीवी आणि सामान्य जनतेचे जगणे दिवसेंदिवस कठिण होत आहे. अशा प्रकारे भारतात 'आहे रे' (Haves) आणि 'नाही रे' (Have Nots) असे दोन वर्ग स्पष्ट दिसू लागले आहेत. या दोन वर्गामध्ये अर्थातच पैसा असणाऱ्या वर्गाच्या हातात सत्तेची सुत्रे पहावयास मिळतात.

जात आणि वर्ग यांच्यात साधारणत: एक सहसंबंध दिसून येतो. भारतातील बहुतांश भागात मागास जातीमधील वर्ग हा श्रमजीवी म्हणून काम करताना दिसतो. त्यामुळे गरीबी आणि सामाजिक मागासलेपणा या दोन्ही गोष्टी एकत्र पहावयास मिळतात. याउलट संपत्ती असणारा वर्ग हा उच्च जातीमध्ये अधिक प्रमाणात दिसून येतो. उच्च जातीमध्ये देखील काही प्रमाणात आर्थिक मागासलेपणा दिसून येतो. त्यामुळे सामाजिक विषमता आणि आर्थिक विषमता या दोन्ही गोष्टी भिन्न असल्या तरी त्यांचा अभ्यास एकत्रच करावा लागतो. 'जात' आणि 'वर्ग' यांचा राजकारणावर मोठा प्रभाव दिसून येतो. एकाचवेळी सामाजिक व आर्थिक न्याय प्रस्थापित करणे ही खरी कसोटी आहे.

या घटकात आपण भारतीय राजकारणातील 'जात' आणि 'वर्ग' यांच्या प्रभावाचा अभ्यास करणार आहोत.

## ३.२ विषय विवेचन

### ३.२.१ प्रबळ जातींचे राजकारण व त्याचा ऱ्हास

प्राचीन भारतीय समाज वर्ण व्यवस्थेमध्ये विभागला गेला होता. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र या चार वर्णामध्ये समाजाची उतरंड पध्दतीने विभागणी झाली होती. वर्ण व्यक्तींच्या जन्मावर

ठरत असे. या व्यवस्थेमध्ये प्रत्येक वर्णाचे कर्तव्य, जबाबदाऱ्या आणि मर्यादा परंपरेने निश्चित केल्या होत्या. ही बंदिस्त व्यवस्था होती. या व्यवस्थेत ब्राह्मण सर्वश्रेष्ठ होता. त्याला शिक्षणघेण्याचा आणि पूजापाठ करण्याचा अधिकार होता. क्षत्रिय वर्गातील व्यक्तीने देशाचे किंवा समाजाचे रक्षण करणे अभिप्रेत होते. वैश्य लोकांनी व्यापार, उदीम, शेती इत्यादी क्षेत्रात आपले योगदान देणे अपेक्षित होते. तर शूद्र लोकांनी या तीन वर्गातील लोकांचे सेवक म्हणून काम करावे आणि समाजातील कनिष्ठ दर्जाची कामे करावीत. अशा प्रकारचा दंडक होता. एवढेच नव्हे, शूद्रांना अस्पृश्य मानले गेले होते. त्यांना सार्वजनिक ठिकाणी पाणी भरण्यास अथवा धार्मिक स्थळामध्ये प्रवेश करण्यास मज्जाव करण्यात आला होता. प्रत्येक वर्णात अनेक जाती आणि उपजाती आहेत. या सर्व जातींची दोन गटात वर्गवारी करता येईल. एक शोषण करणाऱ्या जातींचा गट आणि दुसरा शोषित जातींचा गट.

परंपरागत भारतीय समाज व्यवस्थेमध्ये उच्च जातींचे वर्चस्व होते. ब्रिटीश राजवटीत देखील उच्च जातीमधील लोकांचा राजकारण आणि प्रशासनात प्रभाव होता. तथापि, १९व्या शतकाच्या उत्तरार्धात आणि २०व्या शतकाच्या पूर्वार्धात स्वातंत्र्य चळवळी सोबत सामाजिक स्वातंत्र्याची चळवळ सुरू झाली होती. म. जोतिबा फुले, म. गांधी, डॉ. बी. आर. आंबेडकर, रामस्वामी पेरियार, सानेगुरुजी इत्यादींनी सामाजकि समता प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने चळवळी केल्या. २१ व्या शतकातील सामाजिक व राजकीय बदल हे त्याचेच फलित आहे. शोषित जातींना शिक्षण, संपत्ती, सन्मान, संधी इत्यादी प्राप्त व्हावी म्हणून अनेकांनी प्रयत्न केले. यातील डॉ. आंबेडकर यांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरले. घटनात्मक तरतूद करून मागास जात समूहांना संसद, राज्यविधीमंडळ, सनदी सेवा, शिक्षण इत्यादी क्षेत्रात आरक्षणाची तरतूद लागू केली. त्यामुळे कायद्याच्या बंधनामुळे (उपेक्षित/ मागास) जातींना संधी मिळत गेली. त्यामुळे प्रबळ किंवा प्रस्थापित जातींना जागावरील आपला दावा कमी करावा लागला. राज्यघटनेतील कलम ३३४ नुसार संसदेतील ८४ जागा अनुसूचित जातींसाठी आणि ४७ जागा अनुसूचित जमातींसाठी २०३० अखेर आरक्षित ठेवण्यासाठी २०१९ साली १०४ वी घटना दुरुस्ती करून मुदत वाढ देण्यात आली. त्याचप्रमाणे राज्य विधिमंडळातील आरक्षण देखील पुढील दहा वर्षांपर्यंत वाढविण्यात आले.

१९८० च्या दशकात भाजपाने आरक्षणाच्या धारेणाला विरोध करत पक्षाची वाटचाल सुरू केली. या धोरणाचा विरोध करताना काँग्रेस हा दलित आणि मुस्लीमांचे अनुनय करणारा पक्ष म्हणून टीका केली. परंतु सत्ता प्राप्तीसाठी या मुद्याला भाजपाने बगल दिली. १९९६ नंतरच्या निवडणुकीत दलित मतांचा पाठिंबा मिळावा म्हणून काँग्रेसच्या धर्तीवर भाजपने देखील आरक्षणाच्या धोरणाला आपला विरोध नसल्याचे स्पष्ट केले. एवढेच नव्हे दलित आणि मागास प्रवर्गातील नेतृत्वाला संधी देण्यास प्राधान्य दिले. त्यामुळे १९९० नंतर भाजपाने हळूहळू आपला 'भडजी-शेटजींचा लालची पक्ष' ही प्रतिमा पुसण्याचा प्रयत्न केला.

प्रा. सुहास पळशीकर यांच्या मते, भाजपने देखील कनिष्ठ जातीच्या नेत्यांना पुढे आणण्याचा

प्रयत्न केला. भाजपच्या गोविंदाचार्य यांनी यास 'सोशल इंजिनिअरिंग' असे म्हटले. १९९१ नंतर कल्याणसिंग या मागास जातीमधील नेतृत्वाचा उदय झाला. याच काळात मध्य प्रदेशमध्ये उमा भारती, महाराष्ट्रात गोपीनाथ मुंडे या मागास जातींमधील नेतृत्वाला भाजपने संधी दिली. याच काळात गुजरातमध्ये नरेंद्र मोदींच्या रूपाने ब्राम्हणेतर नेतृत्व भाजपमध्ये तयार झाले. सलग तीन वेळा गुजरातमध्ये भाजपला यश प्राप्त करून दिल्यामुळे २०१४ च्या लोकसभा निवडणूकीपूर्वी तात्कालीन गुजरातचे मुख्यमंत्री, भाजपचे पंतप्रधान पदाचे उमेदवार म्हणून घोषित केले गेले. परिणामत: इतर मागास प्रवर्गातील अनेक जातसमूह भाजपशी जोडले गेले. मागास व इतर मागास जातींमधील नेतृत्वाला संधी मिळाल्यामुळे साहजिकच प्रस्थापित जात समूहांना काही संधी गमावावी लागली. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रात भाजपने पुन्हा देवेंद्र फडणवीस यांचे नेतृत्व पुढे आणले. त्याचवेळी एकनाथ खडसे, चंद्रकांत बावनकुळे, विनोद तावडे, पंकजा मुंडे इत्यादी बहुजन समाजातील पक्षातील नेते नाराज झाले. त्यामुळे पक्षाला सत्तेपासून दूर जावे लागले. एकूणच भारतीय राजकारणात सत्ता प्राप्त करण्यासाठी समाजातील केवळ प्रस्थापित जातींवर अवलंबून चालणार नाही याची प्रचिती भाजपला देखील आली आहे.

काँग्रेस पक्षात स्वातंत्र्यानंतर पुढे दोन तीन दशक राज्या-राज्यातील नेतृत्व व राष्ट्रीय पातळीवरील नेतृत्व प्रस्थापित उच्च व मध्यम जातीकडे होते. १९८० मध्ये इंदिरा गांधींचे पुनरागमन झाले. त्यानंतर राजीव गांधीचे नेतृत्व लाभले. या पक्षाने प्रस्थापित जातीप्रमाणे विस्थापित किंवा मागास जातींना देखील राजकीय संधी प्राप्त होण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले. दलित आदिवासी, मुस्लीम आणि इतर अल्पसंख्यांक समुदाय यांना सोबत घेवून हा पक्ष दीर्घकाळ सत्तेवर राहिला. १९९१ च्या लोकसभा निवडणूकीपर्यंत हा सर्वात मोठा व प्रभावशाली पक्ष होता. १९९१ नंतर पक्षाला आपला प्रभाव टिकवता आला नाही, याची अनेक कारणे आहेत. त्यातील एक महत्त्वाचे कारण म्हणजे जातीय समीकरण. दलित आणि मुस्लीम हा काँग्रेसचा परंपरागत मतदार काँग्रेस पासून दूर गेला. दलितांचा केवळ सत्ता मिळविण्यासाठी काँग्रेस वापर करते, असा आरोप करण्यात आला. त्यामुळे कांशीराम, मायावती, रामदास आठवले, रामविलास पास्वान, ॲड. प्रकाश आंबेडकर, मुलायमसिंग यादव, लालू प्रसाद यादव, नितीशकुमार, प्रा. जोगेंद्र कवाडे, रा. सु. गवई इत्यादी स्व सामर्थ्यावर मागास जातींमधून नेतृत्व तयार झाले. या नेत्यांनी प्रस्थापित जातीमधील नेतृत्वासमोर आव्हान निर्माण केले. या नेत्यांनी स्वतंत्र चूल मांडल्यामुळे काँग्रेसचा मागास जातींचा जनाधार कमी झाला. साहजिकच काँग्रेसमधील उच्च जातींमधील नेतृत्वाला सत्तेपासून दूर जावे लागले.

अशा प्रकारे काँग्रेसपासून एक मोठा मागास जातींचा समूह बाहेर पडला. याशिवाय भाजपमध्ये सुध्दा मागास जातींच्या नेतृत्वाला दुय्यम स्थान देत असल्याच्या कारणावरून तेथेसुध्दा दलित किंवा मागास जातींना न्याय मिळत नाही, अशी काही नेत्यांची भावना निर्माण झाली. त्यामुळे उपरोक्त नमूद केलेल्या नेत्यांनी आपआपल्या परीने प्रबळ जातींच्या राजकारणाला आव्हान देत स्वत:चे अस्तित्व

निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे बहुजन समाज पक्ष, राष्ट्रीय जनता दल, लोकजनशक्ती पार्टी, वंचित बहुजन आघाडी, रिडालोस, ए.आय.एम.आय.एम. (AIMIM) इत्यादी पक्षांच्या किंवा आघाड्यांच्यामुळे उपेक्षित जातींना संधी मिळत गेली. या पक्षांचा लढा सत्तारूढ पक्ष आणि प्रस्थापित उच्च जाती यांच्या विरोधात होता. तरीसुध्दा प्रत्यक्ष व्यवहारात मात्र मागास जातींना जेवढ्या प्रमाणात राजकीय संधी मिळणे आवश्यक होते, तेवढी संधी अद्याप मिळत नसल्याचे दिसून येते. परंतु काही प्रमाणात प्रबळ जातींच्या वर्चस्वाला धक्का दिला गेला.

प्रा. रजनी कोठारी यांनी 'कास्ट इन इंडियन पॉलिटीक्स' (Caste in Indian Politics) या आपल्या पुस्तकात भारतातील जातीचे राजकारण आणि राजकारणाचे जातीयकरण कशा प्रकारे झाले आहे, याचे विश्लेषण केले आहे. स्वातंत्र्यानंतरच्या काळात राजकारणात ब्राम्हण किंवा इतर उच्च जातींचे वर्चस्व राष्ट्रीय आणि राज्याच्या राजकारणात होते. १९७० नंतर शिक्षणाचा प्रसार झाला त्यामुळे समाजातील उपेक्षित वर्गामध्ये जागृती निर्माण झाली. परिणामत: राजकारणातील मागास जातींच्या लोकांचा सक्रीय सहभाग १९८० नंतर वाढत गेला. तसेच प्रस्थापित जातींच्या नेतृत्वाला किंवा प्रबळ जातींच्या नेतृत्वाला आव्हान निर्माण झाले.

सुरूवातीपासून भारताच्या सामाजिक, धार्मिक आणि राजकीय क्षेत्रात ब्राम्हण, क्षत्रिय आणि वैश्य या जात समूहांचा प्रभाव दिसून येतो. आजसुध्दा या जातसमूहांचे वर्चस्व दिसून येते. ब्राह्मण समाजाची लोकसंख्या ५ ते ६ टक्क्यांपेक्षा जास्त नाही. तसेच क्षत्रिय मानल्या जाणाऱ्या जातीदेखील ४ ते ५ टक्के पेक्षा जास्त नाहीत. अशाप्रकारे हिंदू धर्मातील उच्च मानल्या गेलेल्या जातींचे प्रमाण एकूण लोकसंख्येच्या जेमतेम १७ ते १८ टक्के एवढेच आहे. याउलट अनुसूचित जातींचे प्रमाण १६ ते १७ टक्के आणि अनुसूचित जमातींचे प्रमाण ७ ते ८ टक्केच्या जवळपास आहे. याशिवाय हिंदू धर्मातील इतर मागास जातींचे प्रमाण ५२ टक्क्यांपेक्षा जास्त आहे. ही आकडेवारी राजकारणात महत्त्वाची ठरते.

प्रत्येक राज्यातील स्थिती वेगळी दिसून येते. प्रत्येक राज्यात असणारी प्रबळ जात वेगळी आहे. त्यामुळे प्रत्येक राज्यातील जातीय राजकारणाचे स्वरूप वेगळे दिसून येते. या प्रबळ जातींना तेथील मागास जातींनी आव्हान दिल्याचे दिसून येते. तामिळनाडू आणि दक्षिण भारतात ब्राह्मण-ब्राह्मणेतर आणि मागास जाती या तीन गटात राजकारणाचे ध्रुवीकरण दिसून येते. तेथे क्षेत्रीय वर्गाचा प्रभाव दिसून येत नाही. त्यामुळे तामिळनाडूत ब्राम्हण-ब्राम्हणेतर यांच्यात नेतृत्वासाठी चुरस दिसून येते. कर्नाटक राज्यात लिंगायत आणि वोक्कलिंग या दोन प्रबळ जाती आहेत. आंध्र प्रदेश आणि तेलंगणा या राज्यात रेड्डी आणि कम्मा जातींचे राजकारणात वर्चस्व दिसून येते. महाराष्ट्रात मराठा जातीचा राजकारणात मोठा प्रभाव आहे. त्याचप्रमाणे केरळसारख्या राज्यात मुदलियार आणि मुस्लीम मतांचे राजकारण चालते. उत्तर प्रदेश, बिहार या हिंदी भाषिक राज्यात यादव, जाट, दलित आणि मुस्लीम समाजाचे वर्चस्व दिसून येते. ईशान्य भारतातील राजकारणात 'जात' या घटकापेक्षा वंश हा घटक

अधिक महत्त्वाचा ठरला आहे. तेथे नागा, बोडो, आसामी इ. वांशिक गटात असणाऱ्या संघर्षाचे प्रतिबिंब राजकारणावर दिसून येते.

यावरून असे लक्षात येते की, १९९० नंतर प्रत्येक राज्यात वेगवेगळ्या मागास जातींमधून नेतृत्व तयार होत गेले. त्याचप्रमाणे समाजातील गरीब किंवा कौटुंबिक पार्श्वभूमी नसताना अनेक नेते तयार झाले.

व्ही.पी.सिंग, चंद्रशेखर, एच.डी. देवेगौडा, इंद्रकुमार गुजराल, मनमोहन सिंग आणि २०१४ पासून नरेंद्र मोदी यांनी देशाचे नेतृत्व केले. हे सर्व ब्राम्हणेतर समाजात जन्मलेले पंतप्रधान आहेत. १९९० नंतर उत्तर प्रदेशच्या राजकारणात कांशिराम आणि मायावती या दलित नेत्यांचा उदय झाला. त्याच काळात मुलायमसिंग यादव, लालूप्रसाद यादव, नितीशकुमार या नेत्यांचा प्रभाव हिंदी भाषिक राज्यात वाढत गेला. अर्जुनसिंग, दिग्विजय सिंग, उमा भारती हे मध्यप्रदेश, छत्तीसगढ या राज्यातील नेतृत्व राष्ट्रीय पातळीवर काम करू लागले.

गोपीनाथ मुंडे, छगन भुजबळ, प्रकाश आंबेडकर, रामदास आठवले यांनी महाराष्ट्रातून उपेक्षित वर्गांचे नेतृत्व केले. कर्नाटकातून मल्लिकार्जुन खर्गे, सिध्दरामय्या या नेत्यांना पहिल्या फळीतील नेतृत्व म्हणून काम करण्याची संधी मिळाली. के.आर.नारायणन आणि रामनाथ कोविंद या नेत्यांनी राष्ट्रपती या सर्वोच्च पदावर काम केले. मीरा कुमार यांनी सभापती म्हणून केलेले काम नोंद घेण्यासारखे आहे. त्याचप्रमाणे रघुवर दास यांची झारखंडच्या मुख्यमंत्रीपदी झालेली निवड या सर्व घटना मागास जातीच्या राजकीय उन्नतीकडे होणारी वाटचाल दर्शविते.

प्रबळ जातींच्या राजकारणातील ऱ्हासाचा अभ्यास करत असता मागास वर्ग आयोगाचा संदर्भ अभ्यासणे आवश्यक ठरते. राज्यघटनेने केवळ अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती या दोन सूचीतील जातींनाच राजकीय प्रतिनिधीत्व आणि प्रशासनातील सेवेत प्रतिनिधीत्व देण्यासाठी तरतूद केलेली दिसून येते. त्यामुळे समाजातील सामाजिकदृष्ट्या व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गाला याचा लाभ झाला. तथापि, हा वर्ग जेमतेम २० टक्के होता. अनुसूचित जाती जमातींशिवाय एक मोठा मागास वर्ग उपेक्षित होता.

श्री. दत्तात्रय बाळकृष्ण कालेलकर उर्फ काका कालेलकर यांच्या अध्यक्षतेखाली पहिला मागास वर्ग आयोग स्थापन करण्यात आला. या आयोगाने 'इतर मागास वर्ग' (Other Backward Class) हा शब्दप्रयोग प्रचलित केला. या आयोगाच्या व्याख्येनुसार ब्राम्हण व समांतर उच्च वर्णातील लोक आणि अनुसूचित जाती जमातींचे लोक वगळता हिंदू धर्मातील बहुतांश जात समूह हा 'इतर मागास वर्ग' (OBC) होय. या वर्गातील लोकांना आरक्षणाचा लाभ देण्यासाठी केवळ जातीचा आधार ग्राह्य मानावा का? हा वादाचा प्रश्न ठरला. दुसरा मतप्रवाह आर्थिक स्तरावर इतर मागास प्रवर्ग ठरवावा असा होता. या वादामुळे याबाबत पुढे १९७७ पर्यंत कोणताही निर्णय झाला नाही. परंतु १९७० च्या

दशकात इतर मागास जातींच्या समूहामध्ये मोठ्या प्रमाणात राजकीय जागरुकता निर्माण झाली. परिणामत: प्रस्थापित उच्च जातींच्या नेतृत्वाला आव्हान निर्माण झाले.

जनता पार्टीच्या सरकारने १९७९ साली बी.पी.मंडल यांच्या अध्यक्षतेखाली दुसरा मागास वर्ग आयोग गठीत करण्यात केला. या आयोगाने सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक मागासलेपणा निर्धारित करण्याचे ११ निकष ठरविले. त्याआधारे 'इतर मागास वर्ग' या संदिग्ध संकल्पनेला मूर्त रूप देण्याचा प्रयत्न झाला. या शिफारशींच्या आधारावर ऑगस्ट १९९० साली शासकीय नोकरीमध्ये इतर मागास प्रवर्गासाठी २७% आरक्षण देण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतला. मा. पंतप्रधान व्ही. पी. सिंग यांनी हा ऐतिहासिक निर्णय घेतला. याविरुध्द न्यायालयात याचिका दाखल करण्यात आल्या. या आरक्षणाच्या निर्णयावर निकाल देताना १९९२ साली सर्वोच्च न्यायालयाने 'इतर मागास प्रवर्गातून' सधन वर्गाला (Creamy Layer) वगळावे असा निकाल दिला. त्यामुळे 'इतर मागास वर्ग' (OBC) या वर्गातील सधन वर्ग वगळता सर्वांना २७% आरक्षणाचा लाभ देण्यात आला. यासाठी पुढे ४ ऑगस्ट १९९३ रोजी राष्ट्रीय मागास वर्ग आयोग गठीत करण्यात आला. या आयोगामुळे भारतातील एक मोठा सामाजिक व राजकीयदृष्ट्या उपेक्षित वर्गाला विकासाची संधी प्राप्त झाली.

१९९० नंतर भारताच्या राजकारणात इतर मागास जातीचे नेतृत्व उदयास आले. राष्ट्रीय आणि राज्य पातळीवर इतर मागास जातींचे वर्चस्व वाढत गेले. परिणामत: ब्राह्मण व उच्च वर्णीय जातींची राजकारणातील मक्तेदारी कमी झाली. कमी-अधिक प्रमाणात सर्वच राजकीय पक्षात इतर मागास वर्गातील नेतृत्व निर्माण झाले. गेल्या तीन दशकात अनेक राज्याचे मुख्यमंत्रीपद किंवा पक्षाचे प्रदेश अध्यक्षपद यावर मागास प्रवर्गातील नेते विराजमान झाले.

## ३.२.२ मागास वर्गांचे राजकारण

जाती व्यवस्था हे भारतीय समाज व्यवस्थेचे एक आगळे वेगळे वैशिष्ट्य आहे. जाती व्यवस्थेचा अभ्यास केल्याशिवाय भारतीय समाज व्यवस्था अभ्यासता येणार नाही. जाती व्यवस्थेचा प्रभाव समाजातील सर्व उपव्यवस्थांवर झालेला दिसून येतो. शिक्षण, राजकारण, अर्थकारण, धर्मकारण, गाव व शहरांची रचना इत्यादी प्रत्येक क्षेत्रावर जातीचा प्रभाव दिसून येतो. त्यामुळे 'जात विरहीत राजकारण' हे भारतीय राजकारणातील केवळ एक मिथक बनले आहे. प्रत्येक पक्ष आपल्या सोयीने राजकारणात 'धर्मनिरपेक्ष' (Secular) शब्दाचा वापर करतो. मुळात प्रत्येक पक्ष जात आधारीत राजकारण करतो हे वास्तव आहे.

या घटकात आपण मागास वर्गाचे राजकारण या विषयाबद्यल चर्चा करणार आहोत. 'मागास जात' आणि 'मागास वर्ग' यात एक मूलभूत फरक आहे. मागास जात हे पूर्णत: जात आधारीत वर्गीकरण आहे. परंतु 'मागास वर्ग' यामध्ये जात व आर्थिक स्तर हे घटक महत्वाचे ठरतात. भारतीय राजकारणात मागास वर्ग हा शब्द एका विशिष्ट अर्थाने वापरला जातो. मागास वर्ग यांचा अर्थ सामाजिक व आर्थिक दृष्टया

मागास वर्ग होय. प्रामुख्याने सामाजिक मागासपणा हा आर्थिक मागासपणाचा परिमाण आहे. याऊलट सामाजिक मागासपणामुळे आर्थिक मागासपणा निर्माण होतो. त्यामुळे या दोन्हीमध्ये परस्पर संबध आहेत.

ज्याप्रमाणे भारतीय समाजात जात आधारीत विभागणी आहे तशीच ती वर्ग आधारीत देखील आहे. १९९१ ला भारताने खाऊजा धोरण स्विकारले. खाउजा म्हणजे खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण होय. या धोरणाचे परिणाम इ.स. २००० नंतर दिसू लागले. या धोरणामुळे एक मोठा सुखवस्तू वर्ग देशात निर्माण झाला. उद्योगपती, व्यापारी, उच्च पदस्थ, सनदी अधिकारी, राजकीय पुढारी, खाजगी क्षेत्रातील मोठे पगारदार यांचा एक वर्ग तयार झाला. याच काळात श्रीमंत व गरीब यांच्यातील दरी, प्रचंड मोठया प्रमाणात वाढली. जसा श्रीमंत वर्ग निर्माण झाला तसाच मजूरी करणारा व श्रमाची कामे करणारा मोठा वर्ग देखील निर्माण झाला. या श्रमजीवी वर्गाला अगदी तुटपुंजे पगार मिळतात. भांडवलशाहीच्या अतिरेकीपणामुळे 'आहे रे' (Haves) आणि 'नाही रे' (Have Nots) यांच्यात मोठी दरी निर्माण झाली. खाऊजा धोरणाचा तीन दशकातील परिणाम स्पष्ट दिसू लागला.

राजकारणात पैसा असणारा वर्ग सत्तेच्या केंद्रस्थानी गेला. त्याने आपल्माला अनुकूल धोरणे स्विकारली. त्यामुळे श्रीमंत अधिक श्रीमंत होत गेला व गरीब अधिक गरीब होत गेला. श्रीमंताची शाळा वेगळी व गरीबांची शाळा वेगळी निर्माण झाली. त्याचप्रमाणे उच्च शिक्षण देखील गरीबांच्या आवाक्या बाहेर गेले. काही उच्च शिक्षणातील कोर्स मध्यम वर्गाच्या देखील आवाक्यात राहिले नाहीत. उदा. डॉक्टर व इंजिनिअर होणेसाठी लांखो रुपये खर्च येवू लागला. शिक्षणाप्रमाणे आरोग्य, वाहतुक, नागरी सेवा यामध्ये श्रीमंत व गरीब यांच्यासाठी अंतर निर्माण झाले.

अल्पभूधारक शेतकरी, शेतमजूर, छोटे व्यावसायिक, शहरातील कामगार, कारखान्यातील मजूर, अल्प वेतनावर काम करणारे, विविध सेवा क्षेत्रातील कामगार यांचा मोठा वर्ग निर्माण झाला. हा आर्थिक मागास वर्ग हा बहूतांश करुन मागास जातीमधील होता. काही उच्च जातीमधील लोकसुध्दा या आर्थिक मागास वर्गात आहेत. परंतु त्याचे प्रमाण कमी आहे.

जात आणि वर्ग यांच्यात एक सहसंबंध दिसून येतो. भारतातील बहुतांश भागात मागास जातीमधील वर्ग हा श्रमजीवी म्हणून काम करताना दिसतो. त्यामुळे गरीबी आणि सामाजिक मागासलेपणा या दोन्ही गोंष्टी एकत्र पहावयास मिळतात. याऊलट संपत्ती असणारा वर्ग हा उच्च जातीमध्ये अधिक प्रमाणात दिसतो. त्यामुळे सामाजिक विषमता आणि आर्थिक विषमता या दोन्ही गोष्टी भिन्न असल्या तरी त्यांचा अभ्यास स्वतंत्रपणे करता येत नाही. त्यामुळे आरक्षणाच्या धोरणाचे नवीन पैलू दिसू लागले.

२०१४ नंतर भारतीय जनता पक्षाचे सरकार सत्तेवर आले. त्यांनी आर्थिक मागास वर्गासाठी (EWS) दहा टक्के आरक्षणाची तरतुद केली. हा निर्णय क्रांतीकारक ठरला. विशेष म्हणजे आरक्षणाची ५०% ची

मर्यादा (EWS) आरक्षणामळे ओलांडली गेली. याच्या विरोधात काही संघटनांनी सर्वोच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल केल्या. दि. ०७ नोव्हेंबर, २०२२ रोजी ३:२ अशा बहुमताने (EWS) च्या १०% आरक्षणाला मान्यता दिली. केवळ सामाजिक मागासपण आरक्षणाचा आधार असू शकत नाही. हा विचार राजकारणात पुढे आला. परंतु आर्थिक मागास वर्गाला संधी दिल्यामुळे सामाजिक मागास वर्गावर अन्याय होण्याची भीती कांही अभ्यासकांनी व्यक्त केली.

डॉ. प्रकाश आंबेडकर यांनी मागास वर्गाचे राजकारण यावर भाष्य करताना, एक नवीन विचार मांडला आहे. त्यांच्या मते, महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यात देखील मराठा जातीमधील साधारणत: १५० ते १८० ठराविक कुंटूंबामध्ये गेली ७० वर्षे सत्ता एकवटलेली आहे. त्या कुटूंबाच्या बाहेर सत्ता दिली गेलेली नाही. कुणबी-मराठा, माळी, साळी, कोळी, लोहार-सुतार-कुंभार इत्यादी जातीच्या लोकांना विधीमंडळात व मंत्रिमंडळात पुरेसे प्रतिनिधीत्व मिळालेले नाही याचे कारण प्रस्थापित वर्ग मागास वर्गाला संधी देण्यास इच्छुक नाही. यातून डॉ. प्रकाश आंबेडकर यांनी वंचित बहूजन आघाडीचा प्रयोग केला. त्यामुळे २०१९ च्या लोकसभा आणि विधानसभा निवडणूकीत काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसला मोठा फटका बसला.

आर्थिक मागास वर्गाच्या आरक्षणामुळे देशाच्या विविध भागातील जात समुहांनी त्यांच्या मागासपणाच्या आधारे आरक्षणाची मागणी केली. महाराष्ट्रात मराठा जातीने आरक्षणाची मागणी केली, कर्नाटकात लिंगायत समाजाने आरक्षणाची मागणी केली. त्याचप्रमाणे गुज्जर, जाट इत्यादी जातींनी देखील मागासपणाच्या आधारे आरक्षणाची मागणी केली. त्यामुळे २०१० नंतर भारताच्या राजकारणात एक नवीन प्रवाह दिसून आला. आर्थिक मागास वर्ग आरक्षणाची मागणी करू लागला. या मागणीला कोणत्याही राजकीय पक्षाने उघड विरोध केला नाही. आर्थिक मागास सर्व जातींना आरक्षण देणे कायदयाच्या व घटनेच्या चोकटीत बसत नाही. तथापि मराठा आरक्षणाचा कायदा मंजूर करण्यात आला. कोर्टाने मराठा आरक्षण रद्यबातल ठरविले. त्यामुळे अनेक नवीन प्रश्न निर्माण झाले.

विविध राज्य शासनांनी मागास वर्गाची मते मिळविण्यासाठी आर्थिक निकषावार विविध सवलती लागू केल्या. तीन ते पाच लाखांपेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असणाऱ्या वर्गासाठी राजकीय पक्षांनी विविध सवलतींचा वर्षाव केलेला दिसून येतो. उदा. घरकुल योजना, उज्वला गॅस योजना, पंतप्रधान किसान योजना, राजर्षी शाहू शिक्षण शुल्क सहाय्य योजना, इत्यादी या योजना म्हणजे आर्थिक दुर्बल घटकांची मतपेढी पक्की करण्याचा प्रयत्न आहे.

अशा प्रकारे भारतीय राजकारणात १९९० नंतर जातीचे राजकारण व मागास वर्गाचे राजकारण अशा दोन्ही दृष्टीने घडामोडी घडत गेल्या. प्रत्येक राज्यात आर्थिक मागास वर्ग या राजकारणाचा घटक बनला.

शासनाच्या लोकांना खुश करण्यासाठी राबविण्यात आलेल्या योजना म्हणजे देशाला कर्जाच्या विळख्यात अडकविण्याचा प्रयत्न आहे हे विसरुन चालणार नाही.

**स्वाध्याय**

एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) मागास वर्ग म्हणजे काय ?

२) कोणत्या साली भारताने खाऊजा धोरण स्विकारले ?

३) भांडवलशाहीच्या धोरणामुळे कोणते दोन वर्ग निर्माण झाले ?

४) भारतीय जनता पक्षाने आर्थिक मागास वर्गासाठी किती टक्के आरक्षण दिले ?

५) नव्याने आरक्षणाची मागणी करणारे जात समुह कोणते ?

## ३.२.३ उपेक्षित व दबलेल्या वर्गाचे राजकारण (Politics of Oppressed Class)

भारताच्या राजकारणात ज्याप्रमाणे मागास जाती व मागास वर्ग आहेत. त्याचप्रमाणे भारतीय राजकारणात काही वंचित जाती देखील आहेत. काही जात समुहांना समाजाच्या मुख्य प्रवाहात समावेश करण्याची संधी मिळालेली नाही. या जातींना ऑप्रेसड क्लास असे म्हणता येईल. त्याचा मराठी अनुवाद उपेक्षित वर्ग किंवा दबलेला वर्ग असा करावा लागेल. या दबलेल्या वर्गाची मतासाठी बोळवण करणे व सत्ता मिळविणे हे बहुतांश राजकीय पक्षांचे धोरण ठरलेले आहे.

भारतीय राजकारणात त्या-त्या प्रदेशातील प्रस्थापित जातींचे वर्चस्व दिसून येते. महाराष्ट्रात मराठा, कर्नाटकात वोक्कलिंगा व लिंगायत, आंध्र प्रदेशात कम्मा व रेड्डी, उत्तर भारतात रजपूत, ठाकूर याप्रमाणे सर्वच भागात हे चित्र दिसून येते. त्यामुळे साहजिकच त्या प्रदेशातील सामाजिकदृष्ट्या काही जाती राजकारणाच्या (सत्तेपासून) मुख्य प्रवाहापासून वंचित राहिल्याच्या दिसून येतात. या जातींना सत्तेमधील खूपच लहान वाटा मिळाल्याचे दिसून येते. भारतातील उपेक्षित जातींचे राजकारण समजावून घेण्यासाठी त्या प्रश्नाकडे एकांगी दृष्टीकोनातून पाहून चालणार नाही. या प्रश्नाला अनेक पैलू आहेत. खालील संदर्भावरुन या प्रश्नाच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकण्यात आला आहे.

प्रारंभीच्या चार दशकात मागास जातींचा वोट बँक (Vote Bank) म्हणून वापर झाला. या काळात या जातींचा काँग्रेस पक्षाला एकमुखी पाठिंबा राहिला. त्यामुळे १९९० अखेर समाजातील दलित, आदिवासी, मुस्लिम, अल्पसंख्यांक यांचा कल काँग्रेस पक्षाकडे होता. साहजिकच काँग्रेसच्या धोरणामध्ये या उपेक्षित घटकांच्या कल्याणकारी योजनांना प्राधान्य देण्यात आले होते. आरक्षणाचे धोरण किंवा सामाजिक न्यायाच्या

योजना यांना काँग्रस पक्षाने प्राधान्यक्रम दिला होता. दरम्यान या काळात या धोरणांना उजव्या विचार धारेच्या पक्षांनी विरोध सुरु केला होता. त्याचप्रमाणे दलित चळवळीतील नेतृत्वाने काँग्रेस केवळ दलित मतांचा वापर करत असल्याचा आरोप सुरु केला. त्यामुळे १९९० नंतर मागास जातींचा काँग्रेसला असणारा पाठिंबा कमी-कमी होत गेला. त्यामुळे राष्ट्रीय राजकारणातील काँग्रेसचे स्थान कमी झाले. दरम्यान १९९० नंतरच्या काळात दलित व मागास वर्गातील जागृतीमुळे काशीराम, मायावती, नितीश कुमार, रामविलास पास्वान, लालूप्रसाद यादव, मुलायमसिंग यादव, एच.डी. देवेगौंडा इत्यादी मागास प्रवर्गातील नेतृत्व उदयाला आले. तसेच प्रादेशिक पातळीवर देखील मागास जातीतून नेतृत्व निर्माण झाले. या मागास जाती-जातींमधील नेतृत्वाने काँग्रेस पक्षाच्या 'वोट बँक' राजनीतीला छेद देण्याचे काम केले.

उत्तर भारतात कांशीराम आणि मायावती यांनी दलितांना केंद्रस्थानी ठेवून राजकारण केले. १९८४ साली काशीराम यांनी बहुजन समाज पक्षाची स्थापना केली. पक्षाने दिलेल्या घोषणा खूप महत्वाच्या आहेत.

उदा. १) वोटसे लांएगे सीएम-पीएम.। रिझर्वेशन लाएंगे एस.पी-डी.एम।।

२) जिसकी जितनी संख्या भारी। उतनी इसकी भागीदारी।।

३) जो बहुजन की बात करेगा । वो दिल्ली पे राज करेगा ।।

४) हाथी नहीं गणेश है । ब्रम्हा विष्णू महेश है ।।

५) वोट हमरा राज आपका । नही चलेगा, नही चलेंगा ।।

या घोषणा देत उपेक्षित जातींच्या आर्थिक उन्नती व सामाजिक परिवर्तनाचा नारा दिला. १९९० नंतर या पक्षाने भाजप, समाजवादी पक्ष यांच्याशी युती करून सत्ता स्थापन केली. मायावती यांनी चारवेळा उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्रीपद भूषविले. परंतु स्पष्ट बहुमताअभावी त्यांना आपला कार्यकाल पूर्ण करता आला नाही. २००७ च्या विधानसभा निवडणूकीत मायावतींचा सोशल इंजिनिअरिंगचा प्रयोग यशस्वी झाला व त्याच्या पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले. कांशीराम आणि मायावती यांच्या राजकीय चळवळीचा हा एक यशस्वी टप्पा होता. तथापि, २०१२ नंतर बसपाला उत्तर प्रदेशमध्ये मोठया पराभवाला सामोरे जावे लागले. पाच वर्षातील कारकिर्दीवर भ्रष्ट्राचाराचे आरोप झाल्याने मायावती व बसपाची प्रतिमा मलिन झाली. २०१४ व २०१९ च्या लोकसभा निवडणूकीत देखील बसपाला आपली कामगिरी खूप सुधारता आली नाही.

डॉ. आंबेडकर यांच्या स्वप्नातील रिपब्लिकन पक्ष त्यांच्या पश्चात त्यांच्या अनुयायांनी १९५७ साली स्थापन केला. परंतु प्रारंभानंतर लवकरच या पक्षात फूट पडत गेली. रिपब्लिकन पक्षाचे अनेक गट-तट तयार झाले. दलित आणि उपेक्षित जातींना राजकीय संधी मिळावी हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून या पक्षाची स्थापना झाली होती; परंतु काळाच्या ओघात या पक्षातील एक गट काँग्रेस सोबत तर दुसरा गट भाजप सोबत गेला.

२०१४ पुर्वी काँग्रेस सोबत असणारा आपला घरोबा सोडून रामदास आठवले यांनी भाजप शिवसेनेची साथ धरली. सत्तेत राहून दलितांचा उद्धार करावा अशा प्रकारचा विचार आठवले यांनी मांडलेला दिसून येतो. याउलट डॉ. प्रकाश आंबेडकर यांनी भाजप आणि काँग्रस या दोन्हीपासून अंतर ठेवणे पसंत केले.

भारतीय जनता पक्ष १९८० मध्ये आरक्षणाच्या धोरणाबाबत अनुकूल नव्हता; परंतु राजकारणातील बदलत्या परिस्थितीमध्ये या पक्षाला देखील आरक्षणाला आपला पाठिंबा दर्शविला. एवढेच नव्हे तर आरक्षणाला धक्का लावला जाणार नाही याची जाहीर कबुली या पक्षाने दिली. यामागील उद्देश साहजिकच दलित मतांचा पाठिंबा मिळवणे हा होता.

२०१९ च्या लोकसभा व विधानसभा निवडणूकीपूर्वी डॉ. प्रकाश आंबेडकर यांनी केलेला वंचित बहुजन आघाडीचा प्रयोग देखील घेण्याजोगा आहे. उपेक्षितांना राजकीय संधी मिळावी म्हणून केलेला प्रयत्न महत्वाचा ठरला.

"आमच्या वरकोणी नाही, आमच्या खाली

कोणी नाही, आम्ही सर्व समान आहोत."

"शिक्षकी संख्या न हो भारी, फिर

भी मिलेगी हिस्सेदारी। "

"भिक नको सत्तेची, सत्ता हवी हक्काची। "

अशा घोषणा देत एक वेगळा विचार मांडला. परिणामी, या आघाडीने आपली ताकद दाखवून दिली

उपेक्षितांच्या राजकारणात अस्मितांचे राजकारण आवर्जून पहावयास मिळते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अण्णाभाऊ साठे, महात्मा फुले, शाहू महाराज इत्यादी उपेक्षितांसाठी काम केलेल्या महापुरुषांच्या नावांने राजकारण चालते. इंदू मिल (मुंबई) या ठिकाणी डॉ. आंबेडकरांचे स्मारक बांधण्यासाठी गेली दहा वर्षे नियोजन व घोषणा चालू आहेत. तिच स्थिती चैत्य भूमीवरील कामाबाबत आहे. लंडनमधील डॉ. आंबेडकर यांनी निवास केलेली वास्तू खरेदी करताना देखील त्यांचे राजकीय भांडवल करण्यात आले. त्याच प्रमाणे कोल्हापूर येथील शाहू महाराजांच्या जन्मस्थळाची आणि सांगली जिल्ह्यातील वाटेगाव येथील अण्णाभाऊ साठेंच्या स्मारकाची अवस्था आहे. या महापुरुषांच्या नांवे वेळोवेळी अनेक योजनांची घोषणा करण्यात आली. परंतु प्रत्यक्षात याबाबतचे काम समाधानकारक दिसत नाही. यात सर्वच पक्ष कमी-अधिक प्रमाणात सहभागी आहेत. या अस्मितांचे विषय जेवढे दीर्घकाळ प्रलंबित राहतील, तेवढा विविध गटांचा राजकीय स्वार्थ साध्य केला जातो. त्यामुळे असे प्रश्न निकालात काढण्याऐवजी ते जास्त ज्वलंत ठेवले जातात.

जातीच्या राजकारणात काही हितसंबंधी गट जाणीवपूर्वक प्रस्थापित जाती (उच्च जाती) आणि विस्थापित जाती (कनिष्ठ जाती) यांच्यात संघर्ष निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. यातून दोन किंवा अधिक जात समुहांमध्ये काही वेळा उघडपणे संघर्ष दिसून येतो. त्यामुळे जातीय दंगली हा देखील राजकारणाचा एक भाग झाला आहे. त्यामुळे उपेक्षित जातींच्या राजकारणाला विविध पैलू असल्याचे स्पष्ट होते. हा विषय एक जटील समस्या आहे. जातींचा राजकारणासाठी वापर करण्याऐवजी जातीअंतासाठी सर्वच पक्षांनी एकत्रितपणे काम करणे आवश्यक आहे.

**सरावासाठी स्वाध्याय**

एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) कर्नाटकातील प्रबल जात समुह कोणते?

२) स्वातंत्र्यानंतर चार दशके कोणत्या राजकीय पक्षाला उपेक्षित वर्गाचा पाठींबा होता?

३) मागास वर्गातील राष्ट्रीय नेत्यांची नांवे सांगा?

४) महाराष्ट्रात वंचित बहुजन आघाडीचा प्रयोग कोणी केला?

५) इंदू मिल या ठिकाणी कोणाचे स्मारक बांधण्यात येत आहे?

## ३.२.४ जातीच्या राजकारणातील नवे प्रवाह

वरील विवेचनावरून हे स्पष्ट झाले आहे की, जातीय राजकारणाच्या अभ्यासाशिवाय भारतीय राजकारणाचा अभ्यास पूर्ण होऊ शकत नाही. 'जात' हा घटक आज केवळ सामाजिक विषमता दर्शविणारी व्यवस्था एवढ्यापुरता मर्यादित राहिलेला नाही. जातीच्या राजकारणाने नवीन वळण घेतल्याचे दिसून येते. ग्रामपंचायतीच्या निवडणूकीपासून लोकसभा किंवा राष्ट्रपती पदाच्या निवडणूकीपर्यंत प्रत्येक ठिकाणी 'जात' हा घटक महत्त्वाची भूमिका बजावतो. खालील संदर्भ आणि घटना भारतीय राजकारणातील जातीच्या राजकारणाचे नवे प्रवाह स्पष्ट करतात.

१. प्रत्येक घटक राज्यात तेथील संख्येने जास्त असणारी 'जात' राजकारणात प्रभावी दिसते. बिहारच्या राजकारणात यादव-मुस्लीम यांचे प्राबल्य आहे. उत्तर प्रदशात यादव, रजपूत, ब्राह्मण, मुस्लीम, दलित, जाट यांचा प्रभाव दिसून येतो. कर्नाटकात लिंगायत, वोक्कलिंगा, धनगर या जातीचे वर्चस्व दिसते. तमिळनाडूत मुक्कलथोर थेवर, मुदलियार, वनियार, नाडर यांचा प्रभाव अधिक आहे. पंजाबचे राजकारण शीख, जाट, दलित यांच्या भोवताली केंद्रीत झाले आहे. बिस्नोई (जाट), गुज्जर, रजपूत, मीनाज या राजस्थानमधील प्रमुख जाती आहेत. महाराष्ट्रात मराठा, वंजारी, दलित, ब्राम्हण यांचा राजकारणात वरचष्मा दिसतो. अशा प्रकार प्रत्येक राज्यात वेगवेगळे चित्र दिसून येते. उत्तर

भारतातील हिन्दी भाषिक राज्याच्या जातीय राजकारणाला अजगर (AJGAR) या नावाने संबोधले जाते. याचा अर्थ अहिर, जाट, गुज्जर आणि रजपूत, विशेषकरून स्थानिक पातळीवरील राजकारणात बहुसंख्य जातींचा अधिक प्रभाव दिसतो.

२. सत्ता मिळविण्यासाठी सोशल इंजिनिअरिंगचा प्रयोग सर्वच प्रमुख पक्षांना करावा लागत आहे. त्यामुळे जातीय समीकरण डोळ्यासमोर ठेवून राजकीय पक्ष निर्णय घेताना दिसतात. पूर्वी पक्षातील योगदान आणि उमेदवाराची योग्यता या गोष्टी पाहून पक्षाची उमेदवारी दली जात असे. परंतु सध्या त्या-त्या भागातील मतदारसंघात कोणत्या जातीचे किंवा समुदायाचे लोक जास्त आहेत हे पाहून त्यांना उमेदवारी दिली जाते. अजीम प्रेमजी युनिव्हर्सिटी आणि लोकनीती (CSDS) यांनी २०१८ साली केलेल्या एका सर्वेक्षण अभ्यासात असे दिसून आले की, ५५ टक्के पेक्षा जास्त लोक जातीय दृष्टीकोणातून मतदान करतात. त्यामुळे विविध जात समूहांचा पाठिंबा मिळावा म्हणून पक्षातील महत्त्वाची पदे वेगवेगळ्या समूहांना देण्यात येतात. काँग्रेस प्रमाणे भारतातील सर्वच प्रमुख राजकीय पक्ष मुस्लीम, दलित, शिख, ख्रिश्चन इत्यादी घटकांना स्थान देताना दिसतात किंवा त्यांचा पाठिंबा मिळविण्याचा प्रयत्न करतात.

३. पक्षांची जात किंवा धर्मआधारित ओळख हा देखील जातीच्या राजकारणातील एक नवा प्रवाह म्हणून ओळखला जातो. काही राजकीय पक्षांची जात किंवा धर्म आधारित ओळख स्पष्ट आहे. उदा. मुस्लीम लीग व ए. आय. एम. आय. एम. मुस्लीमांचा पक्ष, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया दलितांचा पक्ष, अकाली दल शिखांचा पक्ष, जम्मू-काश्मीरमधील नॅशनल कॉन्फरन्स हा मुस्लीमांचा पक्ष, झारखंड मुक्ती मोर्चा हा आदिवासींचा पक्ष, महाराष्ट्रातील वंचित बहुजन आघाडी ही दलित व मुस्लीम ऐक्याची आघाडी, शिवसेना हिन्दुत्ववादी पक्ष. याउलट काही पक्षांची जात किंवा धर्म आधारित ओळख छुप्या स्वरूपाची दिसून येते. भाजपाची हिंदुत्ववादी पक्ष म्हणून असणारी ओळख एका बाजूला आहे, तर दुसऱ्या बाजूला हा उच्च वर्णियांचा पक्ष म्हणून ओळखला जातो. समाजवादी आणि बहुजन समाजवादी पक्ष यांच्यावर दलित, मुस्लीम व इतर मागास जातींचे पक्ष म्हणून शिक्के पडले आहेत. महाराष्ट्रातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षावर मराठी लॉबीचे वर्चस्व दिसून येते. अशा प्रकारे प्रत्येक राजकीय पक्षाची जातीय ओळख व्यवहारात निर्माण झाली आहे.

४. जातीचे राजकारण व शासन आणि प्रशासन यांचा जवळचा संबंध असतो. मंत्रीमंडळाची रचना असो अथवा मुख्यमंत्री पदाचा उमेदवार निश्चित करणे असो, यावर जातीच्या राजकारणाचा प्रभाव दिसून येतो. मंत्रिमंडळात प्रादेशिक समतोल जसा महत्त्वाचा मानला जातो. तसाच जातीय समतोल देखील महत्त्वाचा मानला जातो. प्रमुख जातींसह इतर जात समूहामधील घटकांना मंत्रिमंडळात स्थान दिले जाते. महामंडळाचे अध्यक्षस्थान अथवा उच्च पदस्थ नोकरशहा यांच्या नियुक्त्या देखील जातीच्या राजकारणापासून अलीप्त राहिलेल्या नाहीत. जात समूह राजकारणात दबाव गट म्हणून

अधिक सक्रिय होत असताना दिसतात. निवडणूकपूर्व व निवडणूक पश्चात जातीय समूह राजकीय पक्ष व उमेदवार यांचेशी सौदेबाजी करतात. आपले हितसंबंध जपण्याचा प्रयत्न करतात.

५. १९९३ नंतर स्थानिक स्वराज्य संस्थांमधील जात आधारित आरक्षणाच्या धोरणामुळे मागास जातीमध्ये राजकीय नेतृत्व निर्माण होण्यास मदत झाली. प्रत्येक राज्यातील मागास आणि अतिमागास जात समूहांना ग्रामीण आणि शहरी भागातून संधी मिळाल्यामुळे नवीन नेतृत्व तयार होण्यास मदत झाली. हे नेतृत्व तळागाळातून तयार झाल्याने अधिक सक्षम आहे. हा देखील जातीच्या राजकारणातील एक नवीन प्रवाह आहे.

६. राष्ट्रपती, पंतप्रधान, सभापती, मुख्यमंत्री इत्यादी सन्मान आणि अधिकाराच्या पदावरील व्यक्तींची निवड करताना देखील राजकीय पक्ष जातीचे राजकारण करतात. दलित, मुस्लीम अथवा अल्पसंख्यांक समुदायातील एखाद्या व्यक्तीची अशा पदावर निवड करण्यामागे छुपा उद्देश असतो. आपल्या पक्षाचा मताधार वाढावा. हा राजकीय डाव असतो. याचप्रमाणे पक्ष संघटनेत देखील काही उच्च पदावर मागास जातीच्या लोकांना संधी दिली जाते. त्यास राजकीय भाषेत 'चेहरा' हा शब्दप्रयोग वापरला जातो. पक्षाचा मुस्लीम चेहरा, पक्षाचा दलित चेहरा इत्यादी. या तंत्रांचा अवलंब राजकारणात होतो.

७. डॉ. प्रकाश आंबेडकर यांनी जातीच्या राजकारणातील एक नवीन विचार मांडला आहे. त्यांच्या मते, महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यात देखील मराठी जातीमधील साधारणत: १५० ते १८० ठराविक कुटुंबामध्ये सत्ता गेली ७० वर्षे एकवटलेली आहे. महाराष्ट्रातील कुणबी-मराठा, माळी, साळी, कोळी, लोहार-सुतार-कुंभार इत्यादी अनेक जातींच्या लोकांना विधिमंडळात पुरेसे प्रतिनिधीत्व मिळालेले नाही. त्यामुळे २०१९ च्या लोकसभा आणि महाराष्ट्र विधानसभा निवडणूकीपूर्वी वंचित बहुजन आघाडीचा प्रयोग केला. सत्तेपासून दीर्घकाळ वंचित असणाऱ्या सर्व जातीसमूहांना एकत्र करून दलित व मुस्लीम मतदारांच्या मदतीने निवडणूक लढविण्याचा प्रयत्न केला. लोकसभा किंवा विधानसभा निवडणूकीत या आघाडीला आपला एकही उमेदवार निवडून आणता आला नाही. परंतु निवडणूकीच्या निकालावर वंचित आघाडीचा खूप मोठा परिणाम झाला. अनेक ठिकाणी केवळ वंचित बहुजन आघाडीमुळे काँग्रेस-राष्ट्रवादीला फटका बसला.

८. जाट, गुज्जर, मराठा, धनगर, लिंगायत इत्यादी जात समूहांनी आरक्षणासाठी केलेली आंदोलने हा देखील जातीय राजकारणातील एक नवीन प्रवाह आहे. हे जात समूह सामाजिकदृष्ट्या उपेक्षित म्हणता येणार नाहीत. अशा प्रकारच्या प्रत्येक जातसमूहाला आरक्षण दिल्यास आरक्षणाच्या मुख्य उद्देश बाजूला पडेल. सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय प्रस्थापित करणे हा कोणत्याही आरक्षणामागील मुख्य हेतू असतो. परंतु संख्येने जास्त असणाऱ्या जात समूहांच्या आरक्षणाच्या मागणीला उघडपणे कोणत्याही पक्षाने विरोध केला नाही. अशा प्रकारच्या जातीच्या आरक्षणाच्या

संदर्भातील निर्णय हे 'सामाजिक न्यायापेक्षा राजकीय अनिवार्यता' यातून घेतले गेले. त्यामुळे खऱ्या अर्थाने सामाजिकदृष्ट्या मागास नसणाऱ्या परंतु संख्येने जास्त असणाऱ्या जात समूहांकडून आरक्षणाची मागणी होणे किंवा अशा मागण्या राजकीय पक्षाच्या धोरणाचा भाग होणे ही देखील एक नवीन गोष्ट आहे.

९. आरक्षण व जातीचे राजकारण ही भारतीय राजकारणातील नवीन गोष्ट नाही. केवळ भूमिका बदलत्या आहेत. अनुसूचित जाती-जमातीच्या लोकांना आरक्षण देण्यावरून नेहमी राजकीय पोळी भाजून घेतली जाते. काँग्रेस पक्षाने ४०-५० वर्षे आरक्षणाच्या धोरणाला पाठिंबा देवून दलित वोट बँक आपल्याकडे ठेवली व सत्ता संपादन केली. या धोरणाला विरोध करत भाजपसारखा उजव्या विचारधारेचा पक्ष १९८० नंतर पुढे आला. १९९६ च्या लोकसभा निवडणूकीनंतर या पक्षानेदेखील आरक्षणाच्या धोरणाचा सत्तेसाठी वापर सुरू केला. २५ जानेवारी २०२० रोजी १०४ वी घटना दुरुस्ती अंमलात आणून अनुसूचित जाती-जमातीच्या प्रतिनिधींना संसद व राज्यविधिमंडळातील आरक्षण २०३० अखेर वाढविण्यात आले.

१०. माहिती तंत्रज्ञानातील प्रगतीचा प्रभाव जातीय राजकारणावर झालेला दिसून येतो. जाती-उपजातींचे गट (ग्रुप) सोशल नेटवर्किंगच्या माध्यमातून तयार झालेले दिसून येतात. अशा प्रकारच्या जात किंवा समुदाय आधारित व्हॅटसॲप ग्रुपवर सत्याची पडताळणी न करता माहितीची देवाण-घेवाण केली जाते. अशा ग्रुपवर जातीय अस्मिता जागृत करणारे संदेश व व्हिडिओ पाठविले जातात. महापुरुषांबद्दलच्या काही अवाजवी माहिती दिली जाते. एवढेच नव्हे अनेकदा समाजविघातक माहितीचीदेखील देवाण-घेवाण होते. त्यामुळे अनेकदा सुरक्षा यंत्रणांना सोशल मिडियावर आक्षेपार्ह मजकूर टाकणाऱ्याविरोधात कारवाई करावी लागते. जातीय व धार्मिक तणाव वाढण्यास कारणीभूत ठरणाऱ्या व्हिडिओ क्लीप्स व्हायरल झाल्यामुळे समाजात तणाव निर्माण होतो. या सर्व घटनाच्या मागे काहीवेळा राजकीय शक्ती प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष असतात.

वरील विश्लेषणावरून हे स्पष्ट होते की, 'जात' आणि 'जातीचे राजकारण' या गोष्टींचे संदर्भ खूप बदलले आहेत. जात केवळ सामाजिक विषमतेचे प्रतिक राहिलेले नाही. जातीचा वापर राजकारणात साधन म्हणून केला जातो. त्यामुळे पुष्पा भावे यांनी राजकीय सत्ता प्राप्त करण्यासाठी जातीचा वापर करणाऱ्या नेत्यांना आळशी म्हटले आहे. कारण विचाराच्या आधारे संघटन बांधून सत्ता प्राप्त करणेसाठी अहोरात्र प्रयत्न करावे लागतात, त्यापेक्षा जातीय अस्मिता जागृत करून भावनेच्या आधारावर सत्ता मिळविणे सोपे काम आहे. त्यामुळे भारतातील राज्यशास्त्राचे गाढे अभ्यासक रजनी कोठारी यांच्या मते, राजकारणाचे जातीयकरण नव्हे तर जातीचे राजकीयकरण झाले आहे.

## ३.३ सारांश

सामाजिक आणि आर्थिक विषमता हे भारतीय समाजाचे वैशिष्ट्य आहे. जात किंवा वर्ग आधारीत विषमता आणि आर्थिक विषमता यामुळे समाजात दोन प्रमुख वर्ग तयार होतात. एक प्रस्थापित उच्च जातींचा वर्ग आणि दुसरा उपेक्षित मागास जातींचा वर्ग या सामाजिक विषमतेला आर्थिक विषमतेची जोड दिसून येते. १९९१ च्या खाऊजा धोरणामुळे एक अति श्रीमंत वर्ग आणि एक अति गरीब वर्ग समाजात निर्माण झाले. या जात आणि वर्ग समूहांना राजकीय पक्षांनी आपल्या मतपेटीत रूपांतरित करण्यासाठी अनेक तंत्रांचा अवलंब केलेला दिसून येतो.

वर्ण व्यवस्था व जाती व्यवस्था यामुळे उच्चवर्णीय व उच्च जातीतील लोकांना सामाजिक, राजकीय व आर्थिक क्षेत्रात संधी मिळाली. परंतु मागास व अतिमागास जातींना या संधींपासून वंचित रहावे लागले. सामाजिक चळवळींमुळे या वंचित घटकांना न्याय देण्यासाठी तरतुदी करण्यात आल्या. विशेषत: डॉ. आंबेडकर यांच्या आग्रहावरून घटनात्मक तरतूदी करून मागास जातींना आरक्षणाची संधी देण्यात आली. १९५० साली सुरू केलेल्या या धोरणाचे परिणाम आज दिसत आहेत. गेल्या सात दशकात विविध क्षेत्रात मागास व अतिमागास जाती-जमातींमधील लोकांनी आपले योगदान सिध्द केले आहे. सर्वच राजकीय पक्षांनी आपल्या पक्षात मागास जातींच्या प्रतिनिधींना संधी देण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे प्रस्थापितांना त्याची थोडीबहुत झळ पोहोचली. जेव्हा राजकीय पक्षांनी या मागास जातींच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केले, तेव्हा त्याची राजकीय किंमत त्यांना मोजावी लागली. १९९० नंतर इतर मागास जातींचा झालेला उदय ही देखील एक महत्त्वाची घटना आहे. त्यामुळे सत्तेमध्ये असणाऱ्या विशिष्ट जातींच्या मक्तेदारीला लगाम बसला.

प्रारंभीच्या काळात उपेक्षित किंवा मागास जातींना केवळ वोट बँक म्हणून वापरले गेले. नंतरच्या मागास वर्गाच्या चळवळीतून नवीन नेतृत्व तयार होत गेले. मागास जातींच्या नेत्यांनी सत्तेमध्ये प्रमाणशीर वाट्याची मागणी सुरू केली. त्यातून पुढे बहुजन समाजवादी पक्ष, समाजवादी पक्ष अशा पक्षाचा जन्म झाला. सर्वच राजकीय पक्षांनी कमी-जास्त प्रमाणात जातीचे राजकारण सत्ता मिळविण्यासाठी केले. जातीच्या राजकारणात महापुरुषांच्या नावांचा वापर आणि गैरवापर देखील झाल्याचे दिसून येते. यास अस्मितांचे राजकारण असेही म्हटले जाते.

जातीच्या राजकारणात खूप मोठे परिवर्तन झालेले दिसून येते. शिक्षणाचा प्रसार, काँग्रेस या एक प्रबळ पक्षाचा ऱ्हास, नवीन पक्षांचा उदय इत्यादी कारणांमुळे जातीच्या राजकारणाचे समीकरण बदलत गेले आहे. खाऊजा धोरणामुळे देखील जातीच्या राजकराणात नवीन प्रवाह निर्माण झालेले आहेत. माहिती तंत्रज्ञान यांचा प्रभाव जातीय राजकारणावर दिसून येत आहे.

## ३.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१. **खाऊजा धोरण :** १९९१ नंतर भारताने स्विकारलेले मुक्त अर्थव्यवस्थेचे धारेण. यात खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण यांचा समावेश होतो.

२. **आहे रे :** समाजातील संपत्ती असणारा वर्ग.

३. **नाही रे :** समाजातील संपत्ती नसणारा वर्ग (मार्क्सवादी संकल्पना).

४. **रिडालोस** (RiDaLoS) : रिपब्लिकन लेफ्ट डेमोक्रॅटिक फ्रंटची स्थापना २००९ च्या विधानसभा निवडणूकीपूर्वी रामदास आठवले यांच्या नेतृत्वाखाली झाली.

५. ए.आय.एम.आय. एम. ऑल इंडिया मजलिस ए-इतेहहुल मुसलीयीन-तेलंगणा राज्यातील एक मुस्लीम पक्ष असुदुद्दीन ओबेसी यांनी पक्षाची स्थापना केली आहे.

६. **अजगर** (AJGAR) : चौधरी चरणसिंग यांनी १९७० च्या दशकात उत्तर प्रदेशमधील अहिर, जाट, गज्जर आणि रजपूत यांच्यासाठी वापरलेला शब्दप्रयोग आहे.

## ३.५ स्वयं-अध्ययन प्रश्न व उत्तरे

❑ **योग्य पर्याय निवडा.**

१. प्राचीन भारतीय समाज किती व कोणत्या पध्दतीने विभागला गेला होता?

२. भारताने खाऊजा धोरणाचा पुरस्कार केव्हा केला?

३. भारतातील जाती व्यवस्थेविरुध्द चळवळ करणाऱ्या विचारवंतांची यादी तयार करा.

४. कोणत्या कलमांतर्गत अनुसूचित जाती-जमातींच्या लोकांना संसदेत आरक्षणाची तरतूद करण्यात आली आहे?

५. बहुजन समाजवादी पक्षाची स्थापना कोणी व केव्हा केली?

६. पहिल्या मागास आयोगाचे अध्यक्ष कोण होते?

७. राजकारणात 'अजगर' शब्दाचा प्रयोग कोणत्या अर्थाने केला जातो?

८. वंचित बहुजन आघाडी कोणाच्या नेतृत्वाखाली स्थापन झाली?

९. मागासवर्ग आयोगाला केव्हा घटनात्मक दर्जा देण्यात आला?

❑ **उत्तरे :-**

१. चार वर्ण : ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य अणि शूद्र.

२. १९९१ सालापासून.

३. महात्मा फुले, शाहू महाराज, सयाजीराव गायकवाड, डॉ.बी.आर.आंबेडकर, रामस्वामी

पेरियार इत्यादी.

४. राज्यघटनेतील कलम ३३४.

५. कांशीराम यांनी १४ एप्रिल १९८४ साली.

६. श्री. दत्तात्रय बाळकृष्ण कालेलकर उर्फ काकासाहेब कालेलकर.

७. अजगर-म्हणजे (AJGAR) - अहिर, जाट, गुज्जर, रजपूत.

८. ॲड. प्रकाश आंबेडकर.

९. १०२ वी घटना दुरुस्ती करून-२०१९ साली.

## ३.६ सरावासाठी स्वाध्याय

❑ **खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. भारतातील प्रस्थापित (प्रबळ) जातींच्या राजकारणातील वर्चस्वावर भाष्य करा.

२. राजकारणासाठी मागास जातीचा वापर कसा होतो यावर चर्चा करा.

३. जातीच्या राजकारणातील नवे प्रवाह स्पष्ट करा.

## ३.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


१. **शर्मा, जी. एल.** (२०१५) : *''सामाजिक मुद्दे''*, रावत पब्लिकेशन्स, जयपूर.

२. **लोटे, रा. ज.** (२००३) : *''भारतीय शासन आणि राजकारण''*, पिंपळापुरे पब्लिशर्स, नागपूर.

३. **पळशीकर, सुहास** : *'''समकालीन भारतीय राजकारण : काँग्रेस वर्चस्व ते हिंदू जमातवाद''.*

४. **पाटील, बी.बी.** (२०१०) : *''भारतीय शासन आणि राजकारण''*, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

५. **Bipin Chandra and Others** (2007) : *"India Since Independence"*, Penguin Books.

६. **Fadia B. L.** (2004) : *"Indian Government and Politics"*, Sahitya Bhavan Publications, Agra.

७. **Rajani Kothari** (1970) : *"Caste in Indian Politics"*, Orient Longman.


❑❑❑

घटक-४

# राजकीय अर्थकारण

**अनुक्रमणिका**

४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

४.२.१ मिश्र अर्थव्यवस्थेचे प्रारूप

४.२.२ १९९१ नंतरच्या आर्थिक सुधारणा

४.२.३ असमानता आणि पुनर्वितरण

४.२.४ विज्ञान, तंत्रज्ञानाचा राजकीय अर्थकारणावरील परिणाम

४.३ सारांश

४.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

४.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ४.० उद्दिष्ट्ये

प्रस्तुत घटकाच्या अभ्यासातून आपणास,

१. मिश्र अर्थव्यवस्था कशी अस्तित्त्वात आली हे समजून घेता येईल.

२. आर्थिक सुधारणांमधील बदल समजून घेता येतील.

३. असमानता आणि पुनर्वितरणाची समस्या काय आहे? हे समजून घेता येईल.

४. विज्ञान, तंत्रज्ञानाचा राजकारणावरील वाढता प्रभाव समजून घेता येईल.

## ४.१ प्रास्ताविक

मानव हा जसा समाजशील प्राणी आहे, तसा तो राजकीय ही आहे. राजकारण करणे मानवाच्या

स्वभावातच आहे. सत्ता असेल तर सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक अशा कोणत्याही पद्धतीचे निर्णय मनुष्य घेऊ शकतो. त्यासाठी सत्ता प्राप्त करणे हा मानवाच्या राजकीय जीवनाचा एक भाग आहे. वेगवेगळ्याा संस्था, संघटनांवर वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी मनुष्याला सत्तेची आवश्यकता असते. कारण येथेच आर्थिक सत्तेची बीजे रूजलेली असतात. राज्याद्वारे फक्त मानवाच्या संरक्षणावर भर देवून चालत नाही, शांतता राखून चालत नाही, तर त्यांच्यामध्ये सामाजिक सुरक्षितता, अर्थव्यवस्थेवर नियंत्रण, समान वितरणाची व्यवस्था अशा सर्व बाबींवर राज्याला काम करावे लागते. त्यामुळे राज्य मानवाच्या आर्थिक जीवनामध्ये भाग घेते. त्यामुळे सत्ता टिकविणे याचा अंतिम उद्देश आर्थिक धोरण ठरवण्याचे अधिकार मिळविणे होय. त्यासाठी राज्यसंस्थेवर सत्ता प्राप्त करणे आणि राज्याचे आर्थिक धोरण ठरवणे हा उद्देश असतो. सध्याच्या काळात निवडणुकीय राजकारण म्हणजे सत्ताकारण असा एक चर्चाविश्वाचा भाग बनलेला आहे. त्यामुळे राजकारण करताना विज्ञान, तंत्रज्ञान आणि अर्थकारण यांचा समन्वय निर्माण करून केले तर सत्ता प्राप्त करणे सोपे आहे. याचे उत्तम उदाहरण म्हणजे २०१४ साली झालेल्या सोळाव्या लोकसभा निवडणुका होय. या निवडणुकांमध्ये विज्ञान, तंत्रज्ञान आणि सोशल मीडियाचा मोठ्याा प्रमाणात वापर केला गेला. त्यामुळे सत्ताबदल घडून आला. याला कारणीभूत अर्थकारणाचा देखील भाग आहे. म्हणून या घटकांमध्ये आपण आर्थिक परिवर्तनासाठी कोणत्या बाबी कारणीभूत ठरल्या आहेत याचा आढावा घेणार आहोत.

## ४.२ विषय विवेचन

### ४.२.१ मिश्र अर्थव्यवस्थेचे प्रारूप (Model of Mixed Economy) :-

आधुनिक भारताचा आर्थिक विकास साध्य करण्यासाठी भांडवली व समाजवादी अर्थव्यवस्थेपेक्षा मिश्र अर्थव्यवस्थेला प्राधान्य दिले गेले. कारण सर्व क्षेत्रे खाजगी भांडवलदारांच्या हाती ठेवू पाहणारी अनिर्बंध भांडवलशाही अर्थव्यवस्था असते. भांडवलशाही अर्थव्यवस्थेत भांडवलदारांची मक्तेदारी वाढते, मजुरांचे शोषण होते तसेच ग्राहकांचेही शोषण होते. मोठ्याा प्रमाणात आर्थिक विषमता निर्माण होते. या भांडवलशाही अर्थव्यवस्थेमध्ये संसदीय लोकशाही अस्तित्वात असूनदेखील संपत्तीच्या जोरावर खाजगी भांडवलदार राजकीय सत्ता आपल्या मनाप्रमाणे राबवितात. त्यामुळे लोकशाहीला ही भांडवलशाही अर्थव्यवस्था पोषक असलेली दिसून येत नाही. याउलट समाजवादी किंवा साम्यवादी अर्थव्यवस्थेमध्ये सर्व आर्थिक व्यवहारांचे सरकारच्या हातात केंद्रीकरण होते व राज्यसत्तेचेही केंद्रीकरण होते. व्यक्तिस्वातंष्याचा लोप होतो. त्यामुळे आर्थिक विकासाची गती मंद होत जाते. अशा प्रकारचे दोष या दोन्ही अर्थव्यवस्थांमध्ये निर्माण होताना दिसतात. भांडवली अर्थव्यवस्थेत भांडवलदार वर्गाचे वर्चस्व आर्थिक घटकांत निर्माण होते. आणि समाजवादी अर्थव्यवस्थेत संपूर्णपणे सरकारचे नियंत्रण अर्थव्यवस्थेवर असते. त्यामुळे सामाजिक, आर्थिक समता निर्माण करावयाची असेल तर या दोन्हीहून वेगळी अर्थव्यवस्था भारतासाठी आवश्यक वाटू लागली. त्यामुळे या दोन्हीहून वेगळी अशी

मिश्र अर्थव्यवस्था ही भारतीय अर्थव्यवस्थेला बळकटी आणू शकेल तसेच आर्थिक अडचणीतून भारतीय अर्थव्यवस्थेला बाहेर काढू शकेल अशी अपेक्षा व्यक्त होवू लागली. याचा परिपाक म्हणून ङ्गमिश्र अर्थव्यवस्थेचेङ्ख प्रारूप भारताने स्वीकारले. अशा या मिश्र अर्थव्यवस्थेत भांडवलशाही व समाजवादी अशा दोन्ही अर्थव्यवस्थांमधील चांगले गुण विकसित करण्याचा प्रयत्न केला जातो. या अर्थव्यवस्थेमध्ये सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रातील कार्य हे परस्पर सहकार्याचे व एकमेकांना पूरक असावे अशा स्वरूपाची अपेक्षा असते.

जागतिक स्तरावर प्रथम लॉर्ड जॉन मेनार्ड केंस यांनी १९२९ मध्ये जागतिक महामंदीचा अभ्यास करताना याची प्रथम सैद्धांतिक मांडणी केली. १९४० मध्ये फ्रान्सने प्रथम मिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला. त्यानंतर यु.एस.ए व तिसऱ्या जगातील अनेक देशांनी याचा स्वीकार केला. मिश्र अर्थव्यवस्थेत खाजगी व सार्वजनिक क्षेत्राचे सहअस्तित्व असते. खाजगी क्षेत्रातील निर्णय हे बाजारपेठेतील मागणी पुरवठ्याावर घेतले जातात. तर सार्वजनिक क्षेत्रातील निर्णय हे ना नफा ना तोटा या तत्त्वावर शासन घेत असते. मिश्र अर्थव्यवस्था ही वस्तू व सेवा निर्माण करण्याच्या अर्थव्यवस्थेतील एक पद्धती आहे. या अर्थप्रणालीत काही वस्तू व सेवा खाजगी संस्थांकडून पुरविल्या जातात तर काही वस्तू व सेवा या शासन संस्थेकडून म्हणजेच सार्वजनिक क्षेत्राकडून पुरविल्या जातात. उदा. वीज, दळणवळणाची सेवा, पोस्टाची सेवा इत्यादी.

भारतात या मिश्र अर्थव्यवस्थेची बीजे प्रथम आपल्याला 'मुंबई योजने'मध्ये सापडतात. १९४४ मध्ये मुंबईतील आठ मोठ्याा उद्योगपतींनी ही योजना आखली. त्यामध्ये जे.आर.डी.टाटा, पुरूषोत्तम ठाकूरदास यांसारख्या उद्योगपतींचा समावेश होता. त्यांच्या मते, भारतीय सरकारने औद्योगिक व इतर क्षेत्रांमध्ये मोठी गुंतवणूक करण्यासाठी मिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार करावा. कारण १० ते १५ वर्षाच्या कालावधीत राष्ट्रीय उत्पन्नात तिप्पट व प्रति व्यक्ती उत्पन्नात दुप्पट वाढ घडवून आणणे आवश्यक आहे. विशेषत: भारताने स्वातंष्यानंतर मिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार करून आर्थिक नियोजनाच्या माध्यमातून आर्थिक विकासाची प्रक्रिया सुरू केली. लोकशाही मार्गाने समाजवाद प्रस्थापित करण्यासाठी आणि आर्थिक क्षेत्रांत जलद गतीने प्रगती घडवून आणावी म्हणून मिश्र अर्थव्यवस्थेचा आ.तीबंध भारताचे पहिले पंतप्रधान पंडित नेहरूंनी स्वीकारला. या आधी इंग्लंडमधील मजूर पक्षाने अशा प्रकारच्या अर्थव्यवस्थेचा आग्रह धरलेला दिसून येतो. भारताने स्वीकारलेल्या या मिश्र अर्थव्यवस्थेला दुहेरी अर्थव्यवस्था असेही म्हणतात. कारण त्यामध्ये आधुनिक आणि परंपरागत अशा अर्थव्यवस्थांचे सहअस्तित्व असलेले पहायला मिळते. त्याचबरोबर भारतीय मिश्र अर्थव्यवस्था ही मूलभूतरित्या भांडवलशाहीला पूरक कार्य करणारी आहे. कारण समाजवादी अर्थव्यवस्थेत नियोजनाची अंमलबजावणी व लक्ष्ये साध्य करून घेण्यासाठी करण्यात येणारी सक्ती भारतात आढळून येत नाही.

## ❑ मिश्र अर्थव्यवस्थेचा अर्थ :-

भांडवलशाही आणि समाजवाद या दोन्ही अर्थप्रणालीमधील दोष टाळून चांगल्या गुणांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न करणाऱ्या अर्थव्यवस्थेला ‍‌मिश्र अर्थव्यवस्था‌ असे म्हणतात. भांडवलशाही आणि समाजवाद या दोन्ही व्यवस्थांमधील त्रुटींचा त्याग करून दोघांमधील चांगल्या गोष्टी एकत्र आणण्याचा प्रयत्न म्हणजेच मिश्र अर्थव्यवस्था होय. मिश्र अर्थव्यवस्थेत सार्वजनिक (सरकारी) व खाजगी क्षेत्राचे सहअस्तित्व असते. म्हणजेच यामध्ये वस्तू-सेवांचे उत्पादन कार्य हे सरकार तसेच खाजगी क्षेत्रामार्फत घडवून आणले जाते. काही वस्तू-सेवांच्या उत्पादनावर सरकारची पूर्ण मक्तेदारी असू शकते. अशा या अर्थव्यवस्थेमध्ये खाजगी व सार्वजनिक क्षेत्राचा विस्तार घडवून आणण्याचे महत्त्वाचे कार्य शासन कितपत परिणामकारकरित्या राबविते यावर समाजाचे आर्थिक व्यवहार व सामाजिक कल्याण अवलंबून असते.

१९९१ च्या आर्थिक सुधारणांपासून मात्र भारतीय अर्थव्यवस्थेचा प्रवास मिश्र अर्थव्यवस्थेकडून मुक्त अर्थव्यवस्थेकडे होत असलेला दिसून येतो. कारण भारतातील लोकसंख्या मोठ्याा प्रमाणात वाढत आहे. लोकसंख्येच्या मानाने राष्ट्रीय उत्पन्न कमी आहे व त्याचीही विषम विभागणी झालेली आहे. यामुळे बहुसंख्य जनता आज दारिद्र्याात जीवन जगताना दिसून येते. त्यामुळे भारताचा आर्थिक विकास जलदगतीने घडवुन आणणे ही अत्यंत निकडीची गोष्ट बनलेली आहे. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेची वाटचाल १९९१ नंतर मुक्त अर्थव्यवस्थेकडे होताना दिसत आहे. कारण १९९१ नंतर भारतात समाजवादाचा अंत झालेला दिसून येतो. अनेक सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग खाजगी व्हायला लागले. त्यामुळे समाजवादाने प्रश्न सुटतील असे वाटत असताना आता खाजगीकरणाने सगळे प्रश्न सुटतील असा भ्रम निर्माण करण्यात आलेला आहे. अनेक सार्वजनिक सेवा बंद होण्याच्या मार्गावर आहेत. उदा. बीएसएनएल ही टेलिफोन सेवा बंद होण्याच्या मार्गावर आहे. त्यामुळे हजारो लोक बेरोजगार होतील. असे अनेक प्रश्न आज खाजगीकरणामुळे किंवा मुक्त अर्थव्यवस्थेमुळे उपस्थित होताना दिसतात.

## ❑ भारताच्या मिश्र अर्थव्यवस्थेतील चार क्षेत्रे :-

### १. सार्वजनिक क्षेत्र (Public Sector) :-

सरकारी उद्योग हे जनहिताच्या दृष्टिकोनातून चालविणे आवश्यक असते. त्यासाठी देशातील साधन-सामग्रीचा विकास आणि त्यांचा उपयोग करण्याचे ध्येय तसेच सार्वजनिक हित व गतिशील औद्योगिक प्रगती साधण्याकरीता ज्या क्षेत्रातील उद्योगधंदे सरकारच्या मालकीचे असतात, ते सार्वजनिक (सरकारी) क्षेत्र होय. सरकारी मालकी, व्यवस्थापन व नियंत्रणाखाली असलेल्या सर्व उद्योग-उपक्रमांचा समावेश सार्वजनिक क्षेत्रात होतो. सार्वजनिक क्षेत्रात सरकारमार्फत चालविले जाणारे सर्व उद्योग-उपक्रम येतात. उदा. रेल्वे, शस्त्रास्त्रे, दूरदर्शन, पेट्रोलियम, संरक्षण साहित्य, ॲल्युमिनियम,

खते, यंत्रअवजारे, वाहतूक व दळणवळण, बँकिंग, पोलाद, वीज इत्यादी. सार्वजनिक क्षेत्रामध्ये नयाचा विचार बाजूला ठेवला जातो आणि सार्वजनिक विकास कसा साधला जाईल याकडे लक्ष दिले जाते. सार्वजनिक क्षेत्रामध्ये नवनवीन उद्योगधंदे स्थापण्याची जबाबदारी सरकार उचलते. स्वातंष्यपूर्व कालखंडामध्ये सार्वजनिक क्षेत्रातील उदाहरणे म्हणून फक्त रेल्वे, पोस्ट आणि टेलिग्राफ यांना ओळखले जात होते. मात्र स्वातंष्यानंतर काँग्रेसने सार्वजनिक क्षेत्राचा विकास घडवून आणला.

**२. खाजगी क्षेत्र (Private Sector) :-**

खाजगी व्यक्ती किंवा व्यक्तीसमुहाची मालकी व नियंत्रण ज्या उद्योग-व्यवसायांवर असते त्यास ङ्खखाजगी क्षेत्रङ्ख असे म्हणतात. उदा. .षी व पूरक उद्योग, लघु उद्योग, घाऊक व किरकोळ व्यापार इत्यादी. वैयक्तिक लाभ मिळविणे हे खाजगी क्षेत्राचे मूलभूत उद्दिष्ट असते. जास्तीत जास्त नफा मिळविणे हा याचा उद्देश असतो. भारत सरकारने १९९१ मध्ये खाजगीकरणाचा विचार प्रथम अंमलात आणला. कारण सरकारी उद्योगांपुढे अनेक प्रकारच्या मर्यादा येवू लागल्या. यातून मार्ग काढण्यासाठी सरकारने खाजगीकरणाची प्रक्रिया सुरू केली. याच्याही आधी इंग्लंडमध्ये हुजूर पक्षाच्या मार्गारेट थॅचर पंतप्रधान (१९७९-९०) असताना त्यांच्या काळात सरकारी उद्योगांचे खाजगीकरण करण्यात आले होते. याचाच आधार घेवून १९९१ मध्ये मनमोहन सिंग अर्थमंत्री असताना या प्रक्रियेला वेग आला. २०१४ नंतर भाजप व मित्र पक्षांचे सरकार सत्तेत आल्यानंतर खाजगीकरणाला बळकटी मिळालेली दिसते. काँग्रेसने सुरू केलेल्या समाजवादी धोरणाचा लोप होत जाऊन भांडवलशाही अर्थव्यवस्थेकडे भारतीय अर्थव्यवस्थेची वाटचाल सुरू असल्याचे दिसते. कारण आज टेलिफोन सेवा, वाहतूक सेवा, वीज पुरवठा, खनिजे उपकरणे, वैद्यकीय सेवा इत्यादी सगळ्या सेवा या खाजगी व्यक्ती किंवा संस्थांकडे चालवायला दिल्या जात असल्याचे दिसते.

**३. संयुक्त क्षेत्र (Joint Sector) :-**

या क्षेत्रात येणाऱ्या उद्योग-व्यवसायांवर सरकार तसेच खाजगी व्यक्ती किंवा व्यक्तीसमुहाची संयुक्त मालकी, व्यवस्थापन व नियंत्रण असते. कोणत्याही दोन व्यक्ती, समुह किंवा संघटना समान उद्दिष्टासाठी किंवा परस्परांच्या लाभासाठी एकत्र येतात त्यावेळी संयुक्त क्षेत्राचा उदय होतो. या संकल्पनेत संयुक्त मालकी, संयुक्त नियंत्रण आणि व्यावसायिक व्यवस्थापन यांचे मिश्रण आढळते. यामध्ये सार्वजनिक आणि खाजगी अशी दोघांची गुंतवणूक असते आणि त्यावर नियंत्रण व निर्देश राज्याचे असू शकते. सार्वजनिक क्षेत्र म्हणून शासन २६ टक्के पर्यंत भागभांडवल उभे करू शकते. परंतु त्यापेक्षा कमी भागभांडवल असता कामा नये, असे हे संयुक्त क्षेत्र आहे. यामध्ये केंद्र सरकार आणि खाजगी उद्योजक संयुक्तपणे नवीन उपक्रम स्थापन करू शकतात. कधीकधी केंद्र सरकार आणि एक किंवा अधिक राज्य सरकार एकत्रितपणे खाजगी क्षेत्रासह भागीदारीमध्ये उद्योग स्थापन करू शकतात.

### ४. सहकारी क्षेत्र (Co-operative Sector) :-

सभासदांच्या समान गरजा भागवणे, त्यांचे आर्थिक कल्याण साध्य करणे हा सहकारी क्षेत्रामध्ये उद्देश असतो. सहकारी क्षेत्रात प्रत्येकाने स्वत:पुरते व स्वतंत्रपणे कार्य न करता, अनेकांनी एकत्र व परस्पर सहकार्याने कार्य करणे म्हणजे सहकार होय. सहकारात मालकी खाजगीच पण व्यक्तीऐवजी ती समुहाची असते. भांडवलशाही व समाजवाद या दोन अर्थप्रणालींचा सुवर्णमध्य म्हणजे सहकार होय. सहकाराचे वैशिष्ट्या हे की, सभासदाने आणलेले भांडवल कितीही असले तरी 'एक सभासद एक मत' या तत्त्वानेच सहकारी संस्थांचा कारभार चालतो. समान आर्थिक व्यवहार करू इच्छिणारे लोक एकत्र येतात व ते परस्परांना मदत करून आपल्या गरजा भागविण्याचे उद्दिष्ट्या पार पाडतात. महाराष्ट्रामध्ये जी सहकार क्षेत्राची उल्लेखनीय वाढ व प्रगती झाली ती येथील नेतृत्वामुळे. त्यामध्ये डॉ. धनंजयराव गाडगीळ, डॉ. पंजाबराव देशमुख, यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, शरद पवार, बाळासाहेब विखे पाटील इत्यादी नेतृत्वाने ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी सहकारी संस्था स्थापन केल्या. लोकांकडून भागभांडवल गोळा करून समाजाच्या, लोकांच्या कल्याणासाठी त्याचा उपयोग करण्यात पुढाकार घेतला.

### ❑ मिश्र अर्थव्यवस्थेतील शासनाची भूमिका :-

भारतीय स्वातंष्यानंतर देशाचा जलद आर्थिक विकास आणि औद्योगिकीकरण घडून येण्यासाठी मिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला गेला. त्यासाठी सर्वसामान्य जनतेचे जीवनमान उंचावणे हे महत्त्वाचे उद्दिष्ट्या मिश्र अर्थव्यवस्थेत निश्‍चित करण्यात आले. हे उद्दिष्ट्या पार पाडत असताना शासनाला वेगवेगळ्याा भूमिका पार पाडाव्या लागतात. त्यांचा आढावा खालीलप्रमाणे घेता येईल.

### १. सार्वजनिक क्षेत्राचा विकास घडवून आणणे :-

भारत हा एक अविकसित देश आहे. त्यामुळे भारत देशाचा आर्थिक, औद्योगिक आणि सामाजिक विकास घडवून आणणे हे मोठे आव्हान सरकारपुढे होते. त्यामुळे मिश्र अर्थव्यवस्था हा एक चांगला पर्याय भारतासाठी उपलब्ध झाला. यामध्ये सार्वजनिक आणि खाजगी अशा दोन्हीतील चांगल्या बाबी स्वीकारून अर्थव्यवस्थेला बळकटी आणण्याचा प्रयत्न होताना दिसतो. सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रातील मूलभूत सामाजिक आणि आर्थिक सुविधांच्या निर्मितीसाठी खाजगी क्षेत्राकडून काही वेळा पुरेसा प्रतिसाद मिळत नाही. यामध्ये सेवासुविधा निर्माण करताना दीर्घकालीन गुंतवणुकीचे उद्दिष्टय असल्याने त्यांना लाभांश कमी मिळतो. त्यामुळे खाजगी क्षेत्र याकडे दुर्लक्ष करताना दिसते. अशा वेळी पोस्ट, तारसेवा, बँकिंग, रस्ते, वाहतूक सेवा, लोखंड व पोलाद उद्योग, विमानतळ, अणुशक्ती विकास, संरक्षणाच्या दृष्टीने महत्त्वाचे उद्योग, रेल्वे, वीजनिर्मिती इत्यादी उद्योग क्षेत्रांत सार्वजनिक क्षेत्राचा विस्तार घडवून त्याचा विकास साधणे ही शासनाची जबाबदारी बनते. त्यामुळे सार्वजनिक क्षेत्राचा विकास फक्त शासनच करू शकते.

**२. संयुक्त क्षेत्र व खाजगी क्षेत्राच्या विकासाला चालना देणे :-**

मिश्र अर्थव्यवस्थेत सार्वजनिक क्षेत्राच्या विकासाबरोबर खाजगी क्षेत्राकडेही लक्ष देवून समाजाला विविध सेवा व सुविधा प्राप्त करून द्याव्या लागतात. म्हणूनच भारताच्या १९५६ च्या औद्योगिक धोरणामध्ये सार्वजनिक धोरणाबरोबर खाजगी क्षेत्रामध्ये विविध १२ प्रकारचे उद्योग समाविष्ट करण्यात आले होते. त्याचप्रमाणे काही उद्योग सार्वजनिक व खाजगी अशा दोन्ही क्षेत्रांत संयुक्तपणे उभारले गेले. म्हणजेच शासनाला संयुक्त क्षेत्र व खाजगी क्षेत्राचे सहकार्य मिश्र अर्थव्यवस्थेत मिळवावे लागते. प्रत्येक क्षेत्राची उत्पादन क्षमता व तिच्या वाढीच्या वेगही विचारात घेऊन शासनाला उद्योग विस्ताराचे धोरण आखावे लागते. म्हणून संयुक्त क्षेत्र व खाजगी क्षेत्राच्या विकासाला चालना देणे सरकारला महत्त्वाचे आहे.

**३. विकास कामांना पुरेसा निधी उपलब्ध करून देणे :-**

सरकारला विविध विकास कामे करण्यासाठी पुरेसा निधी जमा करणे आवश्यक असते. विकास कामांसाठी लागणारा निधी हा कर, सार्वजनिक कर्ज व सर्व उद्योग व्यवसायात मिळणाऱ्या नयातून उभारावा लागतो. बचत व भांडवल संचय करण्यासाठी शासनाला व्यापक प्रयत्न करावे लागतात. विविध योजना आखून नागरिकांमध्ये राष्ट्रीयीकृत बँकेच्या माध्यमातून बचतीची सवय लावावी लागते. अशातून विकास कामांसाठी निधी उपलब्ध होवू शकतो.

**४. सार्वजनिक व खाजगी क्षेत्रात समन्वय घडवून आणणे :-**

सार्वजनिक क्षेत्रातून समाजाच्या विकासास पोषक असणाऱ्या विविध सेवा सुविधा पुरविल्या जातात. भारतात अनेक लघु व कुटीरोद्योगांची निर्मिती खाजगी क्षेत्राने केलेली दिसून येते. उपभोक्त्यांना आवश्यक असणाऱ्या वस्तूंची निर्मिती या लघु व कुटीरोद्योगातून झालेली दिसून येते. त्यामुळे या खाजगी क्षेत्राचा सहभाग विकासाच्या प्रक्रियेत महत्त्वाचा ठरला आहे. त्यामुळे सार्वजनिक आणि खाजगी अशा दोन्ही क्षेत्रांचा विकास घडवून देशातील जनतेच्या कल्याणासाठी त्याचा उपयोग करून घेणे ही शासनाची जबाबदारी बनली आहे.

### * स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-१ *

❑ **पुढील प्रश्नांची एक-दोन वाक्यात उत्तरे लिहा.**

१. मिश्र अर्थव्यवस्था म्हणजे काय?

२. मिश्र अर्थव्यवस्थेत कोणत्या दोन क्षेत्रांचे सहअस्तित्व पहायला मिळते?

## ४.२.२ १९९१ नंतरच्या आर्थिक सुधारणा

भारतामध्ये आर्थिक सुधारणा या १९९१ नंतर अंमलात आल्या असल्या तरी त्याच्या अगोदरपासून आर्थिक उदारीकरणाकडे थोडी थोडी वाटचाल भारतीय अर्थव्यवस्थेची असलेली दिसून

येते. १९६५ मध्ये आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने बर्नाड बेल यांना भारतात पाठवून आर्थिक सुधारणांबाबत अहवाल तयार करण्याचे निर्देश दिले होते. त्यांनी तो अहवाल १३ खंडात सादर केला होता. पण तो १९८९ पर्यंत गुप्त ठेवण्यात आला होता. त्यामध्ये प्रमुख १५ उपाय योजना आर्थिक सुधारणेबाबत सांगितलेल्या होत्या. उदा. आयात नियंत्रणाचे शिथिलीकरण, परवाना पद्धती रद्द करणे, खाजगी विदेशी गुंतवणूक आकर्षित करणे, सार्वजनिक क्षेत्राला अधिक स्वायत्तता, संरक्षण खर्चावर मर्यादा आणि कुटुंब नियोजनावर भर इत्यादी उपाय सांगता येतील. १९६६ मध्ये रूपयाचे केलेले प्रथम अवमूल्यन हा भारताच्या आर्थिक सुधारणांचा पहिला टप्पा होता. १९८० च्या दशकामध्ये आयात उदारीकरणावर जास्त भर देण्यात आला. राजीव गांधी पंतप्रधान (१९८५-९०) असताना अर्थव्यवस्थेमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले गेले. मात्र त्यास म्हणावे तसे यश आले नाही. त्या सातत्यहिन व वरवरच्या होत्या. या काळात मुक्तपणे आयात वाढली. पण याच्या तुलनेत निर्यात वाढ झाली नाही. याचा परिणाम महसुली खात्यातील तूट सतत वाढत गेली. त्यामुळे आर्थिक अरिष्ट निर्माण झाले.

२१ जून, १९९१ रोजी पी.व्ही. नरसिंहराव यांचे सरकार अस्तित्वात आल्यानंतर या सरकारने अर्थव्यवस्थेच्या सुधारणेसाठी अनेक धोरणात्मक निर्णय घेतले. उदा. उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरण. त्यांनाच ङ्गआर्थिक सुधारणाङ्ग असे संबोधले गेले. भारतीय अर्थव्यवस्थेवरील संकट निर्माण झाले होते त्याची अनेक कारणे आहेत. त्याचा प्रथम अभ्यास करणे गरजेचे आहे.

### ☼ आर्थिक सुधारणा हाती घेण्याची कारणे :-

१) १९८० च्या दशकात आर्थिक व्यवस्थापनामध्ये त्रुटी निर्माण झाल्याने १९९१ ला आर्थिक संकट उभे राहिले. त्यामुळे केंद्र शासनाची राजकोषीय तूट १९८९-९० मध्ये ८.२ टक्क्यांपर्यंत वाढली होती. ही तूट भरून काढण्यासाठी शासनाने मोठ्याा प्रमाणात अंतर्गत व परकीय कर्जे घेतली. त्याचे व्याज मोठ्याा प्रमाणात वाढत गेले.

२) १९८० च्या दशकामध्ये सरकारने आयातीवर आधारीत औद्योगिकीकरण व उत्पादनाच्या धोरणावर भर दिल्याने आयात मोठ्याा प्रमाणात वाढली. त्यामानाने निर्यात वाढू शकली नाही. परिणामी आंतरराष्ट्रीय देयता वाढली. परकीय कर्जांचे व्याजही वाढत गेले.

३) वाढत्या तूटी, तुटींचे चलनीकरण व त्यामुळे चलन पुरवठ्याातील अतिरिक्त वाढ यांमुळे चलनवाढीचा दर उच्च राहिला.

४) अनेक उद्योग, व्यवसाय उभे करण्यासाठी मोठ्याा प्रमाणात लायसेन्सची अट घालण्यात आली होती. हा लायसेन्स किंवा परवाना पद्धतीमुळे उद्योग, व्यवसाय अडचणीत आले त्यामुळे बेरोजगारी, आर्थिक टंचाईला सामोरे जावे लागले.

५) भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात कृषी क्षेत्राचा मोठा वाटा होता. मात्र .षी क्षेत्रात गुंतवणूकीचा व भांडवल निर्मितीचा दर अल्प प्रमाणात राहिल्याने शासनाला आर्थिक धोरण राबविण्यास अडथळे निर्माण झाले.

६) देशांतर्गत व परकीय व्यापारावर अनेक प्रकारची बंधने होती. बँकिंग कायदे व कामगार कायदे यामुळे अनेक प्रकारच्या मर्यादा निर्माण झालेल्या होत्या.

अशा सर्व कारणांमुळे अनियंत्रित व्यवहारतोलाचे संकट भारतीय सरकारपुढे उभे राहिले. ते सोडविण्यासाठी जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यांच्याकडे भारत सरकारने ७ अब्ज रूपये कर्जाची मागणी केली. त्यावेळी या दोन्ही संस्थांनी भारत सरकारवर काही अटी घालून कर्ज मंजूर करण्यात आले. त्या अटी पुढीलप्रमाणे.

१) खाजगी क्षेत्रावरील बंधने कमी करून अर्थव्यवस्था खुली करून तिचे उदारीकरण घडवून आणणे.

२) अनेक क्षेत्रांमधील सार्वजनिक क्षेत्राची भूमिका कमी करणे,

३) व्यापारावरील बंधने दूर करणे, इत्यादी.

त्यामुळे भारतीय सरकारला नवीन आर्थिक धोरण राबविणे आवश्यक वाटले. २१ जून, १९९१ मध्ये नरसिंहराव सरकारने आर्थिक संकटाला तोंड देण्यासाठी काही नवीन आर्थिक सुधारणात्मक निर्णय घेतले. विविध धोरणात्मक निर्णय घेतले गेले. तेच नवीन आर्थिक धोरण म्हणून पुढे आले. १९९१ मध्ये तत्कालिन सरकारने सुरू केलेल्या आर्थिक सुधारणांचा मध्यवर्ती गाभा म्हणजेच उदारीकरण, खाजगीकरण, जागतिकीकरणाची प्रक्रिया होय.

- **उदारीकरण–खाजगीकरण–जागतिकीकरण (Liberalisations-Privatisation-Globalisation) :-**

१९९० च्या सुमारास भारतात जागतिकीकरणाला सुरूवात झाली. याच काळात आपल्या देशावरील परकीय कर्ज देखील वाढले होते. जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यांनी भारताला कर्ज देणे नाकारले. कर्ज मिळविण्यासाठी भारतावर काही अटी घालण्यात आल्या. या अटींमध्ये भारताने आपल्या अर्थव्यवस्थेमध्ये बदल करून परदेशी व्यापारी कंपन्यांसाठी भारतातील वातावरण खुले करून देणे अपेक्षित होते. यानुसार भारत सरकारने आर्थिक क्षेत्रामध्ये बदल केले. अर्थव्यवस्थेमधील या बदलांना आर्थिक सुधारणा असे म्हटले गेले. यामध्ये जागतिकीकरणासोबत उदारीकरण व खाजगीकरण यांचा समावेश होतो. यालाच एकत्रितपणे ङ्गङ्घखाऊजा धोरणङ्क असे म्हटले जाते.

## ❑ उदारीकरण (Liberalisation) :-

उदारीकरण ही एक व्यापक संकल्पना आहे. अर्थव्यवस्थेच्या सर्वांगीण विकासासाठी राज्यसंस्थेने खाजगी क्षेत्राला पूर्णपणे मोकळिक देवू करणे हे उदारीकरण संकल्पनेत अभिप्रेत आहे. त्याचबरोबर आर्थिक स्वयंपूर्णत: वाढावी, शासनाने आर्थिक क्षेत्रात भरीव कामगिरी करावी यासाठी खुल्या व मुक्त अर्थव्यवस्थेला चालना देणे हे उदारीकरण संकल्पनेचे महत्त्वाचे वैशिष्टय असलेले दिसते. या उदारीकरणाच्या संकल्पनेवरच आधारीत भारत देशाच्या मिश्र अर्थव्यवस्थेचा मुक्त अर्थव्यवस्थेच्या दिशेने प्रवास चालू आहे. या उदारीकरणामध्ये नियंत्रित अर्थव्यवस्थेच्या जागी बाजाराभिमुख, खुल्या व मुक्त स्पर्धेवर आधारीत अर्थव्यवस्थेची निर्मिती होत असते. यामध्ये सार्वजनिक क्षेत्रातील, मोठ-मोठ्या उद्योगधंद्यातील सरकारची असलेली व्यावसायिक भूमिका कमी कमी होत जावून त्यामध्ये खाजगी उद्योजकांना अधिकाधिक वाव देणे, हे तत्त्व अंतर्भूत आहे.

जागतिक पातळीवर १९७० च्या दरम्यान आर्थिक उदारीकरणाला महत्त्व प्राप्त झाले. १९७० नंतर बेला बालास, जगदीश भगवती, क्रुगर आणि जेफरी साच इत्यादी अर्थशास्त्रज्ञांनी तसेच आंतरराष्ट्रीय मुद्रा निधी, जागतिक अधिकोष इ. आंतरराष्ट्रीय संस्थांनी आर्थिक उदारीकरणाचा पुरस्कार केला. यामध्ये असे प्रतिपादन करण्यात आले की, आयात धोरण मोठया प्रमाणात न अवलंबता निर्यात धोरण मोठया प्रमाणात आखणे हे आर्थिक उदारीकरणात महत्त्वाचे आहे.

### ☼ उदारीकरणाची व्याख्या :-

**१. डॉ. व्ही. एम. अत्री :** ''आर्थिक उदारीकरण ही एक अशी प्रक्रिया आहे की जिच्यामुळे निर्यातीस आणि आयातीस प्रतिबंध करणाऱ्या घटकांची तीव्रता कमी करण्यासाठी बाजाराधिष्ठित किंमतयंत्रणेचा स्वीकार केला जातो.''

**२. डॉ. रामनजनेयुल :** ''आर्थिक उदारीकरण म्हणजे आयात, निर्यात आणि उत्पादक गुंतवणुकीवरील अनिष्ट निर्बंध, नियंत्रणे, परवाने शिथिल करणे होय.''

### ☼ अर्थ :-

उदारीकरण म्हणजे अर्थव्यवस्था खुली करणे, किंमतीवरचे सरकारी नियंत्रण काढून टाकणे, परवाने आणि लायसन्सची पद्धत रद्द करणे, परकीय भांडवलाचे स्वागत करणे होय. अर्थव्यवस्थेतील प्रत्येक बाजारातील नियंत्रणे दूर करणे, असा आर्थिक उदारीकरणाचा अर्थ आहे. सरकारने अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रांवर टाकलेली बंधने कमी करणे, काढून टाकणे किंवा शिथिल करण्याची प्रक्रिया म्हणजे उदारीकरण होय. उदारीकरण हा नवीन औद्योगिक धोरणाचा परिणाम आहे जो परवाना पद्धती नष्ट करतो. सरकारद्वारे व्यापार धोरणाचे उदारीकरण करून देशामध्ये वस्तू आणि सेवांच्या प्रवाहावर शुल्क, सबसिडी आणि इतर निर्बंध काढून टाकले जातात. तेव्हा उदारीकरणाची प्रक्रिया घडून येते.

देशातील व्यापार आणि उद्योग स्वतंत्रपणे विकसित करण्यासाठी आर्थिक वातावरणाची निर्मिती करण्यासाठी सरकारद्वारे प्रयत्न केले जातात. विदेशी विनिमय बाजार, वित्तीय बाजार, श्रम बाजार, शेतमालाचा बाजार, इ.च्या बाबतीत सर्व अडथळे दूर करणे म्हणजे आर्थिक उदारीकरण होय. अशा या उदारीकरणातून सामाजिक व आर्थिक उद्दिष्टांची पुर्तता होऊ शकेल. पूर्वी अशा सामाजिक-आर्थिक उद्दिष्टयांच्या पूर्ततेसाठी अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रांवर सरकारने बंधने घातलेली होती. उदा. सार्वजनिक क्षेत्र आरक्षण धोरण, लघु उद्योग क्षेत्र आरक्षण धोरण, औद्योगिक परवाना पद्धती, परकीय वस्तू-सेवा भांडवल यांच्या आयातीवर बंधने, औद्योगिक स्थानिकीकरणावर बंधने इत्यादी.

१९९१ नंतर प्रथमच या सर्वांवरील बंधने सरकारने शिथिल केली, काढून टाकली. त्यामुळे आज भारतामध्ये पेट्रोलियम, दूरचित्रवाणी, रेडिओ, दूरसंचार, वीजनिर्मिती, विमा इत्यादी क्षेत्रे खाजगी क्षेत्रासाठी खुली करण्यात आली. कारण कोरिया, सिंगापूर, थायलंड या देशांनी उदारीकरणाच्या माध्यमातून प्रचंड आर्थिक विकास घडवून आणला होता. अशा प्रकारचा विकास भारत देशाचा घडवून आणण्यासाठी सरकारद्वारे पाऊले उचलण्यात आली. त्यासाठी काही उद्दिष्टये निश्चित करण्यात आली. ती पुढीलप्रमाणे :-

१) औद्योगिक उत्पादनाची अंतर्गत स्पर्धाशक्ती वाढविणे.

२) परकीय गुंतवणूक व तंत्रज्ञान आकर्षित करणे.

३) देशावरील कर्जाचे प्रमाण कमी करणे.

४) विकसित देशांना निर्यात करण्याची संधी प्राप्त करणे.

५) सार्वजनिक क्षेत्राची तसेच सरकारचे अर्थव्यवस्थेतील भूमिका कमी करणे.

६) जागतिकीकरणाच्या प्रक्रियेस गती देणे.

### ☼ उदारीकरणाची व्याप्ती :-

भारत सरकारने १९९१ मध्ये उदारीकरणाची प्रक्रिया सुरू केली. त्याद्वारे सर्व क्षेत्रे खाजगी व परकीय गुंतवणुकीसाठी खुली करण्यात आली. सरकारद्वारे काही महत्त्वाच्या क्षेत्रात उदारीकरणाचे निर्णय घेण्यात आले. ते पुढीलप्रमाणे आहेत.

### १. औद्योगिक क्षेत्रातील सुधारणा :-

१९९१ मध्ये 'नवीन औद्योगिक धोरण' जाहीर करण्यात आले. त्यानुसार औद्योगिक परवाना पद्धती रद्द करण्यात आली. औद्योगिक क्षेत्रातील ८५ टक्के उद्योगधंदे परवाना मुक्त केले होते. ही संख्या पुढे कमी कमी करत आता फक्त ५ गोष्टींसाठीच औद्योगिक परवाना आवश्यक केला आहे. त्या गोष्टी पुढीलप्रमाणे आहेत.

१) मद्यार्क पेयांचे उत्पादन.

२) सिगार, सिगारेट व तंबाखूच्या इतर पर्यायांची निर्मिती.

३) इलेक्ट्रिक, ऐरोस्पेस आणि सर्व प्रकारची संरक्षण साधने.

४) आगपेट्यांसहित सर्व औद्योगिक स्फोटके.

५) घातक रसायने. अशा बाबींसाठी शासनाने परवाना पद्धती आवश्यक केली आहे.

स्वातंष्यानंतर भारतात १७ उद्योगधंदे हे सार्वजनिक क्षेत्रासाठी आरक्षित होते. मात्र १९९१ च्या धोरणानुसार ही संख्या कमी करून ८ वर आणण्यात आली. पुढे ही संख्या दोन सार्वजनिक क्षेत्रासाठी निश्चित करण्यात आली. त्यामध्ये अणु उर्जा व रेल्वे वाहतूक यांचा समावेश आहे. लघु उद्योगांसाठी असणारे आरक्षण १० एप्रिल २०१५ रोजी काढून टाकण्यात आले. त्याचबरोबर १०० कोटी पेक्षा अधिक भांडवली गुंतवणूक असलेल्या कंपन्यांना (एमआरटीपी कंपन्या) सरकारी संमतीविना नवीन गुंतवणूक, नवीन प्रकल्प, नवीन वस्तूंचे उत्पादन करण्यास संमती देण्यात आली. परकीय गुंतवणूक आणि तंत्रज्ञानास मुक्त प्रवेश देण्यात आला. औद्योगिक स्थानिकीकरणाचे धोरण शिथिल करून परवानामुक्त उद्योगांना कोठेही उद्योग स्थापन करण्यासाठी सरकारची पूर्व अट असणार नाही. अशा प्रकारचे उदारमतवादी धोरण सरकारने निर्माण केले.

## २. **आर्थिक क्षेत्रातील सुधारणा :–**

भारतीय स्वातंष्यानंतर ज्या काही वित्तीय संस्था किंवा बँका कार्यरत होत्या त्यावर सरकारद्वारे अनेक प्रकारची बंधने घातलेली होती. उदा. बँक परवाना पद्धती, कर्ज व्यवहारांवर नियंत्रण, उच्च सीआरआर व एसएलआर, व्याज दराचे कडक नियंत्रण, इत्यादी. त्यामुळे आर्थिक क्षेत्राचा विकास मंदावला होता. जागतिक पातळीवर आर्थिक क्षेत्राचा मोठया प्रमाणावर विकास झालेला होता. म्हणून भारतीय शासनाने देखील आर्थिक क्षेत्रात सुधारणा घडवून आणण्यासाठी १९९१ च्या एम. नरसिंहन समिती नेमण्यात आली आणि त्याच्या शिफारशी क्रमाक्रमाने स्वीकारण्यात आल्या. त्यानुसार खाजगी क्षेत्रात देखील बँकांची निर्मिती करता येईल असे धोरण आखण्यात आले. रिझर्व्ह बँकेची इतर बँकावरील बंधने देखील कमी करण्यात आली. सीआरआर, एसएलआर, बँक दर इत्यादी दरांमध्ये घट करण्यात आली. १९९२ मध्ये म्युच्युअल फंड हे क्षेत्र, तर १९९९ मध्ये विमा क्षेत्र खाजगी व परकीय गुंतववणुकीस खुले करण्यात आले. त्यामुळे आर्थिक उदारीकरणाची प्रक्रिया वेगाने गतिमान होण्यास चालना मिळाली.

## ३. **राजकोषीय सुधारणा :–**

शासनाच्या सरकारी खजिन्यामध्ये मोठ्याा प्रमाणात वित्तीय तूट निर्माण झालेली होती. त्यामुळे

ही तूट भरून काढण्यासाठी सरकारचे प्रयत्न सुरू झाले होते. यासाठी कर व करेतर उत्पन्नात वाढ करण्यात आली, सार्वजनिक खर्चाचे प्रमाण कमी करण्यात आले, कर संरचनेत सुधारणा करण्यात आली, व्हॅटची अंमलबजावणी, अनुदान पद्धतींवर नियंत्रण आणण्यात आले. राज्यांवर वित्तीय शिस्त आणण्यात आली. अशा प्रकारचे निर्णय घेऊन राजकोषीय सुधारणा करण्यात आल्या.

## ४. **पायाभूत क्षेत्र सुधारणा :–**

अनेक पायाभूत संरचनांचा विकास घडवून आणण्यासाठी तसेच रोजगार निर्मिती होण्यासाठी खाजगी तसेच परकीय गुंतवणुक वाढावी यादृष्टीकोणातून प्रयत्न केले गेले. खाजगी व परकीय गुंतवणूकीसाठी पायाभूत क्षेत्रे खुली करण्यात आली. उदा. ऊर्जा, बंदरे, विमान सेवा कंपन्या, दूरसंचार इत्यादी.

## ☼ **उदारीकरणाच्या मर्यादा :–**

उदारीकरणाची प्रक्रिया राबविण्यामध्ये काही अडथळे आले. त्यामुळे उदारीकरणाचा विकासात काही मर्यादा आल्या त्या पुढीलप्रमाणे.

१) उदारीकरणाची प्रक्रिया सर्वच क्षेत्रात यशस्वी झाली नाही. तर काही क्षेत्रांत ही प्रक्रिया सुरूच करण्यात आली नाही. उदा. कामगार कायदे, कायद्याची व्यवस्था इत्यादी.

२) शिक्षण व आरोग्य क्षेत्रामध्ये उदारीकरणाच्या प्रक्रियेने म्हणावा तसा शिरकाव केला नाही.

३) उदारीकरणाच्या या प्रक्रियेने मोठया उद्योगांना चालना मिळाली. त्यामुळे लघु उद्योगांना मोठया उद्योगांच्या स्पर्धेला तोंड द्यावे लागत आहे. काही ठिकाणी लघु उद्योग बंद होण्याच्या मार्गावर आहेत.

४) उदारीकरणाच्या प्रक्रियेने परकीय व्यापार कंपन्यांचे आपल्या देशामध्ये वर्चस्व वाढले. या बहुराष्ट्रीय कंपन्या असल्यामुळे आपल्या देशातील छोटया छोटया उद्योगधंद्यांना त्यांच्याशी स्पर्धा करताना अडचणी येवू लागल्या.

५) बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये यांत्रिकीकरणाचा वाढता वापर यामुळे मनुष्यबळाची संख्या कमी झाली. त्यामुळे बेकारीच्या प्रमाणामध्ये वाढ होऊ लागली. रोजगारनिर्मिती मोठया प्रमाणात होऊ शकली नाही.

## ❑ **खाजगीकरण (Privatisation) :-**

भारतीय स्वातंष्यानंतर देशाचा जलद गतीने आर्थिक व सामाजिक विकास साध्य करण्यासाठी सार्वजनिक क्षेत्राला प्रोत्साहन देण्यात आले. मात्र १९४७ ते १९९० या कालावधीमध्ये सार्वजनिक क्षेत्राची कामगिरी निराशाजनक झाली. अर्थव्यवस्थेला या काळात उभारी मिळू शकली नाही. त्यामुळे

सरकारला नवीन उपाङ्गोजना करणे आवश्यक वाटले. त्यानुसारच सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांकरीता राखून ठेवलेले क्षेत्र खाजगी क्षेत्रामधील उद्योगांसाठी खुले करण्याच्या या प्रक्रियेलाच खाजगीकरण असे म्हणता येईल. सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांची मालकी व नियंत्रण खाजगी व्यक्ती किंवा खाजगी कंपनीला हस्तांतरीत करण्याचे धोरण खाजगीकरण या संकल्पनेत अभिप्रेत असलेले दिसून येते. नवीन धोरणाद्वारे सरकारने निर्गुंतवणुकीच्या माध्यमातून सार्वजनिक उद्योगांच्या खाजगीकरणाचे धोरण सुरू केले. बाजारयंत्रणेतील सरकारचा हस्तक्षेप कमी करण्यासाठी सार्वजनिक क्षेत्रांतील उपक्रम खाजगी क्षेत्रास विकून टाकण्यापर्यंत विविध प्रक्रियांचा समावेश खाजगीकरणात होत असतो.

☼ **खाजगीकरणाच्या व्याख्या :–**

**१. डी. आर. पेंडसे :** ''खाजगीकरण म्हणजे राष्ट्रीय आर्थिक व्यवहारातील सरकारचा सहभाग कमी करणे होय.''

**२. पीटर ड्रकर :** ''खाजगीकरण म्हणजे, सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांतील शासकीय भांडवल काढून घेण्याची प्रक्रिया होय.''

**३. डेव्हीड हेरॉल्ट :** ''खाजगीकरण म्हणजे साधनसामग्रीच्या उपयोगासाठी बाजारविरहीत पद्धतीऐवजी बाजारधिष्ठीत पद्धतीचा स्वीकार करण्याची प्रक्रिया होय.''

☼ **खाजगीकरणाची कारणे :–**

१) सरकारमार्फत जे सार्वजनिक उपक्रम किंवा उद्योग चालवले जात होते त्यांचा संचित तोटा दरवर्षी वाढत होता.

२) अशा सार्वजनिक उपक्रमांचा देशाच्या बचतीतील हिस्सा कमी कमी होत होता.

३) सार्वजनिक क्षेत्रातील उत्पादन क्षमतेचा पुरेपूर वापर होत नव्हता.

४) सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांमध्ये अतिरिक्त नोकर भरती केली होती. निर्णय प्रक्रियेत विलंब होत होता. यातील संसाधनांच्या अपव्ययाचे प्रमाण देखील वाढत होते.

५) नोकरवर्गातील कमी कार्यक्षमता व उत्पादकतेचे प्रमाण कमी असल्याने तोटयाचे प्रमाण वाढत होते.

या सर्व कारणांमुळे खाजगीकरणाला वाव मिळाला.

☼ **खाजगीकरणाचे परिणाम :–**

खाजगीकरणामुळे आपल्या देशाच्या अर्थकारणावर काही सकारात्मक तर काही नकारात्मक

परिणाम झाले. ते पुढीलप्रमाणे आहेत.

१) खाजगीकरणामुळे सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगधंद्यांचे प्रमाण कमी झाले व खाजगी क्षेत्रातील उद्योगधंद्यांचे प्रमाण वाढले. त्यामुळे उद्योगपतींचे सामर्थ्य वाढले आहे.

२) खाजगीकरणामुळे सरकारचे सार्वजनिक उद्योगावरील वर्चस्व कमी झाले. त्यामुळे खाजगी भांडवलदारांचे वर्चस्व वाढले. त्यामुळे त्यांची मक्तेदारी निर्माण झाली. त्याचा परिणाम समाज व सरकारला जाणवू लागला.

३) खाजगीकरणामुळे उत्पादनावर होणारा खर्च कमी होईल, उत्पादनाचा दर्जा सुधारेल, व्यवस्थापनाच्या क्षमतेत वाढ होऊन सर्वच उद्योगांना मोठया प्रमाणावर नफा मिळेल या सरकारच्या अपेक्षा प्रत्यक्षात उतरल्या नाहीत.

४) खाजगीकरणामुळे उद्योगांमधील कामगारांची संख्या कमी करण्यात आली. त्यामुळे बेकारीचे प्रमाण वाढले. बेकार कामगारांच्या रोजगाराचा प्रश्न निर्माण होऊन अनेक कुटुंबामध्ये अस्वस्थता निर्माण झाली.

५) खाजगीकरणामुळे सरकारचा नियमित उत्पन्नाचा स्त्रोत कमी होईल.

६) खाजगीकरणामुळे अनेक भांडवलदार आर्थिकदृष्ट्याा संपन्न बनले. त्यांच्याकडे संपत्तीचे केंद्रीकरण होऊन आर्थिक विषमता वाढण्याची शक्यता निर्माण झाली.

☼ **खाजगीकरणाचे फायदे :–**

१) खाजगी उद्योगधंदे हे सार्वजनिक क्षेत्राच्या तुलनेत अधिक कार्यक्षम चालतात. कारण त्यांच्यात व्यवस्थापन चांगले असते. नफा वाढविण्याच्या दृष्टिकोनातून प्रयत्न केले जातात. उपक्रमांना त्यांच्या खऱ्या उत्पादन क्षमतेची जाणीव होईल.

२) खाजगीकरणामुळे सरकारी खर्च कमी होईल, कारण सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग चालविण्यासाठी घेतलेल्या कर्जाचे प्रमाण कमी होईल, तसेच आजारी उपक्रमांवर होणाऱ्या खर्चाचे प्रमाण कमी होईल. त्यामुळे अर्थसंकल्पीय तुटींचे प्रमाण कमी होईल.

३) सरकार स्वत: व्यावसायिक होण्याऐवजी व्यवसायांचे योग्य नियंत्रण करू शकेल.

४) सरकारी नियंत्रणापासून खाजगी उपक्रम मुक्त होतील. त्यामुळे खाजगी उपक्रमामध्ये जबाबदारीने व पारदर्शकतेने काम केले जाईल.

५) खाजगीकरणामुळे सार्वजनिक उद्योगांवर होणारे सरकारी अनुदानांचे प्रमाण कमी होईल.

## ❑ जागतिकीकरण (Globalisation) :-

जागतिकीकरणामुळे आजच्या काळात दळणवळण आणि माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात मोठ्याा प्रमाणात प्रगती झालेली दिसते. यामुळे जागतिक स्तरावर कोठेही वस्तु, सेवा उत्पादन करणे किंवा विक्री करणे शक्य झाले आहे. तसेच व्यापार, गुंतवणूक, तंत्रज्ञान, उत्पादन, कला, क्रीडा, वागणे, बोलणे, शिक्षण, मनोरंजन यांचे जागतिकीकरण घडून आले आहे. जगामध्ये १९५० नंतर जागतिकीकरण या संकल्पनेने वेग घेतला. पण याच्याही आधी जगामध्ये मुक्त व्यापार होत होते. १८७० ते १९१० या कालखंडात मुक्त व्यापार होत होता. वस्तू, भांडवल यावर कोणतीही बंधने नव्हती. मात्र पहिल्या महायुद्धानंतर आंतरराष्ट्रीय व्यवहारांवर बंधने येऊ लागली. जागतिक मंदी आणि दुसरे महायुद्ध यामुळे ही नियंत्रणे आणखी वाढली. पण १९५० नंतर ही बंधने कमी होऊ लागली. त्यामुळे १९७० पर्यंत आंतरराष्ट्रीय व्यापारात प्रचंड वाढ झाली. १९८० च्या दशकात उदारीकरणाचा काळ सुरू झाला. त्यामुळे व्यापार, गुंतवणूक आणि वित्त, सेवा, तंत्रज्ञान, माहिती, विचार यामध्ये मोठ्याा प्रमाणात वाढ झाली. वर्तमानकाळात जागतिकीकरण ही संकल्पना प्रामुख्याने व्यापार, आर्थिक विकासाची प्रक्रिया व विचारधारांचे विश्वव्यापीकरण करणे याच्याशी संबंधित बनली आहे. म्हणजेच देशाच्या सीमेबाहेर आर्थिक व्यवहारांचा विस्तार होऊ लागल्याने जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत वाढ झाली.

### ☼ जागतिकीकरणाच्या व्याख्या :–

**१. रूसी मोदी :** ''मुक्त स्पर्धा आणि नवे तंत्रज्ञान याद्वारे उत्पादन आणि उत्पादकता वाढविणे आणि संपूर्ण जगाची सलग एकच बाजारपेठ निर्माण करून वस्तू व सेवा यांची विक्री करणे.''

**२. श्रवणकुमारसिंग :** ''जागतिकीकरण म्हणजे सर्व देशाची एकच बाजारपेठ निर्माण करणे आणि त्या बाजारपेठेत जगातील साधनसामग्रीचे आणि भांडवलाचे सुलभ परिचालन निर्माण करणे होय.''

**३. प्रा. देवेंद्र अवस्थी :** ''जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत सर्व वस्तूंच्या आयातीवरील निर्बंध टप्याटप्याने रद्द करणे, आयात कमीत कमी पातळीवर आणणे तसेच सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांचे खाजगीकरण करणे होय. तसेच जागतिकीकरणामध्ये राष्ट्रांतर्गत श्रमविभागणी आणि राष्ट्रीय बाजारपेठ यापेक्षा आंतरराष्ट्रीय श्रमविभागणी आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठ यांचा प्रभाव अधिक असतो. त्यामुळे भांडवल, वस्तू, तंत्रज्ञान आणि श्रम यांच्या गतिशीलतेला राष्ट्रीय सीमा राहत नाहीत.''

**४. मॅलकॉम एस ॲडशियह :** ''जागतिक दृष्टिकोन निर्माण करणारी प्रक्रिया म्हणजे जागतिकीकरण होय.''

## ☼ जागतिकीकरणाची वैशिष्ट्ये :-

जागतिकीकरणाची वैशिष्ट्यो पुढीलप्रमाणे सांगता येतील.

### १. खुली बाजारपेठ :-

जागतिक पातळीवर खुल्या बाजाराधिष्ठीत अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला गेला. त्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापार आणि गुंतवणूक यांना मोठया प्रमाणात संधी निर्माण झाल्या. व्यापारावरील निर्बंध कमी केले. वस्तू आणि सेवा यांचा व्यापार आणि गुंतवणूक याबाबत अनेक आंतरराष्ट्रीय करार अस्तित्वात आले. त्यामुळे खुली बाजारपेठ निर्माण झाली.

### २. मोठी स्पर्धा निर्माण झाली :-

जागतिकीकरणामुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांचा प्रभाव बाजारव्यवस्थेत निर्माण झाला. बहुराष्ट्रीय कंपन्या आपल्या अनेक शाखांच्याद्वारे अनेक देशात व्यवसाय करतात. त्यामुळे व्यवसाय करणाऱ्या कंपन्यांसमोर मोठी स्पर्धा निर्माण झाली. देशांतर्गत स्पर्धक व आंतरराष्ट्रीय पातळीवरील स्पर्धक निर्माण झाल्याने मोठी स्पर्धा निर्माण झाली. यातूनच बहुराष्ट्रीय कंपन्यांचा विकास देखील घडून आला.

### ३. सीमोलंघन होऊन व्यापार :-

जागतिकीकरणामुळे व्यापार आणि गुंतवणूकीला प्रोत्साहन देणारे कायदे निर्माण झाले. त्यामुळे देशाच्या सीमा ओलांडून व्यापार, व्यवसाय केला जाऊ लागला. जागतिक बाजारपेठा काबीज करण्याकडे अनेक व्यापारी कंपन्यांचा कल वाढू लागला.

### ४. तंत्रज्ञानात्मक विकास :-

जागतिकीकरणाच्या प्रभावामुळे माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात देखील मोठी प्रगती झाली. लोकांच्या आर्थिक जीवनामध्ये फार मोठा बदल झाला. तंत्रज्ञानामुळे आर्थिक प्रवाहांचे विश्लेषण करण्याची नवी साधने निर्माण झाली. व्यवसायासाठी आवश्यक असणाऱ्या माहितीचे संकलन एका ठिकाणी होऊ लागले.

## ☼ जागतिकीकरणाचे फायदे :-

१) जागतिक स्तरावर प्रत्येक देशाला एकमेकांच्या वस्तूंशी स्पर्धा करावी लागत असल्यामुळे वस्तुंची गुणवत्ता सुधारली आहे.

२) जागतिकीकरणामुळे नव्या तंत्रज्ञानाची देवाण घेवाण झाली आहे.

३) जागतिकीकरणामुळे उत्पादन क्षमतेचा वापर मोठया प्रमाणात झाल्यामुळे उत्पादन वाढले आहे.

४) जागतिकीकरणामुळे विदेशी चलन तसेच निर्यात वाढली आहे.

५) तंत्रज्ञान, व्यवस्थापन कौशल्यात वाढ झाली आहे.

☼ **जागतिकीकरणाचे तोटे :–**

१) जागतिकीकरणामुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांचा वाढता प्रभाव यामुळे स्वदेशी उद्योग, व्यापार कंपन्या बंद पडण्याचा धोका निर्माण झाला आहे.

२) विकसनशील देशांना कर्जाच्या जाळयात अडकण्याचा धोका निर्माण झालेला आहे.

३) विकसित देशातील बहुराष्ट्रीय कंपन्या की, ज्या प्रदुषण निर्माण करतात त्या विकसनशील देशांमध्ये स्थलांतरीत झाल्यामुळे आरोग्यास घातक ठरणारे प्रदुषण निर्माण करत आहेत.

४) विकसनशील देशांचे आयातीचे प्रमाण वाढले व निर्यात कमी झाली त्यामुळे वित्तीय तुटीचे प्रमाण वाढले.

☼ **जागतिकीकरणाचा भारतावरील परिणाम :–**

जागतिकीकरणामुळे सर्वच विकसनशील देशांवर अनुकूल तसेच प्रतिकुल परिणाम झाले आहेत. याचा भारत देशावर देखील मोठया प्रमाणात परिणाम झाला आहे. अनुकूल परिणामामध्ये वस्तू व सेवा यांच्या निर्यातीस मोठी चालना मिळाली आहे. संगणक, वित्तीय क्षेत्रातील वाढ, बिपीओ क्षेत्रातील सेवा इत्यादींचा निर्यातीमध्ये वाढ झाली आहे. त्याचा परिणाम भारताच्या अर्थव्यवस्थेवर झालेला दिसून येतो. सेवा क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या कामगारांच्या पगारामध्ये मोठया प्रमाणात वाढ झाल्यामुळे एक नवीन श्रीमंत वर्ग पुढे येताना दिसतो. यामुळे चैनीच्या वस्तू वापरण्याचे प्रमाण देखील वाढले आहे. तसेच कृषी क्षेत्रातील संशोधनामुळे सुधारीत बी–बियाणे, रोपे उपलब्ध झाली आहेत. याचा परिणाम उत्पादनामध्ये वाढ होण्यामध्ये झालेला आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांमुळे रोजगार निर्मित देखील वाढ झाली आहे. शेअर्स बाजारात पैशांची मोठ्याा प्रमाणात उलाढाल होत आहे. परकीय देशांशी केल्या जाणाऱ्या व्यापारामध्ये देखील वाढ झाली आहे.

तर दुसऱ्या बाजूला जागतिकीकरणाचा भारतावर प्रतिकुल परिणाम देखील झालेला दिसून येतो. बहुराष्ट्रीय कंपन्यांनी भारताची बाजारपेठ व्यापल्याने भारतातील उद्योग धोक्यात आले आहेत. स्वदेशी कंपन्या, हस्तउद्योग बंद पडण्याचा धोका वाढला आहे. जागतिक स्पर्धा व बहुराष्ट्रीय कंपन्या यांच्याबरोबर टिकून राहणे अनेक उद्योगांना शक्य न झाल्याने अनेक उद्योग बंद पडले. बहुराष्ट्रीय कंपन्या या तंत्रज्ञानावर चालत असल्याने मनुष्यबळाची संख्या कमी लागते. त्यामुळे बेकारीची समस्या निर्माण झाली आहे.

*** स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-२ ***

१. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने भारतातील आर्थिक सुधारणांबाबत अहवाल तयार करण्याचे निर्देश कोणाला दिले होते?

२. खुली बाजारपेठ निर्माण होण्यामागचे कारण कोणते?

## ४.२.३ असमानता आणि पुनर्वितरण

व्यक्ती ही जन्मत: स्वतंत्र असते. परंतु समाजामध्ये जीवन जगत असताना अनेक सामाजिक बंधनात ती बांधली गेली आहे. उदा. जात, धर्म, वर्ण, वर्ग, वंश, लिंग, भाषा, चालीरिती इत्यादी. त्यामुळे भारतीय समाजात सामाजिक आणि आर्थिक पातळीवर असमानता असलेली दिसते. भारतीय समाजातील बलुतेदारी व अलुतेदारी पद्धतीमुळे प्रत्येक व्यक्तीचा सामाजिक व आर्थिक दर्जा हा भिन्न असलेला दिसतो. त्यामुळे समाजाची विभागणी उत्पन्नानुसार व दर्जानुसार झालेली दिसते. ग्रामीण भागातील शेतकरी वर्गात मोठ्याा प्रमाणात असमानता दिसते. उदा. मोठे जमीनदार, मध्यम शेतकरी, अल्पभूधारक आणि शेतमजूर. यावरून ग्रामीण भागातील सामाजिक आणि आर्थिक स्थितीचा दर्जा समजतो तसेच त्यांच्यातील असमानता देखील समोर येते. शहरी भागामध्ये उद्योजक, नोकरदार, वकील, प्राध्यापक, डॉक्टर, व्यापारी, दुकानदार अशा व्यवसायामध्ये वर्गी.त झालेला समाज पहायला मिळतो. यांच्यामध्येदेखील सामाजिक स्तरीकरण दिसते. यातील प्रत्येक व्यक्तीमध्ये काम करण्याची पद्धती वेगळी आहे, त्यांच्यातील प्रतिष्ठा वेगळी आहे, राहणीमान वेगळे आहे. त्यामुळे त्यांच्यात असमानता दिसते.

मानवी समाज हा समताधिष्ठित नाही. त्यांच्यात जाती, धर्माचे स्तोम निर्माण झाल्याने व्यक्ती किंवा समूहामध्ये समानता दिसत नाही. सर्वच समाजात संपत्ती, सत्ता, प्रतिष्ठा यांची विषम वाटणी झालेली आहे. यातून समाजात भिन्नता असणारे विविध स्तर निर्माण झालेले आहेत. हे स्तर म्हणजे श्रेष्ठ, मध्यम व कनिष्ठ असे होय. अशा स्तरीकरणामुळे प्रत्येकाला प्रत्येक वस्तू व संधीचा उपभोग घेता येत नाही. त्यामुळे असमानता दिसून येते. देशा-देशामध्ये, राज्या-राज्यांमध्ये, शहरी-ग्रामीण, स्त्री-पुरूष, श्रेष्ठ-कनिष्ट, गरीब-श्रीमंत, जात-धर्म, सबल-दुर्बल अशा प्रत्येक ठिकाणी असमानता असलेली पहावयास मिळते. या असमानतेचे प्रतिकूल परिणाम व्यक्ती, समाज व देशाला सहन करावे लागतात. व्यक्ती, समाज, देश यांच्यातील फरकामुळे असमानता दिसून येते.

ग्रामीण भागात श्रीमंत शेतकरी, शहरी भागात अति उच्चभ्रू वर्ग तसेच उद्योग व सेवा व्यवसाय करणारे असे भांडवलदार वर्ग आहेत. त्यांचे उत्पादन साधनांवर नियंत्रण आहे. त्यामुळे वस्तुंच्या किंमतींवर या भांडवलदार वर्गाचे नियंत्रण असललेले दिसते. ग्रामीण भागात श्रीमंत शेतकरी विरोधी

मध्यम, अल्पभूधारक, भूमिहीन असे ध्रुवीकरण झालेले दिसते. हे दोन्ही वर्ग परस्पर विरोधी भूमिका घेतात. श्रीमंत वर्ग हा खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण प्रक्रियेचा समर्थक आहे. तर गरीब त्या खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरणाच्या परिणामांशी तोंड देत आहे. शहरी भागात शहरी गरीब विरोधी उद्योग, सेवा व्यवसाय (बांधकाम, डॉक्टर इत्यादी) असे ध्रुवीकरण झाले आहे. यामुळे त्यांच्यात असमानता आहे.

असमानता ही शिक्षण, लिंग, शहरी-ग्रामीण, श्रीमंत-गरीब, मालक-कामगार, उच्च-निच्च अशा बाबीतून प्रखरतेने जाणवते. मानवाच्या राजकीय वर्तनातून संपत्तीवर वर्चस्व निर्माण करण्याच्या पद्धतीचा विचार राजकीय अर्थशास्त्रात होत असतो. आर्थिक असमानतेचा अभ्यास संपती, उत्पन्न आणि वापर यावर केला जातो.

वेतनवाढीचा विस्तार वाढल्यामुळे शासकीय व खाजगी क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांमध्ये मोठ्याा प्रमाणात वेतनामध्ये फरक पडू लागला. त्यामुळे अति श्रीमंत, मध्यम व कमी प्रमाणात वेतन मिळणारे असे तीन वर्ग निर्माण झाले. यातून उत्पन्नात असमानता निर्माण होऊ लागली. जागतिककीकरण, तंत्रज्ञानातील बदल, धोरणे, वेतनातील असमानता यातून असमानतेच्या प्रश्नाने डोके वर काढले आहे.

आपल्या भारत देशामध्ये असमानतेचा सर्वात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे गरीब-श्रीमंत ही दरी होय. भारतातील १० टक्के लोकांकडे संपत्ती अधिक असण्याचे प्रमाण आहे. तर जवळजवळ ९० टक्के लोक हे गरीबीत जीवन जगत असताना दिसतात. म्हणजे भारतातील ९० टक्के संपत्ती ही १० टक्के लोकांकडे एकवटली आहे. याचा परिणाम म्हणजे देशामध्ये असमानता वाढीस लागण्यास झाला आहे. यातूनच विषमता मोठ्याा प्रमाणात निर्माण झालेली दिसते.

ही विषमता किंवा असमानता नष्ट करण्यासाठी शासन संस्थेद्वारे जे समाजातील मागास घटक आहेत त्यांच्यात संपत्तीचे, सेवांचे पुनर्वितरण करणे आवश्यक आहे.

## ❑ पुनर्वितरण

भारतीय समाजात आर्थिक व सामाजिक विषमता मोठ्या प्रमाणात आहे. ही विषमता नष्ट करण्यासाठी तसेच समाजाचे आर्थिक व सामाजिक कल्याण प्रस्थापित करण्यासाठी देशात विषमतेचे निर्मूलन होणे आवश्यक आहे. आर्थिक विषमतेचे निर्मूलन करण्याकरिता शासनाकडून जे प्रयत्न केले जातात, ते प्रामुख्याने बाजार प्रक्रियेशी निगडित असतात. आर्थिक विषमतेचे निर्मूलन करण्याकरीता मानवी हक्कांचे पुनर्वितरण करणे गरजेचे असते. विषमतेचा विचार केवळ उत्पन्नाच्या बाजूने करून पुरेसे होणार नाही तर विविध क्षमतांचे कशाप्रकारे वितरण झाले आहे, हे पाहणे अधिक महत्त्वाचे आहे. ही विषमता, असमानता नष्ट करण्यासाठी सरकारकडून पुन्हा पुन्हा सार्वजनिक वितरण

व्यवस्थेद्वारे तसेच सबसिडीच्या माध्यमातून दुर्लक्षित घटकावर खर्च करत असते. यालाच पुनर्वितरण असे म्हणतात.

असमानतेच्या दोषापासून देशाला मुक्त करावयाचे असेल तर लोकांच्या बौद्धीक कुवतीनुसार व कौशल्यानुसार त्यांना सोयी उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. यासाठी शासन स्तरावरून वेगवेगळ्याा समाजातील दुर्लक्षित गटांतील लोकांना सक्षम करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यासाठी देशामध्ये मूलभूत समानता व किमान सामाजिक सुरक्षितता निर्माण करणे आवश्यक आहे. देशामध्ये रोजगाराच्या संधी, शिक्षणाच्या संधी, निर्माण करून द्याव्या लागतील. जे बेकार आहेत त्यांना रोजगार निर्माण करून दिला पाहिजे. दुर्लक्षित घटकांकडे शासनाने विविध योजनांच्या माध्यमातून लक्ष देणे गरजेचे आहे. आरोग्य सुविधा, सार्वजनिक वितरण व्यवस्था, वित्तपुरवठा इत्यादींच्या माध्यमातून शासनाने दुर्लक्षित घटकांमध्ये सेवासुविधांचे पुनर्वितरण केल्यास सामाजिक समता प्रस्थापित होण्यास मदत होईल.

सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक अशा सर्वच बाबतीत कल्याणकारी योजनांच्या माध्यमातून शासनाद्वारे दुर्लक्षित घटकांना न्याय दिला जातो. उदा. घरकुल योजना, विमा योजना, आरोग्य सुविधा, अन्नधान्य सुविधा, वीज बिल सवलत, गॅस सबसिडी, ६५ वर्षावरील वृद्धांना सवलतीत बस पास योजना इत्यादी. अशा गोष्टीतून पुनर्वितरण होत असते. तसेच शिक्षणासारख्या पायाभूत सुविधांवर सरकारतर्फे सार्वजनिक खर्च केला जातो. गरीब लोकांना आरोग्य सेवा पुरविण्यासाठी सार्वजनिक दवाखान्यातून मोफत उपचार केले जातात. तसेच सवलतीमध्ये औषधे उपलब्ध करून दिली जातात. ज्या गरीब कुटुंबांना राहायला घरे नाहीत किंवा दारिद्र्या रेषेखालील कुटुंबांना घरकुल योजनेच्या माध्यमातून घर बांधण्यासाठी आर्थिक साहाय्य केले जाते. भारतात अन्नधान्य, साखर, केरोसिन, हातमाग कापड, खते यावर सरकार सबसिडीच्या माध्यमातून लोकांना कमी दरामध्ये उपलब्ध करून देते. म्हणजेच सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत सरकार पुनर्वितरण घडवून आणते. जेणेकरून गरीब कुटुंबे ही मध्यम कुटुंबाच्या समान पातळीवर येऊ शकतील. त्यांचा दर्जा उंचावेल, त्यांचे राहणीमान सुधारेल या हेतूने सरकार पुनर्वितरण घडवून आणते. देशातील लोकांचे सामाजिक कल्याण करणे, त्यांच्या आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी देशाच्या संपत्तीचे पुनर्वितरण करणे आवश्यक असते. यासाठी अधिक श्रीमंत व भांडवलदार वर्गावरील कराच्या माध्यमातून पैसा उभा करणे गरजेचे असते. व तो पैसा सार्वजनिक वितरणाच्या माध्यमातून गरीब कुटुंबांचा सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी केले जाते. हे सर्व सरकामार्फत पुनर्वितरणाच्या माध्यमातून होत असते.

### * स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-३ *

१. भारतीय ग्रामीण समाजातील असमानता बलुतेदारी व अलुतेदारीमधील कोणत्या घटकामुळे झाली?

२. सरकार कोणामार्फत पुनर्वितरण घडवून आणते?

## ४.२.४ विज्ञान, तंत्रज्ञानाचा राजकीय अर्थकारणावरील परीणाम

जगातील एखादी घटना समजुन घेणे, त्या घटनेचा अर्थ लावणे, इतर घटनांशी तिची तुलना करणे, त्या घटनेचे मूल्यमापन करणे, तिच्या मागच्या कार्यकारण प्रक्रियेचा शोध घेणे विज्ञानामध्ये अपेक्षित असते. अशा पद्धतशीर ज्ञानातून विज्ञानाच्या शाखा निर्माण होतात. अशा ज्ञानातून माणूस निसर्गावर ताबा मिळविण्याचा प्रयत्न करतो. वेगवेगळ्याा यंत्रांची आणि तंत्रांची निर्मिती करतो. यातूनच तंत्रविद्या विकसित होते. मानव या विज्ञान-तंत्रज्ञानाचा वापर सुख समृद्धीसाठी तसेच वर्चस्वासाठी करत आला आहे. मानव विज्ञान तंत्रज्ञानाचा वापर विविध विकासात्मक बाबींवर करतो. सामाजिक प्रश्न सोडविण्यासाठी विज्ञान महत्त्वाचे आहे. विज्ञानाचे नियोजन करून भारतातील विकासाचा प्रश्न सोडविण्याची भूमिका देशात प्रथम पंडित नेहरूंनी त्यांच्या शासनकाळात घेतली. त्याच्या आधी ब्रिटिशांनी देखील विज्ञान तंत्रज्ञान धोरण अंमलात आणले. १९४२ साली वैज्ञानिक व औद्योगिक संशोधन संस्थेची स्थापना झाली. यामुळे भारतातील विज्ञान तंत्रज्ञानाच्या धोरणाचा विकास झाला.

भारतातील आर्थिक रचना, सामाजिक, राजकीय घडामोडी यांच्यापासून विज्ञान व तंत्रज्ञानाला अलिप्त ठेवणे शक्य नव्हते. त्यामुळे पंडित नेहरूंनी विज्ञान तंत्रज्ञानावर आधारलेल्या भारताची राष्ट्रबांधणी करण्याचे धोरण आखले होते. जागतिक तसेच राष्ट्रीय प्रश्न सोडविण्यासाठी वैज्ञानिक कार्यपद्धती व वैज्ञानिक दृष्टिकोन महत्त्वाचा आहे. जगातील आर्थिक, सामाजिक आणि राजकीय घडामोडी यांच्यापासून विज्ञानाला अलिप्त ठेवणे शक्य नाही. विज्ञान, समाजकारण, राजकारण, अर्थकारण यांची सांगड घालणारे विचार पंडित नेहरूंनी भारतीय विज्ञान परिषदेच्या अधिवेशनात मांडले होते (१९४७). यामुळे त्यांनी त्यांच्या पहिल्या मंत्रिमंडळात वैज्ञानिक संशोधन खाते निर्माण केले. मुंबई येथे अणुऊर्जा संस्था स्थापन झाली (१९५४). त्यांनी समाजाच्या आर्थिक विकासाचा दृष्टिकोन समोर ठेवला होता. विज्ञान व तंत्रज्ञानविषयक संस्थांच्या उभारणीला पंडित नेहरूंनी पुढाकार घेतला होता. यातूनच अखिल भारतीय पातळीवर आयआयटींची स्थापना झाली. यातून जागतिक दर्जाचे अभियांत्रिकी व तंत्रज्ञानविषयक संशोधक निर्माण झाले. नेहरूयुगात पाच भारतीय प्रौद्योगिक संस्थांची (आयआयटी) स्थापना झाली होती. त्यानंतर मनमोहन सिंग आणि नरेंद्र मोदी यांच्या

काळात भारतीय प्रौद्योगिक संस्थांचा विकास झाला.

विज्ञान-तंत्रज्ञानाचे महत्त्व इतके वाढले की, सत्तरीच्या दशकात इलेक्ट्रॉनिक खाते (१९७०), अवकाश आयोग व अवकाश खाते स्थापन झाले (१९७२). विज्ञान तंत्रज्ञानाशी संबंधीत पर्यावरण खाते १९८० मध्ये स्थापन झाले. उपग्रह, दूरदर्शन, अणुऊर्जा, संगणक इत्यादी क्षेत्रामध्ये क्रांती निर्माण झाली. अन्नधान्य, खते, औषधे, रसायने, वस्त्रउद्योग या क्षेत्रातील प्रगतीसाठी विज्ञान तंत्रज्ञान धोरण आखण्यात आले.

विक्रम साराभाई, होमी भाभा, अब्दुल कलाम, सॅम पित्रोडा इत्यादी संशोधकांनी विज्ञान-तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली. विज्ञान-तंत्रज्ञानाच्या मदतीने बेंगलोर येथे इलेक्ट्रॉनिक सिटी उभी राहिली. यालाच भारताची 'सिलीकॉन व्हॅली' असे म्हणतात. पुण्यामध्ये देखील ङ्गसी डॅकङ्ग सारखे प्रकल्प उभे राहिले. सी डॅक प्रकल्पातूनच सुपर संगणक निर्माण झाला. तंत्रज्ञानाचा उपयोग करून स्मार्ट फोन निर्माण होऊ लागले. निवडणूक आयोगानेही तंत्रज्ञानाचा वापर करून ईव्हीएम मशीन (मतदान करण्यासाठी), सी व्हिजिल ॲप (आचारसंहितेच्या भंगाची छायाचित्रे व व्हिडिओ दिसण्यासाठी) सुरू केले आहे. हा तंत्रज्ञानावर आधारीत महत्त्वाचा बदल आहे. भारतातील युनिक आयडेंटिफिकेशन नंबर म्हणजेच 'आधार' हा ओळख क्रमांक व्यक्तीच्या निवडणूक ओळखपत्र, वाहन परवाना, बँक खाते, पासपोर्ट यांच्याशी जोडण्यात आला आहे. हे धोरण विज्ञान तंत्रज्ञानाशी संबंधीत आहे.

जगातील सर्वच लोकशाही देशामध्ये शासन यंत्रणा विज्ञान व तंत्रज्ञानाचा वापर करीत आहे. याचा हेतू शासनाचा व्यवहार पारदर्शी करणे व सामान्य जनतेच्या समस्या सोडविणे हा आहे. भारत सरकारने ई-गव्हर्नर्स, मेक इन इंडिया, स्मार्ट शहर, स्मार्ट खेडे यासारखी धोरणे विज्ञान तंत्रज्ञानावर आधारीत स्वीकारलेली आहेत.

## ❑ राजकीय अर्थकारण

राजकारण हे नुसते सत्तास्पर्धेचे नसते. तर ते आर्थिक सत्तास्पर्धेचे देखील असते. त्यामुळे प्रत्येक राजकीय पक्ष राजकीय सत्तेबरोबर आर्थिक सत्तास्थानांवर वर्चस्व निर्माण करण्यासाठी धडपडत असतो. ज्या पक्षाला बहुमत मिळते त्या पक्षाचे सरकार बनते. त्यामुळे सर्व संपत्तीबाबत धोरण ठरविण्याचे काम सरकार करत असते. पैसा कोणत्या मार्गांनी उभा करावयाचा, तो विकासकामांवर कसा खर्च करावयाचा तसेच त्याचे नियोजन, व्यवस्थापन देखील कसे करावयाचे हे देखील सरकार ठरवत असते. व्यक्ती, समाज, बाजार, राज्य संस्था, राज्यकर्ते, राजकीय संस्था, शासन व्यवहार अशा विविध घटकांवर याचा दूरगामी परिणाम होतो. त्यामुळे राज्यसंस्थेचे आर्थिक धोरण हे राजकीय स्वरूप धारण करते. जॉन स्टुअर्ट मिल, ॲडम स्मिथ, कार्ल मार्क्स इत्यादी विचारवंतांनी राजकीय

अर्थकारणावर विचार मांडले आहेत. तर भारतामध्ये मनमोहन सिंग, अमर्त्य सेन, जगदीश भगवती, अरविंद पानगढिया यांनी राजकीय अर्थकारण विषयक भूमिका स्पष्ट केल्या आहेत.

☼ **अर्थ :-**

लोकशाही प्रक्रिया आणि उत्पादन शक्तींनी ठरवलेले आर्थिक संबंध यांमधील परस्पर-संबंधांचा अभ्यास राजकीय अर्थशास्त्रात केला जातो. राजकारण म्हणजे आर्थिक हितसंबंधाची सत्तास्पर्धा असते. त्या स्पर्धेमध्ये अर्थराजकीय प्रारूपे घडतात. उदा. कृषी औद्योगिक समाज, कृषीचे औद्योगिकीकरण, ग्रामीण भागाचे शहरीकरण, रियल इस्टेटचा समझोता अशी विविध प्रारूपे म्हणजेच राजकीय अर्थकारण होय. राजकीय अर्थकारण म्हणजे केवळ परस्परांवरील प्रभाव नव्हे, तर राजकीय घटक व आर्थिक घटक यांचे संयुक्तीकरण होय. त्यांचे हितसंबंध स्वतंत्र आणि स्वायत्त आहेत. शहरी भागात आणि ग्रामीण भागात नवीन उत्पादन शक्ती उदयास आल्या आहेत. रियल इस्टेटचा व्यवसाय मोठ्याा प्रमाणात फोफावला आहे. या रियल इस्टेटशी संबंधीत एक नवीन वर्ग उदयास आला आहे. या वर्गाशी संबंधित विविध सेवा व्यवसायांनी जुळवून घेतले आहे. रियल इस्टेटच्या अंतर्गत विविध व्यवसायांचे व्यवहार घडताना दिसतात (घर बांधकाम, रस्ते बांधणी, टोल, मंगल कार्यालय, मल्टीपर्पज हॉल, स्वच्छतेचे ठेकेदार, हार्ड वेअर, हॉटेल, दवाखाने, प्रशिक्षण केंद्रे, पाणी पुरवठा, झोपडपट्टी पुनर्वसन, गाळे इत्यादी) रियल इस्टेट ही एक साखळी आहे. या साखळीमध्ये आर्थिक हितसंबंध दडलेले आहेत. प्रतिनिधीत्व कोणाचे हा प्रश्न सामाजिकदृष्ट्या अदृश्य झाला आहे. त्या जागी आर्थिक हितसंबंधाचे प्रतिनिधीत्व हा मुद्दा राजकारणाच्या मध्यभागी दिसत आला आहे. ज्याच्याकडून राजकीय पक्षांना आर्थिक पुरवठा होऊ शकतो त्यालाच पक्षाची उमेदवारी मिळू शकते, अशी एक रूढ पद्धत आकारास येत आहे. त्यामुळे राजकीय अर्थकारण हा घटक महाराष्ट्राच्या राजकीय प्रक्रियेला कलाटणी देत आहे.

पश्चिम महाराष्ट्राच्या अर्थकारणाची ओळख म्हणजे सहकार होय. या सहकारातूनच अनेकांना रोजगार मिळाला, नवे नेतृत्व मिळाले, विकासाचे वारे वाहू लागले. राजकीय नेतृत्व सक्षम होवू लागले होते. पण १९९० नंतर खाजगीकरणाचा वेग झपाट्याने वाढल्याने सहकार क्षेत्राचा ऱ्हास होत आहे. म्हणजेच सहकारी साखर कारखाने, सहकारी दूध डेअरी, सहकारी भूविकास बँका यांची कुवत कमी झाली. त्या जागी बाजारपेठ केंद्रित नवीन अर्थव्यवस्था उभी राहिली. उदा. गणपती संघ (तासगाव), भारती उद्योग समूह (सांगली), लोकमंगल उद्योग समूह (सोलापूर) हे नवीन उद्योग उभे राहिले. नवीन उद्योग समूहांमधून संजयकाका पाटील, पतंगराव कदम, मोहनराव कदम, विश्वजीत कदम, सुभाष देशमुख असे नेतृत्व घडले. त्याचबरोबर या उद्योग समूहांच्या जोडीला खासगी साखर कारखाने सुरू आहेत. सहकारी साखर कारखाने बंद पडत आहेत. यामुळे पश्चिम महाराष्ट्राच्या

राजकारणाचे स्वरूप अर्थकारणामुळे बदलले. सहकारी क्षेत्रातील नेतृत्व आणि नवीन उद्योग व्यवस्थेतील नेतृत्व यांच्या अंतर्गत संघर्ष निर्माण झाला आहे. नवीन उत्पादनाची साधने जुन्या सहकारी उत्पादन साधनांचा पराभव करत आहेत.

अचल संपत्ती, मध्यस्थ, आर्थिक संस्था यांच्याशी राज्यसंस्था, नोकरदार, प्रशासन, कायदे, राज्यकर्ते, राजकीय पक्ष, मतदार वर्ग, स्वयंसेवी संस्था, प्रसार माध्यमे, इलेक्ट्रॉनिक माध्यमे किंवा सोशल मीडिया जुळवून घेत आहेत. यामधून आर्थिक व राजकीय संस्थांची एक आघाडी घडत आहे. या आघाडीचे खास वैशिष्टये म्हणजे आर्थिक व राजकीय सत्तेचे केंद्रीकरण होत आहे.

राजकीय अर्थकारणाची चार वैशिष्ट्ये समोर येतात, ती पुढीलप्रमाणे :-

१) राजकारण व आर्थिक प्रगती यामध्ये राजकारणाला प्रथम स्थान देण्यात येत आहे.

२) आर्थिक क्षेत्रातील व्यक्तींनी अर्थकारणाचे राजकीयीकरण केले आहे. भांडवलदार वर्ग किंवा आर्थिकदृष्ट्याा सक्षम वर्ग राजकारण आपल्या हाती घेत आहे.

३) राजकारणाचे आर्थिकदृष्ट्याा व्यावसायिकीकरण घडत आहे. म्हणजेच आर्थिकदृष्ट्या सक्षम उमेदवारांनाच राजकीय पक्षाकडून बळ मिळते.

४) जन आणि अभिजन यांच्यामधील अंतर कमी करण्याची राजकीय अर्थकारणाची दूरदृष्टी आक्रसली आहे. म्हणजेच सामान्य लोक आणि भांडवलदार, धनवान लोक यांच्यातील दरी वाढत गेली.

यामुळे जनतेचा रोष कमी करण्यासाठी सरकारने विमुद्रीकरणाचा निर्णय घेतला. विमुद्रीकरण हा सरकारचा राजकीय अर्थकारणाचा महत्त्वाचा भाग होता. नोटाबंदीचे चटके सर्व सामान्य गरीब, मध्यमवर्गीय, किरकोळ विक्रेते, रोजंदारी कामगार, भाजीवाले-फळवाले यांना बसले. शेतकऱ्यांना आपला माल मातीमोल भावाने विकावा लागला. बँकांपुढे, एटीएमपुढे रांगा होत्या. पण हा राजकीय अर्थकारणाचा मुद्दा सरकारने राष्ट्रवादाशी जोडला. विमुद्रीकरण हे भ्रष्टाचार, दहशतवाद आणि श्रीमंतांच्या विरोधातील चळवळ आहे असे सांगून सरकारने राष्ट्रवाद निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

राजकीय अर्थकारणाशी सोशल मीडिया देखील प्रभावी ठरत आहे. कारण आधुनिक काळात टेक्नोलॉजी समाजाची निर्मिती या सोशल मीडियामुळे निर्माण झाली आहे. याने भारतातील मोठा अवकाश व्यापला आहे. भारतात फोन व स्मार्ट फोन वापरणाऱ्यांची संख्या अधिक आहे. फेसबुक व व्हाटसअ‍ॅप जवळपास सर्वच लोक वापरतात. त्यामुळे राजकीय पक्षांनी देखील या वास्तवाची दखल घेण्यास सुरूवात केली. सोशल मीडियामुळे लोकांच्या वर्तनातील फेरबदल समजुन येतात. शहर, गाव,

वाडी-वस्ती, घर आणि प्रत्येक मतदारापर्यंत संपर्काचे, प्रचाराचे, लोकांना संघटीत करण्याचे साधन सोशल मीडिया झाले आहे. त्यामुळे राजकीय पक्षांचे प्रचाराचे कार्य सोपे झाले आहे. राजकीय पक्षांचे माहिती तंत्रज्ञान सेल हे माहिती तंत्रज्ञान कंपनी सारखे काम करू लागले आहेत. यामुळे बेरोजगार युवकांना रोजगार उपलब्ध झाले आहेत. यामध्ये तंत्रज्ञ, कल्पक रचनाकार, व्यंगचित्रकार यांना विशेष स्थान आहे. एका दिवसाला तीनशे रूपयापासून ते लाखो रूपये मिळविण्याची संधी या युवकांना मिळत आहे. राजकीय पक्ष आणि सोशल मीडिया चळवळीतील कार्यकर्ते यांचे संबंध सार्वजनिक मूल्य निर्मिती, सार्वजनिक हित आणि कल्याण यापेक्षा व्यक्तीगत स्वरूपाचे व व्यावसायिक जास्त झाले आहेत. सोशल मीडिया आणि राजकारण यांच्यामध्ये राजकीय देवाणघेवाणीचे संबंध निर्माण झाले आहेत. म्हणजेच येथे अर्थराजकीय घडामोडी घडताना दिसतात.

*** स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-४ ***

१. वैज्ञानिक व औद्योगिक संशोधन संस्थेची स्थापना कोणत्या वर्षी झाली?

२. भारतामध्ये राजकीय अर्थकारणविषयक भूमिका कोणी स्पष्ट केल्या आहेत?

## ४.५ सारांश

नव्वदीच्या दशकात 'खाऊजा' धोरण स्वीकारल्यानंतर भारतीय अर्थव्यवस्थेत मोठ्या प्रमाणात बदल झाले. मिश्र अर्थव्यवस्थेच्या माध्यमातून भारतीय अर्थव्यवस्था मजबूत करण्यासाठी प्रयत्न केले गेले. शासनाला सामाजिक सुरक्षितता, अर्थव्यवस्थेवर नियंत्रण, समान विरणाची व्यवस्था अशा सर्व बाबींवर काम करावे लागते. सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक अशा सर्वच बाबतीत कल्याणकारी योजनांच्या माध्यमातून शासनाद्वारे दुर्लक्षित घटकांना न्याय दिला जावा ही अपेक्षा असते. सध्याच्या काळात निवडणुकीय राजकारण म्हणजे सत्ताकारण असा एक चर्चाविश्वाचा भाग बनलेला आहे. त्यामुळे राजकारण करताना विज्ञान, तंत्रज्ञान आणि अर्थकारण यांचा समन्वय निर्माण झाला तर सत्ता प्राप्त करणे सोपे आहे.

## ४.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१. **मिश्र अर्थव्यवस्था** : समाजवादी आणि उदारमतवादी अर्थव्यवस्थांमध्ये समन्वय साधणारी अर्थव्यवस्था म्हणजे मिश्र अर्थव्यवस्था. यामध्ये खाजगी व सार्वजनिक क्षेत्राचे सहअस्तित्व असते.

२. **सार्वजनिक क्षेत्र** : सरकारच्या मालकीचे उद्योगधंदे

३. **संयुक्त क्षेत्र** : उद्योग-व्यवसायांवर सरकार तसेच खाजगी व्यक्ती किंवा व्यक्तीसमुहाची

संयुक्त मालकी.

४. **उदारीकरण** : खुली व मुक्त अर्थव्यवस्था.

५. **खाजगीकरण** : उद्योग-व्यवसायांवर खाजगी व्यक्ती किंवा व्यक्तीसमुहाची मालकी.

६. **जागतिकीकरण** : देशाच्या सीमेबाहेर व्यापार व आर्थिक व्यवहारांचा विस्तार.

७. **राजकोष** : सरकारी खजिना.

८. **पुनर्वितरण** : पुन्हा पुन्हा वितरण करणे.

९. **राजकीय अर्थकारण** : आर्थिक हितसंबंधासाठी राजकीय सत्तास्पर्धा.

## ४.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

### ❑ स्वयं-अध्ययन प्रश्न-१ ची उत्तरे

१. भांडवलशाही आणि समाजवाद या दोन्ही अर्थप्रणालीमधील दोष टाळून चांगल्या गुणांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न करणाऱ्या अर्थव्यवस्थेला 'मिश्र अर्थव्यवस्था' असे म्हणतात.

२. मिश्र अर्थव्यवस्थेत सार्वजनिक (सरकारी) व खाजगी क्षेत्राचे सहअस्तित्व पहायला मिळते.

### ❑ स्वयं-अध्ययन प्रश्न-२ ची उत्तरे

१. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने बर्नार्ड बेल यांना भारतात पाठवून आर्थिक सुधारणांबाबत अहवाल तयार करण्याचे निर्देश दिले होते.

२. वस्तू आणि सेवा यांचा व्यापार आणि गुंतवणूक याबाबत अनेक आंतरराष्ट्रीय करार अस्तित्वात आले, त्यामुळे खुली बाजारपेठ निर्माण झाली.

### ❑ स्वयं-अध्ययन प्रश्न-३ ची उत्तरे

१. भारतीय समाजातील असमानता ही बलुतेदारी व अलुतेदारी पद्धतीतील उत्पन्न व दर्जानुसार झालेली दिसते.

२. सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत सरकार पुनर्वितरण घडवून आणते.

### ❑ स्वयं-अध्ययन प्रश्न-४ ची उत्तरे

१. वैज्ञानिक व औद्योगिक संशोधन संस्थेची स्थापना १९४२ साली झाली.

२. भारतामध्ये मनमोहन सिंग, अमर्त्य सेन, जगदीश भगवती, अरविंद पानगढिया यांनी राजकीय अर्थकारण विषयक भूमिका स्पष्ट केल्या आहेत.

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय

१. मिश्र अर्थव्यवस्थेची क्षेत्रे स्पष्ट करा.

२. आर्थिक सुधारणा हाती घेण्याची कारणे सांगा.

३. उदारीकरणाची व्याप्ती स्पष्ट करा.

४. खाजगीकरणाचे परिणाम स्पष्ट करा.

५. जागतिकीकरणाचे फायदे तोटे सांगा.

६. जागतिकीकरणाची वैशिष्ट्यो सांगा.

७. भारतातील असमानता स्पष्ट करा.

८. तंत्रज्ञानाचा राजकीय अर्थकारणावरील प्रभाव स्पष्ट करा.

## ४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


१. **खेर, सी.पं.** (२००२) : *''जागतिकीकरण: समस्या, आशय आणि अनुभव''*, दिलीपराज प्रकाशन, पुणे.

२. **गोविलकर विनायक** (२००८) : *'आर्थिक संकल्पना'*, डायमंड पब्लिकेशन, पुणे.

३. **जोशी, बी.आर.** (२००७) : *'सामाजिक शास्त्रातील संज्ञा सिद्धांताचा कोश राज्यशास्त्र'*, डायमंड पब्लिकेशन, पुणे.

४. **जोशी, बी.आर.** (२०१५) : *'अर्थशास्त्र संज्ञा कोश'*, सुनिधी पब्लिशर्स, पुणे.

५. **दत्त गौरव, अश्विनी महाजन** (२०१५) : *'भारतीय अर्थव्यवस्था'*, एस.चन्द.एन्ड कंपनी, नई दिल्ली.

६. **देशमुख चिंतामणी** (२००६) : *'भारताचे विज्ञान धोरण, शतकांतराच्या वळणावर'*, भोळे भा. ल. व किशोर बेडकिहाळ (संपा.), आंबेडकर अकादमी, सातारा.

७. **पवार प्रकाश** : (५ नोव्हेंबर, २०१७) *'राजकीय अर्थकारणाचा नवा अन्वयार्थ'*, लोकसत्ता.

८. **पवार प्रकाश** (संपा.) (२०१७) : *'राजकीय अर्थकारण'*, डायमंड पब्लिकेशन, पुणे.

९. **पवार प्रकाश** (२८ ऑक्टोबर २०१८) : *'व्यवस्थापन केंद्रीत राजकारण'*, सकाळ–सप्तरंग.

१०. **पवार प्रकाश** (११ फेब्रु.२०१९) : *'तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील सत्तासंघर्ष'*, सकाळ साप्ताहिक.

११. **पाटील जे. एफ.** (२०११) : *'सार्वजनिक अर्थकारण'*, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

१२. **पुजारी, आ. गो.** (२०१७) : *'मराठी अर्थशास्त्र परिषद अध्यक्षीय भाषणे'*, तेजस प्रकाशन, कोल्हापूर.

❑❑❑